म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. ५६९०

IRBK-0105640
IRBK-0105640

9 SEP 1971

3 OCT 1971

1 DEC 1972

21 MAR 1973

5 APR 1973

IRBK-0105640

IRBK-0105640

२—०

..... गणेश जोशी २—०

.आर-ग. खं. पवार १—४

...भळवनांत-शामराव ओक २—०

५ चित्ररेखा-सुशिला शिंदे २—०

६ पूर्वा-वि. द. चिंदरकर २—०

७ पुष्पपराग-कु. कुमुदिनी प्रभावळकर २—

८ चाळींतील चाळे-बा. वा. फाटक २—०

९ गाळीव रत्नें-अनंत अंतरकर २—०

१० चोरटे हल्ले-अनंत अंतरकर १—८

११ चौपाटीवर-डॉ. बाळिंबे २—०

१२ मनोरे-शशिकला आळंदकर १—४

१३ उंबराची फुलें—ह. वि. देसाई १—०

१४ राजकीय सत्यकथा—शरच्चंद्र गुण्ये १—४

## इतर

१ आमच्या देशाचे दर्शन-काका कालेलकर १—[illegible]

२ पितापुत्रसंबंध—य. रा. दाते ४—[illegible]

३ मित्रहो—प्रो. फडके १—

४ माझीं गाणीं-जी. एन्. जोशी १—

५ माझे आवडते लेखक ग. त्र्यं. माडखोलकर

६ उद्याचें जग-श्री. रा. पोतनीस

७ भडकत्या ज्वाला-श्री. रा. पोतनीस

८ साम्राज्य व स्वराज्य-दा. न. शिखरे

९ झाशीची राणी-वि. वा. हडप २—

१० साहित्य आणि साहित्यीक-ह. वि. देसाई १—

| | |
|---|---|
| ११ जळतें शरीर– ह. वि. देसाई | १—८ |
| १२ तारांबळ–वि. वि. बोकील | १—४ |
| १३ पूजा–सहृदय | ०–१० |
| १४ सोन्याची माती–सहृदय | २—० |
| १५ जळतीं घरें–व्यंकटेश वकील | ०–१२ |
| १६ कलाकौस्तुभ–सरमळकर | ०–१२ |
| १७ हवन–सहस्रबुद्धे | ०—६ |
| १८ आजचें स्वराज्य–वा. वि. जोशी | ०—६ |
| १९ मराठी लेखसंग्रह—ओडूलमने | १–१२ |
| २० फडक्यांच्या शब्दांत फडकें | १—४ |
| २१ उद्योगांतून उत्कर्ष–य. रा. दाते | ०—८ |
| २२ आपली पृथ्वी–वि. वा. हडप | ३—० |
| २३ दैवी सिद्धांत–भालचंद्र शिंदे | ३—० |

# गांधी साहित्य प्रकाशन

| | |
|---|---|
| १] अखंड भारत– महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, मौ. आझाद यांचे स्फूर्तिदायक विचार. | १–८ |
| २] अहिंसा दर्शन– महात्मा गांधींचे अहिंसेवरील कांहीं निवडक लेख. | १–८ |
| ३] गांधी वादावरील आक्षेप व त्याचीं उत्तरें. | १–८ |

# नवीन बाल वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| १] जादूचा घोडा– | ताराबाई मोडक | ०–४ |
| २] सवाई विक्रम– | ,, ,, | ०–५ |
| ३] गंपूदादांचा लाकडदंड्या– | ,, ,, | ०–५ |
| ४] विक्रमाची साडेसाती– | ,, ,, | ०–५ |
| ५] गारांचा पाउस– | शं. रा. देवळे | ०–४ |
| ६] वानरांची सर्कस– | वसंत वैद्य | ०–४ |

# आगामी प्रकाशन

**झुंज**—ना. के. महाजन यांची प्रणय व राजकारण यांच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली एक नाविन्यपूर्ण कादंबरी
किंमत ६ रुपये.

**शाप**—ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या सुप्रसिद्ध कादंबरीचें पुनर्मुद्रण.

**उलाढाली**—राजरत्न वा. वि. जोशी यांचा विनोदी कथासंग्रह.

**देशाचे दर्शन** भाग २ रा-काका कालेलकर यांचे प्रवासवर्णनात्मक पुस्तकाचा द्वितीय खंड.

**एक होता राजा**—कमला फडके.

म. ग्रं.
दा. क्र. ५६४०
वि. वा. ना.

# १

आनंद ! चोहोंकडे आनंदी आनंद ! !

आज का दिवाळी आहे ? आज का दसरा आहे ! आज का कोणा मोठ्या राजाचें लग्न आहे ? आज हा आनंद कशासाठीं ?

तें पहा—घरोघर तोरणें उभारलीं आहेत. घरें सजवलीं आहेत. स्त्रिया मुलांना मंगल स्नानें घालत आहेत, पुरुष स्त्रिया मुलें, नवीन नवीन कपडे, अलंकार घालत आहेत. रस्ते, फुलांच्या माळा, तोरणें ह्यांनीं भरून गेले आहेत. दारोदार चौघडे वाजत आहेत. मुलें नाचत आहेत, पुरुष नाचत आहेत, स्त्रिया नाचत आहेत, एकमेकांना भेटत आहेत. तें पहा—रस्ते माणसांनीं भरून गेले आहेत. मिरवणुका निघत आहेत. सर्वांच्यापुढें चौघडे वाजत आहेत. मागें लेजीम मंडळी, त्याच्यामागें भजन मंडळी. सारे आनंदानें बेहोष झाल्यासारखे दिसत आहेत. त्या पहा मेवामिठाईच्या टोपल्या चालल्या. तीं पहा देवळें. गजर चालला आहे. तीं पहा दुकानें. दुकानदारांनीं दुकानें सजवलीं आहेत. व्हिक्टोरिया सजवली आहे. मोटरवाल्यानें मोटर सजवली आहे. खटारेवाल्यानें बैलांना सजवलें आहे, खटारा सजवला आहे. आगगाड्या सुद्धां सजवल्या आहेत. स्टेशनें—केळी, झाडें, तोरणें यांनीं सजवलीं आहेत. सर्वत्र रोषणाई चालली आहे. कोणी दुःखी दिसत नाहीं. तें पहा तिकडे कितीतरी भिकारी चालले. तें पहा भिकारी अन्नवस्त्र घेऊन आनंदानें परतले. किती मोठा दानधर्म हा. किती मोठा उत्साह हा ?

स्त्रिया पुरुष मुलें घराबाहेर पडलीं. एकमेकांना भेटायला निघालीं. एकमेकांकडे मिठाई चालली. आणि तें पहा–एका घरावर हवेंत उंच उंच निशाण फडफडतें आहे–हिंदुस्थानाचा तिरंगी झेंडा फडफडतो आहे. सारे त्याला नमस्कार करत आहेत. तो पहा झेंडा उंच उंच चालला. चौघडा वाजूं लागला. बँड वाजूं लागले. तो बघ आवाज आला. महात्मा गांधी की जय ! जवाहरलाल नेहरु कीं जय ! आझाद हिंद झिंदाबाद आणि हें काय ? जिकडे तिकडे तिरंगी झेंडे. प्रत्येक घरांत, दुकानांत तिरंगी झेंडा. किती प्रभावी दृश्य ! किती आल्हाददायक दृश्य ! तें काय ! गांधींचा फोटो. त्याची पूजा. त्याची मिरवणूक. अबब केवढी मिरवणूक ही ! ते पहा लोक ओरडतात. महात्मा गांधींकी जय ! आझाद हिंद की जय. स्वतंत्र भारताचा जय होवो !"

काय भारत स्वतंत्र झाला ? स्वतंत्र भारत ! आहा ! हिंदुस्थान स्वतंत्र झाला ! हिंदुस्थान गुलामगिरींतून मुक्त झाला. जगांमध्यें हिंदुस्थानला मानाचें स्थान मिळालें म्हणूनच हा सोहळा चालला आहे. ही रोषणाई चालली आहे, हें उत्साहपूर्ण वातावरण सर्वत्र पसरलें आहे. करा, मजा करा ! आजचा हा भाग्याचा दिवस आहे. आणखी घरें सजवा. चौघडे वाजवा. देवळांत गजर करा. पुन्हा हा भाग्याचा दिवस यायचा नाहीं. ह्याच्या पुढें दसरा फिका आहे. दिवाळी फिकी आहे. गा, नाचा, मजा करा. हिंदुस्थानचा तिरंगी झेंडा उंच उंच फडफडवा. ह्या नवाहिंद राष्ट्रझेंड्याला प्रणाम करा ! बोला स्वतंत्र हिंदुस्थान की जय ! तो पहा पुन्हां एकदां देवळांत गजर झाला—

ह्या गजरानें आनंद जागा झाला. देवळांत सकाळचा गजर चालला होता. "म्हणजे हें स्वप्नच तर !" त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले. तो हात जोडून म्हणाला, "देवा ! माझ्या भारताला हे दिवस कधीं येतील ?"

तो उठला. बिछाना कवळून ठेवून झोंपडीच्या बाहेर आला. नुकतेंच झुंजुमुंजु होत होतें. तोंड धुवून तो व्यायाम करूं लागला. पण आज त्याचें व्यायामाकडे लक्ष लागेना. त्याच्या मनांत सारखें तें स्वतंत्र हिंदुस्थानचें चित्र उभें रहात होतें. पहांटे पडलेलीं स्वप्नें खरीं होतात म्हणतात. हें स्वप्न केंव्हां खरें होईल ?

स्नानादि विधी आटपून तो आपल्या नेहमींच्या जागीं आला. बरोबर आणलेलें हरणाचें चामडें जमिनीवर अंथरलें आणि त्यावर तो ध्यानस्थ बसला.

निळेभोर आकाश! त्याच्या पार्श्वभूमीवरील ती बाग शोभून दिसत होती. नुकतींच फुलें फुललीं होतीं. त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळला होता. पक्षी नाचत होते, गात होते. सारें वातावरण शांत आणि उत्साहजन्य दिसत होतें. अशावेळीं आनंद बागेंतील त्या झोंपडीच्या ओटीवर ध्यानस्थ बसला होता. त्याच्या शरिराची हालचाल मुळींच होत नव्हती. सभोंवतालच्या वातावरणाच्या पार्श्वभूमीसुळें तो जास्तच शोभून दिसत होता. एखाद्या ऋषीसारखा दिसत होता. त्याचें वय कांहीं फारसें नव्हतें. फारफार तर अठ्ठावीस! एवढ्या तरुण वयांत हें मोठें कठिण व्रत त्यानें कां आचरलें होतें. ?

ते पहा लोक उठले. आपापल्या कामाला लागले. ते पहा त्याच्याकडे किती आदरबुद्धीनें पाहतात! किती भाविकपणें त्याला नमस्कार करतात. तो पहा आनंद उठला. किती शांत, गंभीर आणि तेजस्वी दिसतो त्याचा चेहरा. त्यानें संन्यास कां घेतला आहे ?

लोकांचे नमस्कार घेत, आनंद झोपडींतून बाहेर पडला. एवढ्या सकाळीं कुठें चालला तो ? शांतपणानें चालतो आहे. चालण्यांत घाई, आणि आळशी-पणा मुळींच नाहीं. ऐटदारपणा नाहीं. अगदीं साधी चाल. आणि हें काय ? हा तर आश्रम दिसतो. तो पहा आनंद आश्रमांत शिरला.

त्याला पाहून सारे शांत झाले. त्यांचें हंसणें बोलणें बंद झालें. त्यांनीं त्याला नमस्कार केला. उलट त्यानेंही त्याला नमस्कार केला. सारे इकडे तिकडे न बघतां आपापल्या कामास लागले. जिकडे तिकडे शांत वातावरण पसरलें. कोणी कोणाशीं कारणाशिवाय बोलत नाहीं, कोणाकडे बघत नाहीं. सारें चोख चाललें आहे. पण हें काय ?

हा लहान बालक कोणाचा ? तो मुलगा तर त्याला ओढूं लागला. म्हणतो आहे. "चला ना दादा!"

"अरे कुठें ?"

"आईनें बोलावलें आहे तुम्हांला ?"

"येतो म्हणून सांग जा!"

" नाहीं. आतांच बोलावलें आहे, चला ना ! "

" बरें चल ! " असें म्हणून त्यानें त्याला उचलला आणि तेथून तो बाहेर पडला.

आश्रमाच्या शेजारीं एक लहानशीच झोपडी होती. त्यांत तो शिरला, तो मुलगा " आई आई म्हणून ओरडला ! "

" काय रे यतीन् ! " म्हणत एक तरुण स्त्री बाहेर आली. वय असावें साधारण पंचविस. दिसायला होती दहा जणी सारखीच ! तिचें नांव होतें शांता. आनंदला पाहतांच ती म्हणाली, आलात तुम्हीं ! मला वाटलें, चारपांचदां बोलावणीं पाठवावीं तेव्हां कुठें स्वारी इथें पोहोंचेल ! "

" पण हा चोर सोडेल तर ना ? " असें म्हणून त्यानें यतीन्‌च्या गालांवर एक चापट मारली आणि त्याला खालीं ठेवलें. खालीं ठेवतांच तो आईला जाऊन बिलगला. त्याला जवळ ओढून ती स्त्री म्हणाली, " कायरे लबाडा ! आतांच बोलवायला सांगितलं होतं ? "

" बरं जाऊं दे आई ! कां बोलावलं तें सांग ना ! " आनंदनें विचारलें.

" आजचा दिवस माहित आहे ना तुम्हाला ? "

" हो आज वडिलांना जाऊन दोन वर्षें झालीं ! "

" त्यांच्या नावानं ब्राम्हणांना कांहीं देईन म्हणतें. तुमचें काय मत आहे ! "

" आई मी का तुझ्या विरुद्ध जाणार आहे ? ह्यांत मला तें काय विचारायचं ! "

" पण विचारलेलें बरें. तुम्हांला विचारल्याशिवाय कसें करूं मी ? "

" इतर जरी मला मान देतात, मला विचारल्याशिवाय कांहीं करत नाहींत तरी तूं तसें करावें असें मला मुळींच वाटत नाहीं. किती झालें तरी मी तुझा मुलगा ! "

" हो फक्त नांवाला. बाकी तुमच्यांत आणि माझ्या वयांत अंतर किती ? "

आनंदाला तिचं हें म्हणणं आवडलें नसावें; किंवा त्याला असल्या बोलण्यांत वेळ घालवावयाचा नसावा. तो म्हणाला, " जाऊं दे तें. मी करतों ब्राह्मणांची व्यवस्था ! "

असें म्हणून तो बाहेर पडला.

" जा आंत घेऊन ये त्यांना."

तो वृद्ध बाहेर गेला. आनंद विचारांत पडला. एवढ्या सकाळीं कोण बरं असावीं हीं. इतक्यांत म्हादबा पाहुण्यांना घेऊन आंत आला. आनंदला त्यांना पाहून आश्चर्य वाटलें, आनंद झाला. आपल्या जागेवरून उठून तो म्हणाला, " ये ये जीवन, अरे किती दिवसांनीं भेटलास तूं ! "

दोघे एकमेकांना भेटले, कडकडून भेटले. फारा दिवसांनीं दोन मित्र भेटलेले. जीवन म्हणाला. " आनंद तूं तर संन्याशी बनलास कीं रे ! "

" आनंद उत्तरादाखल हसला. जीवन पुन्हां हंसत म्हणाला, "मला वाटलें होतें तूं एक भगवी कफनी घातलेला, डोक्याला भस्म फासलेला असा आढळशील. खरोखर मी बावरलों होतों. आतां कुठें जिवांत जीव आला माझ्या."

आनंद हंसला. इतर मात्र त्याच्याकडे आश्चर्यानें पहात होते. त्यांना आश्चर्य वाटत होतें. हा कोण कुठचा एकाएकीं येतो. आपल्याला पूज्य वाटणाऱ्याला एकेरी संबोधतो, त्याची मस्करी करतो. पण त्यांना काय माहीत, त्यांना जरी तो मोठा होता तरी तो त्या पाहुण्याचा लंगोटीयार होता.

जीवनच्या आगमनानें आनंदला आनंद झाल्याचें स्पष्ट दिसत होतें. दोघें एकमेकांची विचारपूस करीत होते, इतक्यांत आनंदला आठवण झाली, जीवन बरोबर आलेल्या स्त्रीस आपण विसरलों आहोंत, त्यानें जीवनकडे पहात विचारलें, " अरे पण ह्यांची ओळख करून दिली नाहींस ! "

" अरे ओळख करून काय देणार ? तुझी वहिनी आहे एवढें सुद्धां तुला ओळखतां येत नाहीं ! "

आनंदानें हंसत तिला नमस्कार केला. " बरं चला. आधीं कपडे वगैरे बदला. प्रवासांतून आलेले आहांत तुम्हीं. अरे पण हो सकाळीं कुठची गाडी मिळाली तुम्हांला."

" ती एक मोठी गोष्टच होईल " जीवन म्हणाला. " काल रात्रीं आठच्या सुमारास पोहोंचलों इथं. चौकशीअंतीं कळलें कीं, तुझें हें रामपूर कां सीतापूर हा बारा मैल लांब आहे. मोटर तर नाहीं. चालत जाऊं म्हटलें तर ह्या गामच्या राणीसाहेब मटकन खालीं बसल्या. बैलगाडी सुद्धां मिळेना. मग

करणार काय ! स्टेशनावरच काढली रात्र कशीबशी. मनाशी दोनचार शिव्या सुद्धां दिल्या तुला. म्हटलें सगळें सोडून हें कुठचें खेडें शोधून काढलेंस. रात्रभर झोप तर आली नाहींच. पहांटे मोठ्या प्रयासानें बैलगाडी मिळवली. आणि मग आमची स्वारी निघाली एकदां. आतां मात्र मनाशीं मी निश्चय केला आहे कीं, प्रवासांत बायकांना बरोबर घ्यायचें नाहीं. आधींच आयुष्याचा प्रवास संपवतां नाकीं नव येतात ह्यांच्याबरोबर. त्यांत ह्या प्रवासाची आणि जोड नको. अरे रात्रीं झोपायला सुद्धां दिलें नाहीं हिनें मला. जरा डोळा लागायचा अवकाश कीं, झालें लागली लगेच हात ओढायला. म्हटलें जरा झोपूं दे तर म्हणते, मला भिती वाटते. मग काय बसलों रात्रभर तिला सांभाळीत. करणार काय कोणी चोरून नेली तर...!"

आनंदला त्याचे हें बोलणें आवडलें नसावें. कारण तो मध्येंच म्हणाला, बरें. आतां चला "मग बोलूं आपण. तुमचें सामान वगैरे कांहीं आहे !"

"आहे तर ! संन्याशाकडे यायचें आणि तें आमच्या सारख्यांनीं मग काय, कांहीं न घेतां थोडेंच येणार ! नाहीं तर आमच्यावरच संन्याशी बनण्याची पाळी यायची !"

"म्हादबा, ह्यांचें सामान त्या चार नंबरच्या झोंपडींत घेऊन ये आणि हें बघ दूध तयार ठेवायला सांग !"

"काय दूध !"

"होय चहा नाहीं मिळायचा तुम्हांला इथं !"

"मग आम्हांला संध्याकाळींच जावें लागेल कीं !"

"बरें तें बघतां येईल. आधीं चला तर !"

"करतों काय चला !"

"आनंद इतरांना उद्देशून म्हणाला, "तुम्ही आपल्या कामास लागा. मी येतोंच. नाहीं तर तुमचें काम झाल्यावर तुम्ही चला !"

आनंद, जीवन आणि कमल आश्रमांतून बाहेर पडलीं.

* * * *

सदा गंभीर असणारा आनंदचा चेहरा आज आनंदी दिसत होता. चार वर्षांपूर्वीच्या किती तरी आनंदकारक आठवणी त्याला आठवत होत्या. पुष्कळ वेळां ते भांडत असत पण दुसऱ्या दिवशीं ते भांडणें विसरून एक होत.

पुन्हां भांडण पुन्हा एक होत असें त्यांचें अखण्ड चाललें होतें. दिवसाचा बहुतेक वेळ त्यांचा एकत्र जाई. त्या गोड स्मृती आठवून त्याला आपण त्याच काळांत वावरत असल्याचा भास झाला.

जीवनचे आईबाप मुंबईंत रहात होते. आनंद मात्र शिक्षणासाठीं मुंबईस राहिला होता. जीवनचे आईबाप प्रेमळ असल्यामुळें त्याला ते जीवन सारखीच मानीत. सणावारीं किंवा असेंच कांहीं असलें कीं, आनंद त्यांच्याकडे असायचाच. जीवनचे आईबाप फारसे श्रीमंत नव्हते. तरी त्यांचें सारें समाधान-कारक चाललें होतें. जीवन त्यांचा एकुलता एक मुलगा. त्यामुळें त्यांचा सारा जीव त्याच्यावर होता. त्यामुळेंच जीवनला आपली इच्छा दडपून टाकावी लागली. आनंदाचा मार्ग त्याला अवलंबन करतां आला नाहीं. त्याबद्दल आनंदला कांहीं वाईट वाटलें नाहीं.

आज चार वर्षांनीं त्यांची भेट झाली होती. चार वर्षांत आनंदाला आपलें असें कोणींच भेटलें नव्हतें. एकेकाळीं त्याचे मित्र किती होते पण आज त्याला एकच मित्र भेटला. साऱ्या स्फूर्ति एकदम जागृत झाल्या. त्यांतून आणखी एक स्मृति जागृत झाली. पण ती आठवण होते न होते तोंच त्याचा चेहरा गंभीर झाला. त्यानें त्या आठवणी सोडून दिल्या आणि तो जीवनला भेटण्यासाठीं आला.

जीवनला रहायला देणाऱ्या झोंपडींत आनंद शिरणार तोंच त्याला एक आठवण झाली. तसाच मागें जाऊन त्यानें म्हादबाला भिकंभटजीला बोलावून आणायास सांगितलें आणि तो झोंपडींत आला.

जीवन आणि कमल एकाच खाटेवर बसून बोलत होतीं. आनंदला तें कसेसेंच वाटलें. तो परत जाणार होता इतक्यांत जीवननें त्याला पाहून म्हटलें, " अरे चाललास "

" होय. येईन मग ! "

" वा ! तें कांहीं नाहीं चालायचें. असें म्हणून तो उठला आणि त्याचा हात धरून त्याला खाटेवर आणून बसवला. एका बाजूला कमल आणि एका बाजूला जीवन. आनंदची कोंडून ठेवल्यासारखी स्थिती झाली. तो मान खालीं घालून गप्प राहिला. त्याचा चेहरा मात्र जास्त गंभीर झाला.

त्याला पाहून जीवन म्हणाला, " आनंद तूं लाजतोस फार बुवा ! "

" मी आणि लाजणार ! "

" नाहीं तर काय ? मी आणि कमल बोलत असतांना तुला इथं यायला कसली हरकत आहे. ती कांहीं परकी नाहीं तुला. काय समजलं ! "

" होय ! मला इथं कोणीच परकी नाहीं, सारीं समान आहेत. समानता हाच मुख्य धर्म आहे ! "

"आं ! आं ! आं ! हे पहा आनंद, हें असलें कांहीं अगडंब बगडंब बोलूं नकोस. मला त्याची फार भिती वाटते. तुला जर असलें कांहीं बोलायचें असेल तर ही बघ तुझ्या शेजारीच बसली आहे. पाहिजे तेवढें बोल. तिची तयारी आहे. कधीं कधीं असा कंटाळा आणते मला कीं, वाटतें जावें घर सोडून "

" मग जात कां नाहीं " कमल हंसत म्हणाली, " कोणी अडवून ठेवलें आहे तुम्हांला. काय जायची बिषाद आहे तुमची ? नुसती तोंडाची बडबड ! "

" बघितलेंस ना आनंद ? जास्त काय बोलणार हिच्यापुढें ! " जीवन म्हणाला.

आनंद तो विषय बदलण्यासाठीं म्हणाला, " आई आणि बाबा कशीं आहेत ! "

" तुझी सारखीं आठवण काढतात. तुझा हा उद्योग पाहून त्यांना फार वाईट वाटलें. म्हणतात चांगला हुशार मुलगा. एकदम सर्वांचा त्याग करून संन्यास घेऊन बसला. कसलें वेड लागलें कुणास ठाऊक ! "

" कोणी सांगितलें त्यांना मी संन्यास घेतला म्हणून ? सर्वांचा त्याग केला म्हणून ? मी कशाचाही त्याग केला नाहीं आणि संन्यास तर घेतलाच नाहीं ! "

" अरे पण तुझ्या ह्या कृतीवरून दिसतेंच आहे कीं, आतां हेंच बघ. ही झोंपडी !

" काय झालं झोंपडींत राहिलें म्हणून. मोठ्या बंगल्यांत राहिलं म्हणून काय माणूस माणूसच रहातो आणि झोंपडींत राहिला म्हणून काय माणूस माणूस रहात नाहीं ? लोकांना समजत नाहीं तें हेंच. आपला बहुजनसमाज आज सात लाख खेड्यांत रहातो. त्यांना ह्या असल्या झोंपड्यांतच रहावें लागतें. ते

जन्मतात ह्याच झोपड्यांत, मरतात सुद्धां ह्याच झोपड्यांत. मग आम्हालाच कां लाज वाटावी? आम्ही कोण मोठे लागून गेलों आहोंत!"

"कबूल. मला ह्या बाबतींत मुळींच बोलायचें नाहीं. मी आलों आहे विश्रांति घ्यायला. भांडायला नाहीं!"

"ह्यांत भांडण तें कसलें आलें आहे?" कमलनें विचारलें, "स्वतःला कांहीं समजत नाहीं. आणि दुसरें सांगतात तें ऐकायला नको!"

"तूं मोठी पण्डिता आहेस हें कबूल आहे मला. चूकून तुझें लग्न माझ्याशीं झालें. ह्या संन्याशी बुवाशीं झालें असतें तर छान जोडा जमला असता!"

"आनंदनें चमकून जीवनकडे आणि नंतर कमलकडे पाहिलें आणि गंभीर चेहरा करून तो म्हणाला, "आणि काय म्हणत होती आई आणि बाबा!"

"तुला पाहण्याची त्यांना फार इच्छा झाली आहे!" जीवन म्हणाला.

"तुम्हांला येतांना बरोबर आणायला सांगितलें आहे! याल ना!" कमल म्हणाली.

"मला हें खेडें सोडून कुठेंही जातां येत नाहीं. नाहींतर आलों असतों. मला सुद्धां त्यांना पहावें असें फार फार वाटतें!"

"मग तुम्ही आलेंच पाहिजे!" कमल एकदम त्याचा हात धरून म्हणाली,

आनंदला तिचें हें वागणें मुळींच आवडलें नाहीं. तरी पण तो शांतपणानें म्हणाला, "माणसाला सर्वांपेक्षां कर्तव्य प्रिय असतें!"

"पण कर्तव्य बजावतांना आपल्या सुखाचा त्याग करावा असें कुठें सांगितलें आहे!" कमलनें विचारलें.

"स्वतःच्या सुखाची इच्छा करणाऱ्याला दुसऱ्यासाठीं कसें झटतां येईल? दुसऱ्यासाठीं झटायचें असेल तर त्यानें आपलें सुखदुःख बाजूलाच सारलें पाहिजे!"

दुसऱ्यांना सुखी करण्यासाठीं आपण स्वतः सुखी असलें पाहिजे तरच त्याला दुसऱ्याचें दुःख नाहींसें करतां येईल. स्वतः दुःखी असून दुसऱ्याच्या सुखासाठीं त्याला मनापासून झटतां येणार नाहीं. जो स्वतःला सुखी करूं शकत नाहीं तो दुसऱ्यांना काय सुखी करणार!"

" ज्याला खरोखरच आपल्या देशाचा अभिमान आहे, दुसऱ्याच्या सुखासाठीं झटावेसें वाटतें तो आपल्या स्वतःच्या सुखाचीं मुळींच पर्वा करणार नाहीं ! "

" हा एक सर्वसाधारण कायदा झाला पण निसर्गाचा कायदा ह्या विरुद्ध आहे. निसर्गाच्या कायद्यानुसार प्रत्येकजण स्वतःच्या सुखासाठीं झटतो. कांहींजण दुसऱ्यांच्या सुखासाठीं झटतात पण त्याच्या मुळाशीं स्वतःचें सुख असतें. ह्या निसर्गाच्या कायद्याचें उल्लंघन मनुष्य करूं शकत नाहीं. आणि जो करतो तो खरोखरच महात्मा होय ! "

आणखी किती तरी वेळ त्यांचें ह्याबद्दल बोलणें चाललें असतें कुणास ठाऊक पण जीवनच्या बोलण्यानें त्यांत व्यत्यय आला. तो म्हणाला, " बघितलेस ना आनंद, मी काय सांगितलें तें ! आतां बसा दोघें भांडत. पण एकच विनंति आहे. जीवन नांवाचा एक प्राणी जवळ आहे हें मात्र विसरूं नका ! "

आनंदला काय बोलायचें तें सुचत नव्हतें. इतक्यांत " दादा दादा " म्हणत यतीन् आंत आला. त्याला जवळ घेऊन तो म्हणाला. " कायरे ! "

" दादा ! आईनें सांगितलें आहे कीं, आज जेवायला घरीं ये म्हणून ! "

" बरं म्हणून सांग. आणि हें बघ दोन पाहुणे सुद्धां येणार म्हणून सांग हाँ ! " आनंद म्हणाला,

यतीन् जाणार होता तोंच कमलनें त्याला जवळ घेऊन विचारलें, " कोण हा ! "

" माझा भाऊ, यतीन् ! "

" छान आहे नाहीं ! " कमल जीवनकडे पहात म्हणाली.

" भावासारखाच आहे. पण बेटा, भावासारखा बनूं नकोस हां ! " आनंद हंसत म्हणाला.

यतीन् गेल्यावर कमलनें विचारलें. " घरीं जेवायला या म्हणून कां सांगितलें. तुम्ही घरांत जेवत नाहीं कीं काय ? "

त्याचें असें आहे. आश्रमांत रहाणाऱ्या सर्वांसाठीं एकत्र सैंपाक केला जातो. पण आज वडिलांचें वर्षश्राद्ध आहे तेव्हा घरांतच करणार आहे सैंपाक !

" तुम्ही एवढे सुधारक असून वर्षश्राद्ध वगैरे करतां त्यांत काय आहे एवढें ?"

" मला तर त्यांत कांहींच वाटत नाहीं. त्याची आवश्यकता सुद्धां वाटत नाहीं मला. पण आईला त्याची आवश्यकता वाटते. तिच्या इच्छेविरुद्ध मी जाऊं कां ? तिला जर त्यापासून समाधान मिळत असेल तर तें समाधान मी कां हिरावून घेऊं ?"

थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर आनंद उठून म्हणाला– " तुम्ही आतां आराम करा. मी चाललों माझ्या कामाला. जेवायला बोलवायला येईन !"

" आतां कुठें !"

" शाळेंत चाललों ! "

" अरे आम्ही आलों म्हणून एक दिवस तरी रजा घे आणि आमच्या जवळ बस !"

" तुमच्या जवळ बसायला पुष्कळ वेळ आहे. आजचाच कांहीं शेवटचा दिवस नाहीं !

" आणि शाळेचा मात्र शेवटचा दिवस आहे वाटतें ! "

" तसें नाहीं. वेळ किती मोलाचा आहे त्याची जाणीव अजून आम्हा हिंदी लोकांना झाली नाहीं. शाळेचा एक तास फुकट घालवला तर मुलांना तेवढेंच ज्ञान मिळणार नाहीं. ह्यासाठीं त्यांची खोटी कां ?"

" बरं बाबा तुझ्याबरोबर काय आम्ही थोडेच बोलूं शकणार !"

" तसें नाहीं तें जीवन ! मला सुद्धां तुमच्यापासून दूर जाण्यास वाईट वाटतें पण थोड्यासाठीं आपले दररोजचे व्यवहार सोडावे असें मला वाटत नाहीं. " आनंद म्हणाला.

" बरें पण आम्हींसुद्धां येतो ना तुझ्याबरोबर ! "

" आम्हांला आश्रम बघायचा आहे तुमचा ! " कमल म्हणाली.

" आतांच कशाला ? तुम्ही विश्रांति घ्या. जेवण वगैरे झाल्यावर दाखवतो सगळें !

असें म्हणून आनंद त्यांचा निरोप घेऊन बाहेर पडला.

× × × ×

आनंद शाळेंत आला. विद्यार्थी त्याची वाट पहातच होते. शाळेची इमारत एक मजली होती. लहानच होती पण सुंदर होती. पहिल्या मजल्यावर इंग्रजी शिक्षणाचा एक वर्ग होता. एक तासभर तेथें शिक्षण दिलें जाई. इंग्रजी आनंदच शिकवत असे. सकाळच्या वर्गाला पन्नास मुलें होतीं. आज आनंदच्या मनाची शांतता गेली होती. त्याची गंभीरता ढांसळत होती. त्याचें कशावरही लक्ष लागत नव्हतें.

दररोज मजेनें एकाग्रतेनें, शिकवणाऱ्या आनंदाचें आज अभ्यासाकडे लक्ष लागत नव्हतें हें त्या चाणाक्ष मुलांनीं कधींच ओळखलें होतें. आज तीन वर्षांत त्याच्या मनाची चलबिचल झाली नव्हती. गंभीरता ढांसळली नव्हती. शिकवतांना तो कधीं थांबला नव्हता. पण आज आपली चलबिचल आपल्या काबूंत ठेवण्याचा प्रयत्न करीत असतांही ती रहात नव्हती.

जीवन आणि कमल ह्यांचें बोलणें, त्यांचें प्रेमळ भांडण त्यानें ऐकलें होतें. कमलसारख्या सुंदर तरुणीचा स्पर्श त्याला जाणवला होता, हेंच त्याच्या अशांततेचें मुख्य कारण होतें. त्याचें मन चार वर्षांपूर्वीच्या वेळेकडे धांव घेत होतें आणि तो त्याला मागें खेंचण्याचा प्रयत्न करीत होता.

त्याच्या डोळयांपुढें सुधा उभी राहिली. त्यावेळचे ते आनंदी, सुखी दिवस आठवले. त्याच्या मनांत आलें. आज सुधा कुठें असेल, आपली तिला आठवण येत असेल काय ? ती सुखी असेल काय ? एक ना दोन अनेक प्रश्न त्याच्यापुढें उभे राहिले. त्यावेळचे ते सुखकारक प्रसंग आठवून त्याच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. पण तो क्षणभरच. त्यानें मनाला मागें खेंचलें. तो मनाशींच म्हणूं लागला. आतां काय त्याचें ! आपण एकमेकांपासून दूर झालों. संपला आपला संबंध. आतां तो सबंध आठवून काय करायचें आहे ! त्या सुखाच्या मागें लागून काय उपयोग ? कर्तव्यासाठीं आपण तें सुख लाथाडलें. स्वतः होऊन दूर केलें आतां त्याबद्दल हळहळून काय उपयोग ! त्या सुखाशीं आतां आपल्याला कर्तव्य नाहीं. त्याची आतां जरुरीं नाहीं. हातीं जें कार्य

घेतलें आहे त्यासाठीं मरणें हेंच आपलें ध्येय आहे. मग गत गोष्टीची आठवण काढून दुःख करण्यांत कांहीं एक हशील नाहीं. मना खंबीर बन ! क्षुल्लक कारणासाठीं खंबीरपणा सोडूं नकोस. आजपर्यंत असे अनेक प्रसंग आले. तूं आपला खंबीरपणा सोडला नाहींस मग आज काय झालं तुला !—

झालें ! आनंदानें आपलें मन काबूंत आणलें. तो सारें विसरून गेला. विद्यार्थ्यांना आश्चर्य वाटलें. त्यांना कांहींच बोध होईना. दुसऱ्याच्या सुखासाठीं होळी करणाऱ्याचें मन त्यांना कसें समजणार ! थोड्या वेळांत मुलें सुद्धां सारें विसरून गेलीं. त्याच्या शिकवण्यांत तीं सुद्धां रंगून गेलीं. तास कसा गेला, केव्हां संपला हें सुद्धां मुलांना समजलें नाहीं !

तास संपला. मुलें खालीं दुसऱ्या तासाला जाऊं लागली. आनंदही त्यांच्याबरोबर खालीं उतरूं लागला. एका धीट मुलानें पुढें होऊन प्रश्न केला. " मास्तर आज तुम्हांला बरं वाटत नाहीं का ? "

" कां रे !" आनंदानें चमकून विचारलें.

"पहिल्यांदा तुमचें शिकवण्याकडे लक्षच नव्हतें. आजारी असल्याशिवाय तुम्ही असे वागणार नाहीं !"

" हो, जरासा आजारीच होतों मी त्यावेळीं !"

"मग आज कां तास घेतला ! "

" आजारी पडलों म्हणून तुमचा तास कां फुकट घालवूं ? तुमचेंच नुकसान झालें असतें ना !

" हो पण मास्तर ! तुमच्या प्रकृतीपुढें आम्ही तें नुकसानही आनंदानें सोसलें असतें ! "

आनंदानें त्याच्याकडे कृतज्ञतेनें पाहिलें व म्हटलें, " लक्षांत ठेवा. दुसऱ्यासाठीं आपल्या सुखाचा कांहीं विचार करूं नका. दुसऱ्यांचें सुख तेंच आपलें सुख माना. तरच तुमचें ध्येय साध्य होईल. स्वतःच्या सुखामागें लागून दुसऱ्याचें दुःख नाहींसें होणार नाहीं. जा आतां ! "

मुलें निघून गेलीं. आनंदला कमलच्या म्हणण्याची आठवण झाली. " स्वतःच्या सुखासाठीं झटणें हा निसर्गाचा कायदा आहे ! त्याच्या विरुद्ध जाऊन जो वागेल तोच खरा महात्मा. "

खरं कुणाचें ? आपण आतां मुलांना सांगितलें तें खरें कां माझें खरें ! आपलें खरें असतें तर आज यःकश्चित प्रसंगानें आपल्या मनाची चलबिचल झाली असती कां ? काय करून बसलो आपण हें ! आपली चलबिचल सर्व मुलांनासुद्धां समजून चुकली. कुठें गेली आपली चार वर्षांची तपश्चर्या ! छेः ह्यापुढें असें निष्काळजी राहून उपयोगी नाहीं. मनाचा खंबीरपणा, गंभीरपणा, न सोडतां वागलें पाहिजे. मनाची तळमळ दडपून टाकली पाहिजे.

× × × ×

जेवण शांतपणें चाललें होतें. आनंद, जीवन आणि यतीन् असें तिघेजण जेवायला बसले होते. कमल त्यांच्या बरोबर बसली नव्हती. तिची आणि शांताची थोड्याच वेळांत बरीच गट्टी जमली होती. म्हणून आग्रह करूनसुद्धां कमल शांतासाठीं थांबली होती.

आनंद आणि जीवन गप्पागोष्टी करीत करीत जेवत होते. किती तरी दिवसांनीं अशा जेवणाचा योग आला होता. आनंदला आठवण झाली— जीवनची आई त्याला आणि जीवनला वाढीत असे. नको नको म्हणत असतांना सुद्धां ती एक एक पदार्थ टाकी ताटांत. आनंद म्हणे, "

"आई पुरे झालं आतां ! संपतील ना सारे मग तुम्हांला कुठचे ?"

"संपले तर संपू दे ! चांगले झाले आहेत ना !"

"छे ! मला कांहीं नाहीं आवडले !" तो मुद्दाम खोटेंच सांगे.

"आवडत नाहीं मग एवढे खाल्ले कशाला बाबा ?"

"काय करणार ? तुम्ही तर नको नको म्हणत असतांना एक एक टाकतां ! मी खोटें सांगत असेन तर विचारा जीवनला नाहीं तर बाबांना !"

"पुरुष कधीं बायकांना खरें सांगणार आहेत काय ?" ती आपल्या नवऱ्याकडे रोखून पहात म्हणे.

जीवनचे वडील लगेच म्हणत, "आणि बायका तरी कुठें आपल्या मनांतलें सांगतात पुरुषांना. त्यांच्या नकारावरून, हास्यावरून आणि स्तब्धते-वरून काय तें अनुमान काढायचें आम्ही "

मग बोलण्याला आणि जेवणाला मजा येई. आणि अशा वेळीं ती

आणखी त्यांच्या ताटांत वाढे. जीवन आणि तो नको म्हणून उठायला लागले तर त्यांना म्हणे, " एवढें खाऊन उठा. नाहींतर मी सुद्धां जेवणार नाहीं ! "

" पण आई नको असेल तर एवढा आग्रह का म्हणून ? " आनंद विचारी.

" बाबा, आईची माया आहे ! "

तो निरुत्तर होऊन पुन्हा बसे आणि म्हणे, " आई ह्या पुढें मी इथं जेवायला येणार नाहीं. तुम्ही, नको नको म्हणतां हट्टानें खाववतां. आजारी बिजारी पडलों तर ! "

" तें नाहीं बाबा चालायचें. तुला आलेंच पाहिजे. आजारी पडलास तर आई आहे ना इथं सारं करायला. "

आनंद मग अगदीं निरुत्तर होई. प्रत्येक वेळीं असं कांहींना तरी होई. त्यांचा वेळ मजेंत जाई.

आनंदला ती आठवण झाली. तो मनाशींच म्हणाला, किती आनंदी दिवस ते. आईप्रमाणें भरवी ती. आणि इथं कोणी चौकशी करत नाहीं—हे विचार मनांत येतां येतां तो जेवायचा थांबला.

जीवननें विचारलें, " कायरे थांबलास कां ? "

आठवण झाली. आई आम्हांला कशी वाढत असे नको नको म्हणत असतांना सुद्धां आग्रह करीत असे !

" खरोखर किती मजा यायची नाहीं ? एकदां तूं म्हणाला होतास आठवतें तुला. ' आई तुम्हीं अशा किती दिवस आग्रह करीत रहाणार ? सवय जडेल नाहीं ? मग कांहीं केल्या जेवण जायचें नाहीं ! " त्यावेळीं आई म्हणाली होती. " मी जिवंत आहे तोंपर्यन्त आग्रह करीन. मी मेल्यावर आग्रह करायची जरुरीच नाहीं. बायको समोर असली कीं, आपोआप नको नको होईतों खाल तुम्हीं. तरी सुद्धां पोट भरणार नाहीं तुमचं ! " जीवननें एक आठवण सांगितली.

त्याचें हें बोलणें ऐकून शांता म्हणाली, " आतां ह्यांना आग्रह करणारा कोणी नाहीं. पोटभर कधीं जेवित सुद्धां नाहींत ! "

"खरें आहे कां हें आनंद?" जीवननें विचारलें. आणि तो हंसत म्हणाला, "मग लग्न करून टाक बुवा एकदां! म्हणजे आपोआपच जेवण जाईल पोटांत!"

आनंदला हें बोलणें मुळींच आवडलें नाहीं. तो गप्प राहिला.

त्याला आपलें बोलणें आवडलें नाहीं हें पाहून, जीवनही पुढें कांहीं बोलला नाहीं.

दोघेही मुकाट्यानें जेवण संपवून उठले.

ते बाहेर गेल्यावर शांता आणि कमल दोघीही जेवायला बसल्या.

जेवतांना शांतानें विचारलें, "तुमच्या सासुबाई फार प्रेमळ आहेत वाटतं?"

"फार प्रेमळ आहेत त्या" कमल म्हणाली, मला आपल्या मुलीप्रमाणें वागवतात. आनंदभावजींबद्दल त्यांना फार प्रेम वाटतें. त्या नेहमीं त्यांची आठवण काढतात!"

"मग त्यांना कां नाहीं आणलें बरोबर?"

"आम्ही बोलावलें होतें त्यांना. पण घरीं मामंजी एकटेच असल्यामुळें त्या आल्या नाहींत! शिवाय आणखी एक अडचण काढली त्यांनीं!"

"कसली अडचण?"

"त्या म्हणाल्या, 'मी आलें असतें. त्याला पहावेंसें फार वाटतें! पण मी आणि येऊन त्याला बिचाऱ्याला कशाला उगीच खर्चांत घालूं! त्याचें तिकडे कसें चाललें आहे देवाला माहित, एक एक दिवस जातां जातां नाकी नऊ येत असतील त्यांच्या. तेव्हां बिचाऱ्यावर माझा आणि भार कशाला टाकूं? सुखी राहो बिचारा!'—तेव्हां आम्हीसुद्धां त्यांना जास्त आग्रह केला नाहीं!"

"दुसऱ्या वेळेला त्यांना जरूर घेऊन या हं!"

"हो. आम्ही जातांना आनंदभावजींना घेऊन जाणार म्हणतों. बघूया काय होतंय तें!"

"छेः ते येणारच नाहींत. त्यांनीं आपल्यामागें इतके उपद्व्याप लावून घेतले आहेत कीं, त्यांना जरासुद्धां फुरसद मिळत नाहीं. मी त्यांना घडोघडी सांगतें किती त्रास घ्यायचे हे! पण ऐकत असतील तर शपथ!"

"पण ते लग्न कां नाहीं करीत?"

" कुणास ठाऊक ! त्यांच्या मनाचा पत्ता कुणास लागायचा नाहीं. मला तर वाटतें ते म्हणजे एक न सुटणारें कोडें आहे. "

" विचित्र स्वभाव दिसतो. लग्न करायला काय हरकत आहे. उलट एवढें काम केल्यावर तेवढेंच समाधान मिळेल. पुरूष आणि स्त्रिया कांहींही म्हणोत पण एवढें खरें कीं, लग्न झाल्यावर एकमेकांच्या सहवासानें त्यांना सुखसमाधान खात्रीनें मिळतें. "

" पण त्यांना तें समजायला पाहिजे ना ! "

" आमचे हे माझ्यापासून दूर रहातच नाहींत. जेवायच्या वेळेला मी जवळ नसलें कीं, कांहीं तरी निमित्त करून बोलावून आणतात. मी म्हणते एवढा संन्याशी-पणा पत्करायला काय झालंय त्यांना ? "

" तेंच तर समजत नाहीं मला. लग्नाबद्दल मी त्यांना पुष्कळ वेळां विचारलें, पण कांहीं उत्तर देत नाहींत. लग्न न करण्याचा त्यांनीं निश्चय केलेला आहे. म्हण-तात, " माझें ह्या गरीब जनतेशीं लग्न झालेलें आहे. दुसरें लग्न केलें तर त्या गरीब जनतेचे हाल होतील. एका नवऱ्यानें दोन बायका केल्या कीं, एकीकडे त्याचें दुर्लक्ष होतें, मग तिचे हाल होतात. तसेंच होईल ह्या बाबतींत. माझें आयुष्य चैनी-साठीं नाहीं !"

" पण लग्न करणें म्हणजे चैन नाहीं. ती एक नैसर्गिक बाब आहे. प्रत्येक स्त्रीपुरुषाला त्याची आवश्यकता आहे. स्त्रीशिवाय पुरुषाला आणि पुरुषा-शिवाय स्त्रीला पूर्णत्व येत नाहीं. स्त्रीसहवास, लग्न हा एक निसर्गाचा कायदा आहे. त्याच्या विरुद्ध वागणें सामान्य माणसाला शक्य नाहीं ! "

"त्याचें मन सुद्धां सामान्य नाहीं. त्यांना तें शक्य आहे. ते कोणावरही विजय मिळवतील ! "

" चूक आहे हे ! निसर्गावर माणसाला कधींही विजय मिळवितां येणार नाहीं. हेंच पहा, निसर्गाच्या विरुद्ध जाऊन माणसानें पूल, बोगदे, विमानें, बोटी निर्माण केल्या. मोठमोठी धरणे बांधून नद्यांना अडविलें. माणसाला वाटलें आपण निसर्गावर विजय मिळवला. पण एकाएकी निसर्ग खवळतो, भडकतो आणि पांच मिनिटांत माणसांच्या ह्या विजयाचा चक्काचूर करतो. कुठें गेला माणसाचा विजय ?

निसर्गाशीं अनंत, वेळ टक्कर देणारा एक तरी विजय दाखवून द्या. हे सर्व विजय क्षणजीवी आहेत. लग्न ही माणसाच्या आयुष्यांत अत्यंत आवश्यक बाब आहे. त्यावर एकादाच विजय मिळवूं शकेल. सामान्य माणसाला तें शक्य नाहीं !"

"खरं आहे हे !"

त्यांचीं बोलणीं किती वेळ लांबली असती कुणास ठाऊक? पण बाहेर आनंद आणि जीवन ह्यांच्या खांकरण्यामुळें त्यांच्या बोलण्यांत व्यत्यय आला. आपलीं बोलणीं ते ऐकतात असें वाटून शरमून तीं गुपचूप जेवूं लागलीं.

*　　　　*　　　　*

आनंद आणि जीवन खाटेवर बसून आपल्या गतकालच्या आठवणी आठवून एकमेकांना सांगत होते.

जीवन म्हणत होता, "आनंद, एकादेवेळीं जर देव प्रसन्न झाला—अर्थात देव नाहीं ह्याबद्दल माझी खात्री आहे—आणि जर देवानें सांगितलें कीं, पाहिजे तें माग म्हणून तर मी देवाकडे मागेन कीं, मला लहानपण दे. खरोखर तें बालपण, तें शाळा कॉलेजांतील जीवन आज आठवलें म्हणजे मनाला एक प्रकारची हुरहुर वाटते आणि आजच्या जीवनाशीं तुलना केली कीं, आजचें आयुष्य नीरस वाटूं लागतें !"

आनंदसुद्धां गमतीनें सांगत होता, "शाळेमध्यें आपण घालवलेलें तें मजेदार आयुष्य आजही आठवलें कीं, आनंद, समाधान मिळाल्याशिवाय रहात नाहीं. तुला आठवतें? आपण इंग्रजी सहावीमध्यें असतांना काय काय मजा केली होती?"

"होय ! आमचा वर्ग तर त्यावेळीं अख्या शाळेंत प्रसिद्ध होता. एकेका मास्तरला असें सतावून सोडलें होतें कीं, सांगतां सोय नाहीं. मस्ती, थट्टा, दंगल करण्यांत तसेंच अभ्यासांतसुद्धां आमचा वर्ग प्रसिद्ध होता. शाळा चालू असतांना दांड्या मारून सिनेमा पाहण्यास तर औरच मजा यायची. तो दिवस आठवतो तुला? एडवर्ड कां एम्पायरला कुठें तरी इंग्लीश पिक्चर लागलें होतें. चांगली सिरिअल होती म्हणून आपण दांड्या मारून पिक्चर पहायला गेलों. इंटरव्हलला थिएटरमध्यें पाहतों तों वर्गातलीं पंधरासोळा मुलें हजर होतीं तेथें. दुसऱ्या दिवशीं हेड्मास्तरांनीं हजेरी घेतली एकेकाची आणि आपण मोठ्या युक्तिनें त्यांतून बचाव केला. हेड्मास्तरनाच नव्हे तर क्लासटीचरलासुद्धां सांगून गेल्याची थाप मारून वेळ मारून नेली. किती मजा आली त्या दिवशीं !"

"आणि तुला आठवतें कां जीवन ? त्या भावे मास्तरला सतावण्यासाठीं आपण काय केलें होतें तें ? किती बावळट दिसत होता तो. तुला आठवतें ? मास्तरांच्या खुर्चीच्यामागें शिवाजीची मोठी तसबीर होती. तिच्या मागें आपण डब्बल बार फटाकडी लावली आणि तिचें काडसुत खिडकीला भोंक पाडून एकदम तळमजल्यावर नेऊन ठेवलें आणि मास्तर येण्याच्या अगोदर पांच मिनिटें दिली पेटवून आणि काय मजा होते ती पहात राहिलों. पण त्या दिवशीं ते मास्तरच आले नाहींत आणि त्यांच्या बदली दुसरेच मास्तर आले. त्यावेळीं आपली उडालेली धांदल आणि एकाएकीं झालेला फाटकडीचा स्फोट, मुलांचें आश्चर्यानें पाहणें, मुलींचें ओरडणें, सर्व मास्तरांची धांवपळ, फ्रेमचे झालेले तुकडे तुकडे पाहून किती मजा आली. किती तरी दिवस त्या बाबत चौकशी चालली होती पण शेवटपर्यंत पत्ता लागला नाहीं कुणाला !"

"खरोखरच ते दिवस म्हणजे आयुष्याची फुलबाग होती. मुलांचें खोडकर वागणें, मुलींची चेष्टा करणें, मास्तरना सतावणें म्हणजे एक दररोजचा कार्यक्रमच असायचा तो. असे सुखी दिवस परत येणें शक्य नाहीं !"

आनंद आणि जीवन गतकाळच्या गोष्टी सांगण्यांत एवढे दंग झाले होते कीं, दारांत कमल आणि शांता येऊन उभ्या आहेत ह्याचा त्यांना पत्तासुद्धां लागला नव्हता. आणि जर त्या तशाच गप्प राहिल्या असत्या तर त्यांना तें समजलेंसुद्धां नसतें. कमलच्या बोलण्यानें ते भानावर आले. कमलनें म्हटलें,

"अहो महाराज, पुरे झाल्या तुमच्या आठवणी. आम्ही आलों आहोंत ह्याची तुम्हांला दाद तरी आहे का ?"

त्या आल्यामुळें,त्यांना जरा वाईट वाटलें. तरी तसें न दाखवतां ते गप्प बसले. त्या दोघी आंत आल्या. आनंद शेजारी थोडी जागा होती तेथें जाऊन कमल बसली. शांता मात्र खिडकीजवळ जाऊन बसली.

आनंदला कमलचें हें वागणें आवडलें नाहीं. त्यानें तसें दाखवून दिले नाहीं. क्षणापूर्वी आनंदी असलेला त्याचा चेहरा गंभीर बनला. त्याला वाटलें इथून उठून जावें. पण जाणें शक्य नव्हतें त्यामुळें तो गप्प बसला. इतक्यांत, "दादा दादा" करीत यतीन आला.

तेवढ्यांत कार्यभाग साधून घेण्यासाठीं तो एकदम उठला आणि यतीनच्या जवळ गेला आणि म्हणाला " काय रे यतीन्, काय झालें ?"

यतीन्‌लासुद्धां थट्टा करण्याची हौस आली. आपले हात पाठीमागें तसेच ठेवून तो म्हणाला, " सांगा बघूं मी कां आलों तें ? "

" अरे गुलामा असें होय ? " असें म्हणून त्याला जवळ ओढून त्याच्या हातातलीं पत्रें काढून घेतलीं आणि तीं पहात म्हणाला, " आई हें पहा तुझं पत्र घे ! "

" मला कुठचें पत्र येणार ? " असें म्हणून तिनें पत्र घेऊन वाचायला सुरु-वात केली.

पत्र वाचून होतांच आनंदानें ती आनंदकडे देत म्हणाली, " वाचून पहा. "

आनंद पत्र घेऊन वाचूं लागला—

" प्रिय मैत्रिण शांता हीस,

किती दिवसांनीं पत्र लिहितें आहे नाहीं तुला ? जवळ जवळ एक वर्षानें, तूं म्हणत असशील मी आपल्या दुर्दैवी मैत्रिणीला विसरलें. पण खरें सांगूं ? मी तुला मुळींच विसरलें नाहीं. मी डॉक्टरीण झालें हें तुला सांगण्यास मला आनंद वाटतो. पुढें काय करणार हें मी अजून ठरवलें नाहीं. लवकरच ठरवणार आहे. किती दिवस म्हणते एकदां तुला पाहून यावें. पण शेवटची परिक्षा असल्यामुळें येतां आलें नाहीं. तरी ह्या दिवसांत मी तिकडे येणार आहे. येऊं ना ? कुठं तरी हवा बदल-ण्यासाठीं मला जायचें आहे. शिवाय माझ्या मनांत आणखी एक उद्देश असल्या-मुळें मी तिकडेच येण्याचें ठरवलें आहे. काय उद्देश आहे तो मग सांगेन.

तुला आनंद होईल पण तुझ्या संन्याशीबुवांना वाईट तर वाटणार नाहीं ना ? त्यांना स्त्रियांची फार भीति वाटते. अजून तसेंच आहे कां त्याचें मन ? बदललें असल्यास मला आनंद होईल.

फार काय लिहूं ? तिथं आल्यावर कळेलच सर्वकांहीं. अडचण वगैरे असल्यास कळव-म्हणजे मला बेत बदलतां येईल.

आपली मैत्रीण,

**रजनी**

" ता. क. तूं म्हणशील यतीन्‌ला विसरलीस म्हणून, पण मी मुद्दामच तें ता. क. मध्यें लिहितें. ता. क. शिवाय पत्राला शोभा येत नाहीं ना ? यतीन्‌ची फार फार आठवण येते मला. "

रजनी.

आनंदनें पत्र बंद केलें. त्याला आनंद तर झाला नाहींच उलट त्याच्या कपाळावर आठ्याच पडल्या. त्याचा अर्थ न समजून शांतानें विचारलें. " उत्तर पाठवूं कीं काय ? "

" होय ! "

" काय लिहूं ? "

" इथं फार अडचण आहे, इतक्यांत येण्याचें करूं नये. "

शांता आश्चर्यानें ह्मणाली, " अडचण कसली ? "

आनंद गंभीरपणा न बदलतां म्हणाला, " मुख्य अडचण ह्मणजे रहाण्याची; पाहुण्यांच्या सर्व झोपड्या भरल्या आहेत. शिवाय इतर कुठेंही जागा नाहीं, मग उगीच कशाला तिला इथं त्रास ? "

" त्यांत कसला त्रास. ती येईपर्यंत इकडच्या झोपड्या रिकाम्या सुद्धां होतील शिवाय दोनवर्षांनीं येते आहे. किती आवडीनें तिनें विचारलें आहे. तिला नको ह्मणुन कसें लिहूं ? "

" मग तुला पाहिजे तें कर ! "

" तुमच्या इच्छेविरुध्द मी नाहीं. तुह्मी सांगाल त्याप्रमाणें मी लिहीन. "

" तर मग इतक्यांत येऊं नको ह्मणून लिही ! " आनंद शांतपणें म्हणाला.

निराशा आणि दुःख यानें शांताचा चेहरा भरून गेला. आनंदला तें जाणवलें पण तो गप्प राहिला. नंतर जीवनकडे वळून तो ह्मणाला, " हें पहा, तुह्मी तयार रहा. तुम्हांला आश्रम वगैरे पाहावयाचा आहे ना ? "

" अरे पण हो, जरा चहाची वगैरे व्यवस्था ! "

" आश्रमांत चहा कोणीच पीत नाहीं ! " आनंद गंभीरपणें ह्मणाला.

" नसेल पीत. पण म्हणून आम्हीं पिऊं नये असें थोडेंच आहे ? हें पहा आनंदा, मला एकवेळ जेवण नसलें तरी चालेल पण चहा जरूर पाहिजे. बघ बुवा ! "

थोडा वेळ विचार करून आनंद म्हणाला, " करीन व्यवस्था. "

" कांहीं नको " कमल एकदम म्हणाली, " चहा पिणें हें जर आश्रमांत वाईट ठरवलें आहे, त्याला बंदी केली असली तर तो चहा आम्हांला नको ! "

" चहाला बंदी नाहीं. पण कोणीच पीत नाहीं ! "

“सध्यां आम्हीं आश्रमांत आहोंत त्याअर्थीं आश्रमवासीयाप्रमाणें आम्हांलाही वागलें पाहिजे. चहा नसला तरी चालेल.” कमल म्हणाली.

“बरं बुवा चालेल. पण गरम दूध तरी? कां त्यालासुद्धां बंदी?” जीवननें विचारलें.

“नाहीं ! दूध मिळेल.”

असें म्हणून आनंद बाहेर पडला. त्याच्याकडे सर्वजण आश्चर्यानें पहात राहिलीं.

* * *

आनंद, जीवन व कमल यांना बरोबर घेऊन आश्रमांत आला. पहिल्या-प्रथम त्यानें त्यांना सूत कातायच्या खोलींत नेलें आणि तेथून त्यांना सर्व आश्रम, शाळा, निरनिराळीं खातीं, निरनिराळीं कामें ह्यांची माहिती दिली आणि सर्व बाग फिरवून त्यांच्यासह तो परत आला.

ह्या सर्व माहितीनें जीवन व कमल ह्यांचें मन प्रसन्न झालें. इतकेंच नव्हें तर त्यांना आनंदबद्दल आदर, पूज्यभाव वाटूं लागला आणि आपण त्याच्याबद्दल ज्या कल्पना केल्या होत्या त्या आठवून त्यांना वाईटही वाटलें. आनंद म्हणजे कोणी सामान्य माणूस नाहीं ह्याची त्यांना खात्री पटली.

त्यानंतर तीं खेड्यांत फिरण्यासाठीं निघालीं. जीवन आणि कमल ह्यांना तें फिरणें होतें. पण आनंदाचें एक मुख्य काम होतें. कुठें कोण आजारी आहे, कुठें कोणाकडे काय आहे, कोणाची कशी स्थिति आहे, घरांत कसं काय आहे, ह्याची तो स्वत: जाऊन चौकशी करी. त्यांना योग्य तो सल्ला देई.

नेहमीप्रमाणें तो खेड्यांत आला. खेड्यांत घरें जरी लहान, मोडकीं तोडकीं असली तरी स्वच्छ होतीं. एका घराजवळ येतांच आनंदनें विचारलें, “कसं काय जिवबादादा किती झालं सूत ?”

“आठवड्यापुरतें होत आलं आहे, उद्यां होईल सर्व” ओट्यावरच सूत कांतीत बसलेला एक म्हातारा म्हणाला.

आनंद पुढें जाऊं लागला. जीवननें त्याला विचारलें” दर आठवड्याला हे सूत तुमच्याकडे आणतात वाटतें ?”

" होय ! आम्ही त्यांना सुताचा मोबदला देतो. त्यांना तेवढीच मदत होते. आमचेंही कार्य होतें ! "

जीवन आणि कमल ह्यांच्या नजरेंतून एक गोष्ट मात्र निसटली नाहीं. ती म्हणजे सर्व खेडुतांच्या अंगावर खादीचे कपडे होते. कपडे साधेच होते पण ते स्वच्छ व नीटनेटके दिसत होते.

आनंदला आठवण झाली, गोविंदाची आई आजारी आहे. तो त्यांच्यासह गोविंदाच्या घरांत शिरला. घरांत अंधार असल्यामुळें जीवन आणि कमल ह्यांना चालण्यास अडचण भासूं लागली. आनंदच्या परिचयाचें होतें तें घर. त्यांचीं ती अडचण पाहून तो म्हणाला, " चला ना आंत ! "

" नको, आम्ही बाहेरच रहातों. तूं जाऊन ये " जीवन म्हणाला.

" कां ? तुम्हांला खेडेगांव बघायचें होतें ना ? नुसतें खेडेभर फिरून तुम्हांला खरी कल्पना येणार नाहीं. बाह्यांगावर अंतरंग अवलंबून नसतें. खरें खेडें पहायचें असेल तर त्यांतलीं घरेंदारें, मुलेंबाळें, ह्यांच्यांत मिसळलें पाहिजे. चला ! "

जीवननें आनंदचा हात धरला, कमलनें जीवनचा हात धरला आणि ती आंत आली—

जीवनला वाटलें, भर दिवसां बारा वाजतां देखील येथें अंधुकसुद्धां दिसत नाहीं. छे: ह्या पेक्षां तुरुंगांतील अंधारकोठड्यादेखील छान असतील. त्या कोठड्या पुरवल्या पण ह्या नकोत.

जीवननें डोळे फाडून पाहिलें. एका लहानशा बिछान्यावर एक बाई झोंपली होती. तिच्या अंगावर धड पांघरूण सुद्धां नव्हतें. अंधारांत ती झोंपली आहे हें सुद्धां त्यांना दिसत नव्हतें. जीवनला तिची ही करुण स्थिति पाहून वाईट वाटलें. आनंद तिच्याजवळ बसून तिची चौकशी करूं लागला पण आपली हकिकत सांगण्याची ताकद तिच्यामध्यें नव्हती. तिला धड बोलता सुद्धां येत नव्हतें—

इतक्यांत बाहेर गेलेला गोविंद तेथें आला. आनंद, जीवन आणि कमल ह्यांना पाहून त्याला बरें वाटलें आणि त्यानें त्यांच्याकडे कृतज्ञतेनें पाहिलें. संकटाच्यावेळीं कोणीही सहानुभूती दाखवली कीं, माणूस त्याच्याकडे लगेच कृतज्ञतेनें पहातोच.

आनंदनें आजाराचें कारण विचारतांच गोविंद म्हणाला, " दादा, आठ दिवस झाले तिला ताप येतोय; बरं वाटेल म्हणून राहिली गप्प. पण आज तर ताप बराच आलाय्. मला तर आतां जास्तच भीति वाटते. औषध तरी कुठून आणणार? तुमचा डॉक्टर यायला अजून सात दिवस आहेत. ! "

" घाबरूं नकोस. हें पहा, आधीं तिला ह्या कोंदट हवेंतून बाहेर चांगल्या हवेशीर, भरपूर उजेड असलेल्या जागेंत ने बघूं. "

असें म्हणून त्याच्या उत्तराची वाटही न बघतां त्यानें त्याच्या आईला उठवली आणि स्वत: तिचा बिछाना घेऊन तो बाहेर आला.

सर्व व्यवस्था झाल्यावर जातांना तो गोविंदला धीर देत म्हणाला, " हे पहा गोविंदा, घाबरण्याचें कांहीं एक कारण नाहीं. धीर सोडूं नकोस. होईल तुझी आई चांगली. "

घरांतून बाहेर पडतांच जीवनला आणि कमलला हायसें वाटलें. त्या कोंदट हवेंत त्यांचा जीव कासावीस होत आला होता. त्यांचें मन म्हणत होतें, " आपणांला जर पांच दहा मिनिटें रहायला जीव कासावीस होतों, तर ज्यांना उभे आयुष्य ह्या घरांत काढायचें आहे त्यांना कसें होत असेल? त्यांचें काय हाल होत असतील?. "

आनंद बरोबर ती मुकाट्यानें जात होती. आनंद प्रत्येकाची चौकशी करीत होता, त्यांच्या सुखदु:खांत भाग घेत होता. त्याला ह्या खेड्यांतील प्रत्येक कुटुंब आपलें स्वत:चें वाटत होतें. ह्याच तऱ्हेनें तो प्रत्येकाकडे पहात होता.

आनंद एका झोपडीकडे आला. झोपडीच्या दाराशीं बसून एक स्त्री रडत होती. आनंद तिच्या जवळ जाऊन म्हणाला, " मावशी, उगीच रडण्यांत काय हाशील आहे?"

" काय करूं दादा, " ती स्त्री म्हणाली. " घरांत चार पैसे होते ते देतील ते घेऊन गेले. आतां काय करूं? सोन्यासारखीं दोन पोरें आज चार दिवस अर्धपोटीं आहेत. मुलांसाठीं मी आज किती तरी दिवस उपास काढते पण त्यांना का दया येते? एक एक दिवस कसा तरी जातो. आतां काय करूं? सकाळपासून पोरें उपाशीं आहेत. रडून रडून आतां झोपलीं आहेत. दादा, हाल पाहवत नाहींत हो, हे. कांहीं

आणीन म्हटलें तर एक पैसा देखील नाहीं. माणसानें त्रास सहन म्हणून किती करावा ? जीव नकोसा झालाय अगदीं ! "

तिला एक जोराचा हुंदका आला. जीवन आणि कमल ह्यांच्या हृदयाला तो भिडला. त्यांनीं आनंदकडे पाहून विचारलें, " काय आहे हें ? "

" खेड्यांतल्या अनेक चित्रांपैकीं एक. वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. ह्या एका चित्रानें जर तुम्हांला एवढें वाईट वाटलें तर सर्व चित्रें पहातां पहातां तुमचें हृदय जाग्यावर रहाणार नाहीं. समजलं ? हें तर कांहीं नाहीं; ह्यापेक्षां भयंकर दृश्यें पहायला मिळतील. पहावणार नाहीं तुम्हांला. डोळे वंद करावेसे वाटेल, डोळे फोडावेसे वाटतील " आनंद शांत, गंभीरपणें बोलत होता.

जीवन आणि कमल ह्यांना त्याच्या बोलण्याचें आश्चर्य वाटलें. तीं कांहीं विचारणार तोंच तो म्हणाला, " हिचा नवरा एक जुगारी इसम आहे. जुगारापुढें त्याला आपल्या मुलांची, बायकोची, घरादाराची पर्वा नाहीं. बिचारी दिवसभर मरते आणि चार पैसे आणते. पोरासाठीं जगते बिचारी, पण त्या नवऱ्याला त्याचें काहीं नाहीं. तिनें कावाडकष्ट करून आणलेले पैसे तो पळवतो. पोरें उपाशी रहातात. पैसे दिलें नाहीं तर मार देतो. आहे कीं नाहीं एक नमुना ? "—आनंद हांसत म्हणाला.

जीवनला त्याचें आश्चर्य वाटलें. एवढी करुणस्थिति पाहून तो हसतो कसा ? पण त्याला काय माहित कीं, ह्यापेक्षां किती तरी दारुण दृश्यें त्यानें पाहिलीं आहेत. म्हणुन त्या दारुण दृश्यांनीं त्याचें हृदय केव्हांच होरपळून गेलें होतें आणि त्याच्या ह्या हंसण्याचा अर्थ तरी त्याला कुठें समजला होता ? सुखाच्या पर्वतावरून दुःखाच्या खोल दरीपर्यंत त्यानें प्रवास केला होता. तो ह्या दुःखाच्या खोल दरींत रहात होता. त्याला त्याचा पूर्ण परिचय झाला होता. तें दुःख पुन्हां पाहून त्याला रडायला तरी कसें येईल ? दुःखांतून निर्माण झालेलें तें हास्य होतें !

ते दोघे कांहीं बोलत नाहींत असें पाहून कमल म्हणाली, " बिचारीला कांहीं तरी दिलें पाहिजे ! "

" होय ! " असें म्हणून जीवननें खिशांत हात घालून एक रुपया काढला आणि तो तिला देणार तोंच—

त्याचा हात धरून आनंद म्हणाला, " कांहीं जरुरी नाहीं. "

दोघेंहीं त्याच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागलीं. लोकांच्या सेवेसाठीं, लोकांचें दुःख नाहींसें करण्यासाठीं ज्यानें आपल्या स्वतःच्या सुखाचीसुद्धां पर्वा केली नाहीं तोच एका असहाय्य गरिब, दुःखी स्त्रीला मदत करूं नको म्हणतो ह्याचें त्याना आश्चर्य वाटल्यास नवल तें काय? त्यांना वाटलें त्याला वेड तर लागलें नाहीं?

आनंद म्हणाला "जीवन, तुझ्या ह्या रुपयानें तिला सुख तर होणार नाहींच उलट तिचें दुःख मात्र वाढेल. घरांत कांहीं नसतांना घरांत जेवण कुठून आलें म्हणुन नवरा चौकशी करील, आपल्यापासुन पैसे ही चोरून ठेवते असा त्याला तिचा संशय येईल. तिला तो मारील आणि उरलेले पैसे काढून घेईल. आणि एकदां कां जर पैसे मिळाले तर मग तिची काय स्थिति होईल माहित आहे तुला? मदत करण्यांतसुद्धां विचार करावा लागतो. आपल्याकडे इतके नादान लोक आहेत कीं, त्यांना योग्य दानधर्म करण्याचें माहित नाहीं. त्यांचें म्हणणें दानधर्म केल्यानें गरिबांना जेवण मिळेल, ते सुखी होतील व आपल्याला पुण्य लाभेल. पण त्यांना माहित नाहीं कीं, आपण त्यांना दुःखी करतों आणि पुण्याऐवजीं पाप मात्र त्यांच्या नशीबीं लागतें. जीवन, अरे देवळांना मदत करून, पाषाणाच्या मूर्तिवर अलंकार चढवून, एक दोन दिवस अन्नछत्र उघडून कुठें गरिब जनता सुखी होणार आहे? आणि त्यांना पुण्य मिळणार? जीवन, शहरामध्यें कांहीं श्रीमंत लोक असे आहेत कीं, दानधर्म, देवधर्म ह्यासाठीं लाखांनीं रुपये खर्च करतात. पण त्या नादान लोकांना माहित नाहीं कीं, आपण किती चुकतों तें! देव जर लोकांना सुख देतो, लोकांना पैसे देतो, तर त्या देवालारे अलंकार कशाला? कशालारे हा खर्च? आणि अशा ह्या अन्नाच्या दानधर्मामुळें हे गरीब लोक भिकारी, आळशी होतात. त्यांना आयते मिळतें मग तेरे कशाला स्वतः होऊन झटतील? अशा दानधर्मानें का गरीब जनता सुखी होणार आहे? अरे वर्तमानपत्रांत नांव कमावण्यासाठीं हा सारा खटाटोप असतो. पैशाची उधळपट्टी मात्र होते. ह्याच लोकांकडे कोणी जर संस्थेच्या नांवानें गेला तर एक रुपया त्यांच्यानें देववणार नाहीं. मग त्यांना पुण्य तरी कसें लागेल? ते सुखी तरी कसे होतील? गरीब जनतेच्या आयुष्याचा ते नाशच करीत नाहींत का? जीवन, तुला वाईट वाटत असेल. आपण एका असहाय्य अबलेला मदत करीत होतों. तें पुण्य मी हिरावून घेतलें. पण जीवन, मी तुला पापांतून मुक्त करतों आहें. तुला जर गरीबांना मदत करायची असेल तर कुठल्या तरी संस्थेला मदत कर. मला

माहित आहे कांहीं संस्था भोंद्र आहेत. पण योग्य चौकशीशिवाय मदत करूं नकोस ! आणि जेथें लाखोंच नव्हे तर कोट्यांनीं लोक उपाशीं मरत आहेत तेथें एकालाच मदत ती काय करणार ? म्हणून त्यांना मदत करण्यापेक्षां त्यांच्या हितासाठीं झटणेंच ज्यास्त योग्य आहे !" आनंद शांतपणें पण कळवळ्यानें बोलत होता.

जीवनला त्याचें बोलणें पटलें असावें कारण त्यानें रुपया तसाच खिशांत ठेवला. मात्र त्या गरीब बाईची आठवण होऊन त्यानें विचारलें, "पण आनंद, त्या बाईची सोय काय ? त्या उपाशी झोपलेल्या मुलांची काय व्यवस्था ? त्या अजाण बालकांना कशाला रे तो उपदेश ? त्यांना कशाचीही जाणीव नाहीं !"

"आपला देश दिवसें दिवस कमजोर होत चालला आहे. माणसें बघावीं, अशक्त रोगानें छेडल्यासारखीं दिसतात. अरे लहानपणींच जर मुलांना आईचें दूध मिळत नाहीं, पोटभर अन्न मिळत नाहीं तर मग ही मुलें मोठीं झाल्यावर सशक्त तरी कशी होतील आणि देशाचें सामर्थ्य तरी कसें वाढेल ?"

"तशी व्यवस्था केली पाहिजे. मुलांना दूध, अन्न, शिक्षण मिळालें पाहिजे !"

"परदेशांत हे सारे चालतें. सरकार ह्या मुलांची योग्य व्यवस्था करतें. पण आपला हिंदुस्थान कांहीं आपल्या ताब्यांत नाही. ब्रिटिश सरकारला आह्मांला सशक्त, जोरदार ज्ञानी करायचें नाही मग ह्या विरोधी गोष्टींची सांगड तरी कशी बसणार ? आज जर हिंदुस्थान स्वतंत्र असता तर ह्या लोकांचे असे हाल तरी झाले नसेत. निदान मुलांचें तरी !"

कमल त्याचें बोलणें नीटपणें ऐकत होती. ती ह्मणाली "आज अशा उपदेशानें कांहीं ह्या बाईचें दुःख नाहींसें होणार नाहीं. त्या मुलांना खायला मिळणार नाहीं !"

"खरं आहे तें. ह्याची मी व्यवस्था केली आहे."

नंतर त्या बाईकडे वळून तो ह्मणाला, "मावशी, आज मुलांना घेऊन तूं आश्रमांत ये. तेथें त्यांना पोटभर जेवायला घाल. तुह्मी पोटभर खा. मुलांना पाहिजे तर आश्रमांतच ठेव."

"आणि त्याची काय व्यवस्था" ती बाई ह्मणाली ?

"त्यांना आश्रमांत स्थान नाहीं. व्यसनी, आळशी लोकांसाठी तो आश्रम नाहीं."

"मग मी मुलांनाच पाठवून देईन. ते उपाशी राहून मी कशी जेऊं ?"

" ठीक आहे ! चल मग जीवन ! "

आनंद म्हणाला व ते चालूं लागले. तोंच त्या बाईचा नवरा तेथें आला आणि आनंदकडे तिरस्कारानें पहात एकदम आंत गेला. जीवनला त्याच्या ह्या वागण्याच्या राग आला. पण आनंदला त्याचें कांहींच वाटलें नाहीं.

तीं इकडे तिकडे फिरून आश्रमांत परतलीं.

परत येतांना आनंद म्हणाला, "जीवन, पाहिलेंस ना हें येथील लोकांचें जीवन ? तसे हे लोक फार चांगले आहेत. जेवढे शांत, मायाळू तेवढेच रागीट आणि भयंकर आहेत. बऱ्याला बरे आहेत, वाईटाला वाईट आहेत. त्यांच्यावर केलेले उपकार ते जन्मांत विसरणार नाहींत. त्यांचा आणखी एक गुण किंवा दुर्गुण म्हण पाहिजे असल्यास, त्यांना समजावून सांगितलें असल्यास लवकर पटतें. मात्र ते संशयींही फार आहेत."

चालतां चालतां एक बाई सामोरी आली. तिनें आनंदला नमस्कार केला आणि त्याच्या पायाची धूळ कपाळाला लावली.

आनंदनें विचारलें, " आतां ठीक चाललें आहे ना ? "

" होय ! तुमच्या कृपेकरून सारें ठीक आहे ! "

" सीताराम काय म्हणतो ? "

ती बाई कांहींशी लाजत म्हणाली, " आतां कांहीं बी बोलत नाय ! "

" जा तर आतां घरीं ! "

ती बाई जातांच आनंद म्हणाला, "ही एक दुर्दैवी बाई होती ! हिचें नांव तारा !"

" काय झालं होतं तिला ? " कमलनें विचारलें.

" तिला कांहीं झालें नव्हतें. तिच्या नवऱ्यालाच संशयानें छेडलें होतें. नवरा आणि बायको एवढीच काय ती घरांत. नवरा कामावर गेल्यावर ती कांहीं तरी करीत असे घरांत. सुखासमाधानानें चाललें होतें. एक दिवस नवऱ्याला संशय आला. की आपल्या बायकोचा दुसऱ्या पुरुषाशीं संबंध आहे. तो पुरुष होता तिच्या माहेरचा. तिच्या शेजारींच रहात असे. लहानपणापासून एकत्र वाढलेली होती ती. तो आपल्या गावांतून जेव्हां इथं कामानिमित्त येई तेव्हां तिला भेटल्याशिवाय जात नसे. वारंवार त्याचें येणें झाल्यामुळें इतरांना त्याचा संशय आला. त्यांनीं नवऱ्याच्या कानांत विष ओतलें. नवराच तो आधीं

आणि त्यांत हें. त्याच्यांतला नवरेपणा जागा झाला आणि एक दिवस त्यानें तिला तापवलेल्या सळईनें ठिकठिकाणीं भाजलें. मला सुद्धां पाहवलें नाहीं तें !

कमलनें अंग शहारून म्हटलें, " किती दुष्ट नवरा आहे हा. पुढें काय झालें बिचारीचें ? "

" मी तिला आश्रमांत आणून ठेवली. जखमा वगैरे बऱ्या झाल्यावर ती नवऱ्याच्या भीतीनें आश्रमांत रहात होती. "

" आतां कुठें असते ती ? आश्रमांत तर दिसली नाहीं ! " कमलनें म्हटलें.

" आतां नाहीं ती आश्रमांत. पुढें तिच्या नवऱ्याचा संशय गेला. त्याला पश्चात्ताप झाला. तो पुष्कळ वेळा तिला न्यायला आला, पण ती कांहीं गेली नाहीं !"

" मग गेली कुठें ? "

" आपल्या नवऱ्याकडे ! "

" नवऱ्यानें बळजबरीनें नेलें कीं काय ? "

" एक दिवस तो आला. किती तरी वेळ तो तिची समजूत घालीत होता. शेवटीं गेला आणि त्याच्या दुसऱ्या दिवशीं तीही गेली. इकडे काम फारसें नव्हतें पण खायला भरपूर मिळतें. तिकडे काम करूनसुद्धां तिला पोटभर खायला मिळत नाहीं. मी तिला सांगितलें, " आतां कां जातेस नवऱ्याकडे ? तिथं तुला खायला तरी मिळेल कां ? " तर म्हणाली, " जें कांहीं मिळेल त्यांतच समाधान मानीन मी ! " शेवटीं गेली ती." आनंद म्हणाला.

" बरोबर आहे तें ! " जीवन एकदम म्हणाला.

" काय बरोबर आहे ? " आनंदनें विचारलें.

" ती नवऱ्याकडे गेली हे "

" आतां सारा दिवस काम करून सुद्धां पोटभर अन्न मिळत नाहीं ना ? "

" आनंद, चुकतोस तूं ! अरे नुसतं पोटभर अन्न मिळालें म्हणूनच कां मनाचें समाधान होतें ? तिच्या मनाची परिस्थिति तुझ्यापेक्षां तिलाच जास्त माहित असणार ! तिला काय माहित नव्हते नवऱ्याकडे आपणाला पोटभर अन्न सुद्धां मिळणार नाहीं म्हणून. तरी पण ती गेली. कां गेली ? एवढा नवरा दुष्ट असतांनासुद्धां ती गेली त्याअर्थी तिला त्याच्याकडे खेचण्याची कोणती तरी एक प्रभावी शक्ति असली पाहिजे. त्याशिवाय ती गेली नसणार आणि तो

नवरा तरी कां तिला न्यायला आला तिचा चेहरा सुद्धां विद्रूप झाला असतांना? आनंद, पुरुष आणि स्त्रिया कितीही दुष्ट, निर्दयी, कठोर अंतःकरणाची असली तरी त्यांना एकमेकांचा सहवास प्रिय असतो. निसर्गाचा कायदाच आहे हा. तिचा नवरा दुष्ट होता हें तिला माहित होतें, पण त्याचा सहवास तिला प्रिय होता. समजलें? तुला संन्याशाला कुठचं समजणार हे!" जीवन म्हणाला.

आनंद कांहीं बोलला नाहीं. गप्प राहिला.

जीवननें त्याच्याकडे पाहिलें. त्याच्या चेहऱ्यावर कांहींही बदल झाला नव्हता. जीवननें विचारलें, "आनंद तुला हें पटत नाहीं? कॉलेजमध्यें असतांना ती सुधा मराठे आठवते ना तुला? कां तिलाही विसरलास?"

आनंदाला वाटलें विषय भलत्या ठिकाणीं झुकला. "तो म्हणाला, जाऊं दे त्या गोष्टी!"

"का रे? अरे तुझं तर तिच्यावर प्रेम होते ना? तुला प्रेम म्हणजे काय हें माहीत असतांनासुद्धां तूं त्या बाईस नवऱ्याकडे जाऊं नको म्हणतोस हा तुझा मूर्खपणा होता!" जीवन म्हणाला.

"प्रेम हें विषापेक्षां जहर असतें हें मला माहित नव्हतें," आनंद कांहींशा नाराजपणें म्हणाला.

जीवनला वाटलें त्याला हा विषय आवडत नसावा. तो गप्प राहिला.

आनंदलाही तो गप्प राहिला हेंच बरें वाटलें. तीं झपझप चालूं लागलीं.

* * *

शांतपणें प्रार्थना चालली होती. आश्रमांतलीं सारीं माणसें तर आलीं होतीच. शिवाय खेड्यांतले पुष्कळ लोकही आले होते. आनंद शांतपणें प्रार्थना म्हणत होता. त्यावेळची त्याची ती मूर्ति गंभीर, तेजस्वी दिसत होती. जीवन आणि कमल त्याच्याकडे टक लावून पहात होतीं.

प्रार्थना संपतांच सारे आपआपल्या कामास गेले. थोड्याच वेळांत जेवणाची घंटा झाली. आश्रमांत बरींच माणसें असल्यामुळें त्यांना प्रत्येकाला जेवणाची वर्दी देणें शक्य नव्हतें त्यामुळें ही योजना केली होती.

एका बाजूला पुरुषांची पंगत बसली होती. त्याच्या दुसऱ्या बाजूस स्त्रियांची पंगत बसली होती. जेवणाची सारी व्यवस्था शांताकडे होती. ती कोणाला 'काय

पाहिजे, काय नको' ह्याची चौकशी करीत होती. मधून मधून जेवण्याचा आग्रह करीत होती. शांता सर्वांच्या मागून जेवावयास बसणार असल्यामुळें कमल पहिल्या पंगतींत जेवायला बसली होती.

जेवण्याच्या वेळीं सारे गमतीनें, थट्टामस्करी करीत जेवत होते. आनंदही त्यांत बराच भाग घेत होता. एरव्हीं गंभीर असणारें वातावरण जेवण्याच्या वेळीं आनंदी असे. जेवण संपतांच सर्व उठले आणि आपआपल्या जागेकडे निघाले.

आनंद आपल्या झोपडींत आला. जेवणानंतर त्याला कसलेंच काम नसे. कांहीं वाचन करायचें अगर लेखन करायचें हें त्याचें ठरलेलें होतें पण आज त्यानें विचार केला जीवनकडे जाऊन गप्पा गोष्टी माराव्या.

तो उठला आणि त्याच्या झोपडीजवळ आला. झोपडीचा दरवाजा उघडाच होता. आंत येतांच त्याला कळून आलें—आपण उगीच आलों इथं—

जीवन आणि कमल खिडकीजवळ एकमेकांना बिलगून उभीं होतीं. जीवननें तिचा एक हात आपल्या हातांत घेतला होता आणि दुसरा हात तिच्या कमरे-भोंवतीं टाकून तीं बागेकडे बघत होतीं.

आनंदला तें पहावेना. त्याला काय करावें हें सुचेना. जावें तर बरें वाटेना. त्यांना हांक मारावी तर तें योग्य वाटेना. तो तसाच चाहूल न लागूं देतां बाहेर आला. बाहेरून जीवनला हांक मारली व पुन्हा आंत आला. उद्देश इतकाच कीं, त्यांना एकमेकांपासून दूर सरण्याचा इशारा द्यावा—

पण तो इशारा कांहीं फारसा लागू पडला नाहीं. कारण तीं एकमेकाला बिल-गूनच त्याच्या स्वागतासाठीं उभी होती. आतां मात्र त्याला वाटलें आपण बाहेर गेलों तो सरळ इथून गेलेंच पाहिजे होतें. तरी पण फारसें तिकडे लक्ष न देतां तो खाटेवर जाऊन बसला.

जीवनही त्याच्या शेजारीं जाऊन बसला. आनंद बसतांना खबरदारी घ्यायला विसरला नव्हता. मुद्दाम तो खाटेच्या टोकालाच बसला होता. हेतु हा कीं शेजारी जीवनच बसावा.

जीवन बसतांच आनंदानें विचारलें, "काय रे जीवन, असें एकाएकीं येण्याचें कसें झालें ?"

"एकाएकीं ह्मणजे आधीं न कळवताना ? अरे ह्मटलें तुला जरा आश्चर्य-चकीत करून सोडावें !" जीवन ह्मणाला.

" इतक्या दिवसांनीं तुला माझी आठवण झाली ह्मणायची ! " आनंद ह्मणाला.

" खरं सांगू तुला आनंद ? पहिली दोन वर्षे मला तुझी फार फार आठवण यायची पण पुढें हिच्या सहवासांत मला तुझी आठवण झालीच नाहीं. तुझीच काय मला कशाचीही आठवण रहात नसे. पण परवां वर्तमानपत्रांत तुझ्या आश्रमाचें नांव वाचलें, मनाशीं निश्चय केला आतां तुला भेटायला जायचेंच. तूं एक आह्माला विसरलास पण आह्मीं कांही तुला विसरलों नाहींत."

" मी कुणालाच विसरलों नाहीं. रात्रीं जेव्हां मीं बिछान्यावर पडतों तेव्हां मला माझ्या गत आयुष्याची आठवण येते. त्यावेळीं मला तुझी आठवण येते. वाटतें, तुला आईला आणि बाबांना भेटायला जावें. पण पुन: विचार येतो, इकडच्या कामाचें काय ? त्यामुळें मी कुठेंच जात नाहीं सहसा ! "

" तूं हें एवढें लटांबर मागें लाऊन घेतलें आहेस त्यापासून त्रास नाहीं का होत तुला ! "

" नाहीं कसा ? पण सांगणार कुणाला ? देशाच्या, लोकांच्या हितासाठीं हे त्रास सहन केलेच पाहिजेत. त्याशिवाय गत्यंतर नाहीं. "

"तें खरें पण त्या बरोबर आपल्या सुखाचाही अवश्य विचार केला पाहिजे."

" मी कुठं नाही ह्मणतों ? देशाची सेवा हेंच माझें सुख ! इतर सुखें मला वर्ज आहेत."

" खरं सांगूं का तुला ? तूं कितीतरी बदलला आहेस हल्ली !" जीवननें म्हटलें.

"तें कसं बुवा ? माझ्या प्रकृतीवर कांहीं परिणाम झाला नाहीं. आहे तशीच तर आहे." आनंद म्हणाला.

" तुझें बाह्यांग बदललें नाहीं पण अंतरंग मात्र फार बदललें आहे !"

" खरंच ?" आनंदनें विचारलें.

" लागलास थट्टा करायला ? खरंच आनंद, चार वर्षांपूर्वी तूं किती आनंदी, खेळाडु वृत्तीचा होतास ! कुठें गेलें सारें आतां ? किती गंभीर बनलास तूं ? तुझ्यांतला थट्टेखोरपणा तर दिसत नाहींच. नाहींतर तुझें बोलणें थट्टेशिवाय नसायचेंच !"

"तुझ्यातरी स्वभाव किती बदलला आहे ह्याची तरी तुला जाणीव आहे का ?"

"माझा स्वभाव बदलला तर त्यांत नवल तें काय ? कुठचा तरुण लग्न झाल्यानंतर पूर्वीच्याच स्वभावाचा राहिला आहे ?"

"होय ना ? माझंसुद्धां लग्न झालंय. सेवा हीच माझी सखी !"

दोघेहि बराच वेळ गप्प होते. नंतर त्यांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी सुरू झाल्या.

बराच वेळ गेल्यावर आनंद म्हणाला, "आतां जातों झोंपायला मी !"

"बसरे थोडा वेळ !"

"नको वेळ झालीय माझी झोपायची. झोप हीच माझी विश्रांति त्यामुळें..."

"बरं जा झोंप तूं !"

"तुम्हीं सुद्धां झोपा. इथं घाबरण्याचें वगैरे कांहीं एक कारण नाहीं. दरवाजे उघडे असले तरी कोणी आंत यायचें नाहीं !"

"घाबरायचें काय त्यांत ?" जीवन हंसत म्हणाला.

"बरं तर. कांहीं लागल्यास सांग म्हादवाला. तो असेलच इथं."

आनंद तेथून बाहेर पडला आणि आपल्या झोपडींत आला. त्याची झोपण्याची वेळ झाली होती पण त्याला झोप येईना. अख्या दिवसांत घडलेले प्रसंग त्याच्या नजरेपुढून जाऊं लागले. एवढा वेळ मनाचा खंबीरपणा त्यानें राखून ठेवला होता तो आतां ढासळूं लागला. त्याच्या मनांत नाना विचार येऊं लागले—

जीवनाची अनपेक्षित भेट झाल्यापासून आपल्याला आनंद झाला पण कमलच्या स्पर्शानें तो आनंद ढासळूं लागला. मनाची बेचेन होऊं लागली. आजपर्यंत आपल्या मनानें सर्वस्वावर विजय मिळवला होता. तो विजय ढासळूं पहात आहे. कां हें असे व्हावें ? माणुस हा सुखासाठीं झटतो. तो एक निसर्गाचा कायदाच आहे. खोटें आहे का तें ? आपण लोकांसाठीं झटतो, देशासाठीं झटतो, कां झटतो आपण ? स्वत:ला सुख मिळावें म्हणूनच ना ? मग आपण सुखी आहोंत कां ? छे ! मनाला खरेखुरें समाधान मिळत नाहीं. कुठे चुकतें आपलें ? काय कमी आहे आपल्या सुखांत ?"

जीवन आणि कमल किती सुखी आहेत. जीवनला तिच्या शिवाय चैन पडत नाहीं. खरोखरच का पुरुषाला स्त्री वांचून रहातां येणार नाहीं ? स्त्रीपासूनच

माणसाला खरें सुख मिळतें का? छे! स्त्री पुरुषाच्या कर्तव्याआड येते. तिचा मोह तोडला पाहिजे. स्त्रीचा मोह माणसाला मागें खेचतो. खरें कार्य करायचें आहे तर स्त्रीचा पाश तोडला पाहिजे. पण तसं करूनसुद्धां मला का समाधान होत नाहीं? कशाची तरी उणीव कां वाटते? आमची ही एवढी धडपड कशाला चालली आहे?

जीवन कमलच्या सहवासांत आपल्याला विसरत चालला. तारा आपला नवरा दुष्ट असतांनासुद्धां त्याच्याकडे परत गेली! कां गेली? तिला आश्रमांत का सुख मिळत नव्हतें? काय कमी होते तिला? जीवनचें म्हणणें खरें आहे कां? "पुरुष आणि स्त्री या कितीही दुष्ट, निर्दय, कठोर अंतःकरणाच्या असल्या तरी त्यांना एकमेकांचा सहवास प्रिय असतो. निसर्गाचा कायदा आहे हा!" खरें आहे कीं खोटें आहे हें? ह्या कायद्याला अनुसरूनच कां ती नवऱ्याकडे गेली? मग त्यांत कोणाचें चुकलें? आपलेंच कां?

आपण तरी कां हा सारा खटाटोप करतो? मनाला शांतता मिळावी म्हणूनच ना? सुधाचा त्याग कर्तव्य म्हणून केला. त्यावेळीं वाटलें होतें स्त्री प्रेमाचा मोह हा कर्तव्याआड येतो. मोह झुगारला पाहिजे. मोहावर विजय मिळवलाच पाहिजे. पण खरोखरच कां आपल्याला विजय मिळाला? का आपण स्वतःची वंचना करीत आहोंत? आपण स्वतःची फसवणूक करीत नाहीं ना? खरोखरच का माणसाला स्वतःचें सुख झिडकारून दुसऱ्यासाठीं झगडतां येणार नाहीं? कां नाहीं? आपण नाहीं तसे झगडत? मग त्यापासून समाधान कां नाहीं मिळत? निसर्गावर विजय मिळवितां नाहीं का येणार! आपल्याला कमल म्हणत होती, "निसर्गावर माणसाला कधींच विजय मिळवितां येणार नाहीं. जो निसर्गावर विजय मिळवील, खराखुरा विजय मिळवील तो महात्मा होईल!"

इतके दिवस मिळविलेला हा विजय कां ढासळूं पहातो? जीवन म्हणतो, आपण फार बदललों आहोंत. खरोखरच का मी बदललो आहे? छेः चुकतोय तो. त्याला कुठें पत्ता लागला आहे माझ्या अंतरंगाचा? माझें अंतरंग निसर्गावर विजय मिळवण्यासाठीं झटते आहे पण त्याला विजय मिळवतां येत नाहीं म्हणून त्याला त्यांत बदल वाटतो. केव्हां संपणार हा झगडा? स्त्रीची आपणाला एवढी कां भीती वाटते? रजनीला आपण बोलावूं नको म्हणून कां सांगितलें?

तिचा आपणाला किती उपयोग झाला असता ! कितीतरी गरिब जनतेला तिचा फायदा झाला असता. पण आपण कां नाहीं म्हटलें ? तिची एवढी भीति कां वाटावी आपणाला—

असे सारखे विचार त्याच्या मनांत येत होते. त्याच्या मनाची शांतता ढासळली होती. दिवसाचें सिंहावलोकन करतां करतां त्याला आपल्या पूर्व आयुष्याची आठवण झाली. जीवनचें बोलणें आठवलें. " तूं फार बदलला आहेस !"

त्यानें एक चोपडी काढली. त्याचे त्यांत अनुभव होते. थोडक्यांत तें एक आत्मकथनच होतें. आयुष्यांत घडलेल्या महत्वाच्या प्रसंगांचें त्यांत टांचण केलें होतें.

मध्येंच त्यानें वहि उघडून वाचण्यास घेत, मधून मधून कांहीं पानें सोडून तो वाचुं लागला—

# २

घर सोडून जाणें वाटतें इतकें सोपें नसतें. घर म्हणजे एक मोठा आधार वाटतो. त्यांत कितीही हाल अपेष्टा सोसाव्या लागल्या, तरी त्याची माया जात नाहीं. मन घराकडेच वळतें. माझें आयुष्य कांहीं हाल अपेष्टांत गेलें नव्हतें. मग घर सोडून जातांना मला वाईट वाटल्यास नवल तें काय ? आईची माया ! तिच्याशीं निकटचें साम्य कशाचें असेल तर घराची माया ! आईपासुन दूर जाण्यास लहान बालकांनाच काय, पण मोठ्यांना सुद्धां वाईट वाटतें. तिचा त्यांना एक मोठा आधार वाटतो. आणि घर सोडतांना ? लहान घ्या अगर वृद्ध घ्या. डोळ्यांत अश्रु आल्याशिवाय रहात नाहींत. घर म्हणजे दुसरी आईच !

घरापासुन शेंकडो मैल दूर असलेल्या मुंबईत मला जायचें आहे. माझा जन्म ह्या खेड्यांत झाला. इंग्रजी चौथीपर्यंत शिक्षणही इथंच झालं. ह्या पुढचं शिक्षण इथं होणें शक्य नाहीं. बाहेरगांवीं जाऊन शिक्षण घेणेंच योग्य आहे.

मुंबईला बाबांचे एक मित्र रहात आहेत. त्यांच्याकडे रहाण्याची सोय केली आहे वडिलांनीं. बरोबर वडीलही येत आहेत पण भीति वाटते. भीति म्हणजे काय हें मला ठाऊक नव्हतें पण आजच काय ती समजली.

मुबईला तर जायलाच पाहिजे. पण इकडचा मोह सोडवत नाहीं. घर सोडायचं जिवावर येतें. दुसरें माझा जन्म ह्या गांवांत झाला. आजपर्यंतचें आयुष्य सुखांत ह्याच गांवांतील मुलांबरोबर घालवले. त्यांनाही सोडून जायला वाईट वाटतें. मुंबईला गेलेच पाहिजे असें जेव्हां मला वडिलांनीं सांगितलें होतें तेव्हां मला किती तरी आनंद झाला होता. मुंबईचे वैभव मला माहित होतें. तिथं एकटेच रहायला

मिळणार, पाहिजे तसे भटकण्यास मिळणार, मजा करायला मिळणार ह्या विचारांनीं मला आनंदही झाला होता. मी मुंबईला जाण्यास उत्सुक होतो. पण जसजसे दिवस जवळ येत चालले तसतसा माझा आनंद, माझी उत्सुकता नष्ट होऊं लागली. एवढ्या मोठ्या मुंबईत मी एकटाच रहाणार, जवळपास मायेचें कोणी नाहीं. असे विचार येऊन भीति वाटूं लागली. मनांत आलें, इथंच जर पुढच्या शिक्षणाची सोय असती तर ? तर——

तर मग मला मुंबईला जावें लागलें नसतें. आजपर्यंत शाळेंत जसा मजा करीत वेळ घालवला, तसाच घालवला असता. मित्रांबरोबर शाळा चुकवून नदी-कांठीं गेलों असतों, नदींत पोहलों असतों, खेळलों असतों. पेरू, चिंचा, आंबे चोरले असतां, मजा मजा केली असती.

पण हें आतां कुठून येणार ? मुंबईत असे मित्र मला भेटतील काय ? तिथल्या शाळेंत म्हणे हजार हजार मुलं असतात. पन्नास साठ मास्तर असतात. मास्तर फार कडक असतात. तिथल्या शाळेंत माझा वेळ जाईल काय ? इथल्या सारखीं मजा तिथं करतां येणार नाहीं. इथल्यापेक्षां तिथं मला स्वातंत्र्य जास्त मिळेल. पण इथल्या स्वातंत्र्याची सर तिथल्या स्वातंत्र्यास येईल काय ? इथं मी कांही केलं तरी मला घरचा आधार होता. नुसत्या आधारावर मी कांहींही करण्यास तयार होतों. कोणाची भीती बाळगत नव्हतों. कोणाचीही पर्वा करीत नव्हतों——

एकदां मास्तरांनीं मला मारलें. आम्हीं शाळा चुकवून गेलों होतों. मास्त-रांच्या हें लक्षांत आलें. आम्हांला पकडण्यासाठीं मास्तर मुद्दाम नदीकांठीं येत होते. आम्हीं हें पाहिलें आणि रस्त्यावरच्या एका झाडावर चढून लपून बसलो. मास्तर पुढें जातांच आम्ही पुन्हा शाळेत हजर झालों. मास्तर आम्हाला शोधून परत आले. आम्ही न मिळाल्यामुळें ते रागावलेच होते. आम्हांला शाळेंत पाहून तर त्यांचा राग भडकला पण शाळेंत हजर असल्यामुळें त्यांना कांही करतां येण्या-सारखें नव्हतें. राग आंतल्या आंत गिळणेंच भाग होते. ज्वालामुखी बाहेरून कितीही शांत असला तरी तो आंतून सारखा धुमसतच असतो. त्याचा केव्हां स्फोट होईल हें सांगतां यायचें नाहीं. मास्तरांचेंही तसेंच झालें. अभ्यास बरोबर झाला नाहीं ह्या सबबीवर त्यांनी आम्हांला बेदम मार दिला. मला तर ह्याचा फार राग आला. मनांत म्हटलें त्याचा बदला घेईन तरच नांवाचा आनंद ! दुसऱ्या

दिवशीं मास्तरांच्या खुर्चीवर कुसलीची बोंडें आणुन टाकली. मास्तर मोरे ऐटीनें आणि विजयानें आमच्याकडे पहात खुर्चीवर बसले. थोड्याच वेळांत त्यांची हालचाल होऊं लागली. मुलांच्या समोर खाजवण्याची त्याना लाज वाटूं लागली. आम्हीं तर त्या गावचेच नाहीं असें दाखवून बसलों होतों. मास्तरना बसणें अशक्य झालें. रागानें एकदम ते उठून गेले. कांहीं बोलले नाहीं की कांहीं केलें नाहीं. मात्र दुसऱ्या दिवसापासून आमच्या वाटेस जाण्याचें त्यांनीं सोडून दिलें. मात्र खुर्चीवर बसतांना आधीं हात लावून पाहिल्याशिवाय ते कधीं बसले नाहींत.

असे किती तरी प्रसंग सांगतां येतील. हे सारे प्रकार घरच्या आधारावर केले होते. घरीं हे सर्वांना पसंत पडणार नाहीं हें ठाऊक होतें. तरी कांहीं कमी ज्यास्त झालें तर घरचा आधार मिळणारच हें माहित होतें.

पण ह्या पुढे हा आधार मिळणार नाहीं. आधार मिळो किंवा न मिळो पण आधार आहे ह्यावरच हिंमत वाटते, अंगांत धैर्य येतें; पुढचे पाऊल टाकण्यास भीती वाटत नाहीं. आतां हा आधार माझ्या पासून शेंकडो मैल दूर राहाणार. त्याचा मला फारसा कांहीं उपयोग होणार नाहीं.

मी ज्याच्याकडे रहाणार त्या घरचीं माणसें कशी असतील, ह्या बद्दल विचार मनांत येऊं लागले. तीं प्रेमळ, बोलकीं असतील कां? कां तुसड्या वर्तनाची, कठोर हृदयाची असतील? वडिलांचे ज्या अर्थी ते मित्र आहेत त्या अर्थीं मला चांगल्या तऱ्हेनें वागवतील. वडील माझा खर्च कांहीं त्यांच्यावर टाकणार नाहींत. सर्व खर्च देणार आहेत त्याअर्थीं माझा भार कांहीं त्यांच्यावर पडणार नाही. तरी पण मनुष्य स्वभाव कसा असेल हें कुणी सांगावें?

उद्यां सकाळीं जायचें आहे. पण आतांपासूनच वाईट वाटतें. बारा वाजायला आले तरी झोंप येत नाहीं. मनांत सारखे तेच तेच विचार येतात. पुन्हां पुन्हां तीच तीच भीती डोळ्यासमोर उभी रहाते. झोप दूर जाते. मनालाच जर शांती नाहीं तर झोप तरी कशी येणार? उगीच जास्त विचार करण्यांत तरी काय हाशील आहे. व्हायचें आहे तें कांहीं मी जास्त विचार केल्यानें थांबणार आहे? दुःख हें सहन केलें पाहिजे. त्यांतूनच एखादेवेळी सुख निर्माण होतें. आणि सुखांतून दुःख जन्माला येतें. काय होईल तें पाहिलें पाहिजे.

उद्यां जातांना बाबा बरोबर येतील हेंच काय तें तेवढ्यांतले तेवढ्यांत समाधान !

* * *

मुंबई पाहिली. मी ऐकलें होतें त्यापेक्षां किती तरी जास्त पाहिलें मी. पाहून आनंद झाला. ह्यापुढें इथं रहाणार ह्याचा थोडा अभिमानही वाटला ! पण तो आनंद थोडाच टिकला. ज्या मित्राच्या घरी आलों त्याच्या घराच्या दरवाजावरच नांव वाचलें सदानंदराव बी. मराठे. मराठे कांहीं आह्माला न्यायला स्टेशनवर आले नव्हते. घंटी दाबतांच एका सुंदर मुलीनें दरवाजा उघडला. तिला पाहून बरं वाटलें. तिनें विचारलें,

" कोण पाहिजे तुह्मांला ? "

" सदानंदराव मराठे इथंच रहातात ना ? " बाबांनीं विचारलें.

" होय ! त्यांना बोलावतें हं ! " असें म्हणून ती आंत गेली.

मनाशीं म्हटलें, " एकूण हीं आमच्या बाबांच्या मित्राची मुलगी तर. ठीक आहे. बघतां येईल पुढें ! "

थोड्याच वेळांत ती मुलगी एका इसमाबरोबर आली. सदानंदरावच होते ते. बाबांना पाहून आनंद दर्शवून ते म्हणाले, ' ये ये विनायक. ! '

आमचं जेवण वगैरे ठीक झालें. माझ्या शाळेबद्दलचा विचारही पक्का झाला. माझें मन मात्र त्यांत रमत नव्हतें. माझ्या मनांत निराळेच विचार येत होते. सुधा ! माझें मन तिच्या भोवतींच गोते खात होते. ती बोलायला कशी असेल. आपल्याशीं बोलेल कीं नाहीं ह्याचा विचार मी करीत होतों.

रात्रीं झोपेपर्यंत ती कांहीं माझ्या समोर आली नाहीं. एवढी कां ती दूर रहावी ह्याचा मला विचार पडला. म्हटलें जाऊं दे काय करायचें आहे आपल्याला तिच्याशीं !

रात्रीं झोपतांना बाबा म्हणाले, "आनंद आतां तुला हें आपलेंच घर समजून राहिलें पाहिजे. सर्वांशीं प्रेमानें वाग. कोणाशीं भांडूं नकोस. त्यांनीं कांहीं म्हटलें तरी रागावून प्रत्युत्तर करूं नकोस. तुला कांहीं कमीजास्त लागल्यास मागून घे. संकोच बाळगू नकोस. इतक्या लांब तुला मी ठेवतों आहे. हा आपला गांव नाहीं. सांभाळून रहा आणि अभ्यास कर ! "

मी गप्प राहून ऐकत होतों.

थोड्या वेळानें वडिल म्हणाले, " सुधा ज्या शाळेंत जाते त्याच शाळेंत तूं जावें असें ठरलें आहे. तुला इथची कांहीं माहिती नाहीं त्यामुळें तें योग्यच आहे. ती चौथींत आहे. तिच्याशीं उगीच भांडूं वगैरे नकोस. तुला काय पाहिजे काय नको हें तिला सांगितलें तरी चालेल. तुझ्यापेक्षां दोनतीन वर्षांनीं ती लहान आहे. हुशार आहे पोरगी."

माझ्या मनांत विचार येऊं लागले. सुधेच्याच शाळेंत आपण जाणार. तिच्याबरोबर जाणार, तिच्याबरोबर येणार. आम्हीं बोलत शाळेंत जाणार. शाळा किती लांब असेल. असे विचार माझ्या मनांत येतात तोंच बाबा बोलूं लागले.

" आनंद आणखी, एक सांगायचें राहिलें तुला. सगळ्यांच्या स्वभावाशीं मिळतें घे. मनुष्य आपल्या स्वभावानुसार वागणार. त्याचा स्वभाव कोणी बदलू शकणार नाहीं. त्याच्या मताप्रमाणें वागणें हा त्या रोगावर उपाय. घरांतल्या सर्वांचा स्वभाव समजून घे आणि त्याप्रमाणें वाग. "

मला ह्या बोलण्याचा अर्थ समजला नाहीं. ह्या घरांत विचित्र स्वभावाचीं माणसें आहेत कां? नाहीं तर बाबांना त्याविषयींचा उल्लेख करण्याची काय जरूरी होती?

"मी उद्यां इथून जाणार आहें!" बाबा म्हणाले.

इतका वेळ मी नुसतें त्यांचें बोलणें ऐकतच होतों. आतां बोलण्याची पाळी आली. मी म्हणालों, "उद्यांच कशाला, थांबाना आणखी थोडे दिवस!"

"छे! तुला थोडे दिवस करमणार नाहीं हें खरें आहे. पण थोड्याच दिवसांत तुला सारें कांहीं सहज घडून आल्यासारखें वाटेल. आणि केव्हा आज ना उद्यां कधींतरी मला सोडून रहाण्याची पाळी तुझ्यावर येणारच कीं नाहीं? त्यासाठीं अगोदरच तयारी असलेली चांगली."

" पण बाबा, तुम्ही इथंच येऊन कां रहात नाहीं? तिकडे तरी आतां कोण आहे? आपण दोघे इथंच राहूं!"

"छे! मला शहरांत रहाणें योग्य वाटत नाहीं. मला तें जमणारच नाहीं. मला शहराचा तिटकारा येतो. मला ह्या गजबजलेल्या वस्तींत मुळींच चैन पडत नाहीं!"

एकदां वडिलांनीं नाहीं म्हटल्यावर त्यांना पुन्हा रहा म्हणून आग्रह करण्यांत कांहीं हाशील नाहीं हें समजत असल्यामुळें मी तसा प्रयत्न केला नाहीं. गप्प पडून राहिलों. पण झोप येईना.

गांवाची आठवण होऊं लागली. मित्रांची आठवण होऊं लागली. कोणा-कोणाला मी उगीच मारलें होतें, त्यांची आठवण आली. आणि आतां वाईटही वाटूं लागलें. गावांत मला त्याबद्दल कधींच वाईट वाटलें नाहीं. कारण ते सदोदित माझ्याजवळ असत. पण एक दिवस दूर जाण्यानें मला त्यांच्याबद्दल पूर्वी न वाटणारें प्रेम वाटूं लागलें. त्यांची त्याबद्दल क्षमा मागावीशी वाटूं लागली. जवळ येण्यांत प्रेम उत्पन्न होतें तर दूर जाण्यानेंही प्रेम उत्पन्न होतें ह्याची जाणीव मला झाली.

ह्या सर्व मित्रांची, ज्याची ज्याची म्हणून ओळख होती, पण ज्यांच्याबद्दल मीं कधींच विचार करण्याचा प्रयत्न केला नाहीं अशा किती तरी व्यक्ति मला आठवूं लागल्या. गांवच्या सर्व झोपड्या आठवूं लागल्या. कुठें दगड आहेत, कुठें खळगा आहे ह्याचीसुद्धां आठवण होऊं लागली आणि त्याचा परिणाम एवढाच झाला कीं, माझ्या डोळ्यांतून अश्रु येऊं लागले.

घरांतून बाहेर पडतांनासुद्धां असेच अश्रु माझ्या डोळ्यांतून आले होतें. माझ्या मायेचें असे वडिलच काय ते होते आणि तेच माझ्याबरोबर येत होते. तरी घरांतून बाहेर पडतांना मला अश्रू आवरेनात. घरांत मायेचें कोणी नव्हतें. तरी घर म्हणजे विश्रांतिस्थान. ह्याच घरांत मी सुखदुःखांत राहिलों होतों. ह्याच घरानें माझा योग्य तऱ्हेनें सांभाळ केला होता. घर म्हणजेच आई ! तें सोडून जातांना अश्रू आले. नाहीं, ते यायलाच पाहिजे होतें.

आज तें आठवूत जास्त रडायला येतें. आतांचे माझे अश्रु बघायला कोणी नाहीं. खोलींत काळोख आहे. अंधारसुद्धां माणसावर कधीं कधीं फार उपकार करतो.

* * *

सुधाची आणि माझी मैत्री लगेच जडली. आम्ही शाळेंत बरोबर जातों. शाळेंतून बरोबर येतों. आम्हांला पाहून कांहीं मुलें हंसतात. कांहीं मुलीही आमच्याकडे विचित्र नजरेनें पहातात असें वाटतें. मुलांच्या चेष्टा कांहीं औरच असतात.

कोणी म्हणतात, " काय पोरगी आहे ! "

" फक्कड पोरगी मिळाली बुवा ! "

" नशीब तुझे बेट्या ! "

मला ह्यापासून आनंदच होतो, मला अभिमान वाटतो. सुधा सुंदर आहे. शाळेंत तिच्यासारखी दुसरी मुलगी मिळणें अशक्य आहे. पुष्कळ कादंबऱ्यांत मी तरुण मुलींची पुष्कळ वर्णनें वाचलीं आहेत. पण सुधेपुढें सर्व फिकीच. तिचें वर्णन करण्याचा मोह आवरत नाहीं पण लिहिण्याची छाती होत नाहीं. सौंदर्याची लतिका, तारुण्याची कलिका—छे: जमायचेंच नाहीं. उलट आपलेंच हंसें व्हायचें !

माझी कल्पनाच फोल ठरली. मला वाटलें होतें, इकडच्या शाळेंत गांवच्या सारखी मजा यायची नाहीं. मजा असते शाळेंत. आमचे मास्तर जरा बावळट आहेत, त्यामुळें मुलांवर त्यांचें वजन पडत नाहीं. मुलें त्यांना घाबरत नाहींत. वर्गांत दंगा फार होतों. कसें तरी करून मास्तरना सतवायचें. माझाच भाग जास्त असतो त्यांत. माझ्या जोडीला माझा मित्र जीवनही असतो. खरोखर किती लवकर आमची मैत्री जमली. आमचे गांवचे मास्तरना सतवण्याचे प्रयोग सांगता सांगता तर मी इतका गढून जातों कीं, तास केव्हां संपतो हें समजत नाहीं. मी, जीवन आणि इतर आमच्यासारखीं मुलें, मग मस्ती, दंगा हा असायचाच ?

आज शाळेंतून येतां येतां सुधेला मास्तरला कसं सतावलं हें सांगितलें त्याबरोबर ती म्हणाली, "तुम्ही पोरं म्हणजे मुलखाची वात्रटच !"

"आणि पोरी म्हणजे मूर्तीमंत सभ्यतेचे पुतळेच की नाही !" मी म्हणालो.

"आहोंतच आम्ही !"

"काय पण बोलते आहे ! आम्ही आपले आडपडदा न ठेवतां सरळ बोलतों इतकेंच. पण तुम्ही मुली गुपचूप बोलणार. तो कसा आहे, त्याचें नाक कसें आहे, तो कसा बोलतो, ह्याची आपआपसांत तुम्ही नाहीं कां टिंगल करीत ? तुम्हांलाच तर मुलांच्या उठाठेवी जास्त पाहिजेत !"

"आणि तुम्ही जसे कांही साधूच की नाहीं ! रस्त्यानें जातांना मुलीकड पाहून सरळ तिची टिंगल करतां, तिला नकोनकोसें करून सोडतां !"

"त्यांत कुठं बिघडलें ? आणि तुम्ही चारपांच जणी असल्या कीं सरळ जातां वाटतं ? हल्लीं मुलीच जास्त टिंगलखोर बनल्या आहेत !"

"मीं म्हणतें त्यांनीं कां बनूं नये? तुम्हीं मात्र आमची वाटेल तशी मस्करी करावी आणि आम्ही गप्प रहावें?

"तूं इथंच चुकतेस! मुलीच जर मुलांचीं टिंगल करूं लागल्या तर मुलांना जास्त स्फुरण चढतें आणि त्याचा उपसर्ग मात्र दुसऱ्या मुलींना भोगावा लागतो!"

"मग मुलींनी जें होतें तें स्वस्थ राहून पहावें लागतें!"

"अर्थात!"

"अहा रे पुरुष! मुली म्हणजे बाहुल्या वाटते मुलांच्या हातच्या? पुरुष म्हणजे स्वार्थीच!"

"आतां बाकी तूं खऱ्या जातीवंत स्त्रीसारखी बोललीस!"

आमचें हें किती वेळ चाललें असतें कुणास ठाऊक पण घर जवळ आल्यामुळें आम्हांला आमचें बोलणें थांबवावें लागलें.

सुधा लवकर चिडते. त्यामुळें मला तिला चिडवण्यास मजा वाटते. ती जशी लवकर चिडते तसा तिचा रागही लवकर शांत होतो. त्यामुळें आमच्यांत भांडण असें मुळींच होत नाहीं. तिचा स्वभाव प्रेमळ आहे पण घरांतल्या मंडळींचा कुठं तसा आहे?

तिची आई स्वभावानें प्रेमळ आहे पण तिचा स्वभावच कांहीं असा विचित्र आहे कीं, ती कुणाशीं फार बोलणार नाहीं. ती नेहमीं आपल्या कामांत दंग असते.

आणि सदानंदराव? अरे बापरे! ते तर मुलखावेगळेच.

कधीं कुणाशीं बोलणार नाहींत. कुणी कुणाशीं बोललेलें त्यांना खपत नाहीं. दुसऱ्याकडे जाणेही त्यांना आवडत नाहीं. कुणाशीं प्रेमानें तर कधींच बोलायचे नाहींत. सुधा त्यांची एकुलती एक मुलगी! पण छे:! कधीं प्रेमानें हांक मारायचे नाहींत. नियमितपणाचें तर त्यांना फार वेड. जेवणाची वेळ जरा बदलली तर घर अंगावर घेत. जेवणाच्या वेळी न बोलतां जेवण चाले. फिरायला गेलां तरी वेळेवर हजर झालेंच पाहिजे. अकरा वाजल्या नंतर कुणी जागायचें नाहीं, सहाला सर्वांनीं उठलेंच पाहिजे.

मला हें सारें सहन होत नाहीं. पण माणसाच्या स्वभावावर औषध नाहीं. मला ते काहीं रागें भरत नाहींत पण त्यांचा दरारा वाटतो. घरांत सर्वांची हीच स्थिति. कोणाची तोंडातून ब्र काढण्याची छाती होत नाहीं. ते घरांत नसतांना आनंदी वातावरण असतें इतकेंच. घरांत येतांच सारे शांत गंभीर वातावरण!

मला वाटतं, ह्या एकलकोंड्या माणसाला गृहसौख्य म्हणजे काय हें
हीतच नसणार. मला तरी कुठं माहीत आहे? पण घरांत उत्साही, आनंदी
तावरण असलें पाहिजे. एकामेकांशीं प्रेमळपणानें बोललें पाहिजे, एकमेकांच्या
खदु:खाची चौकशी केली पाहिजे. ह्यांतच गृहसौख्य असणार.

मला वाटतें लष्करांत काम केल्यामुळें त्यांचा मेंदू साफ नाहींसा झाला आहे. लष्कराची शिस्त, गंभीरपणा, शांतता त्याशिवाय त्यांना कांहींच दिसत नसावें. त्यांचा जन्मच लष्करांत गेला आणि सध्यां ते सरकारी गोटांत बडे अधिकारी आहेत त्यामुळें त्यांचा मेंदू इतका कांहीं सडला आहे कीं त्यांना कांहींच दिसत नाहीं. आपल्यामुळें इतरांना त्रास होतो ह्याची जाणीव तर त्यांना नाहींच, मग दुसऱ्याच्या भावना त्यांना कशा समजणार?

मला तर ते मुळींच आवडत नाहीं. वाटतें अशीं कडाकड उत्तरें द्यावी— पण इलाज नाहीं. गांवी माझ्या मर्जीप्रमाणें मला बोलतां फिरतां येई पण इथं त्यावर निर्बंधच पडला आहे. बाबांसाठी गप्प रहावें लागतें. नाहीं तर त्या— घरांत मी मुळींच रहायला तयार नाहीं निर्जीव वातावरण सारें.

नाहीं म्हणायला सुधा असल्यामुळें जेवढा वेळ जातो तेवढाच. सदानंद-रावांना चुकवून हळूहळू बोलून आह्मा कसातरी वेळ घलवतों. ते आपल्या खोलीतून सहसा बाहेर येत नाहीत. त्यामुळें आम्हीं बाहेर गच्चीवर राहून हळु हळु बोलून घेतो. संधी सांपडेल ती कांही दवडत नाहीं पण हे सारें निर्जिव वाटतें.

मनांत येतें, आम्ही हंसलों, खेळलों, बोललों तर ह्यांचें काय जातें? त्यांच्य मताप्रमाणें वागावे अशी सक्ति आमच्यावर कां?

काल मास्तर म्हणाले होते, "कांहीं माणसांना वाटतें, सर्वांनीं आपल्य म्हणण्याप्रमाणें वागावें, आपल्या मताप्रमाणें चालावें, आपण वागतो तसें वागा आपण करतो तसें करावें. त्याला आपल्या विरुद्ध वागलेलें खपायचें नाहीं. आप म्हणणें म्हणजे वेदवाक्य. निसर्गाचा कायदाच आहे तो एक. त्यावर उपाय ना त्याकडे लक्ष देऊं नये हेंच योग्य! आपलीं मतें दुसऱ्यांना जाचक होतील, त्यां उत्साहाचा, आनंदाचा, भावनांचा चक्काचूर होईल ह्याकडे लक्ष सुद्धां त्यांचें न तेव्हां त्यांना खुष करायचें तर त्यांच्या म्हणण्याप्रमाणें आपण वागतो अ बहाणा करायचा."

मला ह्या स्वभावाची पुरी माहिती असल्यामुळें मी मास्तरनां विचारलें होतें, " पण मास्तर, हा बहाणा करणें म्हणजे एक प्रकारें दुसऱ्यांना फसवणें आणि दुसरें स्वत:ची फसवणूक करण्यासारखें नाहीं का ? "

" खरं आहे तें. पण कांहीं व्यवहार असे असतात कीं, तेथें सत्यता कांहीं उपयोगाची नाहीं. खोटेपणानेच व्यवहार केला पाहिजे. खोटें कधीं बोलूं नये असें सांगतात, पण सर्वच गोष्टींत आपल्याला हा कायदा लागूं पडणार नाहीं. उलट त्या बद्दल त्रासच पडतील. म्हणून प्रसंगीं खोटा बहाणा करून वेळ मारूनच नेली पाहिजे हेंच योग्य आहे. आपल्या मतांची दुसऱ्यावर सक्ति करणें हाच मुळीं एक गुन्हा आहे. आपल्या भावनांचा कोंडमारा होतो त्यामुळें असल्या माणसाशीं खोटेपणाचाच बहाणा केला पाहिजे. नाहीं तर त्याच्या मताप्रमाणेंच वागलें पाहिजे. ह्याशिवाय दुसरा उपाय नाहीं." मास्तर म्हणाले होते.

मास्तरांचेंच म्हणणे खरें आहे. मी तरी कुठें त्यांच्या मताप्रमाणेंच वागतो ? त्यांच्या डोळ्यांना पाणी लावण्यासाठीं माझा हा सारा बहाणाच चालला आहे नाहीं का ? सुधा सुद्धां तशीच वागते.

वडिलांनीं त्या दिवशीं रात्रीं मला उपदेश केला तो त्यांना ह्या घरांतील सर्वांचा स्वभाव माहित असावा म्हणूनच. असला माझा स्वभाव बाबांना माहित होता मग त्यांनीं मला इथं कां ठेवलें? माझा उनाड, बंडखोर स्वभाव नाहींसा करण्याकरतांच कीं काय ?

* * *

म्हणण्यासारखें कांहींच होत नाहीं. दिवस येतात. जातात. घरांत तेंच तेंच वातावरण. कंटाळा येतो अगदीं. वर्ष गेलें पण दहा वर्षांचा काळ वाटतो. सुधा नसती तर मी ह्या घरांत राहिलों असतो किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं.

परीक्षा झाल्यानंतर एकदां गांवीं जाऊन आलों तोच काय तो मनाला विरंगुळा. कोंडवाड्यांतून सुटल्यासारखें वाटलें त्यावेळीं ! परत येतांना जीवावर आलें. पण करतों काय ? आलों. पुन्हा पूर्वीप्रमाणें सारें चालूं लागलें. बदल असा कांहीं नाहीं. शाळेंत आणि शाळेबाहेर जो वेळ मजेंत जातो तेवढाच.

सदानंदराव ज्यावेळीं घरीं असत त्यावेळीं मला भयंकर कंटाळा येई. त्यावेळीं मी वाचत बसत असे. हें वाचन अभ्यासाव्यतिरिक्त असे. त्यामुळें

मला पुष्कळ गोष्टी समजल्या. महात्मा गांधी, जवाहिरलाल यांच्याबद्दल पुष्कळ गोष्टी समजल्या आणि त्यांचा मोठेपणा, त्यांचा त्याग, मला समजून आला. त्यांच्याबद्दल पूज्यभावना माझ्या मनांत उत्पन्न झाल्या. मुंबईत येऊन हा एक फायदा मला झाला होता. दुसरा फायदा म्हणजे वर्तमानपत्र वाचण्याचा. त्यामुळें मला पुष्कळ ज्ञान मिळे. आमच्याकडे जें पत्र येई तें सरकारच्याच बाजूचें. कॉंग्रेसच्या विरूद्ध असे त्यांत सारें. पण मी ही उणीव शाळेंत भरून काढी. वर्तमानपत्राचें मला एक वेडच लागलें होतें.

ह्या व्यतिरिक्त माझें वाचन म्हणजे कादंबरी वाचन. त्यांत मला फार गोडी वाटे. पुष्कळ वेळां एका जोमांत मी एक एक कादंबरी वाचून काढली होती. शाळेच्या लायब्ररीमधून पुस्तकें मिळतात. शिवाय मी बाहेरच्या एका लायब्ररीमधून पुस्तकें आणित असे.

आजही मी असाच पुस्तक वाचीत बसलों होतों. महात्माजींचे ' सत्याचे प्रयोग' वाचत होतों. मला फार आवडलें होतें तें पुस्तक. कादंबरी वाचावी त्याप्रमाणें मी तें वाचत होतों. इतक्यांत सदानंदराव तेथें आले. सुधा त्यांना आबा म्हणे. त्यांना पहातांच मी थोडा दचकल्याशिवाय राहिलों नाहीं. दचकण्याचें कारण म्हणजे ते आजपर्यंत माझ्या खोलींत कधींच आले नव्हते. दुसरें म्हणजे त्यांना अभ्यासाव्यतिरिक्त इतर वाचन आवडत नसे. त्यांना त्याची आवश्यकता वाटत नसे. त्यामुळें मी दचकलों. माझ्या हातीं दुसरेंच पुस्तक होतें.

आंत येतांच त्यांनीं विचारलें, " काय, अभ्यास चालला आहे कीं काय ? "

होय असें सांगायचें माझ्या मनांत आलें. पण त्यांनीं पुस्तक मागितलें तर मग फजिती होईल म्हणून म्हणालों, " नाहीं. "

" मग कसलें पुस्तक वाचतोस ? कादंबरी असेल. आनंद, तुला सांगतों असें चालायचें नाहीं. तुम्हां विद्यार्थ्यांना काय करावयाचें आहे कादंबरी वाचून ? सारा पांचटपणा भरला असतो त्यांत. तुम्ही विद्यार्थ्यांनीं म्हणजे अभ्यास आणि आपण असें असलें पाहिजे !"

त्यांच्या ह्या बोलण्यावरून मला त्यांची कींव आली, सांगावेसें वाटलें, " तुम्हांला वाटतें तशा कादंबऱ्या नाहींत. त्यांतही घेण्यासारखं पुष्कळ आहे. आणि दुसरें , विद्यार्थ्यांनीं आपण आणि अभ्यास ह्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं असें

समजण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. हें क्रांतियुग आहे. तुम्हीं आपल्याच युगांत आहांत!" पण बोललों नाहीं.

"कसलं बघुया पुस्तक!" असें म्हणून माझ्या हातून त्यांनीं पुस्तक काढून घेतलें. पुस्तकावरचें नांव वाचतांच ते रागानें ओरडले, "सत्याचे प्रयोग! प्रयोग करणारा हा कोण मोठा लागून गेला आहे? ह्या मूर्खानें सर्वांना बिघडून ठेवलें आहे. काय तर म्हणे स्वातंत्र्य पाहिजे. असल्या प्रयोगांनीं काय स्वातंत्र्य मिळणार आहे? आपल्याबरोबरच इतरांना मूर्ख बनवण्याचा प्रयत्न करतो आहे!"

त्यांच्या ह्या बोलण्यानें मला राग आला. मी एकदम म्हणालों, "त्यांना मूर्ख ठरवणारे तुम्ही फार शहाणेच कीं नाहीं!"

त्यांनीं माझ्याकडे एकदम आश्चर्यानें आणि रागानें पाहिलें. त्यांना प्रत्युत्तर ऐकण्याची संवय नव्हती. मी सुद्धां त्याना फारशीं प्रत्युत्तरें देत नव्हतों पण आज मात्र तें सहन करवेना म्हणूनच मी तें बोललों.

रागानें ते म्हणाले, "आनंद! फार बोललास तूं आज!"

"फार बोललों नाहीं मी!"

"तुला सांगून ठेवतों, असलें हें वाचन इथं चालायचें नाहीं!"

"पुस्तकें वाचणें हें वाईट मुळींच नाहीं. पुस्तकें न वाचणें हा एकादे वेळीं गुन्हा होईल!"

"योग्य अयोग्य तूं मला शिकवूं नकोस. मला सारें कांहीं समजतें. मी सांगितलें तेंच ठीक आहे!"

असें म्हणुन ते बाहेर गेले. माझा रागाचा पारा उतरला नव्हता. आजची ही गोष्ट स्वाभिमान दुखवणारी होती. किती तरी वेळ असाच गप्प बसून मी विचार करत होतों.

इतक्यांत हळूच सुधा आंत आली. मी तिच्याकडे पाहून गप्प राहिलों.

माझ्याजवळ येऊन ती म्हणाली, "बोलत कां नाहींस?"

"काय बोलणार?"

"तूं आबांना प्रत्युत्तर उगीच दिलेंस!"

"तुलासुद्धां तसेंच वाटतें? पण सुधा. तूं जरा विचार कर. जगाला वंद्य असलेल्या विभूतीस, ज्यानें समाजाच्या, देशाच्या, इतकेंच नव्हे तर जगाच्या

हितासाठीं, उन्नतिसाठीं आपल्या शरीराची झीज सोसली, देशाचा अपमान तोच आपला अपमान मानून त्या विरुद्ध जे झगडण्यास सिद्ध झाले, स्वातंत्र्यासाठीं सर्व हिंदुस्थानभर ज्यांनीं जाग्रति केली, त्या थोर महान् विभूतीस मूर्ख म्हणणें हें माणुसकीचें वर्तन ठरेल काय? त्या महान् विभूतीस एकेरी नांवानें संबोधणें हें चांगलें का? बहुमानानें संबोधण्याचंसुद्धां त्यांच्या अंगीं सौजन्य नसावें आणि तूं म्हणतेस मी गप्प बसायला पाहिजे होतें?"

"आबांनीं तसें बोलायला नको होतें. पण ते त्यांना आपले शत्रु समजतात!"

"गुलामगिरीचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. देशाचें हित करणारा त्यांचा शत्रु कसा होईल सुधा? गुलामगिरीचें अन्न खाऊन खाऊन शेवटीं हेंच बोलणें बाहेर पडणार. पण सुधा, गांधींना इतर पक्षाचे सुद्धां शत्रु आहेत. पण ते कांहीं असं बोलत नाहींत. ज्यांना स्वदेशाबद्दल प्रेम नाहीं, त्यांना ह्या महान् विभूतीबद्दल कसें प्रेम वाटणार? आपल्या देशांत असे पुष्कळ नादान लोक सांपडतील कीं, ते ब्रिटिश सरकारची थुंकी झेलण्यास, त्याचे गोडवे गाण्यास, त्याच्या हाताखालीं मरेपर्यंत काम करण्यास तयार होतील. पण त्यांना माहित नाहीं कीं, ब्रिटिशसरकार आपणास कुत्र्याइतकी सुद्धां किंमत देत नाहीं!"

"पण आनंद, आबांचा स्वभाव तुला माहित आहे ना?"

"आहे, पण मला त्यावेळीं तें सहन झालें नाहीं. कोणताही स्वाभिमानी मनुष्य त्यांचें तें बोलणें ऐकून घेणार नाहीं!"

"आतां कांहीं वातावरण शांत रहाणार नाहीं! आतां मात्र खबरदारी घे हं!"

"कसली खबरदारी?"

"आबांनीं सांगितलें आहे ना, तसलीं पुस्तकें वाचत जाऊं नको म्हणून!"

"तुला काय वाटतें त्याबद्दल?"

"माझं थोडंच ऐकणार तूं?"

"सांग तर खरं!"

"आबांचा हा हुकूम मला पसंत पडला नाहीं. पण त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागावें हेंच मला सुयुक्तिक दिसतें!"

"आणि मला तें योग्य वाटलें नाहीं तर?"

" म्हणजे ? "

" मी अशीच पुस्तकें वाचलीं तर ? "

" तर काय होईल हें मला सांगतां येणार नाहीं. पण तूं वाचूं नकोस एवढें मी सांगतें. "

"मी वाचणार. मला सुद्धां स्वाभिमान आहे. अमूक करूं नको, तमूक करूं नको ह्याची कोणावरही सक्ति करणें हाच मुळी गुन्हा आहे. तें कोणाच्याही स्वाभिमानाला पटणार नाहीं. जन्मभर आपल्या भावना, स्वाभिमान मारून ज्यांनी सरकारला खुष केलें आहे, त्यांना दुसऱ्यांचा स्वाभिमान कसा दिसणार? आबांचे सांगणें माझ्या स्वातंत्र्याआड, स्वाभिमानांच्या आड येतें. मी खरोखरच जर त्यांत कांहीं वाईट करतो आहे असें मला वाटलें असतें तर मी त्यांचा हुकूम शिरसावंद्य केला असता "

" हा हट्टीपणा कशाला ? "

" हट्टीपणा तर जरूर आहे. सुधा, तुला सांगतो, पुष्कळ वेळां मी माझ्या वडिलांच्या विरुद्धसुद्धां वागलों आहे. मी कांहीं करायचे असें ठरवलें तर त्यांत कधींच माघार घेत नाहीं. माझा स्वभावच आहे तो. ह्यांत तर मी कांहीं वाईट करीत नाहीं. मग माझ्यावर ही सक्ति कां ? काय होईल तें होईल, पण मी माझ्या स्वाभिमानाआड येणारी कोणतीच गोष्ट करणार नाहीं ! "

" मला तर ह्यांत काय करावें हेंच सुचत नाहीं. पण खरें वाटतें तें तुला सांगितलें. म्हणून तुला राग तर आला नाहीं ना ? "

" छे:! ज्या परिस्थितींत तूं वाढली आहेस तिचा हा परिणाम आहे. ह्यांत तुझा दोष नाहीं. मी सुद्धां ज्या परिस्थितींत वाढलों आहे त्याप्रमाणेंच वागतो. सुधा, मी खरें सांगतों, मी उनाड आहे. मी दांडगाई करतो. शाळेंत मला सारे दादा म्हणतात. मस्ति, चेष्टा करण्यांत माझा पहिला नंबर आहे. तरी मला देशाबद्दल, देशांतील पुढाऱ्यांबद्दल अभिमान आहे. प्रेम आहे. देशाबद्दल माहिती मिळवणें, इतर ज्ञान मिळवणें हा कांहीं गुन्हा होत नाहीं. जरी गुन्हा असला तरी तो करायला मला अभिमानच वाटेल. माझ्या वडिलांनीं जरी मला तसा हुकूम केला असता तरी तो मी मानला नसता एवढेंच तुला सांगतों."

सुधा कांहीं बोलली नाहीं. ह्यावर ती तरी काय बोलणार ? थोडा वेळ राहून

ती तेथून निघून गेली. मी मात्र विचार करीत राहिलों. मला माझा दोष कुठेंच दिसेना. आबांच्या अज्ञानाबद्दल मात्र मला कींव वाटूं लागली.

*　　　　*　　　　*

मी येथें एवढे दिवस राहिलों कसा याचेंच मला नवल वाटतें. मला स्वैर वातावरणांत रहायला आवडतें. माझा स्वभाव बोलका. तरी पण मी त्या कोंडवाड्यांत—कोंडवाडा कसला तुरुंगच तो—त्यांत राहिलों. ह्याला मुख्य कारण सुधा ! सुधेच्या आकर्षणाचाच तो प्रभाव.

सुधेच्या आईचा स्वभाव बोलका नाहीं, तरी पण ती माझ्याशी चांगल्या तऱ्हेनें बोलते. आबांचा स्वभाव तर विचारायलाच नको. ब्रह्मदेवाला त्याना जन्माला घातल्याबद्दल धन्यवाद जरूर दिले पाहिजेत. माझी खात्री आहे ब्रह्मदेवालासुध्दां त्यांच्यापुढें हात टेकावे लागतील, मग माझी काय कथा. एवढें मी सहन कसें करूं शकलों हेंच मला समजत नाहीं. माझ्यासारख्या उनाड मुलानें त्यांना कांहीं तरी प्रताप दाखवावा असें माझ्या मनांतसुध्दां ळालं होतें. जन्माची आठवण राहील असें कांहीं तरी त्यांना दाखवायचें, पण सुधेला वाईट वाटेल ह्मणून गप्प बसलों.

पण ह्यापुढें गप्प बसणें शक्य नाहीं. आजच्या प्रसंगानें घरांत रहाणें शक्य नाहीं.

आज मॅट्रिकचा शेवटचा पेपर झाला. सर्व पेपर्स समाधानकारक गेल्यामुळें नापास होण्याची भीति नव्हती. त्यामुळें मला सहाजिकच आनंद झाला. मी ह्या चार दिवसांत गांवीं जाणार होतों. शाळेंतले सौंगडीही आपआपल्या गांवीं जाणार होते. ह्यापुढें सर्व एकत्र जमणें शक्य नव्हतें. म्हणून पेपर झाल्यावर आह्मी सर्वजण सिनेमाला गेलों आणि नंतर एका हॉटेलांत जाऊन एक लहानशीच पार्टी झाली. मजेंत वेळ गेला. घरीं परत येतांना वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. तीनवर्षें एकावर्गांत मजेंत काढलीं. एकमेकांना सहाय्य केलें, एकमेकांच्या सुखदु:खांत भाग घेतला. एक दिवस वर्गांत त्यांपैकीं एकजण भेटला नाहीं तर चुकल्यासारखें वाटे. ते सर्वजण आज निरनिराळ्या ठिकाणीं जाणार होते. सर्वांच्या आयुष्यास निराळें वळण लागणार होतें. सर्वांनाच कांहीं कॉलेजची पायरी चढणें शक्य नव्हतें. कांहीं कॉलेजांत येणार होते. कांहींजण निरनिराळ्या धंद्यांत शिरणार होते. कांहीं नापास झालेले पुन्हां शाळेंत जाणार होते. पुन्हां सर्वजण भेटतील हा संभव फार कमीं होता, ह्यामुळें सहाजिकच वाईटवाटल्या वांचून राहिलें नाहीं.

एकमेकांचा निरोप घेतांघेतां रात्रीचे नऊ वाजले. घरांत आलों. सर्वांचीं जेवणें नेहमींप्रमाणें झाली होतीं. मी कपडे काढून जेवण्याच्या तयारींत होतों. तसें म्हणायला गेलों तर जेवणाची मुळींच आवश्यकता नव्हती. पण तयार झालों.

इतक्यांत आवासाहेब आंत आले. माझ्या खोलींत येण्याची ही त्यांची तिसरी खेप. मला पाहतांच त्यांनी विचारलें, " इतका वेळ कुठं होतास ? "

मी थोडक्यांत सारें सांगितलें.

ते म्हणाले, " त्याची काय आवश्यकता होती? जेवण्याच्या वेळीं तुला हजर राहिलेंच पाहिजे होतें. आतां तुला जेवण मिळणार नाहीं ! "

सहाजीकच मला राग आला. मी म्हटलें, " तुम्हांला त्याची आवश्यकता वाटणार नाहीं. कारण मित्र, त्यांचें प्रेम याबद्दल तुम्हांला काय कळतंय ? आणि एक दिवस जेवणाला वेळ झाला म्हणुन जेवण मिळणार नाहीं, हा कुठचा न्याय ?"

माझ्याकडून असें उत्तर मिळणार ह्याची त्यांना कल्पना नसावी. ते कांहींशा कठोरपणानें म्हणाले, " आमचा कायदाच आहे तसा. जेवण्याच्या वेळीं हजर नसेल त्याला नंतर जेवण मिळणार नाहीं ! "

" तुमचा कायदा तुमच्यापाशी ठेवा. मला त्याची जरूरी नाहीं ! "

" आनंद, माझ्या घरांत असें चालायचें नाहीं. माझ्या म्हणण्याप्रमाणेंच तुला वागलें पाहिजे ! "

" तुमचे म्हणणेंच जर अयोग्य आहे तर त्याप्रमाणें मी कधींही वागणार नाहीं !"

" माझ्या घरांत एवढी अरेरावी ? माझ्या घरांत मी मुखत्यार आहे. मी जें म्हणेन तें प्रमाण मानलें पाहिजे. मग तें योग्य असो वा अयोग्य असो ! "

" ठीक आहे, पण तें तुमच्या कुटुंबाकरतां झालं. माझ्याकरतां नाहीं. माझा मी स्वतंत्र आहे. माझ्यावर तुमचा कांहीं अधिकार नाहीं. मी कांहीं इकडे फुकटचें खात नाहीं. मी इथं रहातो, जेवतो, खातों, ह्याबद्दल माझे बाबा तुम्हांला योग्य पैसे पाठवतात ! तुमच्या म्हणण्याप्रमाणें वागायला मी तुमचे कांहीं खात नाहीं ! "

त्यांचें पित्त खवळलें. काय बोलावें हें त्यांना सुचेना. तरी ते म्हणाले, "तुझ्या ह्या अरेरावीमुळें तुला ह्या ठिकाणी रहायला मिळेल असें तुला वाटते ? "

" इथंच राहिलें पाहिजे असें नाहीं. एवढी मोठी मुंबई ओस पडली नाहीं. आणि तुम्हांला तरी वाटतें कीं काय मी ह्यापुढें इथं रहाणार? उद्यांच चाललों गांवीं. पुन्हा मुंबईला येणार तो स्वतंत्रच रहायला, समजलें? मी म्हणून इथें दिवस काढले. माझ्या जागीं दुसरा कुणी असता तर त्यानें कधींच पळ काढला असता. तुम्हांला वाटतें आपण मोठे शहाणे, विद्वान्, सरकारी गोटांतील प्रमुख, पण तुम्हांला सारे ओळखून आहेत. सरकारची हांजी हांजी करण्यापलिकडे कांहींच नाहीं तुमच्याकडे! मला कोणाची पर्वा नाहीं. समजलें?"

मी इतकें बोलणार ह्याची त्यांना कल्पना नव्हती. ते माझ्याकडे आश्चर्यानें, रागानें सारखे पहात होते. माझें बोलणें संपतांच ते रागानें पहात तेथून निघून गेले.

ते जातांच सुधेची आई येऊन म्हणाली, " उगीच बाबा एवढें बोललास तूं, चल जेवायला!"

" मला नको जेवायला आई!"

" असें म्हणूं नकोस बाबा. उपाशी राहिलास तर मला पाप लागेल."

" आई, खरंच मला जेवायला नको. आज पार्टी होती म्हणून वेळ झाला. जेवायचें असतें तर मी वेळेवर आलों असतों!"

कांहींसा वाईट चेहरा करून त्या निघून गेल्या. त्या जातांच सुधा आंत आली.

माझ्याजवळ येऊन माझ्या खांद्यावर हात ठेवून ती म्हणाली, " खरंच कारे तूं ह्यापुढें इथं रहाणार नाहीस?"

" नाहीं. ह्यापुढें इथं रहाणें शक्य आहे कां? इतके दिवस मी राहिलों तो तुझ्यासाठींच पण ह्यापुढें रहाणें शक्य नाहीं!"

" इतके दिवस राहिलास तसाच आणखी रहा!"

" ह्यापुढें अशा वातावरणांत रहाणें शक्य नाहीं सुधा. मी आतां स्वतंत्र खोलीच घेऊन रहाणार आहे!"

" मग आपण ह्यापुढें भेटणार नाहीं एकमेकांना!"

" कां नाहीं? मी येत जाईन इथं कधीं कधीं. तूही येत जा माझ्या खोलीवर. आपणाला एकमेकांना भेटण्यास कोणती हरकत आहे?"

" खरंच कां तूं जातो आहेस? मला इथं मुळींच करमणार नाहीं तूं गेल्यावर."

"मला सुद्धां तसेंच वाटेल. पण त्याला इलाज नाही. असें वाईट वाटून घेऊं नकोस. सुधा हा प्रसंग कधींतरी येणार होता तो आज आला इतकंच." मी तिच्या पाठीवर हात फिरवित म्हणालों.

"तूं लवकर येणार आहेस ना?"

"हो. गांवीं जाऊन थोड्याच दिवसांनी मी येणार आहे!"

सुधाच्या डोळ्यांतून आश्रु येत होते. मी तिचें शांतवन करूं शकलों नाहीं कारण माझीही तिच स्थिती झाली होती. मी तिचे अश्रु पुसले. तिला एकदां हृदयाशी धरली आणि खोली बाहेर पोंहोंचवली. मी उद्यां गावीं जाणार मग बाबांचें मन कसें वळवावें ह्याबद्दल विचार करूं लागलों.

* * * *

कॉलेजमध्यें दाखल झालों. आज पर्यंत कॉलेज मधलीं किती तरीं उन्माद कारक वर्णनें मी कादंबरींत वाचली होतीं, सिनेमामध्यें पाहिली होतीं. त्यामुळें कॉलेजामध्यें पाय टाकतांना मला आंतल्या आंत गुदगुल्या होत होत्या. त्या उन्मादकारक वातावरणांत आपणास वावरण्यास मिळणार असें वाटून एकप्रकारची गोड उत्सुकता लागून राहिली होत्ती.

माझ्या अपेक्षेप्रमाणें जीवन होताच त्या कॉलेजमध्यें. माझा प्रिय मित्र भेटल्यामुळें मला सर्वांत जास्त आनंद झाला.

कॉलेजचा पहिलाच दिवस असल्यामुळें अभ्यास होण्यासारखा नव्हता. मात्र पुष्कळ जणांची ओळख झाली. आमच्या सारखेच ते असल्यामुळें जास्त आनंद झाला आणि भावी सुखाबद्दल विचार मनांत येऊं लागले.

कॉलेजांतून घरीं खोलीवर आलों तों खाली सुधा माझी वाट पहात होती. तिला पाहून मला आश्चर्य वाटलें.

तिच्या जवळ येतांच मीं विचारलें "इथं कुठं आज?"

"कां येऊं नये कीं काय?"

"मी येऊं नको म्हणून सांगितलें तर तूं माझें थोडेंच ऐकणार आहेस?"

"सांगून तर बघ!"

"जाऊं दे तें. पण इथं कां आलीस तें नाही सांगितलेंस?"

"भेटायला म्हणून आलें होतें!"

" पण मी तुला भेटणार म्हणून कोणी सांगितलें होतें ?"

" कॉलेजचा पहिलाच दिवस आहे .त्याअर्थी तूं घरीं असणार अशी माझी कल्पना होती. पण बघतें तों खोलीला कुलुप."

" घरीं जाण्याच्या विचारांत होतें तोंच तूं आलास !"

" मग चलना वर !"

आह्मीं खोलीत आलों.

सारी खोली पहात सुधा म्हणाली, " आनंद, तूं संसार थाटलास की रे छान !"

" छे: कोण म्हणतो ?"

" मी म्हणतें !"

"मग तें चूक आहे. संसार थाटण्यास मुख्य वस्तु लागते ती कुठं आहे इथं?"

तिनें गोंधळून विचारलें, " कोणती वस्तु ?"

मी हंसत म्हणालों, "अग बायको. बायकोशिवाय कितीही थाट केला तर त्याला संसार म्हणत नाहींत !"

माझ्या बोलण्यानें ती काहींशी लाजली व खाटेवर बसली. आणि माझ्याकडे काहींशा लज्जेनें व हंसत पहात म्हणाली, " मग आण ना !"

" आणलीच पाहिजे."

" कुठें पाहिली आहेस वाटतें ?"

" होय !"

" मला सांग ना नांव तिचें !"

" छे: तिनें होय म्हटल्याशिवाय तुला कसं सांगूं. सांगेन कधींतरी !" मी हंसत म्हणालों.

मला वाटतें तिचा चेहरा कांहींसा पडला पण तिनें दाखवून दिलें नसावें.

मी तिच्याजवळ बसून म्हणालों, " सुधा, अभ्यास जोरानें चालला आहे ना ? पहिल्याच वर्षी पास व्हायला पाहिजे हं ! मग पुढच्या वर्षी माझ्याच कॉलेजमधें आलें पाहिजे समजलेंना ? जोरानें अभ्यास कर !"

" तूं गेल्यापासून अभ्यासाकडे लक्षच लागत नाहीं. पुस्तक हातांत घेऊन

वाचायला सुरवात केली कीं, तुझी आठवण होते. खरेंच, आपण एकत्र अभ्यास करीत होतों तेव्हां किती मजा यायची नाहीं ? माझ्या अडचणी सर्व तूं सोडवायचास. आतां कांहीं अडलें तर विचारणार कोणाला ? त्यावेळीं तुझी सारखी आठवण येते आणि वाईट वाटतें !"

"खरंच ? मग भाग्यवान आहे मी !" मी हंसत म्हटलें.

"कां ?"

"तुझ्यासारख्या मुलीनें माझी आठवण काढून वाईट वाटून घ्यावे ?"

"चल, तूं लागलास थट्टा करायला !" ती मला हातानें ढकलीत म्हणाली.

"तुझी थट्टा करणार नाहीं तर कुणाची थट्टा करणार मी ? पण सुधा तुला आवडतेना थट्टा ?"

"चल मला नाहीं माहित !" ती हंसत म्हणाली.

थोडावेळ बसून माझा निरोप घेऊन सुधा निघून गेली.

* * * *

कॉलेजचें वातावरण म्हणजे आनंदाची लयलूट. तशांत मी आतां पूर्ण स्वतंत्र आहे. कोणाची आडकाठी नाहीं. कोणी विचारणारा नाहीं. मनांत येईल तें करावें. वाटेल तेव्हां उठावें वाटेल तेव्हां झोंपावें. वाटेल तेव्हां फिरायला जावें.

जीवनशीं तर मैत्री जास्त वाढली. ती इतकी कीं, त्याच्या घरीं जाण्यापर्यंत पाळी आली. त्याची आई फार प्रेमळ आहे. आईच्या प्रेमाला मी बालपणींच मुकलों होतों. जीवनच्या आईचें प्रेम पाहून मला मातृप्रेमाची कल्पना आली आणि वाईट वाटलें. मनांत विचार आला, आपल्यालाही आई असती तर.—

ती विचारी माझी फार काळजी घेते. मी म्हणजे तिला जीवनच. जिला आपल्या मुलांसारखीच इतर मुलें वाटतात, त्यांत ती कधींच भेदभाव मानत नाहीं तीच खरी आई ! जेवायला बसतांना तर इतका आग्रह करते कीं, तिचें म्हणणें मान्य केल्यावांचून रहावत नाहीं.

इकडे सुधाही भेटते. मी तिच्या घरीं जातों. ती माझ्याकडे येते. ती आपल्या शाळेंतल्या गमती सांगते. मी माझ्या कॉलेजमधल्या गमती सांगतो. वेळ कसा जातो हें समजत नाहीं.

कॉलेजमधली मजा तर विचारूंच नका. प्रोफेसरनां सतावणें, मुलींची टिंगल

करणें, त्यांच्या जवळपास बसून सारखी थट्टा करणें, कागदाचे गोळे फेकणें, कागदाची विमानें फेकणें, सुटीमध्यें बाकांवर कांहीं तरी ठेवणें, कॉलेज सुटल्यावर टोळीनें त्यांच्या मागोमाग त्यांची मस्करी करीत जाणें, छे: ! दिवस कसा जातो हें समजत सुद्धां नाहीं. वाटतें ही रात्र नसती तर फार चांगलें झालें असतें.

आज तर फार मजा झाली. मराठीचे प्रोफेसर वयानें तरूण आणि विनोदी बुद्धीचे होते. त्यांना रागही सहसा येत नसे. त्यांचें लेक्चर चालू असतांना प्रेमाचा प्रश्न आला त्यावेळीं ते म्हणाले, " हल्लीच्या सारखे पूर्वी प्रेमविवाह होत नसत. आईबापांनीं मुलगी पाहायची आणि मुलानें तयार व्हायचें. लग्नाची माळ गळ्यांत पडेपर्यंत वधुवरांना एकमेकांचें दर्शन व्हायचें नाहीं. माळ गळ्यांत पडतांच एकमेकांना एकमेकांचा चेहरा पाहायला मिळायचा. त्या दृष्टीनें हल्लींचे विवाह चांगले आहेत. निदान मुला-मुलींना लग्नाआधीं एकमेकांची सुरत तरी बघायला मिळते. हल्लींचेच विवाह चांगले आहेत. "

" हल्लींचे म्हणजे प्रेमविवाह काय ? " एक आवाज आला.

" होय ! पण त्यांत सुद्धां धोका असतोच. कधीं कधीं सगळेच प्रेमविवाह सफळ होतात असें नाहीं ! " प्रोफेसर म्हणाले.

" कां होत नाहींत ? "

" त्यांचें पटत नाहीं म्हणून ? "

" कां पटत नाहीं ? "

" त्यांच्या प्रेमांत बिघाड येतो ! "

" प्रेम म्हणजे काय ? "

त्यावरोबर एकदम हंशा पिकला.

THE IDEAL BOOK CO.
THABILDAS ROAD.
BOMBAY 14.

" तुम्ही प्रेम केलें आहे कां ? " एक आवाज आला.

" होय ! " प्रोफेसर हंसत म्हणाले.

" कुणाशीं ? कॉलेजमधल्या मुलीशींच कां ? " मी विचारलें

" छे ! छे ! शेजारची असेल ! " दुसरा आवाज.

" छे रे love at first sight " तिसरा आवाज.

पुन्हा हंशा पिकला.

"हें पहा तुम्हीं जरा गप्प बसा आतां ! " प्रोफेसर वर्ग शांत करण्यासाठीं

म्हणाले.

"सर प्रत्येकाला प्रेम करण्याचा अधिकार आहे ना?" एकानें विचारलें.

"होय लेका! तुला कोणाशीं प्रेम करायचें आहे?" एक आवाज आला.

"आपल्या वर्गांतलीच आहे वाटते?" दुसरा आवाज.

पुन्हा हंशा. सर्व मुलींनीं माना खालीं घातल्या. हें पाहून प्रोफेसर हंसत म्हणाले "हें पहा! आधुनिक मुली म्हणजे आम्ही धीट समजतो, पण प्रेमाचा विषय आला कीं, पहा लाजल्याच. त्यांत लाजायचें काय आहे? कोणत्याही मुलानें प्रेमाची मागणी केली तर रागावून न जातां, किंवा न लाजतां उत्तरें दिलीं पाहिजेत?"

"मग मी विचारूं?" एक आवाज.

"नाहीं नाहीं! मी आधीं!" दुसरा आवाज.

"अरे पण तुम्हीं आपसांत कां भांडतां? हें पहा, हे सारे प्रकार कॉले-जच्या बाहेर करायचे बरं का? कॉलेजमध्यें नाहीं. नाहीं तर मग कॉलेज प्रेमशाळा होईल!" प्रोफेसर म्हणाले.

"हिअर् हिअर्!" मुलें ओरडलीं.

आवाज चढत चालला. इतर वर्गांना त्रास होईल म्हणून प्रोफेसर गप्प रहाण्यास सांगूं लागले, पण छेः! थट्टा मस्करी करण्याच्या भरांत असल्यामुळें तें शक्य झालें नाहीं. त्यांना वर्ग आवरणेंच कठीण गेलें. त्यांचाच विनोद त्यांच्याच अंगाशीं आला. मुली बाकी रागानें बेफाम झाल्या होत्या. पण करणार काय? सिंहाच्या दाढेंत सापडलेल्या कोंकरासारखी त्यांची स्थिति झाली होती.

संध्याकाळीं सुधेला जेव्हां मी ही सारी हकिकत सांगितली, तेव्हां ती म्हणाली, "तुमचे प्रोफेसर तरी बरेच कीं तुमच्या बाजूचे!"

"पुरुषच पडले ना ते" मी म्हणालों.

"एवढ्या मुलांनीं मुलींच्या मस्कऱ्या कराव्या, प्रेमाबद्दल त्यांची थट्टा करावी. हें शोभतं कां तुम्हांला?"

"त्यांत काय वाईट आहे? सारी थट्टा होती ती. थट्टे शिवाय मजा येत नाहीं!"

"पण ही मेली कसली थट्टा?"

" अग त्यांत काय झालें ? प्रेम म्हणजे कांहीं अश्लील शब्द नाहीं. एका मुलानें जर एका मुलीशीं प्रेमयाचना केली तर त्यांत वाईट तें काय झालं ? "

" वाईट ह्मणजे ? हा तिचा अपमान झाला !"

" मला तसं वाटत नाहीं. त्याचं जर तिच्यावर प्रेम आहे, आणि जर त्यानें तिला विचारलें तर त्यांत तिचा गौरव तर आहेच उलट त्याची निर्भयता, धीटपणा आणि मनांतल्या मनांत झुरत मरण्यापेक्षां एकदम निकाल लावण्याचा विचार हें पाहून त्या बद्दल त्याचें अभिनंदनच केलें पाहिजे ! "

" अभिनंदन ? मग प्रत्येकजण उठेल आणि मिळेल त्या मुलीला रस्त्यांत गाठून तिच्याशीं प्रेमयाचना करील. त्यांत एकादा इसम सभ्य असला तर बहुतांशीं सर्व नीचवृत्तीचे मवाली असतील. मग हें छान होईल नाहीं "

हो. ही शंका मला आली नव्हती. तिचें बोलणें मला पटूं लागलें, तरीपण पराजय कबूल करायचा नाहीं असें मनाशी ठरवून मी ह्मणालों, "मवाली सुद्धां असतीलच त्यांत पण स्त्रियांच्या अंगी धैर्य, धीटपणा असला पाहिजे आणि प्रसंगी त्याला थोडा प्रसादही दिला पाहीजे. ह्मणजे पुन्हां वाटेस जायचं नाहीं कोण!"

आजचा हा विषय बराच रंगला असता, पण सुधेचा जायचा वेळ झाल्यामुळें तिला जावें लागलें आणि त्यामुळें तो विषय तसाच अर्धा राहिला.

* * * *

सुधा कॉलेजमध्यें येऊं लागल्यापासुन मला कॉलेजमध्यें जायला जास्त हुरूप येतो. सुधा कॉलेजमध्यें जातांना माझ्या खोलीवर येते आणि मग आम्ही बरोबर कॉलेजमध्यें येतों. एकादेवेळीं तिला उशीर होतो मग मी एकटाच येतों. अशावेळीं चुकल्या चुकल्यासारखें होतें. मनांत नाना विचार येतात. एकादा वाईट विचारसुद्धां चटकन् येऊन जातो आणि मग उगीच भलतेसलते संशय मनांत येतात. मग मी देवाची प्रार्थना करतों. म्हणतों, " देवा ती सुरक्षित असूं दे." मनुष्यप्राणी कितीही सुधारलेला असो, कितीही नास्तिक असो त्याच्या मनांत वाईट विचार आल्यावर, संकटें आल्यावर त्याचें मन देवाकडे धांव घेतेच—

सुधा कॉलेजमध्यें दिसतांच मनाला शांतता मिळते. आणि देवाचे उपकार मानण्याचेंसुद्धां मी विसरून जातों. मनुष्य धर्मच आहे हा !

मी एवढा द्वाड, कॉलेजमध्यें दादागिरी करणारा, पण सुधा आणि जीवन ह्यांच्यापुढें माझें कांहीं चालत नाहीं. सुधेनें तर माझ्यावर पूर्ण मोहिनीच टाकली आहे. सहाजीकच आहे तें. जीवनबद्दल तर मला फार प्रेम वाटतें. त्याच्याविरुद्ध जायला मन धजत नाहीं. वर्गांत जास्त मस्ती करूं नको ह्याबद्दल तो मला वेळोवेळीं बजावत असतो. पण मी थोडाच थांबतो? तोसुद्धां असतोच सामील मला पण अगदींच अंगांशी न येईल अशी खबरदारी घेतो. मला वाटतें, जीवनसारखा मित्र नसता तर मला स्वत:ला लगाम घालतां येणें शक्य नव्हतें. सुधा होती. पण ती माझ्या वर्गांत नव्हती त्यामुळें तें शक्य नाहीं. जीवन माझ्यासारखाच चेष्टेखोर आहे पण तो माझ्यासारखा धाडशी नाहीं.

इतर मित्र आहेत पण त्यांच्याबद्दल मला फारसा जिव्हाळा वाटत नाहीं. माझ्याबद्दल त्यांना काय वाटतें हें मला नक्की समजत नाहीं. पण माझा त्यांना हेवा वाटतो हें मात्र नक्की. त्याचें मुख्य कारण म्हणजे सुधा. सुधा माझ्याबरोबर येते, जाते, मनमोकळेपणानें सर्वांसमोर बोलते, ह्याचा त्यांना हेवा वाटतो.

कधीं कधीं मी, माझे मित्र बोलत असतों. जीवनसुद्धां असतोच माझ्या-बरोबर. आमच्या गप्पा चाललेल्या असतात अशावेळीं एकादे दिवशीं सुधा जरा लांबूनच हांक मारून बोलावते. मी म्हणतों, "काय काम आहे? इकडे ये ना!"

जरा नाखुषीनेच ती जवळ येऊन म्हणते, "तूं येतोस?"

"कुठें घरीं कीं काय?"

"होय!"

"नाहीं. मला जरा वेळ आहे!"

"मग किल्ली देना माझ्याजवळ. मी जाऊन बसतें खोलीवर."

मी किल्ली देतों. जातांना ती म्हणते, "बघ हां लवकर आलें पाहिजे नाहींतर मी जाईन. मग तुला किल्ली न्यायला माझ्याकडे यावं लागेल!"

"नाहीं ग येईन मी, पण जरा उशीर झाला तर थांब!"

"मी नाहीं थांबायची. मी एकटीच बसूं वाटतें वाट पहात तूं येशील म्हणून!"

"काय बिघडलें त्यांत वाट पाहिली म्हणून?"

"अडलंय माझं तुझी वाट पहात बसायला!"

"मग दे तर किल्ली. कशाला जातेस उगीच?"

"हो देते!" असें म्हणून ती हंसत जायची. आणि जरा लांब जाऊन म्हणायची, "लवकर ये हं!"

सुधा गेली कीं सारे माझी चेष्टा करीत. मला माझा अभिमान वाटे. कोणा युवकाला त्याबद्दल अभिमान वाटणार नाहीं. मला वाटतें सुधेला सुद्धां सर्वांसमोर येऊन माझ्याजवळ बोलायला कांहीं तरी खास वाटत असावें! कां नाहीं वाटणार? मुली झाल्या म्हणून काय झालें? त्यांना सुद्धां आपल्या सौंदर्याचा, आपल्या स्तुतीचा अभिमान असतोच कीं नाहीं? त्यांना सुद्धां दुसऱ्यांनीं आपल्या सौंदर्याची चर्चा करावी असें वाटतेंच. मुलीसुद्धां एकमेकांची चेष्टा करतातच. मात्र त्यांच्या आणि मुलांच्या चेष्टा ह्यांत फरक फार असतो.

आमच्या चेष्टा म्हणजे विचारायलाच नको! मुलींना सतावण्याचे कोणतेच प्रकार आम्ही शिल्लक ठेवले नाहींत. मला जे मित्र भेटले ते सुद्धां माझ्यासारखेच. कॉलेजचें जीवन म्हणजे मजा करण्याचे दिवस. ह्या शिवाय दुसरें आम्हाला कांहीं माहित नाहीं. कांहीं करायचें बाकी ठेवलें नाहीं आम्ही.

सिगरेट्स! सिगरेट्स ओढणें हा तर हल्लींच्या कॉलेज तरुणांचा जन्मसिद्ध हक्कच होऊन बसला आहे. इतर मित्रांच्या सल्ल्यानें मीहि ओढतों. उघड उघड ओढण्याची भीति वाटते. एकादे वेळी सुधानें पाहिलें तर! छे:! तिला मी सिगरेटस् ओढतों हें समजूं देतच नाहीं. खोलींत तर मी सिगारेटस् ठेवीतच नाहीं आणि खिशांत सुद्धां. नजाणो कदाचित् तिनें खिशांत हात घातला आणि तिला सांपडल्या तर उगीच वाईट परिणाम व्हायचा—

पण आज मी चांगलाच खतऱ्यांत सापडलों होतों. सुधा येण्याची वेळ केव्हांच गेली होती. ह्यापुढें ती येणार नव्हती ह्याची खात्री असल्यामुळें मी सिगरेटचे पाकीट काढलें. मी सिगारेट ओढायच्या बेतांत होतों इतक्यांत दरवाजा कोणी तरी ठोकला. सिगरेट तशीच पाकिटांत ठेवली आणि तें टेबलावर ठेवून मी दरवाजा उघडण्यासाठीं आलों. पाहतों तों सुधा. दचकलोच मी. वाटलें धावावें आणि पाकिट उचलावें. पण विचार आला, तिला संशय यायचा. व सारें बिंग बाहेर यायचें. त्यापेक्षां आपण त्या गावचेंच नाहीं असें दाखवायचें म्हणजे झालें. असा विचार करून मी बेफिकीर राहिलों.

सुधा येऊन बसली. तिचें कांहीं टेबलावर लक्ष गेलें नाहीं. मनांत आलें, असेंच लक्ष न गेलें तर छान होईल. पण भित्र्याच्या मागेंच भूत लागते म्हणतात

ना त्याप्रमाणेंच झालें. टेबलावर पाकीट पाहून आश्चर्यानें तिनें विचारलें,

" हें सिगरेटचे पाकीट रे कुठचें ? "

मी तिकडे न पाहातां खोटा आव आणून ह्मणालों, "चल कांहीं तरीच बोलतेस तूं. इकडे कुठचं पाकीट येणार ?"

"अहा, काय पण बोलतो आहेस !" पाकीट हातांत घेऊन माझ्या समोर धरून ती ह्मणाली, "मला बनवायला बघतोस होय ? केव्हां पासुन रे लागलास ओढायला ? इथपर्यन्त मजल गेली वाटतें ?"

मी खो खो करून हसत ह्मणालों, " वाग वा छान ओळखलस तूं मला ! "

" ह्मणजे मी खोटें बोललें कीं काय ? "

" नाहीं तर काय ? अग माझा एक मित्र आला होता नुकताच. तूं येण्यापूर्वी पांच मिनीटें झालीं गेला. त्याला आहे नाद सिगरेटचा. तो विसरून गेला आहे झालं. बाकी तूं माझी छान परिक्षा केलीस हां !"

माझें ह्मणणें तिला पटलें नसावें. माझा तिला संशयच आला. मी जरी आव मोठा आणला होता तरी माझ्या हृदयांत सारखें धडधडत होतें !

ती ह्मणाली, "तुह्मी मुलं काय कराल ह्याचा नेम नाहीं !"

" बरं आतां तुझी खात्री कशी करून देऊं ह्मणजे तुझा संशय जाईल ?"

"कांहीं नको खात्री करून द्यायला. मला सारें समजलें. मला यायला उशीर झाला. तुला वाटलें मी येणार नाहीं. ह्मणूनच तूं इथं ओढीत होतास, दरवाजा वाजतांच तूं आलास. तुला वाटलें असेल आला कोणीतरी. मी कुठची येणार ! पण फसलें तें सारें " असें ह्मणून तिनें माझा हात आपल्या हातांत घेवून एकदम वास घेतला.

मला वाटलें, माझी भरली शंभर वर्षे. मला माहीत होतें, तिला सिगरेट्स ओढणाऱ्याचा फार तिटकारा आहे.

माझ्या हाताच्या वासावरून तिचा संशय दृढ झाला. ती रागानें म्हणाली, "माझ्याशीं खोटें बोलत होतास काय ? हा बघ हाताला सुद्धां वास येतो तुझ्या !"

पुन्हां हसायचा आव आणून मी ह्मणालों, " कितीही सुधारल्या तरी तुह्मी बायका संशयी त्या संशयीच ! अग त्यानें एक ओढली आणि माझ्यासाठी एक टेबलावर ठेवली. पण मी ती तशीच त्याच्या पाकिटांत ठेवली त्यामुळें तुला वास आला झालं !"

" असं होय ? एकंदरीत तूं ओढली नाहींस ? "

" नाहीं ! "

" कधींच ओढत नाहीस ! "

" छे ! "

" आतांच समजेल. तुझ्या तोंडाला येणाऱ्या वासावरूनच समजेल ? "

असें म्हणून माझ्या तोंडाचा वास घेण्यासाठीं तिनें आपलें तोंड माझ्या तोंडाजवळ आणलें. एकमेकांचे श्वासोश्वास एकमेकांत मिसळले. मला एक विचार सुचला. मी एकदम तिचें चुंबन घेतलें—

असं कांहीं होईल ह्याची तिला जाणीव नसल्यामुळें ती एकदम गोंधळून गेली. लाजली. आणि लटक्या रागानें माझ्याकडे पाहून म्हणाली, " हें काय ? तुला कांहीं लाजलज्या ? "

ती खरोखरच रागावली नाहीं हें पाहून मी म्हणालों, "सिगरेटचा तुला वास येतो कीं नाहीं हें पहायचे होतें ना ? "

सिगरेटचा वास माझ्या तोंडाला आला नाहीं. त्यामुळें तिचा शब्द तिच्या-वरच उलटला, शिवाय तें चुंबन. आपल्या तोंडाचा चंबू करीत ती म्हणाली, " तूं फार लबाड आहेस रे "

" उलट मीच लबाड ना, छान ! " असें म्हणतां म्हणतां मनांत विचार आला, सुटलों एकदांचा.

पुन्हां उगीच विचारलें, " खरंच सुधा, तुला माझा संशय आला ? "

" नाहीं तर काय ? "

" आणि आतां राहिला असेल तर सांग. म्हणजे...! "

मला पुढें बोलूं न देतां तिनें माझ्याकडे पहात डोळे वटारले. क्षणांत ती लाजली. तिच्या गालांवर लाली चढली. तिनें चहूंदिशीं तोंड फिरवलें. तिचें त्या वेळचें सौंदर्य, त्या वेळचा अभिनय मी कधींच विसरणार नाहीं !

*　　　*　　　*

आजपर्यंत मला वडिलांचा अभिमान वाटत होता. कां नाहीं वाटणार ? त्यांच्याकडे पैसा पुष्कळ होता. तरुणपणींच पत्नी वारली. पण दुसरें लग्न केलें नाहीं. किती तरी मुली सांगून आल्या होत्या. किती तरी नातेवाईक पुढें सरसावले

होते मन वळवायला. पण ते कोणाच्याच मोहाला बळी पडले नव्हते. त्यांना कसलाच नाद नव्हता. शहराचा त्यांना कंटाळा होता. माझ्यावर त्यांचें फार प्रेम होतें.

पण आज तो सारा अभिमान कुठच्या कुठें नाहींसा झाला. वडिलांचें पत्र आलें. त्यांनीं स्वतःचें लग्न ठरवलें होतें. मुलगी सुंदर होती, तरुण होती. लग्नास तयार होती. चार पांच दिवसांवर लग्न येऊन ठेपलें होतें.

आणि वडिलांनीं मला आयत्यावेळीं कळवलें होतें. आयत्या वेळीं कळवायला. काय मी त्यांना परका वाटलों ? कीं माझी त्यांना जरुरीच वाटली नाहीं ?

ह्या वयांत त्यांना लग्नाची काय जरूरी होती ? मोहाच्या ऐन वेळीं त्यांनी लग्नाची गोष्ट सोडून दिली. आणि आज म्हातारपणींच त्यांना कसला मोह पडला ? म्हातारचळ लागला कीं काय त्यांना ? पण त्यांनीं विचार करायला पाहिजे होता. आपल्या वयाचा आणि तिच्या वयाचा !

मनांत येतें, आतांच्या आतां जावें आणि चांगली कानउघडणी करावी. लग्न मोडण्यास सांगावें. पण शक्य आहे कां तें ? एकदां ठरवलेलें लग्न मोडणें शक्य नाहीं. आणि वृद्धाशीं लग्न करण्यास त्या तरुण मुलीला कांहींच वाटलें नाहीं ? कोणतीही मुलगी वृद्धाशीं आपखुषीनें लग्नास तयार होईल काय ? शक्यच वाटत नाहीं.

त्यांच्या पत्रांतलें वाक्य पुन्हां पुन्हां आठवतें—

" तुला आई पाहिजे होती ना ? आई आणतों आतां !"

आई ! भाडोत्री आईचें प्रेम आणि सख्या आईचें प्रेम ह्यांतलें अंतर त्यांना ठाऊक नाहीं वाटतें ?

काय करावें तें सुचत नाहीं. पत्रच लिहावें हें चांगलें. असा विचार करून पत्र लिहिलें.—

ती. बाबांस साष्टांग नमस्कार.

आपलें पत्र पोहोंचलें. वाचून आनंद होण्याऐवजीं दुःख मात्र फार झालें. तुम्हांला ह्या वयांत लग्नाची काय जरूरी आहे ? आपल्या वयाकडे तरी पहा. तुमचा आतां काय भरंवसा. तुम्हीं त्या तरुण मुलीच्या आयुष्याचा नाश करीत आहांत. तुमची मुलगी शोभणार ती. तिच्या वयाचा तरी विचार करा. आपल्या मुलीसमान असलेल्या मुलीशीं पत्नीच्या नात्यानें वागण्यास तुम्हीं तयार आहांत, तुमच्यांत एवढी सुद्धां माणुसकी नाहीं का ? समजा ती तुमची मुलगीच

असतीं तर ? तुह्मांला काय वाटलें असतें ? तुमच्या मुलीला तुह्मीं एका वृद्धाच्या गळ्यांत बांधली असती काय ?

तुह्मी ह्मणतां ती आपखुषीनें तयार आहे. मला तें शक्य वाटत नाहीं. तिच्यावर कोणतातरी भयंकर प्रसंग आला असला पाहिजे ह्मणूनच ती ह्या आत्म-यज्ञास तयार झाली आहे. त्यांतून तिची सुटका करणें हें तुमचें कर्तव्य आहे. तुह्मी ह्मणाल बापाला कर्तव्य शिकवणारा तू कोण मोठा ? ह्मातान्यांना ह्मातारचळ लाग-ल्यावर त्याची दिशाभूल होते ? त्यांना योग्य मार्ग दाखवणें हें आह्मां मुलांचें कर्तव्य आहे.

आज आपल्या समाजांत विधवा कमी आहेत ह्मणून तुह्मी ही भर टाकतां कीं काय ? तुमच्या जगण्याची आशा आतां फार कमी. तुमच्या बरोबर तुह्मी तिला कां दु:खांत लोटतां ?

तुह्माला जर खरोखरच लग्नाची आवश्यकता वाटते तर प्रौढ विधवा कित्येक सांपडतील तुह्मांला, नाहींतर वेश्या आहेतच. स्पष्टच बोलतों, एकवेळ वेश्येकडे गेलांत तर मी आनंद मानीन पण तरुण मुलीशीं लग्न केल्याबद्दल मी तुमचा तिरस्कारच करीन.

तुह्मी हें लग्न मोडा. मला आनंद होईल. आजपर्यंत मला तुमच्याबद्दल जो अभिमान वाटत होता, तो तसाच कायम राहील. लग्न झालेंच तर मात्र मी येणार नाहीं त्या घरांत. एका अबलेचा बळी घेणाऱ्या बापाचें दर्शन घेणे हें सुद्धा माझ्या दृष्टीनें पापच ठरेल.

ह्या वयांत तुह्मी देवाचें नांव घेऊन दिवस काढायचे. हे चाळे कसे सुचले तुह्मांला? असले चाळे करण्याचें वय गेलें तुमचें. स्त्रिया ह्मणजे तुह्माला आपली भोग्य वस्तुच वाटते का ? आई वारली. तुमचें तिच्यावर फार प्रेम होतें. तिला तुह्मी देवता मानीत. तिच्यासाठीं तुह्मी दुसरें लग्न केलें नाहीं. कुठें गेलें तें सारें ? तिला विसरलां वाटतें तुह्मी ? माझ्या आईला तुह्मी पवित्र मानीत होता. हें सारें विसरून मोहापायीं एका देवतेचा तुह्मीं नाश करतां. तिला जन्माचें दु:खी करतां ! एक वेळ तुमची इच्छा पूर्ण होईल. तुमच्या भावना शांत होतील. तुमची शारिरिक भूक शमेल. पण तिची व्यवस्था काय ? ती तरुण आहे. तिनें कोणाकडे पहावें ? तिची इच्छा, तिच्या भावना, तिची शारिरीक भूक ह्याचा काय

विचार? तिच्या भावनांचा गोंधळ माजेल. इतर स्त्रियांकडे पहातांच तिच्या मनांतला अग्नि भडकेल, मनाची तळमळ होईल. तो कोण पुरा करणार?

हिंदु स्त्रियांच्या भोंवती समाजानें एवढी बंधनें टाकलीं आहेत कीं, त्यांना चालतांना इकडे तिकडे बघतांसुद्धां येत नाहीं; मग तिच्या भावनांचें काय होईल? मुकाट्यानें समाजाच्या क्रुरपणाकडे निमुटपणें गप्प बसून पाहाण्याशिवाय कांहींएक करतां येणार नाहीं. मनांतल्या मनांत तळमळतच राहिलें पाहिजे. असे तिचे मरेपर्यंत हाल होतील!

विचार करा तुम्हीं, आणि काय तें ठरवा. माझ्या हातची गोष्ट असती तर मी हें लग्न होऊंच दिलें नसतें.

मी पुष्कळ ठिकाणीं कडक भाषा वापरली आहे. पण माझा त्याबद्दल नाईलाज आहे. मी क्षमा मागतों त्याबद्दल. तुम्हीं लग्न मोडलें तर मला माझा अभिमानच वाटेल. आणि ह्या कडक टीकेबद्दल तुम्हीं सांगाल ती शिक्षा मी आनंदानें कबूल करीन. मला एकवेळ ती संधी द्या हें एकच मागणें.

—आनंद

पत्र लिहीलें. पण मनाचें समाधान होईना. बाबा काय करतील ह्याकडे लक्ष लागून राहिलें आहे. काय होईल तें पहावें.

*　　　*　　　*　　　*

बाबांचें दुसरें लग्न झालें. बाबा मला परके वाटूं लागले. माझ्या मनाला तो एक धक्काच बसला. एवढ्या वयांत समाजानें त्यांना लग्न करायला कसं दिलें ह्याचा मला प्रश्नच पडला. समाजानें खडबडून जागें व्हायला पाहिजे होतें. मोठा हाहा:कार उडवून द्यायला पाहिजे होता. पण समाज पडला श्रीमंतांचा. ह्या श्रीमंतांना कुठें समाजाची पर्वा असते, आपलें सुख? आपली संपत्ती ह्याशिवाय त्यांना दुसरें कांहींच दिसत नसतें.

माझें मलाच आश्चर्य वाटतें. माझ्या मनावर ह्याचा एवढा परिणाम कां व्हावा? आजपर्यंन्तचें माझें आयुष्य पाहिलें तर बेफिकिर वृत्तीचें, मजा लुटण्याचें. थोडक्यांत म्हणजे खाना, पिना और मजा करना असेंच होतें.

मला वाटतें मी थोडासा गंभीर बनलों आहे. स्त्रियांवर अन्याय होतो असें वाटतें मला. मुलींची चेष्टा करतांना, मला कांहींच वाटत नसे पण आजच कां स्त्रियांबद्दल कळवळा वाटायला लागला? आजपर्यंत मी वागत होतों तें बरोबर होतें कां?

असे किती तरी विचार मनांत धुडगूस घालत होते. पुन्हां पुन्हां तेच तेच विचार मनांत येत होते. असे विचार चालू असतांनाच सुधा आली.

मी विचारांत दंग झालों आहे हें पाहून तिनें विचारलें, "कसलारे विचार चालला आहे?"

"लग्नाचा!" मी एकदम म्हणालों.

ती गोंधळली. कारण समजलें नाहीं. तिनें विचारलें, "कोणाच्या? स्वत:च्याच कीं काय?"

आतां समजलें. म्हणालों, "स्वत:च्या नाहीं. वडिलांच्या. त्यांनीं लग्न केलें!"

सुधा सुद्धां गंभीर बनली. पण कांहीं बोलली नाहीं. मी पण गप्पच राहिलों.

गप्प बसलों हें न आवडून सुधानें विचारलें, "जाऊंदे ते विचार आतां. तुझ्या लग्नाचा विचार कर!"

"तो मी कधींच केला आहे!"

"दिली कां तिनें संमति?"

"हो, कधींच!"

"कोण आहे ती?"

"माझ्या समोरच बसली आहे कीं!"

सुधा लाजली नि म्हणाली, "मी केव्हां होय म्हणून सांगितलें?"

"त्या दिवसाची आठवण कर. मी सिगरेट ओढतों त्याबद्दल तूं संशय घेतला होतास, त्या वेळीं मी तुझें चुंबन घेतलें होतें. तूं त्यावेळीं रागावली नाहींस. ह्यावरून मी अनुमान काढलें!"

"बराच आहेस तूं तसा!" ती लाजत म्हणाली.

"सुधा, आजच सांगतो तुला. वडिलांच्या लग्नाबद्दल मी त्यांची फार निर्भर्त्सना केली. त्यांचे दर्शन घेणें सुद्धां पाप आहे असें त्यांना लिहून कळवलें. ज्या अर्थीं त्यांनीं लग्न केलें, त्या अर्थीं खात्रीनें ते माझ्यावर रागावले असणार हें नक्कीं. आतां ह्यापुढें ते मला मदत करतील किंवा नाहीं, हा प्रश्न आहे. मला अजून त्यांच्या वागण्याचा अर्थ समजत नाहीं. महिन्याअखेरीस काय तें समजेल. त्यांनीं पैसे पाठवले नाहींत तर मला शिक्षण सोडावें लागेल. श्रीमंत बापाचा मुलगा असून सुद्धां मी गरीब बनेन. ह्याचा तूं नीट विचार कर!"

"ह्यांत कसला विचार करणार? पण तूं त्यांना वाईट बोललास हें बरं केलें नाहींस!"

"सगळ्यांनाच वाटणार तसें. मला वाटतें मी योग्य तेंच केलें. माझा स्वभावच तसा आहे. वडिलांनीं पैसे पाठविले नाहींत तरी बेहेत्तर. मला पर्वा नाहीं!"

"पण वडिलांनी तुला घरांतून बाहेर काढल्यावर माझे आबा लग्नाला कशी संमति देतील हा प्रश्न आहे! जाऊं दे ह्यापुढच्या गोष्टी. पुढें काय होईल तें आतां सांगतां येणार नाहीं. तूं जरी गरीब बनलास तरी मी तुझीच होईन! वडिलांशीं भांडेन!"

"बस्स् सुधा" मी एकदम तिचा हात धरून म्हणालों, "तुझा जर एवढा निश्चय आहे, तर मी कोणालाच घाबरत नाहीं. तुझ्याकडे पाहून मी उत्साही बनेन. तूं आबांबरोबर भांडायला जर तयार आहेस तर जगाशीं टक्कर द्यायला तुला कांहीं वाटायचें नाहीं!"

तिचा हात हातांत धरून मी किती तरी वेळ बसलों होतों—

* * * *

सकाळीं उठल्याबरोबर वर्तमानपत्र हातांत घेतलें. बिछान्यावरून उठल्या-बरोबर वर्तमानपत्र चाळून पहाण्याची संवय मला लागली होती.

आज कित्येक दिवस वर्तमानपत्रांत कॉंग्रेसचें नांव झळकत होतें. सरकारनें दडपशाही जोरानें सुरू केल्यामुळें कॉंग्रेस त्यावर इलाज कसा करावा ह्याबद्दल विचार करीत होती. गांधीजींच्या हाताखालीं सारे लढण्यास तयार होते. असहकाराची चळवळ सुरू होणार हें नक्की ठरलें होतें. मात्र केव्हां सुरू होणार हाच प्रश्न होता. लोक सरकारच्या दडपशाहीस कंटाळले होते. कायदेभंग करायला लोक तयार होते. सर्व हिंदुस्थानभर असंतोष पसरला होता. त्यामुळें ही चळवळ वणव्याप्रमाणें सर्वत्र पसरणार होती.

वर्तमानपत्रांत रोज नवे नवे विचार येत. महात्माजी व्याख्यानें देऊन लोकांस कसें वागावें, काय करावें ह्याबद्दल सूचना देत होते. थोडक्यांत कॉंग्रेसकडे सर्वांचें डोळे लागले होते. सर्वत्र त्याबद्दल चर्चा चालली होती.

आजच्या अंकांत गांधीजी, जवाहरलाल ह्यांची भाषणें असल्यामुळें मी उत्सु-

कतेनें वाचत होतों. गांधींजीनीं विद्यार्थ्यांना काय संदेश दिला आहे, त्यांनीं कसें वागावें हें सांगितलें आहे ह्याबद्दल कांहीं सापडतें कीं काय, हें मी बघत होतों. तोंच माझा एक मित्र आला.

अर्थात् आमची सध्यांच्या राजकारणावर चर्चा सुरू झाली. मी ह्मणालों, " पूर्वीच्या मानानें पाहिलें तर ही चळवळ जास्त विजयी होईल ! "

"कशावरून ह्मणतोस तूं ? "

"हिंदुस्थान खडबडून जागा झाला आहे. प्रत्येकास आपल्या हक्कांची जाणीव झाली आहे. आपल्या हक्कांसाठीं, स्वातंत्र्यासाठीं लढण्याची हिम्मत आमच्यांत आली आहे. ह्या शिवाय चळवळ पूर्णतेला जाण्यास आणखी दुसरें काय पाहिजे ! लोकांचा पाठिंबा ह्मणजेच चळवळीचा विजय ! "

" हें झालें सारें बोलण्याचें. प्रत्यक्ष बघायला गेलोंतर समाज अजून जागा झाला नाहीं. आह्मीं पण कुठें अजून जागे झालों आहोंत ? आजचे विद्यार्थीसुद्धां गाढ झोपेंत आहेत. त्यांच्या मनांत परिक्षा पास होऊन सरकारी नोकरी पटकावण्या शिवाय दुसरें कांहीं नाहीं. वरून सर्व ह्मणतील, आह्मीं स्वातंत्र्याच्या संग्रामांत उडी घेऊं. पण प्रत्यक्ष वेळ आल्यावर सर्व चुलीकडे जाऊन बसतील. स्वातंत्र्याची तळमळ लागलेले, स्वातंत्र्यासाठीं ज्यांचा जीव तीळतीळ तुटतो आहे, असे हे विद्यार्थी परिक्षा कधी होते, आपणास पदवी आणि सरकारी खुर्ची कधीं मिळते ह्याच विचारांत दंग असतात ! "

नाहीं ह्मणायला त्याचें ह्मणणें कांहीं अंशी बरोबर होतें आणि कांहीं अंशीं चूकही होते. मला त्याचें ह्मणणें खोडून काढतां आलें नाहीं. मी ह्मणालों, " हल्लींचे विद्यार्थी पुष्कळ पुढारलेले आहेत हें तर खरें ? "

" कुठं पुढारलेले आहेत ? खादी वापरायला त्यांना लाज वाटतें. कां तर खादी शोभून दिसत नाहीं. परदेशी कपडे सुंदर शोभून दिसतात. पण ह्या नादान लोकांना माहीत नाहीं कीं आपण देशाचें किती नुकसान करतों तें. नुसत्या छान-शोकीसाठीं लाखों रुपये परदेशी जातात. आजचें क्रान्तीचें युग आहे. नुसते परदेशी, कपडे, पॉवडर, दररोज दाढी, निरनिराळी फॅशन करण्याशिवाय कॉलेज तरुणांना दुसरं कांहीं माहित नाहीं. आज ही फॅशन नको आहे. नुसती तोंडाची बडबडही नको

आहे. काय करायचें ते कृतीनें. आजच्या प्रत्येक तरुणानें जर देशीमाल वापरायचें ठरवलें तर प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्षरित्या त्यांनीं देशसेवा केल्यासारखें होईल. देशांतला पैसा देशांत राहील. पण ज्यांना डामडौल करून पोरींना खूष करायचें आहे त्यांना देशाची फिकीर कशी असणार?" माझा मित्र जोरानें बोलत होता.

त्याचें म्हणणें खरें होतें. मी सुद्धां कांहीं अंशी त्याच वर्गांत मोडत होतों. माझी मलाच लाज वाटली. माझा मित्र बोलूं लागला,

"आनंद तूं म्हणतोस आजचे विद्यार्थी पुढारलेले आहेत. तुला मी एकीकडे घेऊन जातों. जातीनें ती एक वेश्या आहे. तिला बघ आणि आजचे विद्यार्थी बघ. विद्यार्थी किती पुढारले आहेत हें तुला कळून येईल!"

वेश्या म्हटल्याबरोबर मी घाबरलोंच. तरी पण मित्राच्या आग्रहामुळें आणि जिज्ञासा उत्पन्न झाल्यामुळें त्याच्याबरोबर निघालों.

तिच्या घरांत आलों. तिचें नांव अरुणा. एका मोठ्या ब्लॉक मध्यें ती रहातें. आम्हांला पाहून तिनें नमस्कार करून आमचें स्वागत केलें. स्वागतांत सभ्यपणा, आपुलकी स्पष्ट दिसून येत होती. बोलतांना सुद्धां तिचा सभ्यपणा स्पष्ट दिसत होता.

ती वेश्या असावी हें मला पटेना. वाटलें कोणीतरी एक महान् देशसेविका आहे. वेश्या म्हणजे नीच वृत्तीच्या, बोलण्यांत फाजील, पुरुषांना मोहून टाकणाऱ्या असें मी ऐकलें होतें, वाचलें होतें आणि सिनेमांत पाहिलेंही होतें. पण आज अरुणाला पाहून मला मोठा धक्काच बसला.

मी तिचें घर फिरून पाहिलें. घरांत सर्वत्र गांधी, टिळक यांच्या सारख्या थोर पुढाऱ्यांचे फोटो होते. तिचा रंगमहाल पाहिला. वेश्यांचा रंगमहाल! भावना चेतवणारा महाल! पण पहातों तो किती साधा. फाजील असें एकही चित्र नव्हतें तेथें. तेथेंही पुढाऱ्यांची चित्रें होतीं. लक्ष्यांत भरण्यासारखी गोष्ट म्हणजे घरांतील सर्व सामान देशी, साधे आणि हलक्या किमतीचें होतें. स्वतः अरुणा तर खादी वापरत होती. तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें विलक्षण तेज दिसत होतें. तिला वेश्या म्हणण्याचें कोणालाच धाडस करणें शक्य नव्हतें.

माझ्याशीं ती कितीतरी मनमोकळेपणानें बोलली. तिचा स्वभाव कळून आला मला. पुढाऱ्यांबद्दल तिच्या मनांत भक्ति होती. रोज नेमानें ती गांधींची

पुजा करते. गांधीनांच ती देव मानते. देव्हाऱ्यांत दगडाच्या किंवा सोन्याच्या मूर्तीऐवजीं गांधींचा फोटो आहे. तिची ती भक्ति, प्रेम, वागणूक पाहून माझी मलाच लाज वाटली. माझी मान खालीं झाली.

समाजाने नीच ठरवलेली एक वेश्या इतकी पुढारली असेल, देशासाठीं तिला इतकें प्रेम वाटत असेल, ह्याची मला कल्पना नव्हती. कोणी सांगितलें असतें तर त्यावर माझा विश्वासही बसला नसता. पण प्रत्यक्ष सारें पाहिलें. बोलण्यास तोंड नाहीं. आजच्या ह्या वेश्येनें समाजाच्यापुढें आघाडी मारली, आणि समाज तिला नीच म्हणत अजून गाढ झोपेंत आहे. खरोखरच कां समाज जागा झाला आहे? विद्यार्थी पुढारलेले आहेत ?

आपल्या सौंदर्यावर, तारुण्यावर हजारों तरुणांना झुलवून हजारों रुपये तिला मिळवतां आले असते पण तिनें त्याचा त्याग केला. चैन, मोह, पैसा ह्यांपासून ती दूर राहिली. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपलें सुख बाजूला सारलें. पण आजचे विद्यार्थी, जे स्वतःला सुशिक्षित, विद्वान्, पुढारलेले, स्वातंत्र्याचे उपासक समजतात, त्यांना त्या क्षुद्र वेश्येइतकीसुद्धां अक्कल, ज्ञान आणि समज नाहीं. काय ही त्यांची अधोगति ? चैन, पैसा, सुख विलास हेंच जें वेश्यांचें ध्येय; त्यांचें आजच्या विद्यार्थ्यांनीं, लोकांनीं, समाजानें अवलंबन केलें आहे.

माझी चूक मला समजली. घरीं परत येतांना माझा मित्र म्हणाला, " पाहिलेंस आनंद. अरुणासारख्या जर सर्व देशभर स्त्रिया असतील, तिच्या मतांचा, भक्तीचा पुरस्कार करणारे पुरुष भेटतील तर देश हां हां म्हणतां स्वतंत्र होईल ? "

अजून मला तिची खरी हकिकत समजली नव्हती म्हणून मी विचारलें. " तिची जर देशासाठीं एवढी तळमळ आहे तर मग ती वेश्या कां बनली ! "

"ती स्वतः वेश्या बनली नाहीं. तिच्या घरच्याच मंडळीनें तिला ह्या धंद्यांत लोटलें, आज फार फार तर तिचें वय वीस बावीस असेल. तिला मनांत येईल तितका पैसा मिळवतां आला असता. कितीतरी तरुण तिच्यावर मोहित झाले आहेत. तिनें मनांत आणलें असतें तर एकाशीं लग्न करून ती सुखी झालीही असती. पण ती लग्न करीत नाहीं ! "

" कां ? " मी आश्चर्य वाटून विचारलें.

" तिच्याकडे जे तरुण येतात त्यांना ती उपदेश करते. देशाची सेवा कर-

ण्याचा उपदेश करते. वाट चुकलेल्या ह्या तरुणांना ती वाट दाखवते. मलासुद्धां तिनें वाट दाखवली. मी सुद्धां तिच्या साठीं उल्लु बनलों होतों. तिनें मला वाट दाखवली. समाजानें, देशानें, जरी तिला नीच ठरवलें आहे तरी तिची योग्यता कोणत्याही सामान्य देशसेवकापेक्षां कमी नाहीं. अप्रत्यक्षरीतीनं तिनें जी देशसेवा केली आहे ती कोणत्याही पुढाऱ्याला शक्य नाहीं. कितीतरी तरुण आज देशाला सेवक म्हणून मिळाले आहेत तिच्यापायीं."

"खरोखर, वेश्या आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठीं झटते हें पाहून मला आश्चर्य वाटतें. तिचा त्यांत फायदा काय ?"

"कां ती ह्या देशांतली नाहीं ? ह्या मातृभूमींत तिचा जन्म झालेला नाही ! तिला काय देशाबद्दल प्रेम नाहीं ? तिला सुद्धां देश स्वतंत्र व्हावा असें वाटतें. आपला देश गुलाम रहावा असें कोणाला वाटेल? ज्यांना तसें वाटतें तेच देशाचे शत्रू आहेत. देश लवकर स्वतंत्र व्हावा अशी तिची मनापासूनची इच्छा आहे. ह्या ब्रिटिश-सरकारच्या राज्यांत आपल्या वेश्या समाजाला मानाचें स्थान मिळणार नाहीं, वेश्यांची उन्नति होणार नाहीं ह्याची तिला खात्री आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर वेश्या व्यवसायावर निर्बंध येतील. समाज त्यांना नीच, हीन वृत्तीच्या समजतो, तसें होणार नाहीं. त्यांची उन्नति होईल. असें तिला वाटतें !"

तिचे हे विचार कांहीं सामान्य नव्हते. ती इतकी विचारवंत असेल अशी कल्पना नव्हती मला.

घरीं आलों. अरुणा डोळ्यांपुढें उभी राहिली. मनांत आलें, तिच्यापुढे आपण कोणीच नाहीं. तिच्या पासंगाला सुद्धां उभें रहाण्याची आपली लायकी नाहीं. एका वेश्येनें इतकें पुढें यावें आणि ज्यांनीं तिला नीच ठरवली तेच आपण इतकें मागे रहावेत ह्यापेक्षां वाईट ती दुसरी गोष्ट कोणती असणार ?

माझ्या विचार सरणींत किती फरक पडला. माझे मघांचे विचार किती खोटे ठरले. एका सामान्य वेश्येला जर असें बनतां येतें तर मग आपणच कां मागें रहावें. खरोखर अरुणानें माझ्या विचारांना, आचारांना, जबरदस्त धक्का दिला. मनाचा शांतपणा हिरावून नेला.

तिच्या वागण्यावरून एक गोष्ट मला समजून चुकली. देशसेवेसाठीं चैन, मोहपाश, पैसा ह्यांचा त्याग करणें हेंच प्रत्येकाचें मुख्य कर्तव्य आहे !

*            *            *

एका मागून एक असे प्रसंग येतात कीं, डोकें सुन्न होऊन जातें. आबांचा मी एवढा तिरस्कार केला होता, त्यांना एवढें टोंचून, टाकून बोललों होतों, कीं त्यांच्या मदतीची मला अपेक्षा नव्हती. ते मला ह्यापुढें एक पैसाही पाठवणार नाहींत असें मला वाटलें होतें. पण माझा हा समज चुकीचा ठरला. बाबांचें रजिस्टर आलें. इतकेंच नव्हे तर अगोदर मी पैसे पुरत नाहींत म्हणून कळवलें होतें व जास्त पैशांची मागणी केली होती. म्हणून ह्यावेळीं त्यांनीं दहा रुपये जास्त पाठवले होते. मला काय करावें तें सुचेना!

वडिलांच्या मनाचा पत्ता लागत नाहीं. माझें पत्र त्यांना पोहोंचलें नाहीं कां? छे: पत्र पोहोंचलें नसतें तर त्यांनीं तसें कळवलें असतें, लग्नाला कां आला नाहीं ह्याची चौकशी केली असती. मी एवढे केलें तरी त्यांनीं त्याबद्दल कांहींच वाटून घेतलें नाहीं कां? त्यांच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं कां?

अजून वडिलांबद्दल मनांत तिरस्कार येतो. त्यांचे पैसे घ्यावे कीं नाहीं ह्याचा प्रश्न उभा रहातो. त्या पैशांना शिवावेसें सुद्धां वाटत नाहीं. मनांत येतें, त्यांनीं मला खिजवण्यासाठीं तर नाहीं ना हे पैसे पाठवले? "माझा तिरस्कार करणारा तूं, माझ्याच पैशांवर जगतोस आणि तुला जगावें लागणार!" असेंच त्यांना सुचवायचें तर नाहीं ना? छे:! मनांत भलतेच संशय येतात. पैसे घ्यावे कीं नाहीं हेंच समजत नाहीं!

एक मन म्हणतें, "हे पैसे घेतां कामा नये, पैसे घेणें हें तुझ्या स्वाभिमाना-विरुद्ध आहे. हा पैसा नीच आहे. त्याला शिवणें सुद्धां पाप आहे. उपाशीं मेलास तरी हरकत नाहीं. पण त्या पैशांस शिऊं नकोस. स्वाभिमान सोडूं नकोस!"

दुसरें मन म्हणालें, "पैसे घ्यायला काय हरकत आहे? पैसा कधीं नीच असत नाहीं. वडिलांनीं जरी वाईट गोष्ट केली तरी तुला शिक्षण देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. शिकणें हें तुझें कर्तव्य आहे. त्यांनीं वाईट गोष्ट केली आहे हें खरें आहे. तुझें कर्तव्य केलेंस. तुझें म्हणणें त्यांना पटलें नाहीं. तुझ्या ह्या पैशांवर हक्क आहे. तो पैसा जरी तुला वाईट वाटत असेल, तुझ्या स्वाभिमानाच्या आड येत असेल, तरी त्याच्यामागें पवित्र हेतु आहे. तुला तो घेतलाच पाहिजे. तुझें तें कर्तव्य आहे!"

मनाचा गोंधळ उडाला. मनाची रस्सीखेंच सुरू झाली. विचारांतीं ठरवलें, वडिलांनीं आपण होऊन जर पैसे पाठविले आहेत तर ते ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं.

मनांत आलें, सुधेला सुद्धां वरें वाटेल त्यामुळें—

× + × +

केव्हां तरी व्हायचें तें आज झालें. महात्माजींना पकडणार हें सर्वांना ठाऊक होतें. पण इतक्या लवकर पकडतील असें कुणासच वाटलें नव्हतें.

रात्र संपून दिवस उजाडला. अंधार जावून प्रकाश आला. अंधारांत दडून राहिलेली गोष्ट प्रकाशांत आली. महात्माजींना पकडलें. कानावर विश्वास बसेना. एवढ्या मोठ्या लोकमान्य पुढाऱ्याच्या अंगाला हात लावायची छाती सरकारला कशी झाली ?

घरांमध्यें वसून चैन पडेना. रस्त्यांत गर्दी जमत होती. जयघोष चालला होता. मी बाहेर पडलों. रस्त्यांत जीवन भेटला. दोघेही फिरूं लागलों.

मुंबईनें विराट स्वरूप धारण केलें होतें. कांहीं तरी होणार हें स्पष्ट दिसत होतें—

रस्ते भरून गेले होते. पुरुष, स्त्रिया, मुलें, सर्वजण रस्त्यांत जमलीं. सर्व धर्मांचे, सर्व वयाचे लोक जमले. जयघोष सुरू झाला. ट्रॅमस्, बसेस्, मोटर्स बंद पडल्या. दुकानें भराभर बंद होऊं लागलीं. लोक बेफाम झाले होते. त्यांना आपण काय करतों, काय नाहीं हें समजत नव्हतें.

सरकारचे सैनिक आले. आतां रंग पालटला. लोकांच्या अंगांत पराक्रम संचारला. लढाईस प्रारंभ झाला. एका बाजूस सशस्त्र सैनिक. दुसऱ्या बाजूस निशस्त्र लोक. त्यांच्या हातांत शस्त्रे नव्हतीं. पण ते जिवावर उदार होऊन लढत होते. प्रक्षुब्ध जमावानें सैनिकांवर दगडफेक सुरू केली. सैनिक घावरले. पळापळ सुरू झाली. पण लगेच गोळीबार झाला. धन्य ह्या सरकारची ! जगास माणुसकी शिकवणारे, जगाला शांततेचा उपदेश देणारे, हे सरकार स्वतः माणुसकी कोळून प्याले होते.

युद्ध सुरूंच होतें. सारी मुंबई पेटली होती. ट्रॅम्स्, बसेस् रस्त्यावर जळत होत्या. विलायती कपड्यांची होळी चालली होती. जमाव नाक्या नाक्यावर राहून सैनिकांशीं लढत होता. एवढे हे वीर सैनिक पण मुख्य रस्ता सोडून गल्लींत जायला घाबरत होते. काय त्यांचा हा पराक्रम ! ठिकठिकाणीं किती तरी आगी लागल्या. मुंबईच पेटत असल्याचा भास होत होता.

लाठीहल्ला, गोळीबार सर्वत्र चालू होते. पण जमावाला काबूंत आणणें त्यांना शक्य नव्हतें. महात्माजींच्या अंगाला हात लावल्याचा परिणाम काय होतो हें सरकरला समजून चुकलें होतें. लहान लहान मुलें सुद्धां सर्वांच्या पुढें पुढें जात होतीं. त्यांना सुद्धां आपल्या जिवाची पर्वा नव्हती. मात्र हिंदुस्थानांत जन्मलेल्या ह्या सैनिकांना स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या लोकांवर लाठीहल्ला, गोळीबार करण्यास कांहींच वाटत नव्हतें. मुलांवर गोळी झाडतांना त्यांचा हात कचरत नव्हता. एकाच्याही अंगीं स्वातंत्र्यप्रेम, देशाचा अभिमान, देशांतील लोकांबद्दल प्रेम नव्हतें.

आजची ही मुंबई विसरण्याजोगी नव्हती. सरकारची निर्दयता, कठोरपणा, अत्याचार ह्यांनीं सरकारबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला. उघड्या डोळ्यांनीं हें सहन करवेना. इकडे देश स्वातंत्र्यासाठीं लढत असतांना आपण स्वस्थ बसावें हें कोणा स्वातंत्र्यप्रेमी माणसास शक्य आहे ?

घरीं आलों. बरोबर जीवनही होता. मी म्हणालों, "जीवन, परिस्थिति बिकट झाली आहे. व्हायलाही पाहिजे. असे अत्याचार झाल्याशिवाय आपला देश जागा व्हायचा नाहीं."

"ह्या सरकारला जरासुद्धां दयामाया नाहीं कां ? निःशस्त्र लोकांवर हल्ला करून त्यांना मारणें याला काय पराक्रम म्हणतात ?"

"ब्रिटिश लोकांना माणुसकी आहे कुठें ? त्यांना फक्त साम्राज्य स्थापायचें आहे. आपले बंधु जे आयरिश लोक त्यांच्यावर सुद्धां त्यांनीं नाना अत्याचार केले. त्यांच्या अंगीं काय माणुसकी असणार ? स्वार्थ, मोह आणि हाव ह्यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं. पण एक वेळ अशी येईल कीं, ह्या लोकांना रडावें लागेल. जगांत त्यांना कोणतेंच स्थान मिळणार नाहीं. इतर देशांकडे त्यांना भीक मागावी लागेल. एकही मित्र मिळणार नाहीं."

"पापाचा घडा आज ना उद्यां भरणारच ! आनंद, आजचें हें कृत्य एवढें कठोर आहे कीं, कोणालाही स्वस्थ बसतां येत नाहीं. ह्या स्वातंत्र्याच्या संग्रामांत उडी घेणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. तुला काय वाटतें ?"

"माझा तोच विचार आहे. महात्माजींनीं काय सांगितलें आहे ? ह्या चळवळींत प्रत्येकानें भाग घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांनीं, शिक्षकांनीं, प्राध्यापकांनीं, शाळा कॉलेजें बंद पाडलीं पाहिजेत. ह्यापुढें राष्ट्रीय शिक्षण घेतलें पाहिजे, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं झगडलें पाहिजे !"

आम्ही बराच वेळ विचार करून बेत नक्की केला. सत्याग्रहांत भाग घ्यायचा. देशासाठीं मेलों तरी हरकत नाहीं—

संध्याकाळीं सुधा आल्यावर मी तिला सत्याग्रहांत भाग घेणार म्हणून सांगितलें. ती घाबरली. म्हणाली, "आनंद, असा वेडेपणा करूं नको !"

"देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढणें जर मूर्खपणा आहे तर तो मी करणार ! देशाला आज असल्या मूर्खांचीच जरूरी आहे. शहाण्यांचा गुलामीची बेडी जास्त घट्ट करण्यापेक्षां कांहीं एक उपयोग व्हायचा नाहीं !"

"पण तूं एकटा गेला नाहींस म्हणून काय अडून रहाणार आहे सारें ?"

"असें जर प्रत्येक जण म्हणूं लागला तर कसें होईल ? सुधा, माझ्यामुळेंच कांहींतरी मोठ्या उलाढाल्या होतील असें नाहीं. पण माणसाला स्वाभिमान हा असतोच. देश लढत असतां मी भेकड बनून घरांत बसूं काय ? तुला तुझा आनंद भेकड बनलेला आवडेल काय ? सुधा, तुला वीर स्त्री बनलें पाहिजे. तूं मला उत्तेजन दिलें पाहिजेस"

"मला सुद्धां तसें वाटतें पण मी दुबळी आहे रे !"

"हा दुबळेपणा सोड. कर्तव्य बजाव ! मी कर्तव्यापुढें सर्व कांहीं लाथाडायला तयार आहे. तूंही तशी बन !"

"सांगितलं ना मी दुबळी आहे म्हणून ! मला तसें धैर्य होणार नाहीं. आनंद तुझ्या वडिलांनीं तुला परवानगी दिली काय ?"

"मला कोणाच्याही परवानगीची जरुरी नाहीं. कर्तव्यापुढें मी कोणालाच जाणत नाहीं !"

"माझं सुद्धां ऐकणार नाहींस ?"

"सुधा, कर्तव्य फार कठोर असतें. तुला तुझा मान राखायचा असेल तर मला ह्यापासून परावृत्त करण्याचा हट्ट धरूं नकोस. तूं माझी आहेस. मला तूं भेकड बनलेली नको आहेस. मला आनंदानें परवानगी दे. देशासाठीं मेलों तरी त्यांत आनंद मान. तुझें तें कर्तव्य आहे. देशासाठीं सर्वस्वाचा त्याग करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. ह्या पेक्षां मी जास्त काय सांगणार?"

सुधा कांहींएक बोलली नाहीं. तिच्या चेहऱ्यावर भीती, दुःख स्पष्ट दिसत होतें. मी म्हणालों, "सुधा, असें भिणें, दुःख करीत बसणें हें आजच्या मुलींचें काम नाहीं. आपल्या देशांत किती वीर स्त्रिया होऊन गेल्या ह्याची आठवण कर. देशासाठीं, त्यांनीं आपल्या मुलांना, पतींना इतकेंच काय पण वेळीं स्वतःलासुद्धां बळी दिलें!"

सुधा म्हणाली, "मला खरोखरच भीती वाटतें. तुझें काय होईल? तुला तुरुंगांत जावें लागेल!"

"सध्यां आपण आहोंत कुठें असें वाटतें तुला? तुरुंगांतच आहोंत आपण सुधा. तुरुंगाच्या भिंती फोडून बाहेर येण्यासाठींच आपण आज धडपडतो आहोंत. त्यासाठींच आज लढा सुरू झाला आहे. आजची ही संधी गमावली तर जन्मभर तुरुंगांतच राहूं!"

सुधेचें प्रेम मला माहित होतें. तिला सोडून रहायचें माझ्या जिवावर येत होतें. तिचा पाश मला मागें खेंचत होता. पण महात्मागांधींची तुरुंगांतली मूर्ति माझ्या समोर उभी रहात होती. जणुं काय ती सांगत होती, "उठा, वीर बना. तुरुंग फोडा, देशाचें स्वातंत्र्य परत मिळवा!"

"देशाच्या स्वातंत्र्यासाठीं म्हातारपणीसुद्धां महात्माजी लढत आहेत. आणि तें डोळ्यांनीं पहात स्वस्थ बसणें हें कसें शक्य आहे? ते कोणासाठीं लढतात? आमच्याचसाठीं ना? आह्मांलाच सुखानें रहातां यावें म्हणूनच ना? मग त्यांना सहाय्य करणें, त्यांच्या मागोमाग जाणें हें आमचें कर्तव्य आहे."

ह्या विचारांनीं सुधेचं प्रेम मला अडवूं शकत नव्हतें. प्रेमापेक्षां कर्तव्य मोठें आहे असें मला वाटलें—

सुधेचा अश्रुपूर्ण चेहरा माझ्या हृदयाला भिडला. मी तिचे अश्रू पुसले. तिला घट्ट हृदयाशीं धरली. ह्यापुढें तिची भेट होणार नाहीं असें मला वाटत होतें.

ाझ्या हृदयांत सुद्धां खळबळ माजली होती. तिला हृदयापासून दूर करावीशी टेना—शेवटीं मोह दूर सारला—

सुधा गेली. घरीं गेली. मला वाटलें ती माझ्यापासून दूर दूर गेली. पुन्हां माझ्याकडे येणार नाहीं. पुन्हां तिची भेट होणार नाहीं. वाटलें, जावें आणि पुन्हां तिला जवळ आणावी. पण कर्तव्य आड आलें!

*  *  *

तुरुंगांत बसल्या बसल्या मी विचार करतों, पुढें काय होणार?

तुरुंगांत सारा दिवस काढावा लागत असल्यामुळें कोंडल्यासारखें वाटतें. पण जीवन जवळ असल्यामुळें वेळ तेवढाच मजेंत जातो. आम्ही राजकीय कैदी असल्यामुळें आम्हांला वाईट रीतीनें वागवत नाहींत. वेळेवर जेवण मिळतें, पण जेवणास चव नाहीं. खायचें म्हणून खायचें. दिवसभर खोलींत बसून रहायचें. एक वर्ष काढलें पाहिजे ह्या खोलींत. तोंपर्यंत बाहेर जगांत काय चाललें आहे, ह्याचा पत्तासुद्धां लागणार नाहीं. एक वर्ष जगाबद्दल अज्ञानांत घालवावें लागणार! वाचावयास वर्तमानपत्रें मिळत नाहींत त्यामुळें सकाळीं उठल्यावरोबर चुकल्या चुकल्या सारखें वाटतें. दिवसभर भटकण्याची संवय पण इथं चोविसतास कोंडून रहावें लागतें. त्यामुळें जीव बेचैन होतो. कधीं एकदां सुटून बाहेरच्या जगांत जातों असें वाटतें.

आमची खोली मोठी आहे. हवेशीर आहे. उजेडही आहे. मात्र मच्छरांचा त्रास फार होतो. रात्रीची झोपमोड होते. असा राग येतो—पण काढणार कोणावर? मनांतल्या मनांत जळफळल्याशिवाय काय करणार? तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडे तक्रार केली. त्यानें जबाब दिला,

"हा तुरुंग आहे घर नाहीं, वाटेल त्या सुखसोयी मिळायला!"

किती समर्पक उत्तर होतें हें. पुन्हा तक्रार केली नाहीं. देशासाठीं वाटेल तो त्रास सहन करण्यास तयार झालेले आम्ही, वाटेल त्या परिस्थितींत दिवस काढले पाहिजेत. अशा तक्रारी करणें सत्याग्रह्यास योग्य नाहीं.

खोलींत आम्ही सारे पंधराजण आहोंत. जागा पुरत नाहीं. पण पुरवून घेतों. एक वर्ष काढायचें आहे ह्या खोलींत. कांहीं लवकर सुटणारे आहेत. कांहीं जास्त दिवस रहाणारे आहेत. भांडून कसें चालेल? आणि भांडणार तरी कां?

आमचा काय अधिकार आहे भांडण्याचा? एके प्रसंगीं एकत्र आलों, आहोंत. असेच एक दिवस एकमेकांपासुन दूर जाणार. जोपर्यंत एकत्र आहोंत तोपर्यंत एकमेकांशीं हांसुन खेळून दिवस घालवावे हेंच योग्य आहे.

दिवसा गप्पा गोष्टी करतां करतां दिवस जातो. रात्र येते. रात्रीं सर्वत्र सामसूम झाल्यावर एकलेपणाची जाणीव होते. तुरुंग खायला येतो असें वाटतें. भयाण शांतता जीव बेचैन करते. सुधाची आठवण येते. जीव कासावीत होतो. ती काय करीत असेल, तिला काय वाटत असेल, आपली आठवण तिला येत असेल काय? किती तरी प्रश्न पुढें येतात. मनाला फार वाईट वाटतें. प्रसंगीं अश्रूही येतात डोळ्यांत. पण ह्या भयाण अंधःकारांत ते दिसणार कोणाला? दिसत नाहींत हेंच ठीक आहे. कोणी पाहिलें असतें तर मला मूर्खांत काढला असता. मला भ्याड समजला असता! पण माझें हृदय त्यांना समजलें असतें कां? हृदयांत सुधा आहे हें त्यांना दिसलें असतें कां? कसें दिसणार! माझ्या शिवाय दुसऱ्यांना ती कशी दिसणार? प्रेमाच्याच दृष्टीनें पाहणाऱ्याला ती दिसेल! प्रेम करणाऱ्यालाच माझी स्थिति समजून येईल!—

माझें मलाच आश्चर्य वाटतें, माझ्या डोळ्यांत अश्रू कां यावेत? प्रेम हंसवतें तसेंच रडवतेंही.

सुधा आणि मी दोनचार मैलांच्या अंतरावर असून सुद्धां किती दूर आहोंत! तुरुंगाच्या ह्या भिंतीनें हें चिमुकलें अंतर किती तरी पट मोठें केलें आहे. तिला भेटण्यास जीव उत्सुक होतो. वाटतें, ती मला बोलावते. दोन्ही हात पुढें करून बोलावते, आलिंगन देण्यास बोलावते—पण डोळे उघडून पाहतों, तों सारा भास!

ह्यामुळें रात्र कधीं एकदां संपते असें वाटतें. रात्रीचा कंटाळा येतो. रात्र नसती तर बरें झालें असतें असें वाटतें. माझे इतर मित्र स्वस्थ झोपलेले असतात. मलाच झोंप येत नाहीं. जरा कुठें डोळा लागला तर मच्छरांची साडेसाती मागें आहे. जीव नकोसा झाला आहे. वाटतें कुठून इथें आलों. आपण होऊन कां हे त्रास मागें लावून घेतले?—

पण हें क्षणभरच! महात्माजींची भव्य, हंसरी मूर्ति डोळ्यापुढें उभी रहातांच सारे विचार एकदम बदलतात. केलें तेंच योग्य आहे असें वाटतें—

माझ्या मित्रांना स्वस्थ झोंप लागते मग मलाच कां लागूं नये ? मी जास्त विचार करतों म्हणून कीं काय ? मनांत कांहीं आणायचें नाहीं असा मी निश्चय करतों, पण जमत नाहीं. जेव्हां मनावर ताबा मिळेल तेव्हांच शांतपणें झोप येईल.

*　　　*　　　*　　　*

नुसतें यांत्रिक जीवन बनलें आहे माझें ! अमुकच वेळीं उठावें, अमुकच वेळीं जेवावें, ठराविक वेळींच झोपावें. यांत जरासुद्धां बदल होत नाहीं. सारें निरस वाटतें.

तुरुंगांत राजकीय कैद्यांना चांगल्या रीतीनें वागवत नाहींत. पण स्वातंत्र्या-साठीं हे त्रास भोगण्यास तयार झालेल्या लोकांना पाहून आश्चर्य वाटतें. त्यांच्या सहन शक्तीचें कौतुक वाटतें.

माझें आयुष्य ह्मणाल तर ठराविक साच्यांत बसलें आहे. सकाळीं उठल्या-बरोबर व्यायाम करायचा. बाहेर मोकळ्या हवेंत फिरतां येत नाहीं. त्यानंतर थोडें वाचन करायचें. वाचायला पुस्तकें मिळतात हें नशीबच ह्मणायचें. त्यामुळें जरा वेळ जातो. रात्रीं दिव्याचा प्रश्न असल्यामुळें वाचतां येत नाहीं. माझे कपडे वगैरे मीच धुतों. घरीं कधीं कपड्यांना हात लावला नव्हता. मी तुरुंगांत आलों हें एक प्रकारें बरें वाटतें. स्वतःकाम करायला शिकलों. थोडी काटकसर झाली. त्याब-रोबर व्यायामही मिळूं लागला. काम करायला कसे त्रास पडतात हेंही समजून आलें. ह्या कामामुळें वेळही बराच जातो. तेवढाच वेळ कामांत गेल्यामुळें तुरुंगाची आठवण विसरून जातो. मनांत येतें कोणत्यातरी कामांत गुंतवून घ्यावे. पण काय करणार ? लेखन थोडें करतों तें पण अधिकाऱ्याच्या सौजन्यानें.

महिन्यांतून आम्हां कैद्यांना एक पत्र लिहितां येतें. गाठीभेटी होतात. खरें पाहायला गेलें तर हा आमचा भाग्याचा दिवस ! पण मला तो दिवस आला काय नी गेला काय सारखाच. मला कोण पत्र पाठवणार आणि भेटायला तरी कोण येणार ? वडील तर शक्यच नाहीं. सुधा ! तिच्याबद्दल मात्र अपेक्षा होती. ती पत्र पाठवेल, निदान एकदां तरी भेटायला येईल ह्मणून मी त्या दिवसाकडे उत्सुकतेनें वाट पाहात बसतो. तो दिवस आह्मांला कसा जातो हें आह्मा कैद्यांखेरीज इतरांना कसें समजणार ? त्या दिवशीं कोणी भेटायला आलें

नाहीं कीं मन निराश होतें. फार दुःख होतें. सुधा कां येत नाहीं ह्याचा विचार येतो. माझ्यावर ती रागावली तर नसेल ना ? इतर मित्रांना त्याचे आप्तेष्ट भेटायला आले कीं, मला त्यांचा हेवा वाटतो.

जीवनला भेटायला येणाऱ्यामध्यें कांहीं माझ्या ओळखीचे असतात. त्यामुळें जरा समाधान होतें मनाचें. इतरांना पत्रें येतात ते त्यांची उत्तरेंही पाठवतात. पण मला पत्रें येत नाहींत. मी तरी कोणाला पत्रें लिहिणार ? सुधाला एक पत्र लिहिलें पण त्याचें उत्तर आलें नाहीं. कां ते समजत नाहीं. माझ्या नशिबीं नसेल तें सुख !

आज पत्रें येण्याचा दिवस ! मला पत्र येण्याचा संभव नव्हता तरी पण मन पत्र घेऊन येणाऱ्याची वाट पहात होतें. बिचारें मन. सर्वांना पत्रें आलीं. मलाच नाहीं.

जीवन पत्र वाचत होता. त्याच्याकडे पाहून मला वाटलें, किती दुर्दैवी मी ! पत्र वाचतां वाचतां त्याचा चेहरा गंभीर झाला. मला कांहींच बोध झाला नाहीं. मनांत भलत्याच शंका येऊं लागल्या. त्यानें पत्र संपवतांच मी विचारलें, "काय रे, कांहीं वाईट तर नाहीं ना ? कोणाचें आहे पत्र ?"

"बाबांचे. कांहीं वाईट नाहीं !" जीवन म्हणाला.

"मग एवढा गंभीर कां बनलास ?"

माझ्यापुढें पत्र करून तो म्हणाला, "हें वाचून बघ !"

मी त्याच्या हातून पत्र घेऊन वाचलें. सारांश असा होता—

"जीवन तूं ह्या स्वातंत्र्याच्या चळवळींत भाग घेतला हें पाहून मला आनंद झाला. आज माझ्या वयाला पन्नाशी होत आली. पण मी देशासाठीं कांहींच केलें नाहीं हें पाहून वाईटही वाटलें. पण जीवन, तूं विचार न करतां ह्या चळवळींत पडला आहेस असें मला वाटतें. मला सुद्धां पुष्कळ वेळां चळवळींत पडतां आलें असतें पण मला संधी आली नाहीं. मला सुद्धां स्वातंत्र्याची तळमळ आहे पण नाइलाज झाला. मी जर चळवळींत पडलों असतों तर कुटुंब निराधार बनलें असतें. आणि लोकांना सुख मिळावें म्हणून मी झगडण्यास तयार झालों असतों तर एका कुटुंबास दुःखी बनवून देशांतील दुःखांत भर टाकली असती.

देशसेवा प्रत्येकानें जरूर केली पाहिजे पण त्यावरोबरच आपल्यावरची जबाबदारी पाळली पाहिजे. आपल्या घराचा विचार केला पाहिजे. ज्यांच्या घरीं खाण्यापिण्यास मुबलक आहे त्यांना ह्याबद्दल विचार करण्याचें कारण नाहीं. पण जीवन, आपली स्थिती त्या श्रीमंत लोकांसारखी नाहीं. मी जें काय मिळवतों त्यावर आमचा खर्च कसा चालला आहे हें तुला माहीत आहेच. तुझ्या शिक्षणाचा खर्च नसता तर कांहीं शिल्लकही राहिली असती. पण तिही नाहीं. ह्यापुढें घरची सारी मदार तुझ्यावर आहे. घरांतील लोकांस सुखी करणें हें तुझें कर्तव्य आहे. घरांतील लोकांची दुःखं नाहींशीं केल्यावर मग दुसऱ्यांच्या दुःखाकडे लक्ष द्यावें. पुष्कळांना हा रोखठोक व्यवहार वाटेल. पण ह्याच व्यवहारावर आज जग चाललें आहे. जो घरच्या मंडळींना सुख देऊं शकत नाही तो दुसऱ्यांना कसचें सुख देणार ? आणि प्रत्येकजण जर घराची पर्वा न करतां देशकार्यास वाहून घेऊं लागला तर काय देश सुखी होईल असं वाटतें तुला ? उलट देशांतील दुःखें वाढतील. देशकार्य म्हणून करायला जाणार आणि देशद्रोह मात्र पदरीं पडेल.

पुष्कळ मोटमोठे पुढारी देशकार्यासाठीं झटतात. देशासाठीं त्यांनीं आपलें सर्वस्व वेचलें आहे पण त्यांनीं घराचा त्याग केला नाहीं. उलट घराची योग्य व्यवस्था लावूनच ते आपलें कार्य करतात. कुटुंबाची सोय करून सारे आपल्या ध्येयाचा विस्तार करतात. देशासाठीं सर्व कांहीं सोडून दिलेले असे एक दोनच पुढारी सांपडतील हिंदुस्थानांत तुझ्या सारखे तरूण मात्र पुष्कळ सांपडतील. तुझ्या ह्या कार्यामुळें उलट देशांतलें दुःख मात्र वाढेल. तुझ्यासारख्या तरुणांना मागचा पुढचा विचार नसतो. मनांत आलें कीं झालें. करायला सुरवात.

जीवन, आपल्या कुटुंबाचा विचार कर. तूं एकच आधार आहेस. कुटुंबांत जर दोनचार मिळवणारे असते, तर मी तुला चुकून सुद्धां विचारलें नसतें. तूं चूक केली असें मी म्हणत नाहीं. तुझ्या ह्या धैर्याचा मला अभिमानच वाटतो. मी देश-कार्यास मुकलों असें मला वाटत नाहीं. कारण योग्य रीतीनें संसार करून कुटुंबाला सुखी ठेवावें हें सुद्धां एक देशकार्यच आहे.

जीवन, नुसतें तुरुंगांत जाऊन आलें म्हणजे देशकार्य होत नाहीं. तुरुंगाबाहेर संसारांत राहून सुद्धां देशकार्य होईल. संसारांत राहून, कुटुंबाला सुखी करत असतां

शक्य तों देशाला मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. आणि माझ्या मतें हीच देशसेवा देशाच्या हितास जास्त कारणीभूत होईल. तुझ्यासारखी देशसेवा देशाला उपयोगीं पडेल पण तात्पुर्ती. शेवटीं तिचा परिणाम कोणाच्या तरी दु:खांतच होणार '

जीवन, विचार कर. शांतपणें विचार करायला तुला भरपूर वेळ आहे. तरुण लोक भावनेच्या लवकर आहारीं जातात म्हणून तुला मी दोष देत नाहीं. तरुणाकडून चुका ह्या व्हायच्याच. पण त्या सुधारणें हें त्यांचें कर्तव्य आहे. विचार करून काय तें ठरव ! "

मी पत्र वाचलें. मी सुद्धा गंभीर बनलों त्यांत त्यांनीं प्रगट केलेले विचार, मतें इतकीं सत्य होतीं कीं, ती कोणालाही पटावी. मी जरी गंभीर बनलों तरी माझ्या मनाचा गोंधळ उडाल्याशिवाय राहिला नाहीं माझें मन म्हणत होतें देशासाठीं व्यक्तिचाच काय पण कुटुंबाचा सुद्धां त्याग केला पाहिजे. सर्वांच्या कल्याणांतच आपलें सुख आहे असें मानून राहिलें पाहिजे. कुटुंबाच्या सुखासाठीं झटतांना देशकार्य होणें शक्य नाहीं. देशसेवकांनीं संसाराबाहेरच राहिलें पाहिजे.

पण माझें मलाच आश्चर्य वाटतें, हे विचार मला कसे सुचले ? सुधेचा प्रश्न येतांच हे विचार चटकन् नाहींसे झाले. जीवनच्या वडिलांचेंच म्हणणें खरें वाटू लागलें. त्यांत सत्य आहे हा विचार मनाला पटला.

* * * *

तुरुंगांतून सुटलों आज. बाहेरच्या जगांत पाय ठेवल्याबरोबर हृदय आनंदानें भरून आलें. आपण नव्या वातावरणांत-नव्या जगांत आल्याचा भास झाला.

बाहेर आल्यावर जीवनला विचारलें, "ह्यापुढें काय करायचें ठरवलें आहेस तूं ? "

" मी स्वत: असें कांहीं ठरवलें नाहीं अजून. वडिलांच्या संमतीनें ठरवणार काय तें ! "

" म्हणजेच पुन्हां कॉलेजमध्यें जाऊन शिक्षण पुढें चालू ठेवणार असेंच ना ?"

" वडिलांनीं तसें सांगितलें तर तसेंही करीन ! "

" तुला स्वत:चें असें मत नाहीं ? "

" आहे कीं ! पण तें मला योग्य मार्ग दाखवण्यास लायक आहे असें वाटत नाहीं ! "

थोडा वेळ आम्ही कांहीं बोललों नाहीं. बाहेर रस्त्यावर आल्यावर वर्तमानपत्रांत वाचलें, चळवळ अजून चालू आहे. तुरुंगांत वर्तमानपत्रें मिळत नसल्यामुळें खरी बातमी मिळतच नसे.

जीवननें मला विचारलें, " काय रे, तूं काय करणार ? "

" अजून ठरवलें नाहीं ! "

" पण पुन्हां तुरुंगांत जाणार कां सत्याग्रह करून ? "

" नाहीं. पुन्हा तुरुंगांत जाण्याची माझी इच्छा नाहीं. तुरुंगाबाहेर राहूनच मी कांहीं तरी करीन. तुरुंगांत गेल्यानें वेळ फुकट जातो, त्यापेक्षां त्यावेळेंत पुष्कळ गोष्टी करतां येतील ! "

" काय काय करणार आहेस ? "

" तेंच अजून ठरवलें नाहीं. ह्या दोनचार दिवसांत काय तें ठरवीन ! "

जीवन आपल्या घरीं गेला. मी खोलीवर आलों. खोली उघडून पाहतों तों आंत धूळ सांचली होती. मोठ्या कष्टानें धूळ झाडून काढली. खोली स्वच्छ केली. कामाची आतां मला बरीच संवय झाली होती.

कधीं एकदां संध्याकाळ होते ह्याकडे माझें लक्ष लागलें होतें. मला सुधेला भेटायला जायचें होतें. तिला भेटण्यास मी उत्सुक झालों होतों. सुधेला भेटण्यास म्हणून गेलों. दारांत ती दिसली नाहीं. तिच्या आईला हांक मारून, सुधा कुठें आहे म्हणून विचारलें.

ती म्हणाली, " आलास बाबा ! ये. किती वाळलास रे तूं ? "

" पुष्कळ दिवस न पाहिल्यामुळें वाटतें तसें. पण सुधा कुठें गेली ? बाहेर फिरावयास गेली कीं काय ? " मी अधिरतेनें विचारलें.

" ती गेली. आतां दुसऱ्याची झाली. तिचा ह्या घरावर आतां हक्क राहिला नाहीं ! "

मला वाटलें, मी स्वप्नांत तर नाहीं ना ? डोळ्यांपुढें अंधेर आल्याचा भास झाला मला मी चटकन एका खुर्चीवर बसलों.

मी हळूहळू विचारलें, " सुधेचें लग्न झालें ? "

" होय. चार पांच महिने होत आले ! काय करणार बाबा. पोरीच्या इच्छे विरुद्ध झालें सारें. पण तिकडचा स्वभाव माहित आहेच तुला. कोण जाणार त्यांच्या विरुद्ध ! "

मला तिथं बसवेना. मी जायला निघालों. तिची आई म्हणाली, " वाईट वाटून काय उपयोग बाबा ! मला आणि तिला थोडें कां दुःख झालें, पण परिस्थितीपुढें मानवाचें काय चालतें ! "

" बरें येतों मी आतां ! "

" जरा थांब हां ! " असें म्हणून ती आंत गेली आणि थोड्याच वेळांत एक पत्र घेऊन येऊन ती म्हणाली, " हें घे, सासरी जातांना तिनें माझ्याकडे दिलें होतें हें पत्र ! "

मी पत्र घेतलें आणि बाहेर पडालों.

खोलीवर येतांच पत्र फोडून वाचण्यास सुरवात केली.—

" आनंद यास "—

नुसता आनंद हा शब्द लिहिलेला पाहून तुला आश्चर्य वाटेल. मला पण मागें प्रिय हा शब्द न जोडल्यामुळें वाईट वाटतें. पण त्या शब्दाचा काय उपयोग आहे !

माझें लग्न ठरलें हें तुरुंगांत तुला समजण्याची सोय नव्हती. तुरुंगांतून सुटून आल्यावर जेव्हां तुला ही खबर समजेल तेव्हां तुझी स्थिती काय होईल ह्याची जाणीव मला आहे. पण जाणीव असून सुद्धां मी कांहीं करूं शकत नाहीं.

तुला माहीत आहे, आबांचा तुझ्यावर फार राग होता. आपलें एकमेकांवर प्रेम आहे हें त्यांना माहीत नव्हतं. समजलें असतें तरी सुद्धां त्यांनीं लग्नाला संमती दिली असती कीं नाहीं हें सांगतां येत नव्हतें. तरी आपलें लग्न होणें हें पुष्कळ शक्य होतें. पण तूं तुरुंगांत गेलास, सरकारच्या विरुद्ध तूं गेलास. आबांना प्रिय वाटणाऱ्या, थोर वाटणाऱ्या इतकेंच नव्हे तर इमानानें सेवा करणाऱ्या सरकारच्या विरुद्ध तूं गेलास. आबांना हें सहन कसें होणार ? ह्यापुढें तुझें नांवसुद्धां घरांत निघतां कामा नये, असा त्यांनीं हुकूम बजावला.

तुझें पत्र आलें. दुर्दैवानें तें त्यांच्याच हातांत पडलें. तूं उघड केलेलें प्रेम त्यांनीं वाचलें. त्यांचा संताप अनावर झाला. ते बोलून गेले, " सरकारच्या विरुद्ध

जागाऱ्या चोराशीं लग्न करून काय तूं सरकारचा डोळा आमच्यावर वक्र करून घेणार आहेस ? आम्ही सरकारी नोकर. एकाद्या राजद्रोही इसमाशीं नातें जोडलें. समजतांच आमच्या नोकरीवर गदा येणार. मी कांहीं झालें तरी तुझें त्याच्याशी लग्न होऊं देणार नाहीं. प्रसंग आला तर ठार मारीन सुद्धां ! ''

मी ह्यावर काय बोलणार होतें ? त्यांनीं मला कॉलेजांत जाण्याची बंदी केली. घरांतून बाहेर जाण्यास बंदी केली. मला समजत होतें, हा माझ्यावर जुलूम होतो आहे. पण त्याचा प्रतिकार करण्याची शक्ति माझ्या अंगांत नव्हती. तूं मला भेकड म्हण, भ्याड म्हण ! त्यांनीं माझें लग्न ठरवलें. मी कांहीं एक न बोलतां बोहल्यावर चढलें. अश्रु आवरत नव्हते. पण ते पाहणार कोण ? मनांत विचार आले, आत्महत्या करून ह्या त्रासांतून सुटका करून घ्यावी, पण धीर होईना. जीव प्यारा असतो ना सर्वांना !

खरोखर आनंद ! मला माझ्या बाबांच्या विरुद्ध जातां आलें नाहीं. तुम्ही जर इथं असतां तर काय झालें असतं त्यावेळीं हें सांगतां येत नाहीं. तरी पण मला कांहीं करतां आलें नसतें असें मला वाटतें. आनंद, मी भ्याड आहे. तूं धैर्यवान्, धीट आहेस. तुझी पत्नी होण्याची माझी लायकी नाहीं. मी तुझ्यावर प्रेम केलें. कांहीं झालें तरी तुझीच म्हणून रहाणें हें माझें कर्तव्य होतें. तें कर्तव्य मला बजावतां आलें नाहीं. त्यामुळें मीही दु:खी झाले. तूंही दु:खी होशील. तसें बघायला गेलें तर मी तुला फसवल्यासारखेंच झाले नाहीं कां ?

जाऊंदे तें सारं. काय उपयोग आहे त्याचा. तूं मला कांहींही म्हण. उलट बोलायला मला तोंड नाहीं. तुला दु:खी केल्याबद्दल मला क्षमा कर.

— सुधा ''

मी पत्र वाचून संपवलें. राग, तिरस्कार, दु:ख ह्यांनीं माझ्या मनांत गोंधळ उडाला. वाटलें ह्यापेक्षां तुरुंगांतच असतों तर छान झालें असतें !

माझ्या मनावर झालेला हा आघात भयंकर होता.

*          *          *

भटकतो आहे देशभर. आज एका गांवांत तर उद्यां दुसऱ्या ठिकाणीं. सारखें असें चाललें आहे. कुठें म्हणून स्थिर राहवत नाहीं, एकाच गांवांत एका दिवसापेक्षां जास्त दिवस रहायला कंटाळा येतो.

हिंदुस्थानांतील ह्या खेड्यांत नवीन तें काय दिसणार! अज्ञानाच्या खोल दरींत खितपत पडलेली ती जनता पाहून मनाला खेद वाटल्या वांचून रहात नाहीं. शहरांतलें आणि खेड्यांतलें जीवन ह्यामध्यें असलेला हा भयंकर फरक पाहून मन आश्चर्यचकित होऊन जातें—गोंधळून जातें.

खेड्यांतील जनता—जमीनदारांनीं पिळून काढलेली जनता. अज्ञानाशिवाय कांहींच माहित नाहीं त्यांना. अक्षराचें नांव माहित नाहीं त्यांना. त्यांच्या मुलांना-सुद्धां अक्षराची ओळख मिळत नाहीं. जगामध्यें तर राहोंच पण आपल्या मायभूमीत काय चाललें आहे हें त्यांना माहित नाहीं. दारिद्र्याच्या महासागराच्या प्रवाहा-बरोबर तीं वहात चालली आहे. तो प्रवाह जिकडे नेईल तिकडे ती जाते अंगावर धड वस्त्र नाहीं. धड एकवेळ पोटभर खायला मिळत नाहीं. वर्षांतून एकदां काढणारे बहुतेक पिक खंडाला जातें, त्यामुळें घरांत धान्य उरत नाहीं. दुःख, दारिद्र्य, अज्ञान यांच्या भारानें दडपून गेलेली ही जनता कशीतरी जगण्या-साठीं धडपडते आहे.

एका खेड्याचीच ही स्थिति नाहीं. सात लाख खेड्यांची ही स्थिति आहे. सात लाख खेड्यांतल्या लोकांची ही स्थिति आहे. बहुजन लोकांची ही स्थिति आहे ह्या लोकांना बाजूला ठेऊन कॉंग्रेसला स्वराज्य मिळणार नाहीं. ह्या लोकांच्यात्र जोरावर कॉंग्रेस सरकारला वठणीवर आणूं शकेल. पण त्यासाठीं कॉंग्रेसला भयंकर त्याग करावा लागेल. महासागरांतला प्रवाह अडविणें कठीण आहे. कॉंग्रेसला ह्या प्रवाहाशीं झुंज द्यावी लागेल. त्या लोकांचें दुःख, दारिद्र्य, अज्ञान नाहीसें करावें लागेल. त्यांना देशासाठीं, स्वातंत्र्यासाठीं मरण्यास तयार केलें पाहिजे.

किती तरी खेडीं मी फिरलों. सर्वत्र एकच सूर निघतो. त्या लोकांचा स्वभाव प्रेमळ, धीट आणि जिवास जीव देणारा आहे. ह्या लोकांस आपलेसें केलें तर आपल्या देशाचें गेलेलें स्वातंत्र्य हां हां म्हणतां परत येईल. पण ह्या लोकांन आपलेसें करणें हें काम लहानसहान नाहीं. त्यासाठीं सर्वस्वाचा त्यागच केला पाहिजे.

ह्यां लोकांच्या दुःखाचें कारण मी शोधूं लागलों. पण तें सांपडेना. जमीन दाराचा छळ हें तर त्यांच्या दुःखाचें मूळ कारण. पण त्यामुळेंच ती दुःखी झाले हेंही शक्य नाहीं. जमीनदारामुळें त्यांना पोटभर अन्न उरत नाहीं आणि त्यांना

पोट भरण्यासाठीं दुसरा उद्योग राहिला नाहीं. दुसरा उद्योग जर त्यांना मिळाला असता, तर आज ह्या सात लाख खेड्यांतील जनता सुखी झाली असती. पण आपल्या मायबाप सरकारला कुठें हें सुख सहन होतें ? हें सुख म्हणजे त्यांचें दुःख आहे.

पूर्वी खेडयांतली जनता सुखी होती. एका शेतीवरच त्यांचें जीवन अवलंबून नव्हतें. किती तरी निरनिराळे उद्योगधंदे करून त्यांना पोटभर अन्न मिळवतां येत होतें. लोक सुखी होते. पण सरकारनें हे सारे उद्योगधंदे मोडून टाकले. सारे आपल्याकडे घेतले. देशी उद्योगधंद्यावर नियंत्रण ठेऊन आपला परदेशी माल आणून सोडला. परदेशी माल स्वस्त मिळूं लागला त्यामुळें देशी उद्योग धंदे आपोआपच मागें पडले. देशाचे उद्योगधंदे बंद पडले. त्यावर जगणाऱ्या असंख्य लोकांचे हाल होऊं लागले आणि ह्याचा परिणाम, शेतकऱ्यांना शेतीशिवाय दुसरा धंदा राहिला नाहीं. आणि दुसरें, पारतंत्र्याच्या बेडया जास्त आंवळल्या गेल्या. आजवर सारे उद्योगधंदे आपल्या हातांत असते, सर्वांनीं देशीच माल वापरण्याची प्रतिज्ञा केली असती, तर देशाची भरभराट झाली असती. भुकेकंगाल शेतकऱ्यांना पोटभर खायला मिळालें असतें. त्यामुळें दुःख निवारण झालें असतें आणि स्वातंत्र्य अगदीं जवळ आलें असतें. स्वातंत्र्य मिळवण्याचा हा एक नवीन मार्ग आहे. सारे उद्योगधंदे कार्बाज करायचे. शेतकऱ्यांना कांहीं ना कांहीं तरी काम द्यायचें. खेड्यांत तयार झालेलाच माल वापरायचा. परदेशी मालावर बहिष्कार टाकायचा. अशातऱ्हेनें हां हां म्हणतां भारताला स्वतंत्र जगामध्यें स्थान मिळेल.

दारिद्र्यामुळें ज्या जनतेला डोकें वर काढतां येत नाहीं तिला जर नवीन उद्योग मिळाला, तर देशकार्याकडे बघायला तिला वेळ मिळेल. म्हणून जनतेला सुधारणें हाच स्वातंत्र्याचा मुख्य पाया आहे. आज ही सारी जनता जर कॉंग्रेसच्या मागें असती, तर हा लढा कॉंग्रेसनें कधींच जिंकला असता.

मी एवढा भटकतो आहें, पण ह्या चालू लढ्याविषयीं कोणीच कुठें बोललेलें मला आढळून आलें नाहीं. लोकांना लढ्याची माहितीच नव्हती. कॉंग्रेसनें सत्याग्रहाची चळवळ सुरू केली आहे हें सांगतांच त्यांना कांहीं समजलें नाहीं. त्यांनीं कॉंग्रेस म्हणजे काय ? सत्याग्रह म्हणजे काय ? कोणा विरुद्ध चळवळ सुरू केली आहे ? कां केली आहे ? असे नाना प्रश्न विचारण्यास सुरवात केली. मी त्यांना

सांगितलें, “ कॅांग्रेस तुमच्यासाठीं सरकारशीं भांडते. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर तुमचे हे त्रास नाहींसे होतील, तुम्हांला सुख मिळेल. तिला साह्य करणें हें तुमचें कर्तव्य आहे. ”

दुःखांतून सुटूं पाहणारी ही जनता किती उत्सुक असे सहाय्य करायला. पण तिला त्यासाठीं तयार करायला किती त्रास घेतले पाहिजेत ! नुसती घाई आणि एकाएकीं मनावर परिणाम झाल्यामुळें केलेलें काम केव्हांही चांगलें नाहीं. विचार करून, चांगली तयारी करून, केलेलें कामच नेहमीं चांगलें आणि लवकर होतें. ह्या लोकांचेंही असेंच आहे. दुःखांतून सुटण्यासाठीं ते कांहींही करतील. त्यांचा तो उत्साह पाहून मनाला किती तरी बरें वाटलें. पण आपणाला त्यांच्याबद्दल कांहीं करतां येत नाहीं हें पाहून तितकेंच दुःखही झालें. वाटलें, कॅांग्रेसनें आज सारे झगडे, लढे बाजूला ठेऊन ग्रामीण प्रश्न हातांत घ्यायला पाहिजे आणि मग जर पांच वर्षांनीं तिनें लढा सुरू केला तर तो केव्हांही यशस्वी झाल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या बहुजन समाजाला वगळून लढा केव्हांही यशस्वी होणें शक्य नाहीं.

माझ्या मनांत विचार आले, आपण ह्या लोकांसाठीं झटावें. आपले शहरांत तरी कोण आहे ? कोणासाठीं पुन्हां शहरांत जायचें ? ह्यापेक्षां ह्या गरीब, भोळ्या, दुःखी लोकांत राहून त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करावा आणि आपणही आपलें दुःख विसरून जावें. आपण जो आज वणवण भटकतों आहों त्याला केव्हांना केव्हां तरी रजा दिली पाहिजे. मग एखाद्या चांगल्या खेड्यांत राहिलेलें काय वाईट !

असे विचार मनांत आले, पण ते पक्के झाले नाहींत. कारण शहर सोडून खेड्यांत रहाणें शक्य नाहीं. आम्हा शहरांतील लोकांना शहर सोडून रहाणें शक्य नाहीं. शहर सोडून जो खेड्यांत जाऊन राहिल तो खरोखरींच धन्य होय. मला सुद्धां शहर सोडवत नाहीं. पण ह्या भटकण्यानें माझे चांगले डोळे उघडले. मला खरा भारत पहायला मिळाला. ज्यांना हिंदुस्थान पहायचा आहे, त्यांनीं निदान कांहीं खेड्यांत तरी फिरलें पाहिजे म्हणजे त्यांना हिंदुस्थानची खरी कल्पना येईल. नुसतीं शहरें, ताजमहाल पाहून कांहींही कल्पना येणार नाहीं.

ह्या भुकेकंगाल लोकांची आणि माझी स्वतःची मी तुलना करतों तेव्हां माझी मलाच लाज वाटते. एकाच आईची मुलें आपण पण एकाला भरपूर खायला मिळतें, आणि

इतरांना भुकेनें मरावें लागतें. आपल्या बंधूस सहाय्य करणें हें आमचें कर्तव्य. आपलें बंधु गरिबी, दु:खी, अज्ञान ह्यांत खिचपत पडले असतां आपण मात्र सुखचैनीनें रहातों ही काय माणुसकी झाली? हा काय न्याय झाला? आपल्या बंधुंच्या रक्ताचें पाणी करून मिळवलेल्या पैशांवर आपण जगतो ह्याबद्दल आम्हांला लाज वाटायला पाहिजे होती. पण अशी स्थिती नाहीं. उलट आम्ही त्यांचा तिरस्कार, द्वेष करतो आणि तरिही आम्ही त्यांच्यापेक्षां श्रेष्ठच! किती अजब न्याय हा!

छे! हा न्याय किती निष्ठूर आहे. माणुसकी नाहीं ह्या न्यायांत. जगायचें तर माणुसकीनेंच जगायचें, तर त्या जगण्यांत अर्थ आहे. नाहीं तर काय कुत्रीं मांजरें जगत नाहींत! त्यांच्या आमच्या जगण्यांत मग अंतर तें काय राहिलें? माणुसकीशिवाय जगणें हें जगणें नाहीं!!

*  *  *

तुरुंगाबाहेरच राहून कांहीं तरी कार्य करायचें, खेड्यांतील जनतेचा उद्धार करायचा, तिच्या सुखदु:खांत भाग घेऊन आपलें दु:ख विसरून जावें. खेड्यांतील जनतेला सुखी करण्याकरितां आपलें सर्व अर्पण करावें, तिच्या सुखापुढें आपल्या सुखाची पर्वा करायची नाहीं, तिचें सुखांतच आपलें सुख म्हणून रहायचें, असा-विचार करून आज खेड्यांत मुक्काम केला.

खेडें लहान नव्हतें, तसेंच तें बरेंच मोठेंही नव्हतें. तें फारसें पुढारलेलें नव्हतें तसेंच तें मागासलेलें नव्हतें त्यामुळें अशाच खेड्यांत राहून कार्य करावें असा विचार केला. खेड्याचें नांव आनंदपूर. माझ्या नांवाशी संबंध जुळत असल्यामुळेंही मी येथेंच रहाण्याचें ठरवलें.

खेड्यांच्या बाहेर बरेंच मोठे माळ होतें. कोणी लागवडीस न आणल्यामुळें तें ओसाडच होतें. माझ्या मनांत विचार आला हे माळ लागवडीस आणले तर आपलं पुष्कळ कार्य होईल. पण तें काम सोपें नव्हतें. त्याला बराच पैसा खर्च करायला पाहिजे होता. पीक चांगलें आलें असतें. पण त्या खेड्यांतल्या लोकांकडे पैसा कुठून येणार, आणि दुसऱ्याच्या जागेसाठीं ते एवढे पैसे खर्च कां म्हणून करणार? अशा अनेक कारणामुळें ते माळ तसेच राहिले होते. त्या जनतेला त्यापासुन पुष्कळ फायदा झाला असता, पण ज्या जनतेला स्वत:च्या मुलांना

शिक्षण दिलेंच पाहिजे हें सुद्धां समजत नाहीं ती जनता सर्व लोकांच्या हिताकडे कशी पाहील ? एवढें ज्ञान तिला कोठून असणार ?

पहिल्या प्रथम मी शाळा काढण्याचा विचार केला. कांहीं लोकांना विचारलें, पण त्यांचें म्हणणें, आपल्याला काय करायचें शिक्षण आपल्याला काय नोकऱ्या थोड्याच करायच्या आहेत, शेती करायला आली ह्मणजे झालें. ह्यापुढें बोलणार तरी काय ? पुष्कळांना समजावून त्यांच्याकडून मुलांना शाळेंत पाठवण्याची हमी घेतली. त्यांनींच चक्क सांगितलें. "

" तुह्मी आग्रह करतां म्हणून पाठवतों, एरवीं आमचा कांहीं फायदा नाहीं; त्यांत शिक्षणापासुन आमचें कांहीं अडत नाहीं."

एवढें सांगितल्यावर त्यांच्याकडे पैसे तरी कोठून मागणार ? पैसे मागितले तर मुलें यायची नाहींत. मुलें यायला पाहिजे तर पैसे मागतां कामा नये. आणि पैशाशिवाय शाळा, माझा खर्च कसा चालणार ?

मनांत येतें, बाबांकडून पैसे मागवून घ्यावे. पण माझें मलाच ते आवडत नाहीं. मी कांही एक त्यांना न विचारतां वागतो, त्यांचें मत सुद्धां विचारलें नाहीं मी. त्यांच्याकडून पैसे घेणें—त्यांच्या पैशावर मजा करणें हें मला शोभते कां ? त्यांच्याकडे चिक्कार पैसा आहे. मला महिना शंभर रुपये पाठवून त्यांचा पैसा कांहीं कमी व्हायचा नाहीं पण मी एवढा मोठा झालों—तों अजूनपर्यंत त्यांच्याच पैशांवर जगत आलों. आतां ह्यापुढें किती दिवस असाच परतंत्र राहणार ? कांहीं झालें तरी त्यांच्याकडून पैसे मागवतां कामा नये. आपल्या स्वतःच्या पायांवर उभे राहिलें पाहिजे. जी काय ओलीसुकी भाकरी मिळेल त्यावरच जगून देशकार्य केलें पाहिजे.

बाबांकडे असलेल्या पैशांचा तरी उपयोग काय ? तो जर मला मिळाला असता, तर आज मला किती तरी कामें करतां आली असती. माझ्या साऱ्या कल्पना मला सत्यसृष्टींत आणतां आल्या असत्या—वाटतें जावें, बाबांकडे जावें आणि त्यांच्याकडे पैशांची मागणी करावी. पण मन घेत नाहीं जायला. त्यांना पहायला जीव उत्सुक झाला आहे. दीडवर्ष होत आलें त्यांना पाहिल्याला, पण वाटतें किती तरी वर्षें लोटली. जावें त्यांच्याकडे पण मन धजत नाहीं जायला. पाय पुढें पडत नाही जायला.

मन गोंधळून गेलें आहे. मार्गही सांपडत नाहीं. वादळांत सांपडल्यासारखी स्थिती झाली आहे माझी. समोर भयंकर संकट दिसतें आहे. मागें सुख, चैन, आराम दिसतो आहे. मागें जायला मन घेत नाहीं. पुढें जायला धीर होत नाहीं. आणि एकाच जागीं तर रहातां येत नाहीं—पण पुढें पाऊल टाकलेंच पाहिजे. देशाच्या सुखासाठीं आपलें सुख लाथाडलेंच पाहिजे. संकटाशीं झुंज दिली पाहिजे. मरेतों लढलें पाहिजे. त्यांतच जीवनाचें सार्थक आहे. त्यांतच जीवनाचे सार आहे.

*　　　*　　　*

शाळा सुरू केली. पण काय शिकवायचें हा प्रश्न पडला. ह्या खेड्यांतल्या जनतेला शिकून कुठें नोकऱ्या करायच्या नाहींत. आणि हल्लींचें शिक्षण मास्तर आणि कारकून बनवण्याच्या पलिकडे नसतेंच. ह्या शिक्षणाचा त्यांना काय फायदा? आज आपल्याला जें शिक्षण मिळतें तें गुलामगिरीच्या बेड्या जास्त घट्ट करण्या-साठींच असतें. कॉलेजांतून बाहेर पडतांच कुठच्यातरी शाळेंत नोकरी धरायची किंवा कुठेंतरी खर्डेघाशी पत्करायची. कुठें स्वतंत्र धंदा करायचा म्हटला तर तो जमत नाहीं. कांहीं दुसरा उद्योग करावा तर त्यांत कांहीं माहिती नाहीं. चारी बाजूंनीं अडकून पडलेलें आहोंत आपण. नोकऱ्या मिळत नाहींत. दुसरे कांहीं येत नाहीं. आज जें शिक्षण देतात त्याचा मुख्य हेतु हाच कीं, सरकारी नोकरी मिळावी. ह्या पलीकडे ह्या शिक्षणाचा कांहींएक हेतु नाहीं. कांहींच्या मनांत खरोखरच शिकून कांहीं तरी करायचें असतें. त्यांना शिकण्याची वेळ येत नाहीं. एका विशिष्ट विषयांत त्यांचें डोकें तरबेज दिसतांच त्याना खालीं ओढायची पुन्हा सरकारची तयारी असतेच. एका विशिष्ट मर्यादेपलिकडे शिक्षण घेतां येत नाहीं.

अशा त्या शिक्षणाचा देशाच्या वाढीस काय उपयोग आहे, त्यापेक्षां उद्योगधंद्यांचें शिक्षण दिलें असतें तर किती उत्तम झालें असतें! देशाचें उद्योग-धंदे वाढले असते. प्रत्येकाला स्वतंत्रता मिळाली असती—

मला वाटलें खेड्यांतील जनतेला चालु शिक्षणाचा कांहीं एक फायदा नाहीं. त्यांना आपली मातृभाषा लिहितां वाचतां आली पाहिजे. इंग्रजी शिक्षण त्यांना कांहीं कामाचें नाहीं. इंग्रजी भाषा ह्या नात्यानें त्यांना ती शिकविली तर चालेल. पण त्यापासून कांहीं अडत नाहीं. त्यांना शिक्षणापासून फायदा होईल, रिकाम्या-

वेळीं कांहींतरी करून पैसा कमावतां येईल, असलें शिक्षण दिलें पाहिजे म्हणजे त्यांची ही स्थितीही सुधरेल शिवाय देशाचा मोठा फायदा होईल. पण हें व्हावें कसें? मी फार फार तर त्यांना मातृभाषाच आणि इंग्रजी शिकवूं शकेन पण धंदेवाईक शिक्षण मला तर येत नाहीं, आणि त्याची तर त्यांना सर्वात जास्त जरूरी आहे. तें कोण देईल? शहरांतून कांहीं शिक्षक आले तर? पण त्यांचा खर्च कसा चालणार? ते काय माझ्या सारखे फुकट काम करणार?—

छे: ! ह्यावेळीं हातांत पैसा असता तर किती तरी कामें करतां आलीं असतीं. पैशांमुळें सारें अडून राहिलें आहे. पैसा ! पैसा !! पैसा !!! सर्वांच्या आड हा पैसा येतो.

पैशांमुळें सुधा हातची गेली, पैशामुळें बाबांना मुकलों; पैशांमुळें गरिब जनता दु:खि कष्टि झाली आहे आणि पैशांमुळें मला पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. काय करूं? ह्या गरिब जनतेसाठीं जीव तिळ तिळ तुटतो आहे. तिच्याकडे पैसे मागावे असें मनांत येतें. पण ते तरी पैसे कुठून आणणार? जमीनदारांच्या ओझ्याखालीं दडपल्यामुळें त्यांना धड पोटभर खायला सुद्धां मिळत नाहीं. ते मुलांची फी कशी भरणार आणि कोणत्या तोंडानें मी त्यांच्याकडे मागणार?

शिकवावें तर कोणाकडे पाट्या नाहींत, कोणाकडे पेन्सिली नाहींत तर कोणाकडे पुस्तकें नाहींत. गावांत तर मिळण्याची सोय नाहीं. मुलांना पाट्या पुस्तकें आणायला सांगितलें तर कोण सांगतो पुढच्या महिन्यांत आणीन, तर कोण म्हणतो, बाबाकडे पैसे नाहींत. माझ्याकडे पैसे असते तर मी त्यांना पाट्या पेन्सिली आणून दिल्या असत्या; पण आतां आहे तर रात्र कशी जाईल, अशी माझी स्थिती ! तेथें मी त्यांना कुठें आणून देणार पाट्यापुस्तकें ! जीं कांहीं साधनें आहेत त्यावरच भागवून घेतों कसें तरी. सारीं पंचवीस तीस मुलें. एका पडवींत बसतात सारीं. हळूं हळूं एकेकाकडे लक्ष देऊन कांहीं जमेल तर पाहतों. कांहीं हुशार आहेत. तोंडी सांगितलेलें लक्षांत ठेवून अभ्यास करतात. खरोखर जर साऱ्या सोयी असत्या तर ह्या मुलांनीं नांवें कमावलीं असतीं. त्यांच्याबद्दल हळहळल्या शिवाय दुसरें मी काय करणार?

म. शं. कं. हागे, [illegible]

शां. कि ...

संध्याकाळीं गावांतून एक फेरी मारायची हा माझा नेहमींचा कार्यक्रम. आज एकाच्या तर उद्यां दुसऱ्याच्या घरीं जाऊन त्यांची चौकशी करायची, त्यांना योग्य सल्ला द्यायचा, त्यांच्या सुखदुःखाच्या कहाण्या ऐकायच्या, त्यांना धीर द्यायचा, ह्यांतच माझा संध्याकाळचा वेळ जाई. पण ह्या दिवसांत विशेष कांहीं घडलें नव्हतें.

आज मात्र एका मोडक्यातोडक्या घरापुढें बरेच लोक जमले होते. बहुतेकांचीं तोंडें सुकून गेल्यासारखीं दिसत होतीं. घराचा मालक बिचारा रडत होता. बिचारा साधारण वृद्ध होता. त्याच्या रडण्याचें कारण समजलें नाहीं. त्याच्यापुढें उभा राहून एक चाळीशीच्या दरम्यानचा इसम बोलत होता.

" आज वर्ष झालें वाट पाहिली. ह्यापुढें मी वाट पहाणार नाहीं. तुम्हांवर उपकार करणें हें पाप आहे. कांहीं झालें तरी उद्यांच्या उद्यां मला पैसे मिळालेच पाहिजेत. नाहीं तर घरांतलें सारें सामान घेऊन जाईन "

मला समजलें, बोलणारा जमीनदार होता, मोठा दुष्ट माणूस होता असें मी ऐकलें होतें. आजच मी त्याला पहिल्या प्रथम पाहिलें. त्याच्यापुढें जाऊन मी विचारलें,

" काय गडबड आहे ? "

तो माझ्यावर ओरडून म्हणाला, "तूं कोण मोठा लागून गेला आहेस ? तुम्ही लोक बाहेरून इथं येतां आणि ह्या लोकांना बिघडवून टाकतां ! "

माझी माहिती त्याला बरीच दिसत होती. त्याच्या बोलण्यावर मी शांतपणें म्हणालों " मी कांहीं कोणी मोठा लागून गेलों नाहीं. सहज विचारलें ! "

माझें बोलणें ऐकून तो जरा नरम येऊन म्हणाला, " हें पहा, तुम्ही जरा समंजस माणूस दिसतां. सांगतों तुम्हांला. हा गणबा. एक वर्ष झालें त्याला बैल घेण्यासाठीं चाळीस रुपये दिले होते. बैलावर त्यानें कांहीं पैसेसुद्धां कमावले. हल्लींच बैल मेला. तरी सुद्धां माझे त्यानें पैसे चुकते केले नाहींत. पंधरा रुपये काय ते दिले. आतां पंचवीस रुपये कोण देणार ? मागितले तर म्हणतो पैसे केव्हांच पोहोंचले. आतां काय बोलणार ह्यापुढें. म्हणतो—फक्त दहा रुपयेच बाकी आहेत. ते मागितले तर म्हणतो बैल गेला. आतां कुठून आणू पैसे ? बैल मेला हा का दोष माझा ?

आतां तुम्हीच सांगा काय करावें आम्हीं ? तुम्हाला मागतो, ह्यांच्यावर मुळीच दया, उपकार करूं नका कधीं !"

त्याच्या बोलण्यांत कांहीं तरी चूक आहे असें मला वाटलें. म्हणून मी गणबाला विचारलें, " गणबा, ही गोष्ट खरी आहे का ? " गणबा म्हणाला, " खरी बी आहे आणि खोटी बी आहे. बैल आणायापायीं चाळीस रुपये मी घेतले. त्यांतले तीस रुपये फेडले मी. पण ह्यो म्हणतो पंधरा दिले आम्ही गरीब झालों म्हणून खोटें बोलतो ? आमचाच दाम खोटा तेला तुम्हीं काय करणार ? बैल मेला. सारा आधार गेला. घरांत पोरं उपाशी मरत्यात खायला नाहीं म्हणून. कुठून देऊं पैसे मी ? दहा रुपये या चारपांच महिन्यांत कसेंबी करून दिले असत्ये पण उद्यांच पंचवीस रुपये कुठून आणू मी ? "

कोणाचं खरं मानावं हा प्रश्न पडला मला गणबाच्या म्हणण्यांत सत्यता असावी असें वाटलें मला म्हणून मी त्या जमीनदाराला म्हणालों, " तो मागतो दहा रुपये शिल्लक राहिले म्हणून ! "

" मग मी काय खोटें सांगतो ? ह्या लोकांना खोटें बोलण्याची संवयच झाली आहे ! " जमीनदार म्हणाला.

" तुमच्यासारखे असल्यावर ते खरें तरी कसे बोलतील ?"

" तोंड सांभाळून बोला. तुम्हांला आमच्यामध्यें पडण्याची कांहीं जरूरी नाहीं ! " तो रागानें म्हणाला.

" खरें आहे तुमचे म्हणणें त्याशिवाय तुम्हांला ह्या गरीब जनतेला कसें लुबाडतां येईल ! त्या बिचाऱ्या गणबाला लुबाडतांना तुम्हांला कांहींच वाटत नाहीं ? तीस रुपये त्यानें फेडले असतां तुम्ही सांगता पंधरा रुपये दिले. बिचाऱ्याला पंधरा रुपयांना बुडवले. बैल मेला, घरांत पोरें उपाशी मरतात, तरीसुद्धां तुम्ही उद्याच्या उद्यां त्याच्याकडे पैसे मागतां ? कुठें फेडणार तुम्ही हें पाप ? असा पापी पैसा खाऊन तुम्हीं जमीनदार झाला आहांत ह्याबद्दल तुम्हांला लाज वाटत नाहीं ?"

" मला वाटतें तुमचं डोकें फिरलें आहे. पण हें पहा, तुमच्या ह्या गमजा इथं चालायच्या नाहींत. तुम्ही शहरांतले लोक स्वतःला मोठे शहाणे समजतां, पण आम्हीः सुद्धां सवाई शहाणे आहोंत. मी उद्यां पैसे वसूल करून घेणारच, नाहींतर

ह्याच्या घरादारावरून नांगर तरी फिरवणार! बघूयां कोण माझ्या आड येतो तो!"

"साऱ्या पंचवीस रुपयासाठीं तुह्मीं हें करतां?"

"पंचवीस रुपये ह्मणजे कमी झाले नाहींत. तुह्मीं पैसे द्यां. मी सोडीन त्याला!"

"माझ्याजवळ पैसे असते तर तुमच्या तोंडावर वेळींच फेंकले असतें!"

तो हांसत म्हणाला, "तुमच्या अंगी जर त्याला वाचवतां येत नाहीं तर मग पुढाकार घेऊन कशाला आलांत? जा बाबा, जा येथून! हें शहर नाहीं येथें पैसा पाहिजे दुसरें कांहीं नको!"

मला काय करावें तें सुचेना. पुष्कळ लोक जमले होते. पण कोणी पुढें येत नव्हता. सारे तमाशा पहात उभे होते. मला तें असह्य झालें. मी त्यांना म्हणालों,

"बघतां काय फत्तरासारखे उभे राहून? तुमच्याचैपकीं एकावर हा अन्याय होत असतां तुह्मीं गप्प राहून सहन करतां हें?"

"आह्मीं काय करणार?"

"काय करणार? उद्यां तुमच्यावर पाळी आली ह्मणजे तुह्मी काय करणार? स्वस्थ बसणार? तुह्मी हा अन्याय सहन करून अन्याय करणाऱ्यांस उत्तेजन देत आहांत! साऱ्या गांवांतून पंचवीस रुपये जमा होत नाहींत? आज गणबावर हा प्रसंग आला आहे उद्यां तुमच्यावरसुद्धां येईल. तुमच्या घरदारावरून हे जमीनदार नांगर फिरवतील. त्यावेळीं तुमची काय स्थिती होईल? त्यावेळीं आम्ही तमाशा पाहत राहिलेलें तुम्हांला आवडेल काय? एकमेकांना सहाय्य करून, एकमेकांना संकटांतून वांचवणें हें तुमचें कर्तव्य आहे. प्रत्येकानें थोडीथोडी मदत केली तर पंचवीस रुपये जमतील. मदत केल्याचें पुण्य तुम्हांला लाभेल. गणबा संकटांतून मुक्त होईल!"

"हें सारें खरें, पण आम्ही तरी पैसे कुठून आणूं? आमच्याकडे असते तर ह्या दुष्टाच्या तावडींतून गणबाला कधींच सोडवलें असतें!" एक जण म्हणाला.

"काय पंचवीस रुपये जमणार नाहींत?"

"पंचवीस पैसे तरी आहेत कां आमच्याकडे?" दुसरा म्हणाला.

" समजलें आतां ? आतां काय बोलणार पुढें ? ह्या गावांत मी करीन त्याविरुद्ध जाण्याची कोणाची छाती नाहीं. फंड गोळा करण्याची चाल शहरांत असतें. समजलें ? माझ्याआड येण्याची कोणाचीच छाती नाहीं. तुम्ही माझ्याविरुद्ध गेलांत. पण जाऊन तरी फायदा काय झाला समजलें ना ? सारे सांगून ठेवतो. ह्यापुढें माझ्याविरुद्ध अथवा शेतकऱ्यांना बिघडवण्याचें सुरू केलें तर परिस्थिती वाईट होईल. ह्या खेड्यांत थारा मिळणार नाहीं तुम्हांला ! "

असें म्हणून हंसत तो जमीनदार तेथून निघून गेला. निराश होऊन मीही परतलों. एका शेतकऱ्याच्या माझ्या समोर हाल अपेष्टा होत असतांना माझ्याकडून कांहीं होत नाहीं ना ! काय माझा उपयोग जगून ?

मी तरी काय करूं ? माझ्याकडे पैसे असते तर मी त्याला ह्या त्रासांतून सोडवलें नसते कां ? माझा दिवस कसा जातो ह्याकडे माझें लक्ष असतें. मी त्याला कसली मदत करणार ?

सारी लाज लज्जा, भीड सोडून बाबाकडून पैसे मागवले तर ! पण त्यांचा तरी काय उपयोग होणार ? उद्यां सकाळीं तर त्याच्या घरावरून नांगर फिरणार ! सारे बारा तास राहिले. ह्या बारा तासांत कसे पैसे येतील ? नंतर त्या पैशांचा काय उपयोग ? त्यापेक्षां इथं कांहीं तरी सोय झाली असती तर ? इथें माझ्या ओळखीचं तर कोणी नाहीं. कोण मला पैसे देणार इथं ? माझ्या जवळ काय आहे म्हणून मला ते पैसे देतील ?

मला आठवण झाली. माझें हाताच्या बोटाकडे लक्ष गेलें. आंगठी होती. वडिलांची आठवण होती ती. माझ्या मनांत एकदम कल्पना आली. आंगठी विकायची आणि पैसे आणायचे. पण ह्या खेड्यांत ही आंगठी कशी विकणार ? कोण विकत घेणार ?

ऐकलें होतें, ज़वळच गांवाबाहेर एक इसम कर्ज देतो. त्याच्याकडे जावें. वडिलांची आठवण म्हणून जवळ ठेवलेली आंगठी गहाण ठेवायला मन घेईना. पण गणबाची मूर्ति डोळ्यासमोर उभी राहिली. त्याची पोरंबाळं समोर उभी राहिलीं. मी निश्चय केला. आंगठी गहाण ठेवायची—

* * * *

गणवाच्या मागचें दैव संपलें पण तें माझ्या मागें लागलें. मी त्याचे पैसे भरल्यामुळें जमीनदाराचा डोळा माझ्यावर फिरला. त्याला पैसे नको होते. गणबाच्या घरांतल्या चीजवस्तु नेल्या असल्या तर त्यांत त्याचा फायदा होता. पंचवीस रुपयांवर त्याला मिळालें असतें. त्याच्याआड मी आलों. त्यानें माझ्या मागें लागण्यास सुरवात केली. अर्थात हें सारें दुसऱ्या करवीं होतें. उघड उघड तो तसें दाखवत नव्हता—

ज्या पडवींत मी शाळा चालवत होतों ती पडवी त्याच्या कुळाची होती. त्याकरवीं त्यानें त्या पडवींत शाळा चालविण्यास बंदी केली. दुसरी जागा कुठें मिळेना. मंदिरांत शाळा सुरूं करावी तर तें ही शक्य नव्हतें. हरिजनांच्या मुलांना मंदिरांत घेतलें असतें तर लोक पिसाळले असते. हरिजनांचा प्रश्न हातांत घेणें शक्य नव्हतं. शाळेला जागा मिळाली नाहीं म्हणून एका मोठ्या झाडाखालीं शाळा घातली. मुलें येतील किंवा नाहीं हीं शंका होतीच. पण तिंही आलीं. फुकट शिक्षण मिळतें हा फायदाच आहे. त्याला अनुसरून लोकांनीं मुलांना शाळेंत पाठवलें असावें. कांहीं मुलांना पाठवलें हें माझें नशीब नाहींतर चंबूगवाळं आटपून जाण्याची तयारी करावी लागली असती. परंतु ही वेळ सुद्धां केव्हां येईल हें सांगवत नाहीं––

ह्या लोकांना स्वत:चें हित समजत नाहीं. ज्या बाजूला त्यांना न्यावें त्या बाजूला ते यायला तयार असतात. एकावर त्यांचा विश्वास बसला तर ते मरेपर्यंत त्याला सोडणार नाहींत. हा जसा त्यांचा गुण आहे तसाच तो अवगुणहि आहे. जमीनदाराच्या लोकांच्या सांगण्यापुढें ते आपल्या मुलांना शाळेंत पाठवण्याचेसुद्धां बंद करतील. त्यांना कुठें शिक्षणाचें महत्व कळतें? साधेभोळे आहेत ते. धर्मावर त्यांचा विश्वास आहे. पण त्यांना वेड नाहीं. अस्पृशांना ते जवळ उभे करत नाहींत पण त्यांना ते प्रेमानें वागवतात. मोठमोठ्या गांवांतल्या लोकांप्रमाणें तें त्यांना वाईट प्रकारें वागवत नाहींत. हिंदु आणि मुसलमान हा भेद त्यांच्यांत नाहीं. हिंदु कोण आणि मुसलमान कोण हें सुद्धां ओळखतां यायचें नाहीं. दोघेही गळ्यांत गळा घालून फिरतात.

दोघांचे खाणें पिणें एकच असतें. दोघांचे कपडे एकाच तऱ्हेचे असतात. मुसलमान हिंदूंच्या उत्सवांत भाग घेतात. हिंदु त्यांच्या उत्सवांत भाग घेतात. मुसलमान हिंदूंच्या देवाची पूजा करतात, त्यांना नवस करतात तर हिंदु त्यांच्या पिराला नवस करतात. दोघांमध्यें वैर— धर्म वैर कधींच नसतें. पण हेच हिंदु—मुसलमान शहरांत एकमेकांचे गळे कापतात. हा दोष कुणाचा? शहरांतल्या परिस्थितीचा— शहरांतल्या धर्म-वेड्या पुढाऱ्यांचा!

असे हे भोळे लोक आहेत. त्याना कोणीही कांहीं सांगितलेलें ताबडतोब पटतें. त्यावर ते विचार करत नाहींत, म्हणून शाळा कधीं बंद पडेल हें सांगतां येत नाहीं. झाडाखालीं तरी शाळा किती दिवस चालणार? मोठी बिकट परिस्थिती आली आहे—

*            *            *            *

बाबा फार आजारी आहेत अशी तार आल्यामुळें ताबडतोब गांवीं आलों. गावांत पाय ठेवतांच हृदय आनंदानें भरून आलें. घरांत पाय ठेवतांना संकोच वाटला. बाबा कसे असतील, हा विचार मनांत येऊन मनांत गोंधळ माजला. मी आलों हें कळतांच एक तरुण स्त्री बाहेर आली. मला वाटलें, ती माझी आईच असावी. तिनें मला सांगितलें, बाबांनीं माझा ध्यास धरला आहे. मला वाईट वाटलें. मला त्यांच्या समोर जायला धीर होईना. पूर्वीचें माझें पत्र आंठवलें. माझा मलाच राग आला—

मान खालीं घालूनच बाबांच्या खोलींत प्रवेश केला. पलंगावर बाबा जीर्णावस्थेंत पडले होते. मला भडभडून आलें. त्यांच्याजवळ जाऊन मी हळूच हांक मारली, "बाबा!"

"आलास तूं?" त्यांनीं डोळे उघडून विचारलें. त्यांच्या बोलण्यांत आश्चर्य, आनंद, दुःख सारें कांहीं स्पष्ट दिसत होतें.

"होय मी आलों!'

"मला वाटलें तूं येणार नाहींस?

"तुम्ही आजारी असतां मी आल्याशिवाय कसा राहीन" मनुष्य आजारी पडला—मृत्यूच्या दारांत असला कीं, शत्रूसुद्धां आपलें वैर विसरून जातो—त्याला सुद्धां दुःख होतें. मी तर त्यांचा मुलगाच. मी सारें विसरून गेलों मागचें.

बाबा क्षीण स्वरांत म्हणाले, " आनंद, तुझेंच म्हणणें बरोबर होतें. मी शांताच्या आयुष्याचा नाश केला ! "

" आतां कशाला पाहिजेत त्या गोष्टी ? आतां तुम्ही स्वस्थ पडून रहा ! "

" आतां मी स्वस्थच रहाणार ह्यापुढें. आतां थोडे तास राहिले आहेत माझे. मला बोलूंदे ! एवढे दिवस कोंडून ठेवलेलें बोलणें मला बोलूंदे. आनंद किती बरोबर लिहिलें होतेस तूं त्या वेळीं. पण माझ्या डोळ्यांवर त्या वेळीं धुंदी चढली होती. मला कांहींच दिसत नव्हतें. पण दिवसामागून दिवस जाऊं लागले. माझा मद उतरूं लागला. शांता मोठी गोड पोरगी आहेरे ! तिनें मला कांहीं कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. ती प्रेमळ आहे. माझ्यावर तिनें प्रेम केलें. तिच्या प्रेमानें माझे डोळे उघडले. माझ्यानंतर तिचें काय होईल हा विचार सारखा मनांत येउं लागला. मीच तिच्या आयुष्याचा नाश केला असें मला वाटूं लागलें. माझ्या मनाला ही गोष्ट लागली. झालेली चूक मी सुधारूं शकत नव्हतो......! "

ते जरा बोलण्याचे थांबले. मी गप्प राहून ऐकत होतों. ते पुन्हां हळू हळू बोलूं लागले,

" झालेली चूक माझ्या जिव्हारी लागली. तूंही मला सोडून गेलास. तूं तुरुंगांत गेलास. मला तें असह्य झालें. तुरुंगांत तुला साध्या चटईवर झोपावें लागेल हा विचार मला सहन झाला नाहीं. मनांत आलें, तुला सोडवून आणावें. पण तुला तें आवडणार नाहीं म्हणून गप्प राहिलों. मनाची तळमळ शांत होईना. चटईवर झोपलेली तुझी मूर्ति मला भेडसावूं लागली. मी सुद्धां चटईवर झोपूं लागलों. आतां आजारी पडल्यापासून वर पलंगावर झोपतों......! "

" झाल्या गोष्टी आतां काय उपयोगाच्या बाबा ? " ते थांबतांच मी विचारलें.

" कांही नाहीं. पण बोलून टाकावेसें वाटतें. समाधान होईल माझें—एकंदर प्रकारानें मी हाय खाल्ली. तुरुंगांतून सुटतांच तूं माझ्याकडे येशील असें वाटलें मला. तूं आला नाहींस. मी अंथरुण धरलें. शांतानें माझी सेवा केली. तिनें मला तुला तार करून बोलवण्यास पुष्कळ वेळां सांगितलें पण मला धीर होईना. तुला तोंड दाखवण्यास मला लाज वाटूं लागली "

दम लागल्यामुळें ते थांबले. मी ऐकत होतों. माझ्या डोळ्यांतून पाणी पाझरूं लागलें. ते बोलूं लागले,

" आतां मी जगत नाहीं असें मला वाटलें. मरण्याआधीं एकदां तुला पहावें—तुझी क्षमा मागावी असें वाटूं लागलें. म्हणून तुला बोलावलें. तूं आलास मला आनंद झाला. आतां मी सुखानें मरेन—–"

डोळे मिटून ते स्वस्त पडले. मला बोलण्याचा धीर होईना. त्यांची हालचाल होत नाहीं असें पाहून मी भीतीनें हांक मारली, " बाबा ! "

त्यांनीं डोळे उघडले. विचारलें, " काय ?—बरें आतां असूंदे सारें. तूं प्रवासांतून आला आहेस, दमून आलास, कपडे वगैरे काढून जेवण कर. मग ये इकडे. जा आतां. शांता सारें ठीक करील ! "

मीं मुकाट्यानें बाहेर आलों. मरणाच्या दारीं असतांना सुद्धां माझ्याबद्दलची बाबांची काळजी पाहून मला भडभडून आलें—

शांता माझ्या आंघोळीची व्यवस्था करून मुलाला पाजत बसली होती. मला पाहतांच ती जरा लाजली, पण थोडावेळ. मुलाला बाजूला काढून ती म्हणाली, " आंघोळीला चला !"

मी माझ्या भावाकडे पाहूं लागलों. त्याला जवळ घ्यावासें मला वाटूं लागलें. शांतानें हें जाणून त्याला मजजवळ आणलें. मी त्याला घेत विचारलें, " नांव काय ह्याचं "

" यतीन् ! "

नांव बंगाली होतें. मला कांहीं विचारावेसें वाटलें. पण बोललों नाहीं. मुलाला तिच्या स्वाधीन करून आंघोळीला गेलों.

जेवण वगैरे झाल्यावर बाबाकडे जाऊन बसलों. त्यांच्याजवळ बसल्यानें त्यांना समाधान होईल असें वाटलें. बाबा माझ्याकडे कितीतरी वेळ अधाशी पणानें पहात होते. मला मात्र लाजल्या सारखें—गोंधळल्या सारखें झालें. उठून बाहेर जावेंसें वाटलें, पण गेलों नाहीं.

बाबा म्हणाले, " आनंद आतां मी थोड्या तासांचा सोबती आहे. माझ्या मनांतलें शल्य मी बोलून दाखवलें. हृदय हलकें झाल्यासारखें वाटतें मला ! आतां —तूं इथंच रहा. शांताला तुझ्याशिवाय कोण आहे ? "

" मला इथं रहाता येत नाहीं. मला गेलेंच पाहिजे ! "

" अजून तुझ्या मनांतलें शल्य गेलें नाहीं ? "

" त्यासाठीं नाहीं बोलत मी बाबा. खेड्यांतलीं हजारों गरिब, दुःखी माणसें मला तिथं बोलावतात. मला गेलेंच पाहिजे तिथं ! "

थोडावेळ थांबून ते म्हणाले, " जा. खेड्यांतच जा. देशाची सेवा कर. मला जें करतां आलें नाहीं तें तूं करून दाखव. पण शांताला तूं विसरूं नकोस. तिच्याकडे लहानगा यतीन् आहे. त्याला अजून कांहींसुद्धां समजत नाहीं. त्याला चांगलें वळण लावणें तुझें कर्तव्य आहे. तूं त्यांना एकटें सोडून गेलास तर त्यांना आधार कोणाचा राहील ? सगळे सोयरेधायरे त्यांना लुबाडतील ! "

ते थांबले. मी बोलत नाहीं असें पाहून ते म्हणाले, " आनंद यतीन्‌ला तुझा सख्खा भाऊच समज. शांता मनमिळाऊ आहे. ती तुझ्या इच्छेआड जायची नाहीं. मी सारी संपत्ति तुझ्या स्वाधीन करतों. ती एका शब्दानें विचारायची नाहीं तुला !"

" मला काय करायची आहे संपत्ति ? यतीन्‌लाच उपयोगी पडेल ती ! "

" यतीन्‌पेक्षां तुलाच तिचा जास्त उपयोग होईल. तूं जें कार्य अंगिकारलें आहे त्यासाठीं तुला तिची जरूरी लागेल. आणि तूं बऱ्यासाठींच ती संपत्ती खर्च करशील अशी माझी खात्री आहे. अर्धा वाटा यतीन्‌चा आहे. तोसुद्धां तुझ्या स्वाधीन करतों. शांताला मुळींच वाईट वाटणार नाहीं. तुझ्याबद्दल तिला अभिमान आहे. तूं घरांत यावें, रहावें असें तिला फार वाटतें. आपल्यामुळेंच तुला घर सोडावें लागलें हें समजून तिला फार वाईट वाटलें. ती सुद्धां म्हणते, हें जें कांहीं आहे तें सारें तुझेंच आहे !"

ते पुन्हां बोलूं लागले, "मी देशासाठीं कांहीं केलें नाहीं. पण माझा पैसा देशाच्या उपयोगी पडेल, हें पाहून समाधान झालें. मी मेल्यावर तूं शांताला बरोबर घेऊन जा. तुला फार मदत होईल तिची !"

" आतां बोलूं नका तुम्ही. शांत पडून रहा म्हणजे बरं वाटेल तुम्हांला."

" खरोखरच मला आतां बरं वाटतें. हुशारी आल्यासारखी वाटते ! "

त्यांच्या तोंडावरून तसें दिसत होतें. ते थोड्याच दिवसांत बरे होतील असें मला वाटलें—

पण ही दिवा विझण्यापूर्वीची स्थिती आहे हें मला कुठचें माहित ? दिवसभर ते चांगले बोलले, हांसले. पण रात्रीं एकदम प्रकृति ढांसळली. डॉक्टरला आणलें. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. एकदां प्रकृति ढांसळली ती कायमची—

प्राण जातां जातां ते म्हणाले, " आनंद शांताला सांभाळ. तिला दुःख देऊं नकोस. ती भोळी आहे रे ! "

हेच त्यांचे शेवटचे शब्द होते.

सर्वांना फार दुःख झालें. शांताला समजावतां समजावतां नकोसें झालें. ऐन तारुण्यांत तिच्यावर वैधव्याचा प्रसंग आला होता. तिला दुःख होणें साहजीकच होतें. तरीपण तिनें समंजसपणा दाखवून दुःखाला आंतल्या आंत दाबून टाकलें. पुन्हां म्हणून तिनें दुःख बाहेर दाखवून दिलें नाहीं. तिच्या सहनशीलतेचें मला आश्चर्य वाटलें.

* * *

पंधरा दिवस गेले. इकडची सारी व्यवस्था माझ्यावर पडली होती. सारें पहातां पहातां दिवस जाई. रात्र होतांच खेड्यांतली दृष्यें डोळ्यांपुढें उभीं रहात. मनांत येई, जावें इथून. आपलें आयुष्य सुखासाठीं, चैनीसाठीं नाहीं. खेड्यांतली अज्ञानी जनता मला बोलावते आहे असा भास होई. मन बेचैन होई.

ह्या पंधरा दिवसांत एक ओळख झाली. शांताची मैत्रीण रजनीशीं. रजनी डॉक्टरकीचा अभ्यास करीत आहे. दिसायला सुंदर आहे. बोलण्यांत पटाईत आहे. स्वभाव मनमोकळा आहे. पण तिच्याशीं बोलण्याचा मला धीर होत नाहीं. कुठें तरी अडल्यासारखें वाटतें. तिच्यापासुन दूर रहावेंसें वाटतें. तरुण स्त्रियांपासून दूर रहाण्यांतच फायदा आहे, असें माझें मन मला सांगतें. मी शक्य तों तिला टाळण्याचा प्रयत्न करतों. कां करतों हें सुद्धां धड सांगतां येत नाहीं. पण ती कांहीं माझा पिच्छा सोडत नाहीं. तिला बडबडणें फार आवडतें. मला आतां जास्त बोलणें आवडत नाहीं. पूर्वी मला बडबडायला फार पाहिजे होतें. हल्लीं मला गप्प रहाण्यांतच संतोष मिळतो. कामाशिवाय जास्त बोलावेंसेंच वाटत नाहीं. माझा स्वभाव बदलत चालला आहे असें मला वाटतें.

ती आली कीं, मी स्वस्थ बसतों किंवा यतीन्‌ला खेळवत बसतों. तिच्याकडे पहात सुद्धां नाहीं. ती मुद्दाम कांहीं तरी बोलणें काढते.

मग मला बोलावेंच लागतें. मला समजत नाहीं, मला मनमोकळें पणानें बोलायला कां येत नाहीं ? पूर्वी मी सर्व मुलींशीं मनमोकळे पणानें बोलत होतों. त्या बोलल्या नाहींत तरी मी मुद्दाम स्वत:होऊन बोलत होतों. आतां मला त्यांची भीति वाटते. त्यांच्या पासुन दूर रहण्यांतच आनंद वाटतो—

* * * * *

मी यतीनूला खेळवत होतों इतक्यांत रजनी आली. मला पाहून ती ह्मणाली, "मुलांची वरीच हौस दिसेते आपल्याला !"

कांहींतरीबोलायचें ह्मणून मी बोललों, "होय !"

"एवढी मुलांची हौस आहे तर मग लग्न कां नाहीं करत ?" तिनें विचारलें.

तिच्या ह्या प्रश्नानें मी गोंधळून गेलों. गोंधळलया मुद्रेनेच मी तिच्याकडे पाहिलें. दोघांची नजर एक झाली. तिही गोंधळली, लाजली. तिला वाटलें असेल आपण भलतेंच बोलून गेलों कांहींतरी. मी तिच्याकडे पहाण्याचे सोडून देऊन बाहेर पाहूं लागलों.

तिनें विचारलें, "राग आला वाटतें तुह्मांला ?"

"राग येण्याचें काय कारण त्यांत ? तुह्मी सहज बोलून गेलां"

"तुह्मी जाणार असें ऐकलें आहे मी ?"

"होय !"

"कंटाळलां वाटतें इथं राहून !"

"कंटाळा येण्यासारखें कांहीं नाहीं. मला खेड्यांत गेलें पाहिजे.

"खेड्यांत राहवतें कसें तुह्मांला ? मला तर कंटाळा येतो अगदीं ! सर्व कांहीं गैरसोयी भरल्या आहेत भरपूर ?"

"गैरसोयी भरपूर आहेत हें खरें पण तेथें सुद्धां माणसेंच रहातात हें विसरूं नका. त्या गैरसोयी दूर करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. नुसतें तोंडानें गैरसोयी आहेत, कंटाळा येतो असें ह्मणून सर्वजण स्वस्थ वसतात ह्मणूनच आज ह्या खेड्यांची ही दारुण स्थिति झाली आहे. आजच्या तरुण, तरुणींचीं मनें शहरें, सुख चैन सोडण्यास तयार नाहींत. खेड्यांतील जनता दु:ख आणि दारिद्र्य

ह्यांत खिचपत पडली आहे. त्यांना त्यांतून वाचवण्या ऐवजीं, नवीन फॅशन्स, चैनी शोक ह्यांच्याच पाशांत ती अडकून पडलीं आहेत ! "

" आपल्याला नवीन नवीन फॅशन् ह्या बद्दल तिटकारा आहे वाटतें ? "

"कां नाहीं असणार ? खेड्यांत जाऊन पहा. पुरुष फाटके तुटके मळके कपडे वापरतात. स्त्रियांना धड अंग झांकायला कपडा मिळत नाहीं. कपडा असलाच तर त्याला शेकडों ठिगळें लावलेलीं सांपडतील. अंगावरचा कपडा त्यांना धुतां सुद्धां येत नाहीं. मुलें तर उघडी नागडीच असतात. आणि इकडे काय चालते ? फॅशनसाठीं, हौसेसाठीं वाटेल तसा कपडा वापरतात. हें शोभतें कां ? आपल्या भाऊबंदांना अंग झाकायला कपडा मिळत नसतांना आपण उंची उंची कपडे वापरणें हें माणुसकीचें वर्तन आहे कां ? ती जनता हाल अपेष्टांत जीवन कंठीत असतां, त्यांना मदत करण्यांऐवजीं प्रेमाचे चाळे करीत बसणें हें सुद्धां माणुसकी बाहेरचें वर्तन आहे. आपल्या कर्तव्यापुढें प्रेमाचाच काय पण सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे. जो सर्वस्वावर लाथ मारून बाहेर पडेल त्याच्याकडूनच खरें कार्य होईल. "

माझें बोलणें संपल्यावर ती म्हणाली, " तुम्ही बोललां तें अगदीं खरें आहे. पण तें लहान सहान माणसाला झेपण्यासारखें नाहीं. माणसाची प्रवृत्ती नेहमींच सुखाकडे असते. सुखासाठींच तो धडपडत असतो. त्याचाच त्याग करणें हें साधारण माणसाला शक्य नाहीं. त्यासाठीं तसाच माणूस पाहिजे आणि तसा हजारांत एकादाच सांपडूं शकेल. तसेंच प्रेम. प्रेम ही एक नैसर्गिक बाब आहे. तरुणानें किंवा तरुणीनें त्याविरुद्ध जाण्याचा किती ही प्रयत्न केला तरी त्यांना तें शक्य नाहीं. एकमेकांकडे त्यांचें मन आकर्षून जाणारच—निसर्गाकडेच जाणार शेवटीं सारीं. निसर्गाच्या विरुद्ध जाणारा खरोखरच महात्मा होईल. हा मोठ्या माणसांचा नियम सर्व साधारण माणसाला लागू पडत नाहीं—त्यांना तो लावूंच नये !"

ती इतकें बोलेल ह्याची मला कल्पनाच नव्हती. मी म्हणालों, "सुख, चैन, प्रेम, लग्न ह्यांपासून दूर राहिलें तर माणूस मरत तर नाहीं ना ? "

" मरत नाहीं पण तों कधींही समाधानी होणार नाहीं. त्याच्या मनाला खरें स्वास्थ्य मिळणार नाही. इच्छा असतांना मन मारल्या सारखें होईल ते."

" तुम्हीं जें सुख म्हणतां, तें सारें मानण्यावर आहे. दुसऱ्यांच्या सुखांतच आपलें सुख आहे असें मानून चाललें पाहिजे. दुसऱ्यांना सुख देतांनाच स्वतःला आनंद मिळतो, तोंच खरा आनंद. दुःखांत सुद्धां सुख मानून रहातां येतें. "

" येतें, पण तसा रहाणारा हजारांत एकच सांपडेल. ! "

" तुमचीं मतं मला पटत नाहींत. माझीं तुम्हांला पटत नाहींत. तुमचीं मतं खरीं असतील. माझी खोटी असतील. पण माझी मतें मला प्रिय वाटतात. त्याचप्रमाणें मी वागणार आणि इतरांनाही सांगणार. "

" इतरांवर कां ही सक्ती ? "

" सक्ती कोणावर नाहीं. ज्याला पटेल तो त्याप्रमाणें वागेल. ज्याला पटत नाहीं तो वागणार नाहीं. पण एक मात्र खरं. आजचे तरुण, आणि आजच्या तरुणी, ह्यांना स्वतःचें सुख, पैसा, प्रेम ह्यापलीकडे कांहीं नको आहे. देश गुलामगिरींत असला तरी चालेल. त्याचं त्यांना कांहीं वाटत नाहीं ! "

मी तिच्याकडे पाहिलें. तिनें मान खालीं घातली.

थोड्या वेळानें ती म्हणाली, "जाऊं द्या हा वाद. पण तुम्ही केव्हां जाणार?"

" ह्या चार पांच दिवसांत ! "

" शांताला सुद्धां नेणार ना बरोबर ?"

" तिची इच्छा असली तर ! "

" अजून विचारलें नाहीं वाटतें ? तिला न्या तुम्हीं बरोबर. इथं कोण आहे तिला आतां ?"

मी म्हटलें, " सारें कांहीं तिच्या मर्जीवर अवलंबून आहे ! ती माझ्याबरोबर यायला तयार असली तर ठीक आहे. नाहीं तर मला दुसरी व्यवस्था करावी लागेल ! "

* *

शांता यतीनूला दूध पाजीत होती. तिच्याजवळ जाऊन मी म्हणालो, " मी जाणार आहे. तूं येणार आहेस कां ? "

" तुमच्या म्हणण्याबाहेर मी नाहीं. तुम्हांला योग्य वाटेल तें करा. "

" तुझ्या मताप्रमाणें वागायला तुझी तूं स्वतंत्र आहेस. मी तुझ्या आड केव्हांही येणार नाहीं ! "

शांता कांहीं एक न बोलतां स्वस्थ राहिली. ती कांहीं बोलत नाहीं असें पाहून मी म्हणालों, " तुला इथं रहायचें आहे तर खुशाल रहा. मी सारी व्यवस्था करीन. बाबांनीं जाते वेळेस सारी संपत्ति माझ्या स्वाधीन केली आहे. पण त्यांतला अर्धा हिस्सा यतीन्‌चा आहे हें मला पूर्ण माहित आहे. माझ्या वाट्याला निदान वीस हजार रुपये येतील. मला त्यांची जरूरी नाहीं. मला कांहीं लागतील ते ठेवून बाकीचे सुद्धां यतीन्‌च्याच नांवावर करीन. उद्यां सारी तयारी करतों मी ! "

मला वाटलें तिला ही गोष्ट मान्य होईल. पण ती म्हणाली, " नको. एवढें मात्र करूं नका. ! "

" कां ? "

" लोक काय म्हणतील ? वडिल जाऊन पंधरा वीस दिवस झाले नाहींत तोंच इस्टेटीचे वाटे चालले आहेत. वाटे करण्याचें कांहीं कारण नाहीं. वाटे करण्यानें घरांत दुफळी माजल्यासारखें वाटेल. मला तें नको आहे. संपतीची मला जरुरी नाहीं. यतीन् अजून लहान आहे. त्याला त्यांतलें कांहीं समजत नाहीं. त्यानें जोंपर्यंत वाटा मागितला नाही तों पर्यन्त वाटे करण्याचें कारण नाहीं ! "

" त्यानें वाटा मागितला आणि त्यावेळीं माझ्याकडे कांही नसलें तर ! "

" ज्याअर्थी सारी संपत्ति तुमच्या स्वाधीन केली आहे त्याअर्थी यतीन्‌ला वाटा मागण्याचा हक्क नाहीं. आणि ह्या पुढच्या गोष्टी आहेत. अजून त्याला धड बोलतां देखील येत नाहीं. आणि जेव्हां तो वयांत येईल तेव्हां तो तुमच्या-सारखाच होईल ! "

" तरी पण मला वाटतें सारा पैसा माझ्याकडून खर्च होईल ! "

" झाला तरी तो गरिबांसाठींच होईल ना ? त्यांचें दुःख नाहींसें होण्याकरतां तो खर्च झाला तर मला त्यांत आनंदच आहे ! "

मला वाटलें, माझ्यावर जास्त जबाबदारी येऊन पडली. मी त्या पैशांच्या जाचांतून सुटण्यास पहात होतों पण उलट तो वाढलाच. मी शांताला म्हणालों,

" तुझें मग काय ठरलें तूं माझ्याबरोबर खेड्यांत येशील ? "

" होय ! "

पण प्रश्न पडला. माझ्याबरोबर हिला आणि यतीन्‌ला घेऊन जाणार आणि त्यांना ठेवणार कुठें. आपलें काय आहे तिथें ? हक्काचें असें कांहीं नाहीं. हा प्रश्न पडतांच मी म्हणालों, " मी अगोदर जाईन तिथं. सारी व्यवस्था करीन. नवीन घर वगैरे बांधीन आणि मग न्यायला येईन. तोपर्यन्त तूं इथंच रहा. मी सारी व्यवस्था ठीक करीन ! "

" चालेल. " शांता म्हणाली.

मी उठून बाहेर आलों. माझ्यासमोर आनंदपूरचें तें ओसाड माळ उभें राहिलें. मनांत नाना विचार, नाना कल्पना येऊं लागल्या. तें माळ विकत घेतलें तर बरेंच काम होईल असें वाटलें. माझ्या पुष्कळ आशा पूर्ण होतील. गरिब जनतेला पुष्कळ आधार मिळेल.

विचार केला, तें माळ विकत घ्यायचें तर शक्यतों इथून लवकर जावें. व आपल्या कामास लागावें. कधीं एकदां जातों असें मला झालें होतें.

मी तसाच आंत जाऊन शांताला म्हणालों, " मी उद्यांच जाणार ! "

" एवढ्या लवकर ! "

" होय. इकडची मी सारी व्यवस्था करतो. मला जरूरीचें काम आहे. तें झालें तर माझें अर्धे कार्य पूर्ण होईल. पावसाळा सुरू होण्याच्या अगोदरच गेलें पाहिजे. म्हणजे सर्व व्यवस्था करण्यास सोपें जाईल ! "

" काय करणार आहांत ? "

" जमीन घ्यायची आहे. काय काय करायचें तें सारें मनाशीं रचून ठेवलें आहे. वेळ येतांच सांगेन. हें पहा, काम होण्यासारखें असल्यास पैसे न्यायला मी येईन. आलों नाहीं तर तार करीन पैसे पाठव. पत्रानें सारें कळवीनच ! "

शांता गप्प राहिली. मला वाटलें ती कांहीं बोलणार नाहीं पण तिनें विचारलें, " तुम्ही एवढें करतां त्यापासून तुम्हाला फायदा काय ? "

" साऱ्याच गोष्टी फायद्याच्या दृष्टीनें पाहतां कामा नयेत, तरी पण फायदा म्हणजे मला मिळणारें समाधान ! "

" तुमच्या या वागण्यानें प्रकृती बिघडली तर ? "

"मला आजारी पडतां कामा नये. हल्लींच्या मोठमोठ्या पुढाऱ्यांना आजारी पडण्यास सुद्धां फुरसत मिळत नाहीं. देशकार्यापायींच जर मी आजरी पडलों तर त्यांत वाईट वाटण्यासारखें कांहीं नाहीं. देशासाठीं मरणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे."

ती कांही बोलली नाहीं. माझ्यापुढें बोलून कांहीं फायदा नाहीं असेंही वाटलें असेल तिला. मला मात्र कळून चुकलें, माझ्या बऱ्यावाईटाची काळजी तिला आहे.

बाहेर आलों. फिरण्यासाठीं बाहेर पडणार इतक्यांत रजनी आली. मनांत म्हटलें, " चांगलें झालें. आयती पिडा गेली ! "

पण माझें भाग्य नव्हतें तसें. मला पाहून ती म्हणाली, " फिरायला चाललां वाटतं ? "

" होय ! "

" मला पण यायचं आहे. थांबाना जरा. शांताला सांगून येते. " असें म्हणुन माझ्या उत्तराची वाट न पाहतां ती आंत गेली.

मी मनाशींच म्हणालों, माझ्या मागें कां लागली आहे ही ? दुसरा कोणी भेटतच नाहीं कां हिला ? ही येते शांताला भेटायला पण बोलत बसते माझ्या-जवळ. शांताजवळ बसायला काय झालं हिला ? माझा पिच्छाच पुरवलेला दिसतो. आतां कांहीं लवकर सुटत नाहीं हिच्या तावडींतून. त्यापेक्षां फिरण्यास जाण्याचें रद्द केलें तर बरें. जाऊं दे एकटीलाच......

एवढ्यांत ती पुन्हां बाहेर आली आणि म्हणाली, " चला "

तिच्या ह्या बोलण्यानें माझी विचारमालिका तुटली. माझ्या तोंडून नकळत, " चला " असे शब्द बाहेर पडले.

आम्ही चालूं लागलों. ती अगदीं माझ्याजवळून चालत होती. मला संकोचल्यासारखें वाटूं लागलें. मनांत आलें आपण जरा दुरूनच चालावें पण विचार आला, तिला काय वाटेल ? आपल्या मनांत कांहींतरी चाललं आहे असें तिला वाटेल. ती सरावल्याप्रमाणें चालत होती. मी संकोचल्यासारखा चालत होतो. तिचा पदर उडून माझ्यावर पडे, पण तिला त्याचा पत्ता नव्हता. मला मात्र गोंधळल्यासारखें होई.

गांवाबाहेर एका रमणीय जागीं आम्ही आलों. नदीकाठीं एक मोठें झाड होतें. झाडाखालीं एक दगड होता. त्यावर जाऊन मी बसलों. दगड फारसा मोठा नव्हता. तरीपण दोघांना बसायला पुरेसा नव्हता. तिही माझ्याजवळच बसली. मला वाटलें, खालीं बसतों तर चांगलें झालें असतें. आतां खालीं बसणें शक्य नव्हतें.

माझी एकंदर गोंधळलेली चर्या तिच्या लक्षांत आली असावी. तिनें विचारलें, "मुली म्हणजे कांहीं भयंकर असतात कां हो!"

तिच्या प्रश्नाचा रोख न समजून मी म्हणालों, "त्या भयंकर नसतात, पण भयंकर बनतात मात्र!"

"मुळच्या नसतात ना?"

"नाहीं!"

"मग तुम्हीं मुलींना इतकें कां घाबरतां?"

मी एकदम बावरल्या नजरेनें तिच्याकडे पाहिलें. पण चटकन् स्वत:ला सावरून घेऊन म्हणालों, "मी मुलींना घाबरत नाहीं. तुमचा समज चुकीचा झाला असेल!"

"असेलसुद्धां!" ती हांसत म्हणाली.

मला मात्र विचार पडला, कां घाबरतों मी तिला? तिच्याशीं बोलण्यांत मला संकोच कां वाटतो? आणि ती स्त्री असून सुद्धां तिला माझ्याजवळ बसण्यांत संकोच वाटत नाहीं. किती मनमोकळा स्वभाव आहे तिचा—

मी तिच्याकडे पाहिलें, ती समोरच्या संगमाकडे पहात होती. वाऱ्यामुळें तिचे केंस भुरुभुरू नाचत होते. पदर उडत होता. तिच्या अंगाचा स्पर्श मला होत होता. तिच्या मनांत काय चाललें हें मला समजत नव्हतें. तरी पण कसले तरी आनंदी विचारच घोळत असावे असें वाटतें, कारण तिच्या सुंदर चेहऱ्यावर तें स्पष्ट दिसत होतें. तिचें संगमाकडे टक लावून पहाणें, तिचा मोहक चेहरा, तिचा स्पर्श, आणि वाऱ्यानें उडून माझ्या अंगावर पडणारा पदर ह्यांनीं माझ्या मनाची चलबिचल झाली. मनावरचा ताबा उडतो कीं काय ह्याचें मला भय वाटलें. ह्यापुढें इथं बसणें धोक्याचें आहे असें मला वाटलें--

मी चटकन् उठून म्हणालों, "चला!"

ती भानावर येऊन म्हणाली, "काय म्हणालांत?"

"चला घरीं जाऊं!"

"एवढ्या लवकर!"

"हो. मला जाण्याची तयारी केली पाहिजे. मी उद्यां जाणार आहे ना!"

"हो का?" तिनें विचारलें.

तिच्या शब्दांतला कोमल, मनमोकळेपणा गेला असें वाटलें. तो कांहींसा दुःखी आवाज वाटला मला. मला भासही झाला असेल तसा. तिच्याकडे पाहण्याचा मात्र मला धीर झाला नाहीं.

गांवांत शिरल्यावर रजनी म्हणाली, "मला जरा कापडाच्या दुकानांत जायचें आहे. चला ना बरोबर!"

"मला काय कळतंय् त्यांत! आणि मला वाटतं माझी कांही जरुरी नाहीं तिथें!"

"काम असेल तर नका येऊं. आणि मलासुद्धां पांच दहा मिनिटांपेक्षां जास्त वेळ लागायचा नाहीं. शांताला भेटायला यायचंच आहे मला!"

नाईलाज झाला माझा. साडेसाती कांहीं सुटत नाहीं. गेलों तिच्या मागोमाग एका दुकानांत. तिच्यासारख्या फॅशनेबल् मुलीला ह्या गावांतल्या दुकानांत कपडे घेण्याची कां आठवण झाली ह्याचा मला प्रश्न पडला.

आम्ही दोघे आंत आलेले पाहून दुकानदारानें आमचें स्वागत केलें आणि मला विचारलें, "काय पाहिजे?"

"मला कांहीं नको, ह्यांनाच पाहिजे!"

"हो हो मलाच पातळें पाहिजेत!" ती कांहींशी हंसत म्हणाली

निरनिराळ्या रंगाचीं पातळें बघतां बघतां तिनें मला विचारलें, "ह्यांतला कुठचा रंग आवडतो तुम्हांला?"

"मला त्यांत कांही समजत नाहीं!"

" तरी विशेष कुठचा आवडतो ? "

" माझ्या आवडीचा प्रश्न नाहीं हा ! "

एवढ्यांत माझं लक्ष एका खादी पातळावर गेलें. मी दुकानदाराला विचारलें, " तुमच्या दुकानांत खादीसुद्धां आहे वाटतें ? "

" नाहीं हो. कोणी तरी आणायला सांगितली होती. त्यांतलें एक राहिलें. तें पाहिजे तर घ्या. देऊं कां ? "

पुन्हां मलाच विचारलें. तो समजला तरी काय ? मी तिचा कोणी लागतो कां काय ? त्याला सांगावसं वाटलं, " बाबा, तुझा समज चुकीचा आहे. मी तिचा कोणी नाहीं. तिलाच विचार सारे. " पण बोललों नाहीं.

रजनीनें तें पातळ मागून घेतलें आणि त्याच्याकडे पहात ती म्हणाली, " हें चांगलें आहे कां ? हो, तुम्हीं खादी वापरतां तेव्हां खादी बद्दल तुम्हांला जास्त माहीत असेल ! "

खादीबद्दल मला अभिमान होताच. मी म्हणालों, " ह्या सर्व पातळांत हेंच चांगलें आहे ! "

रजनी दुकानदाराला म्हणाली, " मग द्या बांधून ! "

दुकानदारानें पातळ बांधून तिच्याकडे दिलें आणि बिल माझ्याकडे दिलें. मला गोंधळल्या सारखें झालें. बिल तिच्याकडे द्यावें असें वाटलें, पण माझी फजिती झाली असती. मुकाट्यानें पैसे दिले. खिशांत होते म्हणून बरें झालें.

बाहेर येतांच रजनी म्हणाली, " त्यानें बिल तुमच्याकडे दिलं चुकून. मागितलें असतें तर तुम्हांला वाईट वाटलें असतें म्हणून गप्प राहिलें. हे घ्या पैसे ! "

मी एकदम म्हणालों, " कांहीं जरूरी नाहीं आतां ! " तरी पण वाटलें, पैसे घेतले असते तर बरें झालें असतें. पैसे घ्यावे आणि साष्टांग नमस्कार घालून सांगावे, " माझे आई आतां तरी सोड मला ! "

पण बोलण्याचा धीर झाला नाहीं. स्वतःवर रागवण्याशिवाय मला कांहींएक करतां येत नव्हतं.

* * * *

आनंदपुरांत आल्यावरोवर गणवा आणि एका वृद्ध इसमाला वोलावून विचारलें, " गांवावाहेरचें माळ कोणाचें आहे ? "

" कां ? तें तर ओसाड पडलें आहे." गणबा ह्मणाला.

" ओसाड असलें तरी तें सुपीक बनवतां येईल कीं नाहीं " मी विचारलें.

" हो. पण त्याला खर्च फार येईल ! " वृद्ध शिवा ह्मणाला.

" कोणाचें आहे तें ! "

" आपला जमिनदार आहेना, त्याचंच आहे तें ! " गणवा ह्मणाला.

" त्यांनीं ते असेंच कां ठेवलें ? "

" स्वतःच्या खर्चानें जमीन लागवडीस आणायला कोणीच तयार होत नाहीं त्यामुळें पडून राहिलें आहे तें. लागवडीस आणलें तर पुष्कळ उत्पन्न निघेल. मात्र स्वतः मेहनत भरपूर केली पाहिजे ! "

" तो विकायला तयार आहे कां तें ? "

" होय ! "

" किती रुपये सांगतो ? "

" पूर्वीं कांहीं तरी दहा वारा हजार रुपये सांगत होता."

" आतां किती रुपयांना देईल तो ? "

" सांगतां येत नाहीं ! "

" बरं, पण तें किती रुपयांपर्यंत घ्यावें ? "

" नऊ दहा हजार रुपये फार नाहींत ! "

" अस्सं ! मग त्याच्याकडे जावून विकायला तयार आहे का ह्मणुन विचार. माझें नांव सांगूं नकोस ! "

" पण कोणाला पाहिजे तें ? "

" मलाच ! "

" तुम्हाला ह्या पेक्षां चांगली जमीन मिळेल. दहा हजारांना घेऊन पुन्हां दोन तीन हजार खर्च आहे वर. त्यापेक्षां दुसरी जमीन पहा ना तुह्मीं ! "

" मला तिच जमीन पाहिजे. तो देत असेल तर सांग मला. पण मला वाटतं तो मला द्यायचा नाहीं बहुत करून ! "

" कां नाहीं द्यायचा ? " शिवा म्हणाला, "तो आहे पैशांचा लोभी. शिवाय ती जमीन कोणीही घेणार नाहीं अशी त्याची खात्री आहे. आयती शिकार आली आहे तेव्हां तो सहज विकुन टाकील पहा. मात्र त्याला लाडीगोडी लावण्याचा प्रयत्न केला तर तो डोक्यावर बसेल ! "

" तुम्हींच पहाना कायतें ! मला जमीन मिळाली कीं झालें ! "

" नक्की पाहिजे असेल तर मी मिळवून देईन. आठ हजारांना मिळवू देईन. तुम्ही मात्र मध्यें पडूं नका म्हणजे झालं ! " शिवा म्हणाला.

" मी कशाला मध्यें पडतों ? एकदां जमीन घेतली कीं मग ती तुम्ही साऱ्या लोकांचीच आहे. जो कांहीं खर्च येईल तो मी करीन. तुम्ही पिकवा आणि खा. मला कांहीं नको त्यांतलें. " मी म्हणालों.

" म्हणजे तुम्ही काय करणार ? " गणवानें विचारलें.

" आतांच कशाला पाहिजे तें ! मग सांगेन सारें. आधीं जमीनतर हातीं येऊंदे ! " मी म्हणालों.

" त्याबद्दल तुम्ही आतां कांहींच बोलूं नका. जमीन आपली झालीच म्हणून समजा ! "

" एवढी जर तुमची खात्री आहे तर माझें कार्य खात्रीनें पुरें होईल ! आतां जा तुम्हीं आणि तयारीला लागा. जमीन मिळतांच मग बोलूं आपण. " मी म्हणालों.

गणवा आणि शिवा जमिनदाराकडे गेले.

* * * *

जमीनीबद्दलचें कागदपत्र घेतलें. जमीन माझ्या ताब्यांत आली. गांवांतील बहुतेक लोक म्हणूं लागले, " मूर्ख आहे. चांगली जमीन घ्यायची सोडून ओसाड माळ घेतलें आहे ! "

मी त्यांच्याकडे पाहून फक्त हंसलों. त्यांना बोलून न दाखवतां मला सारें कृतीनें करून दाखवायचें होतें. मी गणबाला बोलावून आणून सांगितलें, " गणबा जमीन तर मिळाली. आतां पुढच्या उद्योगास लागलें पाहिजे ! "

" तुम्ही काय करायचें तें सांगा. आम्हीं आहोंत तयार सारें करायला ! "

" हें बघ, पाऊस पडायच्या आंत एक घर तयार झालें पाहिजे ! होईल कीं नाहीं ? "

" जास्त मजूर लावले कीं सहज होईल ! "

" मजूर आण पाहिजे तेवढे. मुलांच्या शिक्षणाची सोय झाली पाहिजे लवकर. त्यासाठीं शाळेची जरूरी आहे !"

इकडचें तिकडचें बोलणें होतांच गणबा निघून गेला. मी काय काय करायचें ह्याचा विचार करूं लागलों—

पहिल्या प्रथम राहण्यासाठीं एक आश्रम बांधायचा. कोणासही त्यांत रहातां यावें. शाळेसाठीं एकमजली इमारत बांधावी. त्यांत इतर सर्व शिक्षणाची सोय करायची. आश्रम व शाळा ह्यांच्या भोवतीं एक लहानशी बाग तयार करायची आणि बाकी जागा शेतीसाठीं वापरायची. वस्स् ठरलें !

*           *           *

कामास सुरवात झाली. आश्रम बांधण्यास सुरवात झाली. त्याच वेळीं शाळेच्या इमारतीचें बांधकामही सुरू झालें. पुष्कळ शेतकऱ्यांना, बेकारांना काम मिळूं लागलें. मी त्यांना सांगितलें, "तुम्हीं जें काम करतां तें तुमचेंच काम आहे. तुम्हांला येथें केव्हांही रहातां येईल. तुमच्या मुलांबाळासाठीं हें चाललें आहे !"

माझ्या ह्या सांगण्यानें त्यांना काम करण्यास आपुलकी वाटली. सारे झटपट काम करीत. कोणी कोणावर रागवत नसत कोणाशीं भांडत नसत. येथें भरपूर काम मिळत असल्यामुळें बाहेर गांवांतून सुद्धां पुष्कळ लोक येत. त्यांनाही काम मिळे. मला सारें लवकर आटपून घ्यायचें होतें. आणि आलेल्या कामगारांना दुःखि करून परत पाठवणेंही मला बरं वाटत नव्हतं.

दिवसभर इकडे वघ तिकडे वघ ह्यामुळें माझाही वेळ जाऊं लागला. माझ्या मनाची थोडी फार करमणूक होऊं लागली. मला उत्साह आला.

कामगार उत्साहानें काम करत. त्यांना काम करा असं सांगावं लागत नसे. ते काम करीत असतांना गीतें म्हणत. त्यामुळें मजा येत असे. गावांतले वृद्ध, लहान मुलें काम चालू असतांना येऊन तेथें बसत. त्यांचा तो एक करमणुकीचा विषय होऊन बसला आहे. मुलें तर उठल्या सुटल्या तेथें जातात. निरनिराळे खेळ खेळतात. वृद्ध निरनिराळ्या गोष्टी सांगतात. असें मोठें काम पूर्वी कधीं झालें नाहीं त्या गावांत, असें त्यांचें म्हणणें आहे. माझ्या कामाचा त्यांना पत्ता लागत नाहीं. ते विचारतात, " हें सारें कशासाठीं ? "

मी सांगतों, "पहाल थोड्याच दिवसांत!"

ह्या कामामुळें मला जनतेच्या सुधारणेला वाहून घेतां येत नाहीं. पण काम संपतांच त्यांच्याच सुधारणेचा प्रश्न घेतला पाहिजे. मुलांना शिकवण्याचें काम थोडा वेळ करतों. शाळा बांधून झाल्या वर त्यांना खरें शिक्षण मिळेल.

महिन्या दीडमहिन्यांत काम पुरें होईल. पण सारें काम मला कसें जमेल? इतर उद्योगधंद्याचें शिक्षण देणें मला कांहीं शक्य नाहीं. माझ्या सारखेच तरूण मला येऊन मिळाले असते तर माझें काम किती तरी सफळ झालें असतें. निरनिराळ्या विषयांच्या शिक्षकांना पैसे देऊन ठेवणें शक्य नाहीं-आणि आम्हांस तें योग्यही नाहीं. स्वतः कमवावें-स्वतःपुरते कमवावें आणि खावें. बाकीचा वेळ जनहितांसाठीं खर्च केला पाहिजे. बघूंया काय होतें तें. सर्व साक्षी ईश्वर आहे! माझ्या कार्यांचा उद्देश जगजाहीर झाला तर पुष्कळ सहाय्य मिळण्यासारखें आहे. वर्तमान पत्रांतून जर मी माझ्या कल्पना, माझ्या कार्यांचा उद्देश स्पष्ट केला तर माझें पुष्कळ काम होईल. वर्तमान पत्रांत लेख लिहिले पाहिजेत. हल्लींच्या परिस्थितींत स्वराज्यासाठीं कोणत्या उपायांनीं प्रयत्न करतां येतो, स्वराज्यासाठीं काय करणें योग्य आहे हें सर्वांना समजावून दिलें पाहिजे. तरूणांना जर ही गोष्ट पटली तर ते आपण होऊन मला सहाय्य करतील. माझ्या कार्यासाठीं जर दहा बारा तरूण पुढें सरसावतील तर देशहिताचें मोठें कार्य माझ्याकडून होईल!

* * * *

मी वर्तमानपत्रांत लेख लिहिण्यास सुरवात केली. सम्पादक महाशयांना माझा उद्देश कळवला. महात्माजींची चळवळही आतां बंद झाल्यामुळें वर्तमान पत्रांवरील बंदी उठली होती. आणि त्यामुळें त्यांनीं माझ्या लेखांना आपल्या पत्रांत जागा देण्याचें आनंदनें कबूल केलें. मला आनंद झाला.

दिवसभर काम झाल्यावर रात्रीं स्वस्थपणें विचार करून मी लिहित असे, प्रत्येक दिवशीं निरनिराळ्या विषयांवर लिहित असे. मला मुख्य भर शिक्षण, उद्योग धंदे आणि ग्रामसुधारणा ह्यांवर द्यायची होती म्हणून त्यावरच मी जास्त लिहीत असे.

"...इंग्रजी शिक्षण आपल्या बुद्धीचा, मनाचा—शरीराचा विकास करूं शकत नाहीं. त्या शिक्षणामुळें आपली बुद्धि, मन दिवसें दिवस आकुंचित होत आहे.

मन आकुंचित करणें हाच त्याचा मुख्य उद्देश आहे. ठराविक शिक्षण देणें हाच त्याच्या मागचा मुख्य उद्देश आहे. इंग्रजांना आम्हांला आमच्या बुद्धीचा विकास झालेला नको आहे. आम्हांला गुलाम म्हणूनच त्यांना वागवायचें आहे. म्हणूनच कारकून बनवण्याचेंच शिक्षण आम्हांला मिळतें. थोडं इंग्लीश यायला लागलें, निदान मुलगा मॅट्रिक झाला कीं नोकरी मिळविण्याचा मार्ग सुरू. ह्यामुळें सर्वांचा कल नोकरीकडेच वळला आहे. ही पद्धति नष्ट केली पाहिजे. बुद्धीचा, मनाचा, शरिराचा विकास होईल तेंच शिक्षण आज प्रत्येकाला दिलें पाहिजे. तरच हिंदुस्थान जगांत नांव वर काढील. सध्यांच्या शिक्षणामुळें आपली कुचंबना होत आहे. बी.ए., एम्.ए. होऊन सुद्धां नोकरी मिळत नाहीं. बुद्धीचा, शरिराचा योग्य प्रमाणांत विकास न झाल्यामुळें त्याला दुसरें कांहीं करतां येत नाहीं. बेकार रहाण्याशिवाय त्यांना गत्यंतर नाहीं. ह्यामुळें बेकारी वाढली आहे. सर्व दृष्टीनें हें शिक्षण हिंदुस्थानच्या हितास अयोग्य आहे. हें शिक्षण नाहींसें करून राष्ट्राच्या हितास योग्य तेंच शिक्षण प्रत्येकाला दिलें पाहिजे !—

आज जगांत जर कोणत्या राष्ट्राला मान असेल तर ज्यांत भरपूर उद्योग-धंदे आहेत. कोणतेंही स्वतंत्र राष्ट्र घ्या. तें उद्योगधंद्यांनीं गजबजलेलें आहे. त्या राष्ट्रांना दुसऱ्या राष्ट्रांकडे आपल्या गरजेच्या वस्तूबद्दल फारसें पहावें लागत नाहीं. आपल्याला प्रत्येक वस्तूसाठीं इतर राष्ट्राच्या तोंडाकडे पहावें लागतें. आपण सर्वस्वी परतंत्र बनलों आहोंत. इंग्रज हिंदुस्थानांत येण्यापूर्वी काय हिंदुस्थानात उद्योगधंदे नव्हते ? त्यावेळीं हिंदुस्थान उद्योगधंद्यांनीं गजबजलेला होता. लहान मोठे कितीतरी उद्योगधंदे हिंदुस्थानांतील प्रत्येक शहरांत आणि खेड्यांत होते. त्यावेळीं हिंदुस्थान समृद्ध होता. पण जोंपर्यंत सर्व उद्योगधंदे हिंदी लोकांच्या हातांत आहेत तोंपर्यंत आपलें राज्य टिकणार नाहीं हें ब्रिटिशांनीं ताडलें. हळूहळू सर्व उद्योगधंदे नष्ट केले. आम्हांला सर्व वस्तूंसाठीं परराष्ट्राकडे पहावें लागलें. आपला पैसा परदेशीं जाऊं लागला. आपण भिकारी बनलों. गुलामगिरींत जास्त अडकलों

ह्या परिस्थितींतून आपली सुटका करून घ्यायची असेल, तर हळूहळू सर्व उद्योगधंदे काबीज केले पाहिजेत. विद्यार्थ्यांना उद्योगधंद्याचेंच शिक्षण दिलें पाहिजे. देशांत होणाऱ्या वस्तूच विकत घेऊन आपले उद्योगधंदे वाढवले पाहिजेत. परदेशी

वस्तूवर बहिष्कार घालून देशी मालास उत्तेजन दिलें पाहिजे. आज जग काबीज करायचें असेल तर त्याला तलवारीची जरुरी नाहीं, उद्योगधंद्यांच्या जोरावर सर्व जग काबीज करतां येईल. म्हणून पुस्तकी शिक्षणाबरोबरच औद्योगिक शिक्षण घेऊन मनाचा, शरिराचा विकास झाल्यावर हिंदुस्थानचा विकास व्हायला वेळ लागायचा नाहीं."

"...हिन्दुस्थानच्या प्रगति आड आज कोण येत असेल तर तो केवळ इंग्रज असें म्हणतां येणार नाहीं. वस्तुतः हिंदुस्थानच्या प्रगतीच्या आड आज सात लाख खेडीं येत आहेत. बहुजनसमाज आज ही प्रगति खुंटवून धरतों आहे. बहुजनसमाज आज अज्ञान, दारिद्र्य, दुःख यांनीं मृतवत् झाला आहे. त्याला सजीव केला पाहिजे. त्यांच्यांत नवचैतन्य भरलें पाहिजे.

आपल्या शहरवासीयांत आणि त्यांच्यांत फार अंतर आहे. आपण. एक लहानशा ओढ्यांप्रमाणें आहोंत आणि ते महासागराप्रमाणें आहेत. आपण मूठभर आहोंत आणि ते टोपलीभर आहेत. त्यांना एका बाजूला ठेवून चालणार नाहीं. शेंकडा ९९ लोकांना वगळून आम्हांला चालणार नाहीं. त्यांच्या सुधारणेंतच हिंदुस्थानचें भवितव्य अवलंबून आहे.

––म्हणून तरुणानों खेड्यांत चला ! जनतेला शिक्षण द्या. त्यांना साक्षर करा. त्यांना परिस्थितीची जाणीव करून द्या. आपल्यावर होणाऱ्या अन्यायांविरुद्ध लढायला त्यांना तयार करा––अन्यायाविरुद्ध मरायला तयार करा. त्यांच्या हातांत सारें आहे. एकदां कां ते समंजस झाले तर ते कोणालाही ऐकणार नाहींत. ब्रिटिशांना येथून हांकलून लावायला हें एकच कारण पुरेसें आहे.

"आज हे शेंकडा ९९ लोक अज्ञानी ठेवण्यांतच ब्रिटिशांचें साम्राज्य दृढ होत आहे. हिंदुस्थानवर आपलाच ताबा असावा म्हणूनच त्यांनीं ह्या लोकांना अज्ञानी ठेवलें आहे. आपल्या पेक्षांही खेड्यांतली जनता स्वाभिमानी झाली तर अपमानाचा ती सूड घेईल, आपलें स्वातंत्र्य कधिं गमावणार नाहीं. तरुणांनों ह्या लोकांना जागवा, चेतवा, स्वराज्य तुमचें आहे."

"...आपल्यापुढें सर्वांत बिकट प्रश्न कुठचा असेल तर तो ग्रामिण जनतेच्या शिक्षणाचा. त्यांना साक्षर केलें पाहिजे. आपलें दुःख निवारण करतां येईल असेंच शिक्षण दिलें पाहिजे. इंग्रजी शिक्षणाचा त्यांना कांहीं एक उपयोग

नाहीं. आज त्यांची स्थिती मोठी बिकट होऊन बसली आहे. पोटभर अन्न मिळत नाहीं. शेतीचें उत्पन्न पुरत नाहीं. आणि शेतीशिवाय दुसरा धंदा नाहीं. अशा परिस्थितींत इंग्रजी शिक्षण देऊन काय फायद्याचें आहे? उलट त्यांचें दुःख वाढेल मात्र. इंग्रजी शिकलेल्यांची प्रवृत्ति बहुधा शिष्टपणाकडे असते. इंग्लीश बोलायला आलें, चांगलें इंग्लीश शिक्षण घेतलें म्हणजे त्यांना आपण युरोपिअन् बनलों असें वाटतें. पुष्कळांची ही स्थिती असते आणि त्यांना हलकें सलकें काम करण्यास लाज वाटते. कां तर इंग्रजी शिकून असली लहानसान कामें करणें म्हणजे तें लांच्छनास्पद आहे, अशी त्यांची प्रामाणिक समजूत झालेली असते. ह्या नादान समजूतीपासून या जनतेस दूरच ठेवलें पाहिजे आणि तिच्या उन्नतीस योग्य असेंच शिक्षण दिलें पाहिजे.

आजच्या होतकरू नवजवान तरूणाचें हें कर्तव्य आहे. त्यांना हस्तकौशल्याचें शिक्षण, सुतार, फ्रेटवर्क, सूत कातणें, वेताच्या खुर्च्या, टोपल्या बनवणें, खेळणी करण्यास शिकवणें अशा किती तरी गोष्टी शिकवतां येतील. म्हणजे त्यांना रिकाम्या वेळीं असलीं कामें करून पैसे मिळवतां येतील. नुसतें शेतीवरच अवलंबून रहायला नको त्यांना. त्यांचीही उन्नति होईल. उद्योग धंदे वाढतील. देशांतला पैसा देशांत राहील. हिंदुस्थान स्वतंत्र आणि समृद्ध होईल. त्यांचें सुवर्णभूमी हें नांव पुन्हां एकदां सार्थ होईल. तरुणानों उठा, कंबर बांधा आणि कामास लागा. देशासाठीं स्वार्थत्याग करा. शहरांत तुम्हांला पैसा मिळेल पण सुख समाधान मिळणार नाहीं. तुम्ही आपली विद्या जर ह्या खेडवळांना दिली तर तुम्हांला पैसा मिळणार नाहीं. पण सुख, समाधान आणि त्यांचा आशिर्वाद जरूर मिळेल. त्यांची सेवा केल्याचें पुण्य तुम्हांला मिळेल ! ...”

असे माझे विचार मी वर्तमान पत्रांत प्रसिद्ध केले. सर्वांकडून त्यांचा स्वीकार झाला. माझ्या अपेक्षेप्रमाणें दोन तरुण मला येऊन मिळाले. मला आनंद झाला. आणखीही सहकारी मिळतील अशी आशा आहे. दोघेही चांगले हुशार आहेत. आपल्या कामांत चांगले वाकबगार आहेत. त्यांच्याकडून चांगलें कार्य होईल अशी आशाही आहे. त्यामुळें माझा विश्वास वाटला. मला पुष्कळ धीर आला.

* * * *

माझ्या मना सारखं होत आहे सारं. शाळा सुरळीत चालली आहे. आनंदपूरच्या बाहेरचीं मुलें येतात. सर्वांना पाट्या पुस्तकें मिळण्याची सोय

केली आहे. ह्या मुलांबरोबरच अस्पृश्य मुलांना देखील शाळेंत घेतलें आहे. पहिल्या प्रथम जरा लोकांनीं नापसंती दर्शविली, पण शेवटीं सारे गप्प बसले. मी त्यांना सरळ सांगितलें होतें, " तुमच्या मुलांसारखींच तीं मुलें आहेत. त्यांना मी शाळेंत घेणारच. तुमच्या मुलांना शाळेंत पाठवणें अगर न पाठवणें हें तुम्हीं ठरवा. मात्र त्यांना जर तुम्हीं घरीं ठेवलें तर तुमचेंच नुकसान होईल. तुम्हीं ज्यांना अस्पृश्य समजून हीन मानतां तेच उद्यां शिकून चांगले पुढें येतील आणि तुम्हांला लज्जेनें मान खालीं घालावी लागेल."

मुलांना मातृभाषा प्रामुख्यानें शिकविली जाते. त्यावरोबर त्यांना इंग्रजीचे ज्ञानही दिलें जातें. ह्याशिवाय त्याना हस्तकौशल्याची कामें, सुतार कामें, सूत-कांतणें हीं शिकवलें जातें. मुलांना त्यांत गम्मत वाटते, काम करण्यास उत्साह वाटतो. शाळेच्या इमारतीच्या तळमजल्यावर सुतार कामाचा मोठा वर्ग आहे त्यांत मुलांबरोबर कांहीं तरुणही शिकतात.

वेताच्या खुर्च्या, टेबलें, टोपल्या वगैरे करण्याचें शिक्षण कोणालाही घेतां येतें. ह्याचा फायदाही पुष्कळजण घेतात. शेती उत्तम तऱ्हेनें कशी करावी हेंही त्यांना सांगण्यांत येतें.

आश्रमांत पुष्कळजण येऊन राहिले आहेत. मी नियमच घालून दिला आहे, प्रत्येकानें स्वतःचे काम स्वतः केलें पाहिजे. मात्र जेवणाची सोय एकत्र केली आहे. आश्रमांतल्याच लोकांनीं शेती करायची. आपणाला लागणारें धान्य पिक-वायचें. बाकीच्या जमीनीवर ज्यानें पाहिजे त्यानें लागवड करायची. आश्रमवासी-यांनीं जनसेवा हेंच आपलें कर्तव्य समजून वागलें पाहिजे. कोणतेंही काम करायला त्यांना लाज वाटतां कामा नये. स्वच्छता हा सुधारणेचा मुख्य पाया आहे म्हणुन प्रत्येकानें स्वतः स्वच्छ राहिलें पाहिजे, इतरांना स्वच्छ रहाण्यास सांगितलें पाहिजे. आश्रमांतल्या तरूणाची एक टोळी दररोज आजुबाजूच्या खेड्यांत जाऊन सर्वत्र साफसूफ करीत आहे हें पाहून मनाचं समाधान होतें. लोक म्हणतात, त्यांना वेड लागलें आहे. पण आपल्या घरापुढची घाण दुसरे येऊन काढतात हें पाहून त्यांची त्यांनाच लाज वाटते. व ते स्वतः घाण काढून टाकतात.

सर्व कामें झाल्यावर आणि रिकामा वेळ असतांना सुत कांतणें चालतें. आश्रमांत पुष्कळ चरखे ठेवले आहेत. पुष्कळजण येतात सकाळचें सूत कांतायला.

पुष्कळांच्या घरीं सुद्धां चरखे नेऊन दिले आहेत. वृद्ध लोक रिकामे बसण्या ऐवजीं सूत कांतत बसतात. त्यांनीं कांतलेलें सुत योग्य मोबदल्यांत विकत घेतलें जातें. बसल्या बसल्या त्यांना पैसे मिळतात आमचेंही कार्य होतें.

एवढें झालें. पण एका गोष्टींची मला उणीव भासत होती. तें ह्मणजे मंदीर. देवाच्या दर्शनाच्या निमित्तानें पुष्कळ लोक एकत्र येतील तेव्हां त्यांना पुष्कळ गोष्टी सांगतां येतील. गावांत मंदीर आहे पण तें आमच्या उपयोगी नाहीं. अस्पृश्यांना त्या देवळांत प्रवेश नाहीं. मला तें नको आहे. अस्पृश्य सुद्धां माणसेंच आहेत. त्यांनासुद्धां देवळांत जावून देवाचे दर्शन घेतां आलें पाहिजे. त्यांच्यावर होणारा हा अन्याय दूर झालाच पाहिजे. ह्यासाटीं एका मंदीराची जरुरी आहे. ती उणीव दूर केलीच पाहिजे.

*  *  *

आमचा हा आश्रम ह्मणजे एक छोटासा गांवच बनला आहे. मुख्य आश्रम, शाळेची इमारत, लहान लहान झोपड्या, मंदीर ह्यामुळें त्याला गांवाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. वस्तीही भरपूर आहे. आपल्या परीनें प्रत्येकजण स्वतंत्र आहे. कोणी कोणावर अवलंबून नाहीं.

मुलांचें शिक्षण स्वतः त्यांच्याच खर्चानें होतें. मुलेंच टोपल्या, पेट्या बनवतात. लहान लहान खेळणीं बनवतात. आणि फावल्या वेळांत गावांत नेऊन विकतात. किंवा साऱ्या वस्तु आश्रमांत विकत घेण्यांत येतात आणि ह्या उद्योगावर त्यांचा शिक्षणाचा खर्च चालतो. स्वतःच्या पायावर उभें रहाण्याचा हा एक मार्ग आहे. सर्वबाजूंनीं मुलांच्या उन्नतीकडे लक्ष देण्यांत येतें.

सुत भरपूर निघत आहे. लगेच हातमागावर त्याचें कापड बनवलें जातें. लोकांना तें विकत घ्यावें लागतें. शेतकरी लोक सुद्धां खादीच विकत घेतात. त्यांना ती जरा महाग पडते पण आपल्याच गावांत तयार झालेली ह्मणून त्यांना ती वापरण्यांत अभिमान वाटतो. थोड्याच दिवसांत खादी भरपूर निघेल. खादी बाहेर गांवी पाठवावी लागेल.

आश्रमाचें कार्य दिवसेंदिवस वाढत आहे. लोकांना सुशिक्षित करणें. त्यांचे अज्ञान, दुःख नाहींसे करणें हेंच आश्रमाचें मुख्य ध्येय आहे. एका खेड्यापुरतेंच हें कार्य करायचें नाहीं. होतां होईतों आपलें कार्यक्षेत्र वाढवायचें आहे. ह्यासाठीं

सात आठ खेडीं सोडून निरनिराळ्या ठिकाणीं लहान लहान आश्रम उघडले आहेत. इथल्याप्रमाणेंच तेथेंही सारीं कामें चालतात.

महिन्यांतून सर्व कामें कशी चालतात ह्यावर देखरेख चालते. महिन्यांतून सर्वांना एकत्र बोलवण्यांत येतें. आजुबाजूच्या खेड्यांतील सर्व लोक जमतात. लहानशीच सभा होते. त्यांत त्यांना कसें वागावें, आपलें कर्तव्य काय, हेही समजावून देण्यांत येतें. भेदभाव सोडून एक होणें ह्यातच हित आहे हें त्यांच्या मनावर बिंबवण्यांत येतें.

मंदिरांतही हेंच काम चालतें. आश्रमांतले स्त्रीपुरुष, स्पृश्य, अस्पृश्य, मंदिरांत येतात, गांवातलेही पुष्कळजण येतात. पार्थना म्हटली जाते. सर्वांना एकत्र आणण्याचा हा एक चांगला उपाय आहे—

सर्वजण आपआपलीं कामें चोख रीतीनें बजावतात. कधीं भांडण नाहीं. भांडण्याचें कारण तरी काय? आपण ज्या पवित्र हेतूनें जमलों आहोंत त्यांत एकमेकांचा द्वेष, तिरस्कार करण्याचें कोणतेंच प्रयोजन नाहीं. सर्वजण आपण ठीक कीं आपलें काम ठीक ह्या न्यायानें वागतात.

पुरुषांप्रमाणें शांताही काम करते. स्त्रियांना सुधारण्याचें तिचे प्रयत्न पाहून समाधान वाटतें. स्त्रियांचीं कर्तव्यें कोणतीं, मुलांना कसें सांभाळावें हें ती सर्वांना सांगते. स्त्रियांचा एक वर्गही ती चालवते. त्यांना विणकाम, भरतकाम, शिवणकाम शिकवते. तिचा उत्साह पाहून आनंद होतो.

ह्या प्रयत्नामुळें सर्व लोक सुधारत चालले आहेत. त्यांचा आत्मविश्वास आतां वाढत चालला आहे. आपण दुसऱ्यांचे गुलाम नाहीं, आपण स्वतंत्र आहोंत असेंही त्यांना वाटूं लागलें आहे. ते सुधारत चाललेले पाहून जमीनदारांची धाबीं दणाणलीं आहेत. जमीनदार त्यांना धमक्या देऊन पहातात पण त्यांचें कांहीं चालत नाहीं. जमीन काढून टाकली तरी शेतकरी इतर कामें करून जगूं शकतों. आणि जमीनदाराची जमीन ओसाड रहाते. कोणी ती करीत नाहीं. शेतकऱ्यांवर जुलूम करणें, त्यांना लुटणें हें त्यांना अशक्य होऊन गेलें आहे. तरी पण कांहीं जमीनदार मोठे बिलंदर आहेत.

ह्या माझ्या सर्व चळवळींचा परिणाम म्हणजे सारे जमिनदार माझ्या विरुद्ध उठले आहेत. माझ्या विरुद्ध त्यांचे प्रयत्नही चालले आहेत. सरकारची

मेहरनजरही माझ्यावर आहे. सरकारची मेहेरनजर नसायला सरकार कांहीं मुर्ख नाहीं. एवढे लोक ज्ञानी होतात हें त्याला कसें सहन होईल. कुठून तरी मला पेंचांत आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. जमिनदारांचें सहाय्यही सरकारला आहे. जमीनदारांना शेतकरी विचारत नाहींत, त्यांचा मान राखत नाहींत, त्यांची पर्वा करीत नाहींत. माझें ऐकतात. हें त्यांना कसें सहन होणार? सरकारला सहाय्य करणें हें त्यांना बरें वाटतें. आजच्या शेतकऱ्याच्या मागचे काळ हे जमीनदार आहेत—

मला दोघांबद्दलही भीति वाटत नाहीं. जनसेवेंत आपलं सर्व कांहीं अर्पण करणाऱ्याला सरकारची भीति कां वाटणार? माझें जें कांहीं चाललें आहे तें सर्व उघड उघड आहे. मी कोणापासून कांहीं लपवत नाही.

सारें सुरळीत चाललें आहे. मला जें जें म्हणून करतां येण्यासारखें आहे तें तें मी केलें. तरी मला पूर्ण समाधान मिळालेलें नाहीं. हृदयांत कुठें तरी दुःखाचें शल्य बोंचत रहातें. मला कांहींएक कमी नाहीं तरी पण मी पूर्ण सुखी नाहीं. जनसेवेच्या कार्यांतच मी सुख मानतों. पण तें सुख मला पूर्ण सुखी करूं शकत नाहीं. असें कां व्हावें हें समजत नाहीं. स्वस्थ बसल्यावर मनाची चलविचल होते. हृदयाला कंप सुटल्याचा भास होतो पण नक्की काय होतें तें सांगतां येत नाहीं.

* * *

मी माझं मन ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करतों. सकाळीं उठल्याबरोबर व्यायाम करतों. आंघोळ झाल्यावर एक तास ध्यानस्थ बसतों. उद्देश इतकाच कीं, एक तास बाह्य जगाचा संबंध तोडून मन शांत ठेवावें. मनावर विजय मिळवावा. मला वाटतें, मी मनावर विजय मिळवीन. पण भीति वाटते, शंकेनें मन व्याकूळ होतें.

आश्रमांत येणारीं जोडपीं, त्यांचें बोलणें, एकमेकांवरील प्रेम पाहून मन चलबिचल होतें. हृदयांतून दुःखाचा कड आल्याचा भास होतो. मी त्यावर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करतों.

आजही माझं मन असंच चलबिचल झालं. मी आश्रमांत बसलों होतों. माझा एक सहकारी येऊन म्हणाला, "मला माझ्या गांवीं जायचें आहे!"

मला आश्चर्य वाटलें त्याच्या बोलण्याचें. देशकार्यासाठीं तो घरादाराचा त्याग करून आला होता. मी विचारलें, "आईबापांना भेटायला जातोस कीं काय?"

"होय. त्यांनींच बोलावलें आहे मला. त्यांच्या मनांत माझें..."

तो बोलण्याचा थांबला म्हणून मी विचारलें, "बोलना काय आहे त्यांच्या मनांत?"

"माझें लग्न करण्याचें?"

"मग तूं लग्न करायचें नाहीं म्हणून सांगायला जातोस कीं काय?"

"नाहीं!"

"म्हणजे तूं लग्न करणार?"

"होय!"

"मग तूं पुन्हां येणार नसशील इथं?"

"कां नाहीं येणार मीं? लग्न होतांच येईन मी इथं. बायकोला घेऊनच येईन मी!"

"पण लग्न केल्यावर तुला देशसेवा करतां येणार नाहीं. अविवाहितच राहून कांहीं करण्यासारखें आहे!"

"मला तसं वाटत नाहीं! लग्न केल्यावरही मी पूर्वी इतकीच देशसेवा करीन! लग्न आणि देशसेवा ह्यांचा एकमेकांशीं कांहीं एक संबंध नाहीं!"

"नाहीं कसा? लग्ना आधीं मी असं करीन, तसं करीन म्हणणारा लग्न केल्यावर कांहीं करूं शकत नाहीं. स्त्रियांच्या मोहपाशांत सांपडल्यावर पुरुष सर्व विसरून जातो!"

"हें जसें खरें आहे तसेंच स्त्रियांच्या मोहपाशांत सापडून तो आपलें कर्तव्य बजावतो. स्त्रीप्रेम त्याला मार्ग दाखवतें."

"लग्न न करतां रहाणें सोइस्कर आहे.!"

"पण लग्नाशिवाय रहाणें माणसाला शक्य नाहीं. लग्न ही नैसर्गिक बाब आहे. माणसाला त्याची आवश्यकता आहे.. त्यानें त्या विरुद्ध जाण्याचा कितीही प्रयत्न केला तरी शेवटीं तो निसर्गाकडे जाणारच!"

"जो मनावर ताबा मिळवूं शकतो तो सर्व कांहीं करूं शकतो!"

"मी तेवढा शक्तिवान नाहीं. मी त्याबाबतींत दुबळा असेन. पण मी माणुस आहे. माणसाचें एक मुख्य कर्तव्य मी बजावतों. स्त्री पासून मिळणाऱ्या सुखापुढें इतर सुखें फिकी आहेत. कितीही

दमून भागून या, कितीही भुकेनें व्याकुळ व्हा — बायकोचा एक सहानुभूतीचा, उत्साह देणारा शब्द ऐकला तर सारें दुःख विसरून जातो पुरुष. स्त्री हेंच पुरुषाचें खरें विश्रांतीस्थान आहे. त्यापासून दूर रहाणारा मनुष्य इतरांना तर फसवतोच पण स्वतःची सुद्धां फसवणूक करून घेतों."

माझा सहकारी शांतपणें बोलत होता. त्याला अडवून धरण्याचें सामर्थ्य माझ्यांत आलें नाहीं. मी त्याला रजा दिली. तो गेला. मी विचार करूं लागलों, मी स्वतःची तर फसवणूक करीत नाहीं ना ?

आश्रमांत जोडपीं आनंदानें, न भांडतां काम करीत आहेत. तीं कुठें एक-मेकांच्या कार्यांच्या आड येत नाहींत ? मग आपण लग्न करूं नका असा उपदेश कां करतों ? कोणाचें खरें आहे ? माझें कां माझ्या मित्राचें ? त्याला त्याच्या मार्गानें जाऊंदे. मी माझ्या मार्गानें जाईन. माझें म्हणणें मी खरें करीन.

* * *

माझा मित्र लग्न करून आपल्या पत्नीला घेऊन आला. लक्ष्मीनारायणासारखा जोडा दिसत होता. मित्राच्या तोंडावर उत्साह, आनंद स्पष्ट दिसत होता. त्यानें मला नमस्कार केला. मी म्हटलें, " तुम्हांला दिवस सुखाचे जावोत ! "

माझा मित्र आपल्या पत्नीला म्हणाला, " आजपासून तुला इथल्या नियमा-प्रमाणें वागलें पाहिजे. आपलें आयुष्य सुख चैनीसाठीं नाहीं, हें तत्व इथं पाळलें जातें ! "

" मी आनंदानें सर्व नियम पाळीन." ती म्हणाली.

त्यानें मला आपल्या कामाबद्दल विचारलें. मी त्याला सारें सांगितलें. जातांना तो म्हणाला,

" आतां मला काम करण्यास दुप्पट जोर आला आहे. पूर्वी मी काम करत होतों, पण त्यांत खरा जिवंतपणा नव्हता. आतां मला खरा उत्साह आला आहे. खरें सांगतों तुम्हांला निसर्गाकडे जाण्यांतच खरें सुख आहे ! "

तो गेला. मी विचार करीत राहिलों. त्याच्या बोलण्यांत चालण्यांत उत्साह होता तो मला दिसत होता. मी एक दुःखपूर्ण निश्वास सोडला. कां सोडला हें सांगतां येत नाहीं. मी डोळे मिटले. माझ्या डोळ्यांसमोर सुधाची मोहक मूर्ति राहिली—तिच्या संगतींतले प्रसंग आठवूं लागले. मला वाटलें, सुधा माझ्या समोरच आहे. मी डोळे उघडून पाहिलें, सारा भास होता—

मन शांत करण्याचा मी प्रयत्न करूं लागलों. सुधेची मूर्ति डोळ्यांपुढून जाईना. मी तिला मनांतून काढून टाकण्याचा प्रयत्न करूं लागलों. सुधा गेली पण तिच्या ऐवजीं रजनी आली. तिच्या स्पर्शाची आठवण झाली. अंग शहारलें—

मनाची चलविचल वाढली. कांहीं केल्यानें शांत होईना. ध्यानस्थ बसण्याचा प्रयत्न केला, पण मन शांत होईना. उठलों आणि मंदिरांत आलों. राधाकृष्णाची मूर्ति माझ्याकडे पहात होती. तिच्या तोंडावर सात्विक तेज दिसत होतें. मला वाटलें कृष्णाची मूर्ति माझ्याकडे पाहून हंसते, तिचें हंसणें जणुं काय मला सांगत होतें, " तूं देव म्हणून माझी पूजा करतोस. मी देव आहे पण मला सुद्धां मोह आवरतां आला नाहीं. तूं कशाला निसर्गापासून दूर जातोस ? माझ्या शेजारी पहा राधा कशी उभी आहे ? स्त्रीया आपल्या कर्तव्याआड येतात हें चुकीचें मत आहे. माझ्याकडे पाहून तुला हें समजत नाहीं का ? "

माझें मन म्हणालें, " देवांना सुद्धां स्त्रीमोह दूर करूं शकला नाहीं मग तूं कशाला त्या विरुद्ध प्रयत्न करतोस ? "

मंदिरांत येतांच माझें मन शांत होत असे. पण आज कांहीं केल्या मन शांत होईना. उलट राधा-कृष्णाच्या मूर्तिकडे पाहून मनाची अशांतता वाढली—

एवढ्यांत मंदिरांत लोक जमूं लागले. प्रार्थनेस सुरवात झाली. मी प्रार्थनेंत गढून गेलों. मन शांत झालें—

मी बाहेर आलों. माझ्या झोपडीकडे चालूं लागलों. कानावर गाण्याचे सूर ऐकूं येऊं लागले. कोणीतरी मंजुळ, शांत आवाजांत गात होतें—

"विश्रांति स्थळ केव्हां यायचें कळेना.
अजून चालतों वाट माळ कां सरेना ! "

माझी स्थिती त्या प्रवाशा सारखीच नाहीं का ! ज्या प्रवासासाठीं मी निघालों आहे तो कधीं संपणार ? माझें विश्रांति स्थान कधीं येणार ? मनाला खरें सुख कधीं मिळणार ? कां असाच प्रवास चालू रहाणार ?—

मी मनाशींच म्हणालों,

" विश्रांति स्थळ केव्हां यायचें कळेना
अजून चालतों वाट माळ कां सरेना ! "

# ३

रजनी जागी झाली. सकाळ झाली होती. शांत मंद मंद वारा खिडकींतून आंत येत होता. वाऱ्या बरोबर फुलांचा सुगंधहि येत होता. बाहेर पक्ष्यांचा गोड चिवचिवाट चालला होता.

रजनींचें मन प्रसन्न झालें. तिला उत्साह आला. अंगावरचें पांघरूण तिनें दूर केलें. बिछान्यावरून उठतांउठतां तिनें पातळ नीट केलें. आणि केसांवरून हात फिरवत ती झोपडीच्या बाहेर आली.

शांत वातावरणांत तिचें मन रमलें. ती बागेंत फिरूं लागली. असें फिरणें, अशी बाग, असें वातावरण तिनें कधीं पाहिलें नव्हतें. ती फिरतां फिरतां एका झाडाजवळ आली. तिचें लक्ष झाडाखालीं बसलेल्या व्यक्तीकडे गेलें. आनंद ध्यानस्थ बसला होता. त्याचा चेहरा शांत, गंभीर, निर्विकार दिसत होता. चेहऱ्यावर एक प्रकारचें तेज दिसत होतें. तिनें आश्रमाकडे पाहिलें—आश्रमावर राष्ट्रीय निशाण वाऱ्याबरोबर फडफडत होते. स्वातंत्र्याचें द्योतक असें तें निशाण, झाडाखालीं ध्यानस्थ बसलेला तो आनंद पाहून तिचे हात आपोआपच जोडले गेले. तिनें दोघांनाही नमस्कार केला—

रजनीनें त्याचें कार्य समजून न घेतां त्याला त्या स्थितींत पाहिलें असतें तर त्याची थट्टाही केली असती. पण तिला त्याचा उद्देश, आणि त्याच्या सिद्धतेसाठीं त्यानें केलेला त्याग समजून चुकला होता—

पत्र पाठवल्या प्रमाणें रजनी आली होती. शांतानें तिला इतक्यांत येऊं नको, असें पत्रही पाठवलें होतें. तें पत्र तिला मिळण्याच्या अगोदरच ती इथें हजर झाली

होती. शांताला पाहून तिला आनंद झाला होता. आनंदला काय वाटलें हें सांगणें कठिण होतें, तिच्या येण्यानें त्याला आनंद झाला नाहीं हें मात्र खरें होतें.

रजनीला अपेक्षेबाहेर आश्चर्य वाटलें होतें सारें पाहून. जणूं काय आश्रम, झोपड्या, लोकवस्ती मिळून तें एक स्वतंत्र गांवच भासत होतें. त्याबद्दल शांता जवळ बोलतांना ती म्हणाली होती,

" शांता मला कल्पनासुद्धां नव्हती ह्याबद्दल. मला वाटलें होतें. वर्तमानपत्रांत जें मीं वाचलें होतें, त्याच्या अर्ध्यानें जरी मला इथं पहायला मिळालें तर नशीब ! पण मी साफ चुकलें. वाचल्या पेक्षां किती तरी जास्त मीं पाहिलें ! "

शांता म्हणाली होती " आनंदनीं हें सारें स्वतःच्या श्रमांनीं बनवलें आहे. ह्या पायीं त्यांनीं स्वतःच्या सुखाची, पैशाची, विश्रांतीची मुळींच पर्वा केली नाहीं !

" त्यामुळेंच एवढें ऐश्वर्य आलें आहे ह्या खेड्याला. खेडें असें वाटतच नाहीं मला हें. किती बदलून टाकलें आहे सारें. रस्ते किती चांगले आणि साफ आहेत. कुठें केरकचरा, घाण दिसत नाहीं ! "

आश्रमांतल्याच लोकांनीं सारें केलें आहे हें. आज शेंदोनशें खेडीं त्यांच्या पाठीशीं उभी आहेत. त्यांच्या एका शब्दासरशीं सर्व लोक वाटेल तें करायला तयार आहेत. त्यांच्यामुळेंच ह्या खेड्यांत शांतता आणि सुख नांदत आहे. लोकांना पोटभर खायला आणि अंग झाकायला कपडा मिळतो आहे. उद्योगधंद्यांचें शिक्षण मिळत आहे. मुलांना शालेय शिक्षण मिळत आहे ! "

" खरोखरच ह्या खेड्यांचें भाग्य उदयास आलें आहे. पण ह्यापासून त्यांना फायदा काय होतो ?"

" फायदा ? दुसऱ्यांना सुखी करणें, देशासाठीं लढणें हाच काय तो फायदा. त्यांच्यामागें आज सारी जनता आहे, हा काय लहान फायदा ? रजनी, सारी जनता त्यांच्यामागें आहे खरी, पण सरकारचा त्यांच्यावर डोळा आहे. महिन्या दोन महिन्यांनीं एकादा तरी सी. आय. डी. पोलिस असतोच !"

" त्यांना माहित नाहीं हें ?"

" नाहीतर काय ?"

" पण सी. आय. डी. चे काय काम इथं ?"

"एकादा जरी लहानसान मुद्दा सांपडला तरी त्यांना येथून उचलायचा उद्देश आहे त्यांचा!"

"उगीचच्या उगीच सी. आय. डीचा ससेमिरा मागें आहे हें पाहून ते स्वस्थ कां बसतात? कितीतरी लोक त्यांच्यामागें आहेत!"

"होय! पण तूं हें विसरतेस, अहिंसा हा त्यांचा धर्म आहे. सारें कांहीं उघड उघड करायचें. चोरून कांहीं ठेवायचें नाहीं. ह्याप्रमाणें ते वागतात. आपण सत्याग्रही आहोंत. कोणत्याही बाबतींत तक्रार करायची नाहीं हें त्यांचें ब्रीद आहे. लोकांना ह्या सी. आय. डीना पाहून राग येतो पण त्यांनीं शिकविलेल्या अहिंसा तत्वांमुळें सारे लोक गप्प रहातात. त्यांचा मान राखतात. त्यांनीं सांगितलेल्या गोष्टीविरुद्ध ते जात नाहींत. रजनी, तुला माहित नाहीं, आज जी ह्या खेड्यांत शांतता नांदते आहे ती ह्या अहिंसेच्या उपदेशामुळेंच. नाहींतर भांडण मारामाऱ्या ह्या असायच्याच!"

शांताच्या ह्या सांगण्यानें, आणि तिनें स्वत: जें कांहीं पाहिलें होतें त्यामुळें आनंदाविषयीं तिच्या मनांत आदर उत्पन्न झाला होता आणि ह्मणूनच तिनें जेव्हां त्याला ध्यानस्थ पाहिलें तेव्हां आपोआप तिनें हात जोडले होते—

ती त्याच्याकडे टक लावून पाहू लागली. तिच्या मनांत नाना विचार येत होते. इतक्यांत आनंदाची समाधि संपली. त्यानें डोळे उघडले. समोरच रजनीला पाहून त्याला आश्चर्य वाटलें. तो थोडासा गोंधळून गेला. तरीपण तो ह्मणाला,

"एवढ्या सकाळीं उठला तुह्मी?"

"सकाळच आहे वाटतें आतां?"

"खेड्यांतल्या मानानें आतां सकाळ नाहीं. पण तुह्मां शहरवासीयांची कुठें सकाळ होते येव्हां! आठ नऊ वाजेपर्यंत झोपत रहाणें हा तुह्मां लोकांचा हक्कच आहे!"

रजनीला स्वत:ची लाज वाटली. आठ वाजण्या अगोदर ती कधीं उठत नव्हती. ती कांहीं बोलली नाहीं.

आनंद उठला. हरिणाजीन गोळा केलें आणि तो चालूं लागला. त्याच्या बरोबर रजनीही चालूं लागली.

रजनीला त्याचें हें ध्यानस्थ बसणें कांहींसें विचित्र वाटलें होतें. हल्लींचा तरुण, देशकार्यासाठीं झटणारा संन्याशासारखा समाधि लावून बसतो हे पाहणाऱ्याला विचित्र दिसणारच !

आपल्या शंकेचें निरसन करण्यासाठीं रजनीनें विचारलें, " आपण समाधि लावून कां बसतां ? "

" कां, त्यांत एवढें विचारण्याजोगें काय आहे ? "

" जरा विचित्र वाटलें म्हणून विचारलें ! "

" विचित्र काय आहे त्यांत ? समाधीलावून बसणें म्हणजे बाह्य जगाला विसरून जाणें. सर्व विसरून जाऊन मन शांत ठेवणें. म्हणजेच मनावर विजय मिळविणें. मनांत कांहींएक न आणतां सर्वसाक्षी परमेश्वराचें चिंतन करणें ! "

" परमेश्वर आहे कां जगामध्यें ? "

" असेलही किंवा नसेलही. पण मला काय करायचें आहे त्याच्याशीं त्याचें चिंतन केल्यानें कांहीं तोटा तर होत नाहींना ? "

" [illegible] परमेश्वराविषयीं संशय आहे तर मग त्याचें चिंतन [illegible] संशयित आहे. परमेश्वर जर जगामध्यें असता तर गरीबाचे हाल झाले नसते ! "

" खरें आहे ! "

" हें माहीत असूनसुद्धां तुम्ही त्याची भक्ति करतां ? "

" होय. मी देव मानीत नाहीं. देवाबद्दल मला शंका आहे. मात्र हें जग निर्माण करणारी, कोणी तरी एक मोठी शक्ति आहे. ह्या शक्तीमुळें सर्व कारभार चालतात. ह्या शक्तीलाच मी देव मानतों ! "

" तुम्हांला काय वाटतें ! भक्ति केल्यानें, भजनें म्हटल्यानें आपले कार्य सिद्ध होईल ? असें असतें तर सर्वच देवाची भक्ति करायला लागले असते, पूजा करायला लागले असते ! "

" आपण स्वस्थ बसलों तर आपणाला कांहीं मिळणार नाहीं. कोणत्याही बाबतींत जोरानें प्रयत्न केला पाहिजे. नुसता प्रयत्न उपयोगी नाहीं. विश्वास पाहिजे. आपल्याला त्यांत यश मिळालेंच पाहिजे. हा आत्मविश्वास प्रबळ

करण्याचें कार्य देवाची पूजा, भक्ति करण्यानें होते. देवाच्या पूजेनें आपला आत्मविश्वास वाढतो, त्यामुळें आपलें कार्य सफळ होतें. ह्यासाठीं देवाची भक्ति ज़रूर आहे!"

बोलतां बोलतां आनंद आपल्या झोपडीपाशीं आला. त्यानें रजनीला विचारलें, "अजून तुम्ही तोंड वगैरे धुतलें नाहीं वाटतें?"

"नाहीं. उठल्या बरोबरच बागेंत आलें होतें!"

"मग तोंड वगैरे धुवून घ्या. शांता वाट पहात असेल तुमची!"

रजनीला वाटलें आपल्याला हा जाण्याचा निरोप आहे. तिच्या मनांत त्याच्याशीं अजून बोलायचें होतें. पण त्यानें तिला जवळ जवळ निरोप दिल्यामुळें तिच्या मनांत असून सुद्धां तिला रहाणें शक्य झालें नाहीं.

तोंड धुण्यासाठीं ती जाऊं लागली. जातांना मनांत म्हणाली, "बोलायला अजून पुष्कळ दिवस आहेत. जातात कुठें न बोलून!"

* * * *

संध्याकाळची वेळ होती. आश्रमाच्या बाहेर उघड्या हवेंत आनंद, जीवन, कमल, रजनी वगैरे गप्पा मारीत बसलीं होतीं. रजनीची आणि कमलची मैत्री चांगली जमली होती दोन स्त्रियांची मैत्रि व्हायला वेळ मुळींच लागत नाहीं. पहिल्या भेटींत त्यांचीं मैत्रि जुळते आणि एकाद्या फार वर्षांपूर्वींच्या मैत्रिणी-प्रमाणें त्या बोलूं लागतात. स्त्रियांचा स्वभावधर्मच आहे हा.

गप्पा गोष्टींत आनंद क्वचितच भाग घेत होता. त्यांचें बोलणें तो ऐकत होता. बोलणें रंगांत आलें होतें. इतक्यांत एक इसम तेथें आला—

त्याला आनंदनें विचारलें, "काय रे?"

"दादा, गोविंदची आईच्या लय् झालंय्!"

"सकाळीं तर चांगली होती ना?"

"होय. पण आतां पुन्हां जास्त झालंय्!"

"चल मी येतों!" आनंद म्हणाला.

"अरे तूं जाऊन काय करणार? तेथें डॉक्टर पाहिजे!"

"पण ह्यावेळीं डॉक्टर कुठून आणणार?"

" कां? इथं आहेत कीं डॉक्टरीण बाई? त्यांना घेऊन जा."

" काय उपयोग?"

जीवनच्या लक्षांत आलें, रजनी डॉक्टरीण होती. पण इथं फिरायला म्हणून आली होती. बरोबर तिनें कांहीं सामान आणलें नव्हतें. तरी पण जीवन म्हणाला, " निदान काय झालंयू तें पाहून कोणता उपाय करावा हें तर समजेल!"

" इतकं लांब यायला त्यांना त्रास कशाला!"

"त्रास कसला त्यांत?" रजनी एकदम म्हणाली.

"वाटेल त्यावेळीं, वाटेल तिकडे जायला डॉक्टरनें तयार असलें पाहिजे!" कमल म्हणाली.

" डॉक्टरची गोष्ट आहे ती. ह्या स्त्री माणूस आहेत?" आनंद म्हणाला.

" म्हणून काय झालं? डॉक्टरच काय धीट असतात आणि डॉक्टरीण धीट नसते? आपल्यापुढें येणाऱ्या प्रसंगाशीं तोंड द्यायची तयारी असल्याशिवाय काय ती डॉक्टरीण बनली आहे? डॉक्टरीण झालीतरी तिला आपल्या कर्तव्याची जाणीव असते. बायका आतां पूर्वीच्या राहिलेल्या नाहींत. पुरुषच त्यांची किंमत कमी करण्याचा, त्यांना भ्याड बनवण्याचा प्रयत्न करतात." कमल म्हणाली.

तिच्या पाठीवर थाप मारून जीवन म्हणाला, " वा! वा! काय बोललीस तूं आज! मला तर वाटलें... !"

" काय वाटलें?" कमलनें विचारलें.

" स्त्रियांची पुढारीण व्हायला तूं लायक आहेस!"

" पुरे पुरे!"

" मग राहिलें आपलें!" जीवन हंसत म्हणाला.

रजनीला त्यांचें हें वागणें पाहून हेवा वाटला. तिनें आनंदकडे पाहिलें. तो गंभीर चेहरा करून दुसरीकडे पहात होता. रजनी मनांत म्हणाली, "काय अरसिक माणूस आहे हा!"

आनंद जायला निघाला. जातांना रजनीकडे पाहून म्हणाला, " येता कां तुम्हीं?"

" तुम्हीं या म्हटलें तर येतें. पण तुम्हांला भीति वाटायची नाहीं ना?"

" कसली भीति ? " कमलनें विचारलें.

" स्त्रियांची ह्यांना फार भीति वाटते ! " रजनी म्हणाली.

" हो हो भीति वाटते. स्त्रियांना घाबरायला तो कांहीं भ्याड, नेभळट नाहीं. कॉलेजमध्यें त्यालाच मुली घाबरत असत. त्याच्या जवळ उभी रहायला कोणी धजत नसे ! " जीवन म्हणाला.

आनंद कांहीं बोलला नाहीं. त्याला तें बोलणें आवडलें नाहीं. तो जायला निघाला. त्याच्या मागोमाग रजनीही निघाली. आनंदला वाटलें, ती आली नसती तर बरें झालें असतें. मनाविरुद्ध तिला बरोबर नेणें त्याला भाग होतें.

गोविंदच्या घरीं जाऊन पहातों तों बरींच माणसें जमलीं होतीं. पुष्कळांची धांवपळ चालली होती. आनंदला आणि रजनीला पहातांच त्यांना थोडा धीर आला. त्यांनीं आंत जाऊन पाहिलें, गोविंदच्या आईला शेवटचा श्वास लागला होता. रजनीनें तिच्याजवळ बसून तिची नाडी पाहिली. निराशेनें तिनें हात सोडला. तिनें गोविंदच्या आईकडे पाहिलें, क्षणाक्षणाला तिचा चेहरा निस्तेज होत होता. आपण डॉक्टर असूनसुद्धां तिला आपणाला वाचवतां येत नाहीं हें पाहून रजनीला परम दुःख झालें. तिला वाटलें, आपण आपलें सामान बरोबर आणलें असतें तर बरें झालें असतें.

रजनीनें पहातां पहातां तिचा प्राण शरीर सोडून गेला. आनंदला फार वाईट वाटलें. त्याच्या मनांत आलें, आपलाच दोष आहे त्यांत. डॉक्टरची व्यवस्था करून लोकांना औषध मिळण्याची व्यवस्था करणें हें आपलें कर्तव्य आहे.

आश्रमाकडे परत फिरतांना दोघांचीं मनें दुःखी झालीं होतीं. आनंदला आपल्या कर्तव्याबद्दल वाईट वाटत होतें आणि रजनीला आपण डॉक्टरीण असूनसुद्धां रोग्याला वाचवतां आलें नाहीं म्हणून वाईट वाटत होतें. पण रोग्याला वांचवणें हें दोघांच्याही हातांत नव्हतें.

जात असतांना रजनी म्हणाली, " तुम्ही ह्या खेड्यांत सारें कांहीं केलें पण डॉक्टरची व्यवस्था कांहीं केली नाहीं ! "

" मला सुद्धां तसेंच वाटतें. मी प्रयत्न केला पण त्यांत मला यश आलें नाहीं. डॉक्टर होऊन खेड्यांत रहाणें हें डॉक्टराना लांछनास्पद वाटतें. डॉक्टरची परीक्षा पास झाल्याबरोबर कुठच्या तरी खेड्यांत दवाखाना उघडून गरिब जनतेला

सहाय्य करणें त्यांना आवडत नाहीं. शहरांत दवाखानें इतके आहेत कीं, त्या मानानें पेशंट फारच कमीं पडतात. कांहीं डॉक्टरची तर अशी स्थिती आहे कीं, त्यांना डॉक्टर झाल्याबद्दल पश्चाताप वाटूं लागतो. दवाखान्यांत औषधांऐवजीं रंगीत पाण्याच्या बाटल्या ठेवण्यापर्यंत पाळी येतें त्यांच्यावर. तरी पण त्यांना शहर सोडून खेड्यांत जाववत नाहीं. काय ही त्यांची मनोवृत्ती! डॉक्टर होऊन

ण्यास सुद्धां ते तयार असतात. डॉक्टरींच्या पवित्र ध्येयाला हा काळिमा आहे!"

"कोणताही डॉक्टर मुद्दाम होऊन लोकांचे खून पाडणार नाहीं!" रजनी म्हणाली.

"खून कांहीं स्वत: करायला नकोत. खेड्यांतली जनता औषधापायीं मरत असतां, पैशांसाठीं, जेथें दवाखान्याची जरुरी नाहीं अशा जागीं दवाखाना घालून, त्या गरिब जनतेला तसेंच मरत ठेवावें, हे त्यांनीं नकळत केलेले खुनच नाहींत कां?

"हा दोष त्यांचा नाहीं!"

"त्यांचाच आहे. मरणाऱ्याला जीवन देणें हा त्यांचा धर्म आहे. त्याकडे दुर्लक्ष करणें हा त्यांचा दोष नाहीं कां? डॉक्टर म्हणजे देवच! पण डॉक्टर ही पदवी मिळतांच त्यांना इतका कांहीं गर्व चढतो कीं, त्यांना वाटतें आपण कोणी तरी बडे. त्यांचें गरिबांकडे लक्ष वळत नाहीं. श्रीमंताकडेच त्यांचें लक्ष! कारण पैसा! ह्या पैशांसाठीं मग ते देवाचे दैत्य–सुध्दां बनतात.!"

"मग तुम्हीं डॉक्टर कां बनला नाहींत?"

"ह्या विचारण्यांत कांहीं अर्थ नाहीं!"

थोडा वेळ कोणी न बोलतां गुपचूप चालूं लागलीं. आनंद कांहींच बोलत नाहीं असें पाहून रजनीने विचारलें, "तुम्हीं, इथं कां एक डॉक्टर ठेवत नाहीं."

"डॉक्टर रहायला तयार नाहीं!"

"डॉक्टरला जर पगार मिळाला तर तो कां नाहीं रहाणार?"

"शहरांतल्या सारखे इकडे लोक वारंवार आजारी पडत नाहींत. दवाखाना उघडला तर दिवसाला दहाबारा रोगी सांपडतील. ह्यासाठीं डॉक्टरला पगार देऊन ठेवणें शक्य नाहीं. जें कांहीं मिळेल त्यावरच संतुष्ट होऊन रहाणारा येथें डॉक्टर पाहिजे!"

"असा डॉक्टर मिळेल काय ?"

"देवाची इच्छा असली तर मिळेल सुद्धां. मानवी जग सुधारत चाललें आहे. एकाद्या डॉक्टरला ह्या गरीब जनतेची कींव येईल आणि तो त्यांच्यासाठीं झटेलही."

रजनीच्यां डोक्यांत एक कल्पना आली. तिचे नेत्र विस्फरित झाले, तोंडावर एक प्रकारचें तेज प्रगट झालें —

* * * * *

फिरायला ह्मणून निघालीं सारीं. शांताला काम असल्यामुळें तिला येतां आलें नाहीं. आनंदाला गावांत एक चक्कर मारायची होती.

बोलत बोलत गावांत आलीं सारीं. आनंद एक दोन ठिकाणीं जाऊन आला आणि पुन्हां तीं गांवाबाहेर आलीं. जीवनला आणि कमलला फार फिरणें आवडत नव्हतें त्यामुळें तीं एका जागीं बसलीं.

रजनीला तें आवडलें नाहीं. ती ह्मणाली, "बसण्यापेक्षां फिरणेंच चांगलें !"

"मला नाहींबाई आतां चालवत पुरुषासारखें. पुरुष ते बसले मग मी तर स्त्रीच ना !" कमल म्हणाली.

"बरोबर बायको असल्यावर कोणाला फिरावेंसें वाटेल !" जीवन हंसत ह्मणाला.

"इश्श ! वाटेल तें बोलत सुटतां तुह्मी !" कमल जरा लाजूनच म्हणाली.

"ह्यांत वाटेल तें काय बुवा ! खरेंखुरें बोललों मी. विचार पाहिजे असल्यास आनंदाला. हो पण त्याला काय समजतं ह्मणा त्यांत. त्याचें हृदय आतां निर्जीव बनलें आहे !" जीवन आनंदाकडे पाहत-हंसत ह्मणाला.

"दुसऱ्याचें हृदय तुह्माला चांगलें समजतें वाटतें ?" कमल आनंदाकडे पहात ह्मणाली.

आनंदाच्या चेहऱ्यावर तिला कांहींच दिसलें नाहीं. जणुं काय त्याचें तिच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतें.

"दुसऱ्या कोणाचें हृदय समजत नसेल पण ह्याचं पूर्ण समजतें. तो स्वतःच्या इच्छेविरुद्ध जाऊन स्वतःची फसवणूक करीत आहे ! खोटें असेल तर त्यानें सांगावें !"

आतां मात्र आनंद गोंधळांत पडला. त्याच्या मनांत आलें, आपल्या मनांतली चलबिचल तर त्याला समजली नसेल ना ? त्याला वाटलें, इथं

थांबण्यांत आतां अर्थ नाहीं. विषय भलताच निघाला आहे. तो म्हणाला, " तुम्ही बसा इथं. मी जरा शेजारच्या गांवीं जाऊन येतों ! "

" बस रे ! आतां कशाला जातोस. ? "

" मला जरा काम आहे. तोपर्यन्त तुम्ही बसा इथं बोलत. गांव कांहीं फार लांब नाहीं. वीस मिनिटांचा रस्ता आहे. ! "

" मग मी सुद्धां येतें. मला इथं बसून कंटाळा आला आहे आणि शिवाय कालच्या पेशंटला सुद्धां पहायचें आहे म्हणजे उद्यां जायला नको ! " रजनी म्हणाली.

रजनीनें आजुबाजूच्या गावांतील आजारी माणसांना तपासुन त्यांना शक्य तो मदत करायची ठरवलें होतें. त्याप्रमाणें तिचें काम सुरुही झालें होतें. पंधरा वीस दिवसांनीं गावांत येणाऱ्या डॉक्टरकडून तिनें जरूरीपुरतें आणि आवश्यक असें सामानं आणून घेतलें होतें. आणि त्या सामानावर तिनें आजारी लोकांना मदत करण्याचें काम सुरु केलें होतें. आनंदला तिचं काम समाधानकारक वाटलें होतें.

म्हणूनच त्यानें ती आपल्या बरोबर येते ह्याला हरकत घेतली नाहीं. ती जायला निघाली. जीवननें म्हटलें, " लवकर या बरें कां ! नाहींतर आम्हांला उगीच इथं बसवून ठेऊं नका ? "

" शक्य तों लवकर येऊं. तुम्हांला कंटाळा आला तर तुम्ही पुढें चला. " आनंद म्हणाला.

रजनीनें कमलकडे पाहून हास्य केलें, तिला सांगायचें होतें, ' आतां तुला बरं वाटेल नाहीं ! तुला एकांत मिळावा म्हणूनच मी मुद्दाम जातें. आतां बोल वाटेल तेवढं ! ' पण ती बोलली नाहीं. तिच्या हास्यांतच तें प्रगट झालें.

कमलला तिच्या हांसण्याचा भांवार्थ समजल्यामुळें ती जरा लाजली.

आनंद आणि रजनी गांवाकडे चालूं लागलीं, जातांना आनंदनें विचारलें,

" तुम्ही का येतां एवढे लांब ? "

" मुद्दाम आलं आहे मी. " रजनी म्हणाली.

" कां ? "

" जीवन आणि कमल ह्यांच्या आनंदांत मी विघ्न कां आणूं ? "

" विघ्न कसलं त्यांत ? उलट तुम्हीं बोलायला असल्यामुळें त्यांचा वेळ गला असतां मजेंत ! "

" तुम्हांला कसं समजणार तें. मिया बिबीच्या बोलण्यात दुसऱ्यांनीं कधीं पडूं नये. वरून जरी त्यांनीं कांहीं दाखवलें नाहीं तरीं मनांतल्या मनांत शिव्याच देतील. प्रेमळ जोडप्यांच्या भावना कशा समजणार तुम्हाला ? " रजनी म्हणाली.

आनंद कांहीं बोलला नाहीं. पुढें बोलून तो विषय वाढवावा असें त्याला वाटेना. तो गुपचुप चालूं लागला. रजनीही त्याच्या जवळून चालूं लागली.

ती गांवांत पोंचली तेव्हां सूर्य अस्तास जाण्याची वेळ झाली होती. काळोखी रात्र असल्यामुळें लवकर काम उरकून परत जायला पाहिजे होतें त्यांना.

आनंद प्रथम आपल्या कामासाठीं गेला आणि नंतर तो रजनीबरोबर एका आजारी माणसाच्या घरीं गेला. रजनीनें आजारी माणसाला पाहिलें आणि ती बाहेर आली.

आनंद म्हणाला " जाऊं या ना "

" हो. माझं काम झालं ! " रजनी म्हणाली.

ती जायला निघाली इतक्यांत एक बाई येऊन म्हणाली, " दादा माझ्या घरीं चला. माझ्या सुनेला फार त्रास होतात ! "

" काय झालंय ?

" दिवस पूर्ण झाले ना ? नुसती तळमळतं आहे. त्रास पहावत नाहींत. सांगा ना रजनीताईंना ! "

" मी बरोबर कांहीं घेऊन आलें नाहीं सामान ! तरीपण चल. पाहतें मी ! " रजनी म्हणाली.

रजनी आणि आनंद त्या बाईबरोबर चालूं लागलीं. जातांना बाई म्हणाली, " मी आश्रमांत माणूस पाठवणार होतें इतक्यांत कोणी तरी सांगितलें दादा आणि डॉक्टरीणबाई गांवांत आल्या म्हणून. मला वाटलें देव पावला. मी धांवतच इथं आलें. कसेंही करून तिला वांचवा ! "

रजनी तिला धीर देत म्हणाली, " घाबरूं नका तुम्ही. कांहीं होणार नाहीं तुमच्या सुनेला ! "

रजनीनें बाळंतिणीच्या खोलींत प्रवेश केला. बिचारीला वेदना सहन करवत नव्हत्या. रजनीला तिची दया आली. तिला वाटलें खेड्यांतील प्रत्येक स्त्रिला असाच त्रास पोंचत असेल. एक स्त्रियांचें हॉस्पिटल असतें तर किती चांगलें झालें असतें. पुष्कळ त्रास कमी झाला असता.

शेवटीं बिचारी सुटली. मुलाचा, आवाज येतांच आईनें विचारलें, " काय झालंय् ? "

" मुलगा " रजनी म्हणाली.

मुलाच्या आईच्या तोंडावर आनंदाचें तेज पसरलें. प्रसूतीपूर्वींच्या साऱ्या वेदना ती विसरून गेली. रजनीनें मुलाला साफ केलें. सारे संस्कार झाल्यावर तिनें मुलाला आईजवळ दिलें. किती प्रेमानें तिनें मुलाला हृदयाशीं धरलें, प्रेमभरानें तिनें त्याचें चुंबन घेतलें. तिचा सारा आनंद त्यांत व्यक्त होत होता. रजनीला तें पाहून हेवा वाटला. आपणही माता झालों असतों तर हेंच सुख अनुभवलें असतें. तिनें मुलाला आपल्याकडे घेतलें आणि त्याला हृदयाशीं धरलें. ती मनांत म्हणाली, " अपत्यसुखापेक्षां स्त्रीच्या जीवनांत दुसरें सुख नाहीं. आपण कधीं होऊं माता ! "

बराच वेळ ती तेथें राहिली असती पण तिला आठवण झाली. आपल्याला परत जायचें आहे. मुलाला खालीं ठेऊन तीं बाहेर आली व आनंदला म्हणाली, " जाऊं या ना ? "

घरच्या मंडळींचा निरोप घेऊन ती निघाली. जातांना रजनी म्हणाली, " एका हॉस्पिटलची फार जरूरी आहे इथं किती हाल होतात स्त्रियांचे ! "

आनंद कांहीं बोलला नाहीं. बोलतां बोलतां तीं दोघें गांवाबाहेर आलीं. गांवाबाहेर येतांच त्यांना कळून आलें, काळोख आहे. गावांत रस्ता चांगला होता. पण गावांबाहेरचा रस्ता एवढा कांहीं चांगला नव्हता. गावांबाहेर वस्तीही नसल्यामुळें भयाण दिसत होतें. आनंदला काळोखांतून एकटें जाण्याची संवय होती. रजनीला हें सर्व नवीन त्यामुळें तिला भीति वाटली. आनंदबरोबर तिला चालतां येईना. अडखळल्यासारखें तिला वाटूं लागलें. मागून कोणी येतें असा भास होऊं लागला. त्यामुळें तिची स्थिति जरा केवीलवाणी झाली. मघाशीं ज्या स्त्रीबद्दल तिला सहानुभूति वाटत होती, तिच्याबद्दल तिला आतां राग

आला. पण राग काढणार कोणावर ? भीति वाटते असें सांगण्याची सुद्धां तिला लाज वाटूं लागली. पण तिचा नाइलाज झाला. ती हळूच म्हणाली, "आपण पुन्हां गांवांत जाऊं या !"

"कां !"

"कोणाकडून तरी कंदील घेऊं ?"

"काय जरूरी आहे त्याची. माझ्या मागोमाग या. कुठें ठेंच सुद्धां लागायची नाहीं !"

"मला अडखळल्यासारखें वाटतें. जरा वेळ लागला तरी हरकत नाहीं !"

"आतां परत गांवांत जायला वेळ तर लागणारच. शिवाय कंदील मिळेल किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं. त्यापेक्षां हळूहळू जाऊं म्हणजे झालें !"

पण रजनीची मनांतली भीति जाईना. शेवटीं संकोच सोडून ती म्हणाली, "खरोखरच भीति वाटते मला. आतां वाटूं लागलें मला उगीच आलें मी !"

"मी नको म्हणत होतों. पण इथं आल्यावर वाटूं लागलें तुम्हीं आलां हें चांगलें झालें. तुमचा फार उपयोग झाला. लोकांसाठीं झटणें हें कांहीं वाईट नाहीं !"

रजनी केविलवाण्या नजरेनें म्हणाली, "पण माझी स्थिति काय झाली ह्याची जाणीव आहे का तुम्हांला ? तुम्हांला संवयीमुळें चालतां येतें. मला कांहींच दिसत नाहीं ह्या काळोखांत. पुन्हां गांवांत जायचें तर तें सुद्धां कसं जाऊं ह्याची पंचाईत आहे !"

आनंदला विचार पडला आतां काय करायचें ? विचार करून तो म्हणाला, "तुमची हरकत नसेल तर......!"

"तर काय ?" रजनीनें विचारलें.

"तुम्ही माझा हात धरून चला." आनंद कसावसा म्हणाला.

रजनीनें विचार न करतां एकदम त्याचा हात पकडला आणि ती चालूं लागली. तिचा हात कांपत होता. तिच्या हस्तस्पर्शानें आनंदच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्याचे हात कापूं लागले पण रजनीचे हात सुद्धां कांपत असल्यामुळें तिला तें समजून आलें नाहीं.

दोघेंहीं सावधगिरीनें चालत होतीं. तरी पण रजनीला एक ठेच लागली. चांगली पडणारच होती. पण आनंदनें तिचा हात पकडून तिला ओढून एकदम

सावरून धरलें. ओढल्यामुळें ती एकदम त्याच्या बाहुपाशांत आली. क्षणभर आनंदाचें मन चलबिचल झालें. त्याला वाटलें, अशीच तिला हृदयाशीं धरावी पण त्यानें तो मोह दूर सारला. तिला नीट उभी करून तो म्हणाला, "सांभाळून पाय टांका म्हणजे ठेंच लागणार नाहीं!"

रजनीची स्थिती मात्र केविलवाणी झाली. लज्जेनें तिचा चेहरा आरक्त झाला. ठेंच लागल्यामुळें झालेलें दुःखही ती विसरून गेली.

त्याचा हात घट्ट धरून, त्याला बिलगून ती चालूं लागली. तिला वाटलें, आपण अंधारांतून प्रकाशाकडे जात आहोंत.

आनंदला वाटलें, आपण कुठें जात आहोंत? मार्ग सोडून आड वाटेनें तर जात नाहीं ना आपण?

एकंदर प्रकारानें त्याच्या मनाचा वराच गोंधळ माजला. सुंदर तरुणीचा एकांतात स्पर्श त्याला जाणवला. त्याच्या मनांत विचारांचे तुंबळ युद्ध चाललें होतें. दिवस असता तर त्याच्या मनांत काय चाललें आहे हें सर्वांना समजलें असतें. काळोख असल्यामुळें कांहीं दिसत नव्हतें—

दोघांच्याही मनांत तुंबळ युद्धें चाललीं होतीं. एकजण आपण आज भलतेंच कांहीं तरी करून बसलों, असें व्हायला नको होतें असें म्हणत होता. दुसरीला वाटत होतें झालें तें चांगलें झालें—

आश्रमाजवळ येतांच आनंदला सुटल्या सारखें वाटलें. तीं येतांच जीवननें विचारलें, "काय रे एवढा उशीर कां झाला?"

आनंदनें थोडक्यांत सारें सांगितलें, अर्थात आपण रजनीचा हात धरून चाललों, तिला ठेंच लागल्यामुळें आपण तिला सांवरायला म्हणून गेलों आणि ती आपल्या बहुपाशांत आली वगैरे प्रसंग गाळून टाकले. त्यानें जरी सांगितलें नाहीं तरीपण जीवनला वाटलें, हा कांहींतरी चोरून ठेवतो आहे आपल्या पासून.

जेवतांना आनंदनें वर मान करून रजनीकडे पाहिलें सुद्धां नाहीं. त्याला तिच्याकडे बघण्याचा धीर होईना. जेवण झाल्यावर तो सरळ झोपण्यासाठीं म्हणून आपल्या झोपडींत आला.

झोंपण्यासाठीं म्हणून तो पडला पण त्याच्या डोळ्यांसमोर तोच तोच प्रसंग उभा राहूं लागला--

*　　　*　　　*

आज जीवन आणि कमल जाणार होतीं. जीवनची रजा संपत आल्यामुळें नोकरीवर त्याला रुजू व्हायला पाहिजे होतें. पण जायला त्याचें मन घेत नव्हतें. येतांना आपण इथं किती दिवस राहूं ह्याबद्दल जरी त्याला शंकाच होती. तरी इथल्या एकंदर उत्साही व आनंदी वातावरणामुळें त्याचें मन भारून गेलें होतें. त्याला आपण सर्वांच्या सहवासास मुकणार म्हणून वाईट वाटत होतें.

त्यांची जाण्याची तयारी झाली होती. कमल, शांता व रजनी ह्यांच्याशीं बोलत होती. जीवन आनंदशीं बोलत होता.

आनंद म्हणाला, " तुम्ही चाललांत. मला खरं सुद्धां वाटत नाहीं. तुम्ही येण्यापूर्वीं माझें आयुष्य म्हणजे नुसतें यंत्राप्रमाणें चाललें होतें. तुमच्या येण्यानें त्यांत बदल झाला. माझा वेळ जरा आनंदांत जाऊं लागला. आतां पुन्हां पहिल्या पदावर येईल कीं काय अशी भीति वाटते ! "

" रजनी आहे ना मागें. तिच्या सहवासांत तुला खरोखर आनंद होईल ! "

" खरं सांगू तुला जीवन......! "

" काय ? "

" तिची मला सारखी भीति वाटते. एका बाजूनें तिच्याशीं बोलावेंसें वाटतें. पण मन धजत नाहीं. असं कां होतें तें मला समजत नाहीं ! "

" तुला तिच्याबद्दल सहानुभूति वाटते कां ? "

" हो ! "

" ती तुझ्या कर्तव्याआड येते असं वाटतें तुला ? "

" नाहीं ! "

" मग तिच्या जवळ जाण्यास, तिच्या जवळ बोलण्यास, तुला भीति कां वाटते ? "

" तेंच तर समजत नाहीं मला. ती मला कांहीं एक करत नाहीं. पण मला वाटतें माझें कांहीं तरी चुकतें, मनाची चलबिचल होते, मनावरचा ताबा नाहींसा

होतो. तिच्यामुळेंच असें कां होतें हें मला समजत नाहीं. माझ्या हातून कांहीं तरी होणार नाहीं ना असें वाटतें !"

"कांहीं म्हणजे काय ?"

"तें मला सांगतां येत नाहीं !"

"माझें ऐकशील कां तूं ?"

"काय ?"

"तुला ती आवडते. ती तुला हवी आहे. पण तूं तिच्या पासून दूर जाण्याचा प्रयत्न करतोस. म्हणूनच तुला हा त्रास होतो. निसर्गाविरुद्ध जाण्यांत काय फायदा आहे आनंद ?"

"मला समजलें नाहीं तुझें म्हणणें !"

"सरळ आहे. तूं लग्न कां करीत नाहींस ?"

आनंद एकदम गोंधळून म्हणाला, "छेः तें शक्य नाहीं !"

"कां शक्य नाहीं तें तरी सांगशील काय ?"

"लग्न केल्यावर माझ्या कडून व्हायला पाहिजे तसें कार्य होणार नाहीं. स्वतःच्या सुखाचीही पर्वा न करतां देश सेवेस वाहून घेणें हाच माझा धर्म आहे !"

"तुझी कार्याबद्दलची तळमळ, त्याग मोठा आहे. हा त्याग करतांना तूं स्वतःच्या सुखाचा विचार करीत नाहींस. त्यामुळें तुझें आयुष्य दिवसेंदिवस नीरस बनत चाललें आहे. आनंद ! पत्नी सुखासारखें दुसरें सुख नाहीं ह्या जगांत. तें सुख कर्तव्याआड येत नाहीं. आज हिंदुस्थानांत पहा, महात्मागांधी, जवाहरलाल नेहरु, सावरकर, इत्यादी मोठमोठ्या पुढाऱ्यांची सुद्धां लग्नें झालीं आहेत. पण तीं लग्नें त्यांच्या कर्तव्याच्या आड आलीं नाहीं ना ! आनंद, लग्न ही मनुष्याच्या आयुष्यांत आवश्यक अशी बाब आहे. कशाला उगीच निसर्गापासुन दूर दूर जाण्याचा प्रयत्न करतोस ? सामान्य माणसाला तें शक्य नाहीं. एकादा रामदास निसर्गावर विजयी झाला म्हणून एवढ्यावरच दुसऱ्यांनीं त्याप्रमाणें वागून आयुष्य दुःखांत घालवणें हें मूर्खपणाचें आहे. निसर्गाकडे जाण्यांतच, स्वतःचें, जनाचें हित आहे !"

आनंद कांहीं बोलला नाहीं. तो बोलत नाहीं असें पाहून जविननें विचारलें, "पटत नाहीं ना तुला हें ?"

आनंदनें मानेनेंच नाहीं म्हणून सांगितलें.

जीवननें एक सुस्कारा टाकला आणि म्हणाला, " आनंद तूं आपलें कर्तव्य बजावीत असतांना एक मुख्य कर्तव्य बाजूला सारण्याचा प्रयत्न करतो आहेस ! "

आनंदनें त्याच्याकडे कांहींशा आश्चर्यानें पाहिलें. त्या बघण्यांतच ' कसलें कर्तव्य ? ' असें विचारण्याचा भाव प्रगट होत होता.........

जीवन म्हणाला ! " उत्तम पिता होणें हें प्रत्येकाचें मुख्य कर्तव्य आहे ! आज ना उद्यां कधीं तरी पटेल तुला हें. आनंद माणसाला दोन भुका असतात. एक शारिरिक भूक आणि दुसरी मानसिक. पैकीं कोणतीही भूक शमली नाहीं तरी त्यांचें आयुष्य दुःखी होतें. ह्या भुकेसाठींच माणसाची सारी धडपड असते ! "

आनंद स्वस्थ राहून ऐकत होता जीवननें घड्याळाकडे पाहिलें. जायची वळ झाली होती. तो ह्मणाला. " आनंद वेळ झाली जायचीं. चल जाऊं बाहेर ! "

आनंद मुकाट्यानें बाहेर आला. कमल, शांता आणि रजनीही बाहेर आल्या. एकमेकांचा निरोप घेतल्यावर कमल बैलांच्या गाडींत बसली. रजनीही बसली. जीवन आणि आनंद चालूं लागले. शांता थोडावेळ पर्यंत आली आणि मागें वळली.

जीवन आणि आनंद मुकाट्यानें चालत होते. पुष्कळांना वाटतें मित्र शेवटचा निरोप घेतांना फार फार बोलतात, पण जे खरे मित्र आहेत, खरोखरच ज्यांचें एकमेकांवर प्रेम आहे त्यांना एकमेकांचा वियोग होत असतांना मुळींच बोलवत नाहीं. जीवन आणि आनंद ह्यांचें असेंच झालें.

गांवापासून गाडी बरीच दूर आल्यावर जीवन ह्मणाला, " आतां चला तुह्मी परत. फार लांब आलांत ! "

रजनी खालीं उतरली. जीवन गाडींत बसला.

आनंद ह्मणाला, " जीवन विसरूं नकोस हां ! येत जा असाच कधीं कधीं आणि वहिनी तुह्मीसुद्धां आमच्या गरिबांच्या आश्रमांत येऊन जे दिवस घालवले ते मी कधींच विसरणार नाहीं ! "

जीवन ह्मणाला, " आनंद, मी तुला एकच सांगतों, स्वतःची फसवणूक करून घेऊं नकोस ! "

गाडी चालूं लागली. आनंदानें जीवनचा हात धरून घट्ट दाबला. त्यात त्याच्या साऱ्या भावना प्रगट झाल्या होत्या—

गाडी दूर दूर जात होती. आनंद आणि रजनी एकत्र उभीं राहून पहात होतीं. आनंद एकचित्तानें गाडीकडे बघत होता. गाडी वळणावर वळून दिसेनाशी झाल्यावर तो फिरला आणि ह्मणाला, " चला जाऊंया ! "

दोघें चालूं लागलीं.

आनंदच्या मनांत नाना विचार येत होते. त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडले.

" विश्रांति स्थळ केव्हां यायचें कळेना

अजून चालतों वाट माळ कां सरेना "

रजनीनें त्याच्याकडे एकदम आश्चर्यानें पाहिलें. पण आनंदाच्या तें लक्षांत आलें नाहीं.

रजनी हळूच म्हणाली, " फार कांहीं दूर नाहीं. जवळच आहे ! "

आनंदनें चमकून तिच्याकडे पाहिलें. तिच्या चेहऱ्यावर कोणतातरी भाव त्याला स्पष्ट दिसत होता—

* * * *

प्रात:काळचा समय ! उषादेवीचें राज्य सुरू होतें. रजनी जागी झाली. झपझप उठून ती तोंड धुण्यास गेली. इथं आल्यापासून तो तिचा कार्यक्रमच होता. सकाळीं उठायचें तोंड धुवायचें, आंघोळ करायची आणि मग बागेंत जायचें. बागेंत येईपर्यन्त आनंदची समाधी धारणा संपत असे.

नेहमींप्रमाणें ती बागेंत आली. ती यायला आणि आनंदनें डोळे उघडायला एकच गांठ पडली. एकमेकांच्या नजरा एकमेकांना भिडल्या—आनंदनें किंचित् हंसून तिचें स्वागत केलें.

रजनीनें बागेंतली दोनचार फुलें तोडली. ती त्याच्याजवळ गेली. त्याच्या पायांवर तीं फुलें ठेवलीं आणि पायांना हात लावून तिनें त्याला नमस्कार केला.

आनंदनें गोंधळून आश्चर्यानें विचारलें " हें काय ?"

" कुठें काय ? पूजा करतें आहे मीं ?"

" पूजा देवाची करतात माणसाची नाहीं ! "

" माणूससुद्धां देव बनतो ! "

"तुमचा तर देवावर विश्वास नाहीं!"

"नाहीं! पण तुम्हींच सांगितलें नाहीं का, माणसानें कोणावर तरी भक्ति केली पाहिजे म्हणजे त्याचा आत्मविश्वास वाढतो, कोणतेंही काम करण्याचें धैर्य अंगांत येतें!"

"मी सांगितलें होतें खरें. पण मी देवाची भक्ति करायला सांगितलें होतें!"

"हो! तुम्ही माझे देव आहांत!"

"ह्या देवाची भक्ति करून कांहीं फायदा नाहीं. हा देव प्रसन्न व्हायचा नाहीं. कठोर आहे हा!"

"नाहीं! देव कठोर असत नाहीं. कठोर असला तरी तो भक्तीनें, पूजेनें संतुष्ट होतो. देवाला प्रसन्न करण्याचें सामर्थ्य अंगीं असलें म्हणजे झालें."

"तुमच्या अंगीं आहे कां तें?"

"सांगतां येत नाहीं. तें सामर्थ्य अंगीं असतें तर देव मला कधींच प्रसन्न झाला असता. तरी पण मी प्रयत्न करतें. आशा आहे कीं कधींना कधींतरी तो प्रसन्न होईलच होईल."

"चुकीचा समज आहे हा. जो देव एवढ्या दिवसांत प्रसन्न झाला नाहीं तो पुढें होईल हें शक्य नाहीं!"

"अशक्य असें जगामध्यें कांहीं नाहीं!" रजनी जोरानें म्हणाली. "देव सुद्धां स्वतःची करमणूक करून घेतो. त्याला प्रसन्न व्हावें किंवा नाहीं ह्याचा फार विचार करावा लागतो. भक्तावर प्रसन्न व्हावें असें त्याला वाटतें, पण तो तसें करत नाहीं. त्याला भक्ताचा अंत पाहायचा असतो. शेवटीं त्याला भक्तावर प्रसन्न व्हावेंच लागतें!"

आनंदाने तिच्या चेहऱ्याकडे पाहिलें. तिच्या चेहऱ्यावर अभिमानाचें तेज स्पष्ट दिसत होतें. त्यामुळें तिचा चेहरा अधिक खुलून दिसत होता—

आनंद उठला. उठतांना त्यानें फुलें हातात घेतलीं आणि तिच्यापुढें हात करून तो म्हणाला, "घ्या!"

"काय?"

"देवाचा प्रसाद!"

रजनीनें हात पुढें केला. आनंदनें हातांतलीं फुलें तिच्या हातावर ठेवलीं. ठेवतांना दोघांचे हात जुळले. आनंदनें आपला हात काढून घेतला आणि तो चालूं लागला.

रजनी त्याच्या मागोमाग चालूं लागली. तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा आनंद स्पष्ट दिसत होता.

आनंद झोपडीजवळ आला तोंच यतीन्, "दादा दादा" करात धांवत आला. त्याच्या हातांत वर्तमानपत्र होतें.

एवढ्या सकाळीं वर्तमानपत्र कुठून आलें ह्याचा त्याला प्रश्न पडला. पोष्टमन् साधारणत: दुपारच्या वेळीं येई त्यावेळींच वर्तमानपत्र मिळे त्याला. पण कोणी एकादा सकाळींच गावांत येणारा भेटला तर स्टेशनवरच पोस्टमास्तर वर्तमानपत्र त्यांच्याकडे देई.

आनंदनें हर्षानें वर्तमानपत्र हातांत घेतलें. आणि पहिल्याच पानावरचें बोल्ड टाईप मधलें 'शिर्षक वाचण्यास त्यानें सुरुवात केली. त्याला फार आश्चर्य वाटलें. त्याने पुन्हां एकदां तें वाचलें—

**"महात्माजींचा स्वातंत्र्य यज्ञ !"**

"एकंदर परिस्थितीचा विचार करून गांधीजींनीं आणि कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांनीं असहकारितेचा ठराव पास केला. लवकर भरणाऱ्या ऑलइंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत ह्या ठरावाला मान्यता देण्यांत येईल असें वाटतें !"

दररोज वर्तमानपत्रांत अशा गोष्टी येत होत्या. आजची बातमी निराळी होती. आठ दिवस बसून वर्किंग कमिटीनें आपला निर्णय ठरवला होता.

आनंदनें पुन्हां वाचावयास सुरवात केली—

"महात्माजींनीं आज एक पत्रक प्रसिद्ध केलें." त्यांत ते म्हणतात—

"हल्लींची परिस्थिति फार वाईट बनली आहे. आपल्याला मान, स्वातंत्र्य राखून जगतां येणें शक्य नाहीं. भयंकर दडपशाही सर्वत्र पसरली आहे. अशा वेळीं कॉंग्रेसला स्वस्थ बसतां येत नाहीं. स्वस्थ बसून अन्याय सहन करणें हें कॉंग्रेसच्या ध्येयास लांच्छन आणणारें आहे. अन्यायांचा प्रतिकार करणें हा कॉंग्रेसचा धर्म आहे. म्हणून आठ दिवस विचार करून अन्यायाचा

प्रतिकार करण्यासाठीं स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं लढा सुरू करायचा असा निर्णय घेण्यांत आला आहे. आतां लवकरच अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची बैठक होणार आहे. त्यांत ह्या ठरावाला मान्यता देण्यांत येईल. आणि स्वातंत्र्याचा लढा सुरू होईल. प्रत्येकानें तयार असलें पाहिजे. ह्या लढ्याचें वैशिष्ट्य म्हणजे तो पूर्ण अहिंसात्मक आहे. प्रत्येकानें अहिंसा तत्वानेंच वागलें पाहिजे.

माझ्या आयुष्यांत मीं अनेक चळवळी केल्या. पण ह्या चळवळीला माझ्या आयुष्यांत फार मोठें महत्व आहे. ह्यापुढें हिंदुस्थान गुलाम म्हणून रहाणार नाहीं असें म्हणून प्रत्येकानें तयार झालें पाहिजे. ह्या लढ्यांत मला मरण आलें तरी पत्करेल. माझ्या मरणानें जर स्वातंत्र्य मिळेल तर मी तें आनंदानें पत्करेन. तरुणानों उठा, तयारीस लागा. कॉंग्रेसच्या मागोमाग या. स्वातंत्र्य मिळवा "!

आनंदनें पत्र दूर केलें. रजनी वाचूं लागली. आनंदाच्या मनांत तें स्वातंत्र्याचें स्वप्न उभें राहिलें—

*　　　*　　　*　　　*

आनंद विचार करीत बसला होता. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची बैठक कालच संपली होती. अजून वर्तमानपत्र वाचावयास न मिळाल्यामुळें शेवटचा निर्णय काय ठरला हें त्याला समजलें नव्हतें. तरी पण वर्किंग कमिटीनें पास केलेल्या ठरावाला मान्यता मिळणार हें नक्कीच होतें. महात्मा गांधीनीं ठराव मांडला होता. जवाहरलालनीं त्या ठरावावर उत्साहपूर्ण, आवेशयुक्त भाषण केलें होतें. त्यामुळें तो ठराव पास होणार होता. पण तो पास झाला हें ऐकण्यासाठीं आनंदचा जीव धडपडत होता.

मुंबईत भरलेली बैठक सर्व बाजूंनीं महत्त्वाची होती. अजून पर्यंत भरलेल्या बैठकींत ती महत्त्वाची होती. सर्व हिंदुस्थानमधून प्रतिनिधी आले होते. आठ दिवस अगोदरच सर्व तिकिटें संपली होती. पांचशे रुपयांची सुद्धां तिकिटें शिल्लक नव्हती. सर्व बाजूंनीं उत्साहपूर्ण बैठक असल्यामुळें त्या बैठकीस हजर रहाण्यासाठीं त्याचा जीव धडपडत होता. पण आपलें काम सोडून त्याला जातां येत नव्हतें. निदान पांच सात दिवस तरी मोडले असते. त्याच्या गैरहजेरींत पुष्कळ कामें अडून राहिलीं असतीं असें नाहीं. कारण पुष्कळशीं कामें त्याच्या शिरावरून कमी झालीं होतीं. दिवसेंदिवस रजनी आपलें कार्यक्षेत्र वाढवत होती. त्याची पुष्कळशीं

कामें ती स्वत: करी. त्यामुळें रजनी त्याच्या प्रमुख सहकाऱ्यांपैकीं एक बनली होती. कांहीं महत्त्वाचें काम असल्यास तिचा सल्ला घेतल्याशिवाय तो क्वचितच राही. रजनी म्हणजे पूर्वी त्याला भीति वाटे. तिच्याबरोबर फिरण्यास, बोलण्यास, तिच्याकडे पाहण्यास त्याला भीति वाटे. पण रजनीनें आपल्या अंगच्या गुणानीं त्याचा तो गैरसमज दूर केला होता. स्त्रियासुद्धां पुरुषांप्रमाणें त्याग करूं शकतात हें तिनें त्याला दाखवून दिलें होतें. ती त्याला अगदीं जवळची वाटूं लागली होती. त्याचा तिच्यावर पूर्ण विश्वास होता. सर्व कामें ती व्यवस्थित रीतीनें पार पाडील ह्याची त्याला पूर्ण खात्री होती. तरी पण बैठकीस तो गेला नव्हता—

बैठकीस न जाण्याचें कारण, त्याला वाटत होतें, आपण गेलों नाहीं म्हणून काय थोडाच बदल होणार आहे. काय होणार तें आपणांस समजल्याशिवाय रहाणार नाहीं. मग जाऊन तरी काय करणार ? इकडचें काम एकाच्याच शिरावर पडणार. आपण कॉंग्रेसचे सेवक आहोंत. कॉंग्रेसच्या आज्ञेप्रमाणें वागणें हें आपलें कर्तव्य आहे. कॉंग्रेसचा हुकूम येईल त्याप्रमाणें आपण वागूं.

असा विचार करून तो गेला नव्हता— पण आज त्याच्या मनांत निराळेच विचार येत होते. त्याच्या डोळ्यांपुढें, 'पुढें काय होणार' ह्याचें चित्र उभें रहात होतें—महात्मागांधी स्वातंत्र्याचा झेंडा घेऊन स्वातंत्र्यगिरी चढत आहेत; त्यांच्या मागोमाग सर्व वयाचे, सर्व धर्मांचे, सर्व जातींचे लोक स्वातंत्र्याचें निशाण घेऊन चालले आहेत. प्रत्येकाच्या तोंडावर वीरश्रीचें तेज स्पष्ट दिसत आहे. स्वातंत्र्य-गिरीच्या शिखरावर जायला प्रत्येकजण उत्सुक झाला आहे. महात्माजींच्या चेहऱ्यावर स्मित झळकतें आहे. त्या स्मितांत सारें कांहीं सांठलें आहे. स्वातंत्र्य-गिरीवर पोंचायला थोडा मार्ग राहिला आहे. इतक्यांत वरून एकाएकीं सैनिक येतात आणि धडाधड गोळीबार चालू करतात. एक गोळी महात्माजींना लागते. ते जमिनीवर पडतात—

इतक्यांत "तार आली, तार आली" असें म्हणून यतीन् धांवत आला आणि त्याच्या मागोमाग तार घेऊन रजनी आली. आनंदचें मन त्या चित्रानें अगोदरच गोंधळून गेलें होतें. मनाला कंप सुटला होता. तशांत तार आल्यानें तो जास्त गोंधळून गेला. धडधडत्या अन्त:करणानें त्यानें रजनीच्या हातांतून तार घेतली आणि तो वाचूं लागला—

" Mahatmaji and Members of Working Committee Arrested

Jivan."

आनंद दु:खानें एकदम खालीं बसला, त्याला तें चित्र आठवलें—

तो मटकन् खालीं बसल्यामुळें रजनीनें भीतीनें विचारलें, "काय झालें?"

" महात्माजींना पकडलें! फार वाईट झालें!"

" महात्माजींना कोणी पकडलें दादा?" यतीन्नें विचारलें.

" सरकारनें!"

" कां?"

" आपल्या विरुद्ध लढणार म्हणून!"

" लढणार म्हणून पकडतात काय दादा? लढल्याशिवाय पकडत नाहींत ना? सरकार घाबरतें गांधींनां!" यतीन् म्हणाला. आणि, "गांधींना पकडलें! गांधींना पकडलें!! गांधींना पकडलें!!!" असें ओरडत पळाला.

तो गेल्यावर रजनीनें विचारलें, "आतां काय होणार?"

" दर खेपेप्रमाणें?" आनंद शांतपणें म्हणाला.

" काय?"

" तुरुंग, गोळीबार, लाठीहल्ला, दडपशाही सारें कांहीं होईल."

" महात्माजींना पकडलें. त्यांच्या वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांना पकडलें. आतां प्रान्तिक कमिटीच्या अध्यक्षांनासुद्धां पकडणार. मग कसं होईल. चळवळ एकदम बंद पडेल!" रजनी म्हणाली.

" नाहीं. वाटतें तसें नाहीं. लोक त्रासांतून सुटण्यासाठीं उत्सुक झाले आहेत. सर्वांना जरी पकडलें तरी नवीन नवीन पुढारी निर्माण होतील पण कॉंग्रेसची चळवळ बंद पडणार नाहीं. उलट जास्त जोरानें फैलावेल. महात्माजींना पकडलें ही सरकारनें घोडचूक केली आहे. आतां प्रजेला आवरणें सरकारला शक्य होणार नाहीं."

" कां नाहीं? गोळीबार करून त्यांना आवरतां येईल!"

" पण जे स्वातंत्र्यासाठीं मरायला तयार आहेत त्यांना गोळीबाराची कसली भिती? नि:शस्त्र लोकांवर गोळीबार न करण्याची माणुसकी सरकारजवळ असेल

कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. पण गोळीबाराचें भय भ्याड लोकांना वाटतें. वीरांना नाहीं !"

इतक्यांत आश्रमांतले लोक हळुहळू जमूं लागले. यतीन्नें महात्माजींना पकडल्याची बातमी फैलावली होती. त्यामुळें सारेजण जमले होते. एकानें विचारलें,

"काय झालं दादा ?"

"महात्माजींना पकडलें !"

हें ऐकतांच प्रत्येकाच्या चेहऱ्यावर, क्रोध, तिरस्कार, आवेश आणि वीरश्री चढली. त्यांच्याकडे पाहून आनंद म्हणाला, "शांत व्हा. आज सर्व कामें बंद ठेऊन निषेध व्यक्त करा. आज संध्याकाळीं सभा भरवायची आहे. आतांच्या आतां सर्व खेड्यांत बातमी पोंचवा, सर्वांना गोळा करा."

आश्रमांतले सारे व्यवहार बंद पडले. कोणाचें कशाकडे लक्ष जाईना. कोणाला जेवण धड जाईना. सगळ्यांपुढें महात्मागांधींचें चित्र होतें—त्यांना पकडलें हें लोकांना सहन झालें नाहीं. त्यांच्या मनाला भयंकर धक्का बसला होता—

हळुहळु ती बातमी खेड्यांत पसरली. संध्याकाळीं मोठी सभा होणार, आनंद त्यांत बोलणार, ही बातमी पसरूं लागली. दुपार होण्याच्या आंत आजुबाजूच्या शेंदोनशें खेड्यांत ही बातमी वणव्या प्रमाणें पसरली आणि लोक जमूं लागले.

हळुहळु लोक आश्रमाजवळ जमूं लागले. शेतांत जागा फार होती. सभेला तेंच ठिकाण योग्य होतें. लोक भराभर येत होते. त्यांत वृद्ध होते. तरुण होते, स्त्रिया होत्या, लहान लहान मुलें होतीं. संध्याकाळ होण्याच्या आंतच सात आठ हजार माणसें जमलीं. हृदय उचंबळून येणारें ते दृश्य होतें.

सभेला सुरवात झाली. लाऊड स्पीकर नव्हता. तरी सात आठ हजार माणसांना सारें भाषण ऐकूं येत होतें. सारे तटस्थ बसले होते. जरा सुद्धां हालचाल होत नव्हती. आनंद बोलत होता—

"...सरकारला वाटत असेल एकाएकीं सर्व पुढाऱ्यांना पकडल्यामुळें आपण वेळींच चळवळ हाणून पाडली. पण ती सरकारची चुकीची समजूत आहे. महात्मागांधी

सारख्या जगद्वंद्य पुढाऱ्याला पकडलेलें पाहून जनता स्वस्थ बसणार नाहीं. सरकारनें हा स्वतःच होऊन स्वतः पायावर धोंडा ओढून घेतला आहे. जनता चिडली आहे. भावनेच्या भरांत पुष्कळ गोष्टी घडतील. ह्या सर्वांचा दोष सरकार-वरच राहील. बंधूनो ! तुमच्या कसोटीची वेळ आली आहे. भावनेच्या भरांत कांहीं विपरित होऊं देतां कामा नये. विचार करून वागलें पाहिजे. आपण आपला धर्म सोडतां कामा नये. अहिंसा हा आपला धर्म आहे. त्या तत्त्वावरच ह्या चळ-वळींची उभारणी केली आहे. म्हणून त्या तत्त्वास काळिमा न लागेल ह्याची प्रत्ये-कानें खबरदारी घेतली पाहिजे. तुमचें तें कर्तव्य आहे..."

सारेजण तटस्थ बसून ऐकत होते. त्याचें भाषण ऐकण्यांत सारे दंग होऊन गेले होते. आनंद बोलत होता.

"...तुमची आई तुह्मांला टाहो फोडून बोलावत आहे. आईला गुलामगिरीं-तून सोडविण्याची ही उत्तम संधी आहे. उठा ! गुलामगिरींत खिचपत पडलेल्या आईला मुक्त करा. तुम्हां प्रत्येकाचें तें कर्तव्य आहे. त्यांत मरण आलें तरी बेहत्तर पुढें सरा. उठा. स्वातंत्र्यासाठीं मरण्यास सिद्ध व्हा ! एक वेळ मरण पत्करा पण मागें वळूं नका. पूर्ण विचारानें पुढें सरा. पण पुढें टाकलेलें पाऊल प्राणांतीही मागें घेऊं नका. पाठ दाखवणें हें भ्याडपणाचें आहे. तुम्ही भ्याड नाहीत. शिवाजी महाराज, राणा प्रतापसिंह, संभाजी ह्यांचे तुम्ही वंशज आहांत. स्वातंत्र्यासाठीं ते लढले. त्यांतच त्यांचे प्राण गेले. तुम्ही सुद्धां त्यांच्याप्रमाणेंच वागायला हवें. बोला. भ्याड बनून घरांत बसणार, का वीर बनून रणांगणांत उतरणार ?"

" आम्ही भ्याड नाहीं. तुम्ही सांगाल त्याप्रमाणें आम्ही वागूं ?"

" तुमची एवढी तयारी असेल तर उठा, स्वातंत्र्य मिळवण्याच्या तयारीस लागा. कॉंग्रेसच्या म्हणण्याप्रमाणें वागा. त्यांतच तुमचें हित, सुख सारें कांहीं आहे. आज तुम्ही सारेजण इथं आलांत ह्यावरून तुमची कळकळ, स्वातंत्र्या-साठीं तळमळणारें मन, महात्माजीं बद्दलचा आदर व्यक्त होत आहे. महा-त्माजींच्या म्हणण्या प्रमाणें वागा. त्यांनीं तुमच्यासाठीं जो हा लढा सुरू केला आहे तो आतां सर्वस्वीं तुमच्यावर अवलंबून आहे. जय मिळवणें हें तुमच्या हातांत आहे. तुम्ही मनावर घेतलें तर सर्व कांहीं ठीक होईल. घाबरूं नका. दडप-

शाहीला डरूं नका ! सरकारशीं असलेला संबंध आजपासून सुटला. आजपासून आपण स्वतंत्र आहोंत असें समजून वागा. बोला—आम्हीं मरूं पण करून मरूं !"

आनंदानें आपलें भाषण संपवलें. भाषण संपतांच एकच आवाज झाला—"महात्मागांधीकी जय ! वंदे मातरम् ! !"

ह्या आवाजानें सारें वातावरण दुमदुमून गेलें. अंगावर रोमांच उभे राहिले. रजनी बोलण्यासाठीं उभी राहिली. एवढ्यामोठ्या जनसमूहासमोर बोलण्याची तिची पहिलीच खेप होती. तरी पण न घाबरतां ती आवेशानें बोलत होती—

"......आजच्या स्त्रियासुद्धां ह्या चळवळीपासून दूर राहूं शकत नाहींत. पुरुषाप्रमाणें आम्हांलासुद्धां बरोबरीचे हक्क पाहिजेत, असें म्हणतांना पुरुषांबरोबर खांद्यालाखांदा लावून काम केलें तरच त्या म्हणण्यांत अर्थ आहे. ह्या चळवळींत स्त्रियांनींसुद्धां त्याग केला पाहिजे. देशाच्या स्वातंत्र्याचा हा जो वणवा पेटवण्यांत आला आहे तो दिवसेंदिवस भडकवणें स्त्रियांच्याच हातांत आहे. स्त्रियांनीं मनावर घेतलें तर पुरुष घरांत स्वस्थ बसुन रहाणार नाहींत. त्यांना स्वतःचीच लाज वाटेल. स्त्रियांनींसुद्धां ह्यांत भाग घेऊन देशाच्या स्वातंत्र्याचा आपला हिस्सा पटकावला पाहिजे. घरांत चुलीकडे बसण्याचे हे दिवस नाहींत. ते दिवस गेले. ह्यावेळीं जर केवळ चूल घेऊन बसलांत तर कायम तशाच बसाल. आपला हक्क शाबीत करायचा तर उठा. तयारीस लागा. शपथ घ्या. जिंकूं किंवा मरूं !"

टाळ्यांच्या गजरांत तिनें आपलें भाषण संपवलें. सर्वांनीं तिच्या भाषणाचें स्वागत केलें. तिला सुद्धां आपण एवढें बोलूं कसें शकलों ह्याचें आश्चर्य वाटलें.

सारे लोक हळुहळु आपल्या घरीं जायला निघाले, रजनी आणि आनंद आश्रमांत आलीं. रजनीला वाटलें होतें, आपल्या भाषणाबद्दल तो कांहींतरी बोलेल. आपलें कौतुक करील. आपल्याला शाबासकी देईल. पण तो जेव्हां त्याबद्दल कांहीं बोलला नाहीं तेव्हां तिला फार वाईट वाटलें. अजूनपर्यंत ज्या-आशेनें ती राहिली होती, ती आशा सफल होईल असें तिला वाटेना. त्या आशेला हा एक धक्काच बसला. जो आपलें साधें कौतुकसुद्धां करत नाहीं, आपल्या कामगिरी बद्दल जरासुद्धां बोलत नाहीं, त्याच्याकडून जास्त अपेक्षा ती कसली करणार?

तिला वाटलें, ह्यापुढें इथं रहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण स्वत:ची फसवणूक करून घेत आहोंत. अशक्य गोष्टीच्या मागें लागून कांहीं फायदा होत नाहीं. तिनें मनाशीं एक बेत मुक्रर केला—

* * * *

पहाटेचीवेळ होती. आनंदला सुखस्वप्नें पडत होतीं. स्वातंत्र्य देवता बोलावते असें त्याला दिसत होतें. स्वातंत्र्य देवता उभी आहे. तिच्या हातांत स्वातंत्र्याचे निशाण आहे. तिचें तेज प्रखर असल्यामुळें तिच्या जवळ जाण्यांत कोणी धजत नाहीं. सर्वांचे डोळे दिपून जातात. पुष्कळजण धडपड करतात. पण कोणी तें तिच्या जवळ जाऊन आणूं शकत नाहीं. जे प्रयत्न करून जातात ते अर्ध्यावरच नाहींसे होतात. त्यामुळें पुन्हां कोणी पुढें सरसावत नाहीं. इतक्यांत तिचें लक्ष आनंदकडे जातें. ती त्याला बोलावते. जावें कीं नाहीं हा त्याला प्रश्न पडतो. तो येत नाहीं असें पाहून, ती रागानें म्हणते,

“ तूं फुकट जन्माला आलास ! इतर माणसासारखें मरण्यांत तुला धन्यता वाटते ? मला वाटलें होतें तूं शूर आहेस. पण तूं भ्याड आहेस, तूं जगण्यास लायक नाहींस. ये. माझ्या जवळ ये. घाबरूं नकोस ! ”

तो मनाचा निश्चयकरून जातो. जरा पुढें जातो तोंच तो एका खोल खोल दरींत पडतो. पडतांना तो एक किंकाळी फोडतो. त्या किंकाळीसरशीं देवी म्हणते,

“ घाबरूं नकोस, धीर सोडूं नकोस ! सुटून येण्याचा प्रयत्न कर ! स्वातंत्र्याचा हा झेंडा सहजासहजी मिळत नाहीं. फार त्रास घेतला पाहिजे. अनेक दु:खांतून जो पुढें येईल त्यालाच हा झेंडा मिळेल !”

“ आतां मी काय करूं मला कांहीं दिसत नाहीं ! मी अडकून पडलो आहे !”

“ सुटण्याचा प्रयत्न कर ! पुष्कळ वेळां तुला असें अडून रहावें लागेल. पण एकदां सुटल्यावर पुन्हां अडून पडेंन म्हणून घाबरून जाऊं नकोस, निराश होऊं नकोस. धडपड कर. तूं माझ्याकडे येऊन पोहोंचशील. मी तुझी वाट पहात आहे. लवकर ये. ये हा स्वातंत्र्याचा झेंडा घेऊन जा ! ”

“ येतों, हा पहा आलोंच ! ” असें म्हणून तो उठतो—

इतक्यात एकदम आनंद जागा झाला. ह्या स्वप्नानें त्याच्या मनांत गोंधळ उडाला. त्याला एक प्रकारचा आनंद झाला. त्याला एक प्रकारचा उत्साह वाटूं लागला. त्याला झोंप येईना. शिवाय त्याचा उठण्याचा वेळही झाला होता.

आज तो जरा लवकर उठला. त्याचें मन आनंदी झालें होतें. आनंद कां झाला असें कोणी विचारलें असतें तर त्याचें उत्तर त्याला देतां आलें नसतें. तो आपल्या नित्य कर्मास लागला.

आंघोळ केली. ध्यानस्थ बसण्यासाठीं तो बाहेर आला इतक्यांत एका मोटारीचा आवाज आला. इथं मोटार कशी असा त्याला प्रश्न पडला. मोटारचा आवाज त्यानें आजच ऐकला होता. तो उत्सुकतेनें पाहूं लागला. मोटार थांबली आणि एक पोलीस अधिकारी आणि चार पोलीस त्याच्या जवळ आले. आनंद समजला. तो मनांत म्हणाला, " स्वातंत्र्य देवीचें आमंत्रण आलें ! "

त्यांना पाहून तो म्हणाला, " या या ! आज सकाळींच इथं कुठं ? "

त्याचें हें सौजन्य पाहून त्या अधिकाऱ्याला जरा लाज वाटली. त्यानें त्याच्या हातांत वॉरंट दिलें.

तें वाचून आनंद म्हणाला, " एवढ्यांत आमंत्रण येईल असें मला वाटलें नव्हतें. पण सरकार कसें चुकेल पाहुण्यांना आमंत्रण द्यायला ? ह्याबद्दल तरी सरकार फार नियमित आहे. माझी तयारी आहे. पण थोडा वेळ मिळेल कां ? "

" हो हो जरूर. तुम्ही सावकाश सारें आटपून घ्या. आम्ही बसतों तोंवर!" अधिकारी म्हणाला.

" आभारी आहे मी आपला ! "

" आभार कसले त्यांत ? तुम्हांला काय वाटतें आम्ही तुम्हांला खुषीनें पकडायला आलों म्हणून ? आम्हांला सुद्धां फार वाईट वाटतें. आम्हांला सुद्धां आमचा देश स्वतंत्र व्हावा असें वाटतें. पण आम्ही अडकून पडलों आहोंत. हुकूम म्हणजे तो पाळलाच पाहिजे. मर्जिविरुद्ध वागलेंच पाहिजे. " अधिकारी खिन्नपणानें म्हणाला.

इतक्यांत मोटरीचा आवाज ऐकून सारे भराभर जमूं लागले. सर्वांना समजलें—त्यांच्याकडे पाहून आनंद म्हणाला, " मित्र हो. मला आमंत्रण आलें

आहे. मला त्याबद्दल आनंद वाटतो. मी माझें कर्तव्य बजावण्यास जात आहे. तुम्ही आपलें कर्तव्य बजावा. मात्र लक्षांत ठेवा, आश्रमाला कलंक लावणारी कोणतीही गोष्ट घडली तर मला आमरण दुःख होईल ! ”

बोलतां बोलतां तो गंभीर बनला. त्यानें आजूबाजूला पाहिलें. रजनी कुठेंच दिसत नव्हती. त्यानें मनाशीं विचार केला आणि तो रजनीकडे जाण्यासाठीं निघाला–

आनंद रजनीच्या झोपडींत आला. रजनी कपडे ट्रंकेंत भरत होती. तिचा चेहरा कांहींसा गंभीर, दुःखी, निराशयुक्त बनला होता. आनंदला पाहून ती कांहीं बोलली नाहीं. आनंदला तिचें आश्चर्य वाटलें. तो तिच्यामागें जाऊन उभा राहिला आणि म्हणाला, “ मी निरोप घ्यायला आलों आहे ! ”

“ कुठें जायला निघालां आहांत ? ” रजनीनें कपडे भरत असतांना विचारलें.

“ तुरुंगांतून आमंत्रण आलें आहे मला. बाहेर पोलीस उभे आहेत ! ”

“ मी सुद्धां तुमचा निरोप घेतें. मला सुद्धां जायचें आहे ! ”

आनंदनें आश्चर्यानें विचारलें, “ कुठें ? ”

“ माझ्या स्वतःच्या घरीं ? ”

“ कां ? ”

“ इथं माझं कोण आहे म्हणून मी राहूं ? ”

आनंद चमकला. थोड्याशा गंभीर आवाजानें तो म्हणाला,

“ हें जे कांहीं आहे तें सर्वांचें आहे. सर्वांना आपलें म्हणून वागलें पाहिजे ! ”

“ आज पर्यंत वागलें तसें. ह्यापुढें वागणें शक्य नाहीं ! ”

“ कां नाहीं ? ”

“ सगळ्याच प्रश्नांचीं उत्तरें देतां येतात असें नाहीं ! ”

“ तरी पण तुम्हांला राहिलेंच पाहिजे ! ”

रजनी रागानें म्हणाली, “ माझ्यावर काय हक्क आहे ? तुमची मी कोण आहे म्हणून तुम्ही मला रहायला सांगता ? ”

आनंद चमकला. त्याला कांहींच समजेना. तो म्हणाला, “ हक्क कोणा-वरच नाहीं माझा ! ”

BHANDLORD ROAD BOMBAY

" मग रहा म्हणून कां सांगता ? "

" लोकांच्या हितासाठीं. मी आतां तुरुंगांत जाणार. माझ्या मागें लोक चवताळतील. भावनेच्या भरांत वाटेल तें करतील. आज पर्यन्त आश्रमानें जें नांव कमावलें होतें, त्याला कलंक लागेल. त्यांना आवरणें तुम्हांलाच शक्य आहे. तुमच्या सांगण्या बाहेर ते जायचें नाहींत. त्यांना वाट दाखवणारे कोणी तरी पाहिजे ! "

" कोणी तरी पाहिजे असल्यास आश्रमांत पुष्कळजण आहेत कीं ? "

" आहेत. पण माझा तुमच्यावर फार विश्वास आहे. "

" आभारी आहे मी ह्याबद्दल. पण मी राहूं शकत नाहीं. "

" परंतु तुम्ही एकाएकीं जाण्याचें कारण काय ? "

" एकाएकीं नाहीं. मी कधींच जायला पाहिजे होतें. पण आशेनें राहिलें ! "

" आशा ? कसली आशा ? "

" जी आशा सफळ झाली नाहीं. तिचा उच्चार तरी कशाला ? मला वाटतें मी इथं राहिलें किंवा इथून गेलें तरी फारसें कांहीं होणार नाहीं. माझ्या मागें माझ्यापेक्षां हुशार, कर्तबगार सर्वांचा त्याग करणारें दुसरं माणूस येईल. मी त्याग करूं शकत नाहीं. मला सुख हवं आहे ! "

" इथं तुम्हांला दुःख तर कोणतें झालें नाहीं. तुम्ही तर सुखी दिसत होतां. कोणी दुःख दिलें तुम्हांला ? "

" कांही फायदा नाहीं नांव समजून. त्यावर माझा कांहीं अधिकारही नाहीं ! "

" मला वाटतें दुसऱ्यांना सुख देण्यासाठीं झटणें, आणि त्यांना सुखी झालेलें पाहणें ह्यांतच खरें सुख आहे. स्त्रीयांची तर दुसऱ्याच्या सुखासाठीं झटण्याबद्दल ख्याती आहे. "

" पण त्या स्वतःच्या सुखाबद्दल सुद्धां झटतातच ! "

" तुम्ही इतर स्त्रियांसारख्या अविचारी नाहींत. तुम्ही मोठा त्याग केला आहे. खरोखर त्यांतच तुम्हांला खरें समाधान, सुख प्राप्त झालें पाहिजे. सुख मानण्यावर आहे ! दुसऱ्यांना सुखी करण्यानें खरें सुख मिळतें ! "

" खोटें आहे हें सारें ! स्त्रीनें कितीही मोठा त्याग केला, दुसऱ्यांच्या सुखांतच आपलें सुख मानलें, वरून ती कितीही शांत, सुखी दिसत असली तरी ती सुखी नसते. ज्वालामुखी जरी वरून शांत दिसला तरी आंतल्या आंत धुसमुसत असतोच कीं नाहीं ? ज्वालामुखी सारखी स्त्रीची स्थिति असते. तें सुख, तो आनंद ती शांतता सारें सारें कांहीं वरपांगीं असतें. माता होण्यांतच स्त्रीला खरें सुख मिळतें. त्या सुखासाठींच तिची सारी धडपड असते ! "

त्याच्या मनांत एकदम प्रकाश पडला. त्याला बोलण्याचा धीर झाला नाहीं. तो तिच्या तोंडाकडे पहात राहिला--

तिनें आपल्या पोलक्यांतून एक कागदाची पुडी काढली आणि त्याच्या हातांत दिली.

त्यानें ती घेतली. आणि उघडून पाहिली त्यांत सुकलेलीं फुलें होतीं त्यानें आश्चर्यानें विचारलें, " हें काय ? "

" देवाचा प्रसाद ! बागेंत तुम्हींच दिला होता. आठवतो ना ?"

" देवाचा प्रसाद परत करत नसतात ! "

" देवालाच जर दया माया नाहीं, तर तो प्रसाद तरी काय कामाचा आहे ? तुम्ही सांगितलें होतें, देव कठोर आहे. प्रसन्न होणार नाहीं. खरं आहे तें. तुमचा विजय झाला. मी हरलें. "

आनंदला म्हणायचें होतें, " नाहीं ! मी हरलों. देव तुझ्यावर प्रसन्न झाला आहे पण त्याला सांगायचा धीर होत नाहीं ! " पण तो बोलला नाहीं. मात्र मनाचा गोंधळ उडाला. रजनीला काय पाहिजे हें त्याला समजत होतें. तो हलुहळू म्हणाला,

" तुम्हांला थांबतां येणार नाहीं का ? "

" नाहीं ? "

"माझ्या साठीं तरी."

"[illegible]साठीं कां म्हणून ? "

"कां विचारतेस ? मी तुझा नाहीं कां ? " तो कसबसा म्हणाला.

रजनी कांहींशीं आनंदानें आश्चर्यानें त्याच्याकडे पाहूं लागली.

आनंद म्हणाला, " रजनी, जे कांहीं माझें आहे तें तुझेंच नाहीं कां? मी जो मोठ्या श्रमानें आश्रम बांधला आहे, त्याला माझ्या मागें कलंक लागलेला तुला पाहवेल काय? बोल, तूं माझी आहेस ना? "

रजनीनें त्याच्याकडे आनंदानें पाहिलें. " खरेंच मी तुमची आहे? "

" सर्वस्वी माझी आहेस तूं! रजनी मी हरलों. तुझा विजय झाला. निसर्गविरुद्ध जाण्याचा मी प्रयत्न करत होतों. निसर्गाच्या कायद्याचें मी उल्लंघन करूं पाहत होतों. पण त्यापासून मला समाधान मिळत नव्हतें. निसर्गाकडे जाण्यांतच खरें सुख आहे हें मला पटलें! "

रजनीला हर्ष झाला. आपल्याला हर्षवायू तर नाहींना होत? ह्याची तिला भीती वाटली—

आनंद तिच्या आतां जवळ आला. त्यानें तीं सुकलेलीं फुलें तिच्या हातांत दिलीं. तिनें तीं घेतली आणि त्याच्या पायांवर ठेवलीं.

आनंदानें तिला तिच्या दोन्हीं बाहूंना धरून उठवलें. आणि तिला आपल्या हृदयाशीं धरलें. आनंदानें बेहोष झालेली रजनी त्याला बिलगली—

तिला हृदयापासून दूर करीत तो म्हणाला, " जाऊंना मी आतां बाहेर पोलिस वाट पहात आहेत? "

" जा! स्वातंत्र्य आणण्यासाठीं जा. कशाची काळजी करूं नका. आनंदानें जा. हंसत जा. आणि हंसत या! " रजनी त्याचा हात घट्ट धरत म्हणाली.

" जातांना हंसत जातों. येतांना परिस्थिति कशी असेल हें सांगतां येत नाहीं. परिस्थिति कशीही असो. मी हंसत येईन, तुला भेटण्यासाठीं."

रजनीनें त्याच्याकडे अभिमानी चेहऱ्यानें पाहिलें. तिचा चेहरा आनंदी; विजयी दिसत होता. आनंद तुरुंगांत जाणार त्याबद्दल तिला वाईट वाटत नव्हतें कारण तो आतां तिचा होता. सर्वस्वी तिचा होता. स्वातंत्र्यासाठीं जात होता. तिला दुःख कां होईल ह्या मंगल प्रसंगीं?

" चल रजनी बाहेर जाऊं. वेळ झाली आहे. " आनंद

तिचा हात धरून तो बाहेर आला.

वाहेर सारीं माणसें त्याची वाट पहात होतीं. सर्वांचे चेहरे दुःखी दिसत होते-कांहांचे रागानें लाल झाले होते परंतु आनंद आणि रजनीं ह्यांचे आनंदी चेहरे पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें—

सर्वांना उद्देशून आनंद म्हणाला, "मी आतां जाणार. जातांना तुम्हांला दोनच शब्द सांगतों. शांत रहा. उगीच भावनेच्या भरांत रागावूं नका. ह्यांत रागावण्याचें कारण नाहीं. रागावल्यानें विवेकबुद्धी नाहींशी होते आणि आपण य करतों हें स्वतःलाच समजत नाहीं. म्हणून शांत रहा. विचार करून काम . आजपासून रजनी तुमची पुढारीण आहे. माझ्या जागीं ती आहे. आजपासून आणि मी दोन नाहीं. आम्हीं दोघें एकच आहोंत. ह्यांतच काय तें समजा. न जागीं मीच आहे असें समजून माझ्याशीं जसें वागतां त्याचप्रमाणें तिच्याशीं ती सांगेल त्या प्रमाणें काय करायचें तें करा!"

नंतर पोलिस अधिकाऱ्याला तो म्हणाला, "चला जायची तयारी झाली माझी!" तुरुंगांत जायच्यावेळीं त्याचा आनंदी चेहरा पाहून पोलिस अधिकाऱ्यानें मान घातली. कांहीं न बोलता तो उठला.

आनंदनें सर्वांचा निरोप घेतला. शांताला सर्वांची नीट व्यवस्था ठेव-सांगितलें. यतीनच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवला. रजनीकडे प्रेमयुक्त पाहिलें आणि तो मोटारींत चढला. त्यानें आश्रमाकडे पाहिलें—

आश्रमावर राष्ट्रीय झेंडा फडफडत होता. दोन्ही हात जोडून आनंदनें त्याला नमस्कार केला—

मोटार सुरू झाली. सर्वांनीं जयघोष केला—

"महात्मागांधी की जय!"

"वंदे मातरम्!"

"आनंद की जय!"

मोटार दूर दूर जाऊं लागली. रजनी मोटारकडे टक लावून पहात होती. मोटार दूर होतां होतां दिसेनाशी झाल्यावर तिच्या तोंडांतून शब्द बाहेर पडले—

"वंदे मातरम्!"

IRBK-0105640
IRBK-0105640